म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. १५६८
REFBK-0013726

REFBK-0013726

देवदत्त दाभोलकर

# बर्ट्रांड रसेल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१९६२ मधील २४ आणि २५ ऑक्टोबर हे दोन दिवस सर्व जगाला मोठ्या चिंतेचे गेले. कोणत्या क्षणी जगाचा अंत ओढवेल हे काही सांगता येत नव्हते. रशियाची जहाजे क्यूबाच्या दिशेने वाटचाल करीत होती. युद्धाचा धोका पत्करावा लागला तरी पत्करू, परंतु झडती घेतल्याशिवाय या जहाजांना क्यूबाला जाऊ देणार नाही, असा प्रेसिडेंट केनेडीचा निर्धार होता.

वेळ प्रलयकाळाच्या आणीबाणीची होती, हे सर्व सुजाण लोक जाणून होते. परंतु घटना अशा अकल्पित वेगाने आणि निकराने घडत होत्या की, सारे दिङ्मूढ, किंकर्तव्यमूढ झाले होते. सुदैवाने क्रुश्चॉव्हने रशियन जहाजांना परतण्याचा आदेश दिला आणि जगावरचे एक अरिष्ट टळले.

या घनतिमिरात 'को जागर्ति' अशी साद घालणाऱ्या मानवतेच्या करुण हाकेला अखिल जगात एका नव्वद वर्षांच्या वृद्धाने उत्तर दिले. आणि

मानवतेला या अंतापासून वांचवावे म्हणून काकुळतीने धावाधाव व हालचाल केली. मानवता या अनर्थापासून वांचली याचे श्रेय सर्वस्वी बर्ट्रांड रसेल यांना देणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. परंतु मानव्यावरचा विश्वास कायम ठेवून, आपली आशेची ज्योत जागती राखून, हा माणूस अशा उतार वयात आटोकाट धडपडत राहिला याची कृतज्ञ जाणीव मानवजात विसरू शकणार नाही.

ही घटना म्हणजेहि काही रसेल यांना आलेला क्षणिक झटका असे म्हणता येणार नाहीं. उभ्या आयुष्यातील जीवनचिन्तनाची साधना त्याच्या मागे उभी होती.

बर्ट्रांर्ड रसेल यांचा जन्म १८ मे १८७२ रोजी झाला. जन्म इंग्लंड-मधील एका सुखवस्तु आणि सुविख्यात कुलात झाला. या कुलाने अनेक राजकारणी पुरुष ब्रिटनला पुरवले. रसेल यांचे आजोबा लॉर्ड जॉन रसेल हे इंग्लंडचे एक उदारमतवादी पंतप्रधान होऊन गेले. अशा सुखवस्तु घराण्यातील मुलाचे पहिले शिक्षण घरातच खाजगी शिक्षकांच्याकडून व्हावें यात नवल नाही. वयाच्या अठराव्या वर्षी रसेलनी केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये प्रवेश केला. गणितात आणि नीतिशास्त्रात पहिला वर्ग मिळवून त्यांनी आपली पदवी संपादन केली. १८९५ मध्ये त्याच विश्वविद्यालयाच्या शिक्षक वर्गात रसेल यांचा समावेश झाला.

रसेल यांच्या जीवनात आणि चिंतनात प्रमुखपणे दोन प्रवृत्ति आढळून येतात. आपल्या ८० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने बी. बी. सी. वर भाषण करताना रसेलनी या दोन प्रवृत्तींचा निर्देश केला आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील मूलगामी ज्ञानाचा शोध घ्यावा अशी एक प्रवृत्ति; व आपल्या भोवतालीचे जग अधिक सुखी कसे करता येईल या दृष्टीने जो प्रत्यक्ष प्रयत्न करता येण्यासारखा असेल तो करावा ही दुसरी प्रवृत्ति. यापैकी पहिल्या प्रवृत्तीतून रसेल यांचे गणिताच्या व तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक मान्यता पावलेले उच्च तात्त्विक पातळीचे लेखन झाले. दुसऱ्या प्रवृत्तीतून सामाजिक पुनर्रचनेचा विचार करणारे ग्रंथ व लेख यांची निर्मिति झाली. " देव न मानणारा देव माणूस " अशा शब्दांनी ज्याप्रमाणे आपण आगरकरांचा

आपल्याकडे निर्देश करतो त्याच शब्दांनी व त्याहूनहि कितीतरी अधिक यथार्थपणे आपल्याला रसेल यांचा निर्देश करता येईल. Aimer et pensee असे एक फ्रेंच वचन रसेलनी आपल्या एका पुस्तकाच्या शिरोभागी उद्धृत केले आहे. To love and to think असा त्याचा इंग्रजी अनुवाद होऊ शकेल. ही करुणा आणि हा विवेक ही रसेल यांच्या सर्व समाजशास्त्रीय लेखन-विवेचनाला अंतर्बाह्य व्यापून राहिलेली आहेत. रसेल यांचे सर्वच विचार सर्वांना जसेच्या तसे पटतील, रुचतील किंवा पेलतील असे नाही. परंतु त्या सर्व विचारांच्या मागील ही करुणा आणि विवेक यांची एकसंध प्रेरणा मात्र कोणालाहि अमान्य करता येणार नाही.

रसेलनी केवळ विचार मांडले असेही नाही. आपल्या विचारांना अनुरूप असा आचार करण्याचाहि रसेलनी सदैव प्रयत्न केला. युद्धाला त्यांचा तात्त्विक विरोध होता. पहिल्या महायुद्धाच्या काळात अशा तात्त्विक विरोधासाठी दोन वर्षांची शिक्षा झालेल्या एका माणसाच्या बाजूने त्यांनी पुस्तिका लिहिली म्हणून त्याना १०० पौंड दंड करण्यात आला. या दंडामुळे ट्रिनिटी कॉलेजमधील नोकरीलाहि त्यांना मुकावे लागले. यानंतर सक्तीच्या सैन्यभरतीला विरोध केल्याबद्दल १९१८ मध्ये त्यांना सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली. तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले.

१९२० मध्ये त्यांनी रशियाला भेट दिली. रशियन क्रांतीचे हुकूमशाहीकडे नेणारे व व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश करणारे स्वरूप ज्यांनी प्रथमपासून ओळखले असे विचारवंत कदाचित् सर्व जगांत रसेल हे एकटेच असतील. दोन महायुद्धांच्या मध्यंतराच्या काळात रसेल यांचे तात्त्विक व सामाजिक असे उभयविध लेखन चालूच होते. या दोन्हीही क्षेत्रात त्यांचे नांव जागतिक मान्यता पावले होते व त्या त्या क्षेत्रातील सर्वोच्च मान त्यांच्याकडे आपण होऊन चालत येत होते. या काळात कुलपरंपरेप्रमाणे लॉर्ड ही पदवी १९३१ मध्ये त्यांच्याकडे आली. परंतु त्यांनी त्या पदवीचे महत्त्व कधीच मानले नाही. अमुक लॉर्ड असे म्हणवून घेण्यापेक्षा आपले पहिल्यापासून चालत आलेले साधे बर्ट्रांड रसेल हे नांव पुढे चालू ठेवणेच त्यांनी पसंत केले आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी काही दिवस रसेल अमेरिकेत गेले होते. या वेळी त्यांचे वय जवळ जवळ सत्तरीच्या आसपास आलेले होते. सामान्यपणे लोक या वेळी निवृत्त होण्याच्या मार्गावर असतात. रसेलना निवृत्त होऊन भागण्यासारखे नव्हते. त्यांची मूळची कौटुंबिक स्थिति बरी असली तरी रसेलनी आपल्या विविध कार्यासाठी केलेल्या खर्चानंतर ती तितकीशी बरी राहिलेली नव्हती. या वेळी त्यांच्या तीन मुलांचे विद्यापीठातील शिक्षणक्रम पुरे व्हावयाचे होते. ( रसेलनी एकूण चार विवाह केले. चौथा विवाह १९५२ मध्ये केला. ' विवाह आणि नीति ' या ग्रंथात रसेलनी आपले वैवाहिक जीवना-विषयीचे प्रक्षोभक विचार मांडले आहेत. त्या विचारांमुळे अनेक सनात-न्यांचा व प्रागतिकांचाही त्याना विरोध सहन करावा लागला. त्या प्रक्षोभक विचारांच्या जोडीला या चार विवाहांची भर पडल्यामुळे मने अधिकच कलुषित झाली. ) विद्वत्तेच्या दृष्टीने जगातील कोणत्याहि विद्यापीठाने आदरपूर्वक सन्मानाच्या स्थानी बसवावा असा हा माणूस त्याच्या विषयीच्या लोकांच्या मनातील विपरीत प्रतिमेमुळे अमेरिकेतील विद्यापीठातून इकडे तिकडे धटिंगण दांडगाईने फेकला गेला. परंतु त्या स्थितीतही रसेलनी शरणागति पत्करली नाही, आपल्या तत्त्वाशी तडजोड केली नाही, आपले न्याय्य हक्क न्याया-लयातून प्रस्थापित करून घेणे जेव्हा जेव्हा शक्य होते तेव्हा तेव्हा त्यात कसूर केली नाही.

१९४४ मध्ये ते इंग्लंडला परत आले. ट्रिनिटी कॉलेजच्या प्राध्यापक वर्गात त्यांची पुन्हा निवड करण्यात आली. १९४५ मध्ये ' पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास ' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. महान तत्त्ववेत्त्यांच्या तत्त्वज्ञानाची त्यांच्या हयातीतच चर्चा व्हावी या हेतूने जी ग्रंथमाला ( लायब्ररी ऑफ लिव्हिंग फिलॉसॉफर्स ) तयार करण्यात आली त्यातील एक ग्रंथ रसेल यांच्या तत्त्वज्ञानावरील चर्चेसाठी देण्यात आला. जगातील नामवंत तत्त्ववेत्त्यांनी रसेल यांच्या तत्त्वज्ञानाविषयी आपले विचार मांडले आणि रसेलनी त्या चर्चेला आपले उत्तर दिले. या सर्वांचा समावेश त्या ग्रंथात झाला आहे. १९५० मध्ये वाङ्मयशाखेतील नोबेल पारितोषिक रसेलना देण्यात आले.

आवश्यक ते बदल होत जातात. काही वेळा अशा फेरबदलात अनेक अडचणी निर्माण होतात. जुन्या पद्धतीत ज्यांचे हितसंबंध राखले जात होते परंतु नव्या समाजपद्धतीत ज्यांच्या हितसंबंधाना स्थान राहणार नाही, अशा लोकांचा साहजिकच परिवर्तनाला विरोध असतो. सामाजिक क्रांतीची निकड अशा वेळी निर्माण होते. भारतासारख्याच देशात आज आपल्याला ही गोष्ट तीव्रतेने जाणवू शकते.

रसेल यांच्यासमोर जो समाज आहे तो मुख्यत्वेकरून प्रगत पाश्चिमात्य राष्ट्रातील समाज आहे. त्या समाजाने ही मधली पायरी ओलांडलेली आहे. विज्ञान त्या राष्ट्रातून सुप्रतिष्ठित आहे. भौतिक समृद्धि एवढेच मानवाचे ध्येय मानले तरी ती त्यांनी बहुतांश साध्य करून घेतली आहे व तिसरे महायुद्ध झाले नाही तर नजिकच्या भविष्यकाळात सर्वांशानेहि ती राष्ट्रे आपल्या जनतेला भौतिक सुखसाधने पुरवू शकतील असा संभव दिसतो.

परंतु रसेल यांच्या मनासमोर जे आदर्श समाजाचे चित्र आहे त्यात केवळ भौतिक समृद्धि एवढी एकच गोष्ट अभिप्रेत आहे असे नाहीं. व्यक्तिमात्राच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असे लोकशाही वातावरण राष्ट्रात अस्तित्वात ठेवणे ही गोष्ट ते महत्त्वाची मानतात. लोकशाही समाजवादाची या दृष्टीने त्यानी मांडलेली भूमिका पाहण्यासारखी आहे. ते म्हणतातः

"साम्यवादाशी सामना देऊ शकेल असे एखादे सुसंगत स्फूर्तिदायक तत्त्वज्ञान तुमच्यापाशी नाही असा आरोप लोकशाही समाजवादी लोकांचे मित्रहि त्यांच्यावर वारंवार करीत असतात. मला वाटते, या आरोपाला, या आव्हानाला, उत्तर देता येणे शक्य आहे. या साठी, या ठिकाणी विशेष वादविवादात न शिरता, चांगली लोकशाही समाजवादी समाजरचना कशी असावी या विषयीची माझी कल्पना मांडतो.

"अशा समाजरचनेत, (१) माणसाला समाजात उपयोगी असे स्थान असावे; (२) त्याची चूक नसताना शक्यतोवर त्याच्यावर संकट परंपरा येऊ नये; आणि (३) इतरांना अपायकारक होणार नाही अशा रीतीने त्याच्या स्वयंप्रेरित कर्तृत्वाला वाव राहिला पाहिजे. यातील

कोणतेहि तत्त्व स्थलकालनिरपेक्ष सदैव अबाध्य राहील असे नाही. एखाद्या वेड्या माणसाला कोणतेच उपयोगी स्थान देता येणार नाही. परंतु वेडा म्हणून त्याला शिक्षाहि होऊ नये. युद्धात काही चूक नसतानाहि एखाद्यावर येणारी संकटे टाळता येण्यासारखी नसतात. एखाद्या महान् सामाजिक संकटाच्या वेळी एखाद्या श्रेष्ठ कलावंतालाहि, आपली कलेची साधना बाजूला ठेवून, एखादा वणवा, एखादा पूर किंवा एखादी सांथ यांच्याशी सामना करण्यासाठी जावे लागेल. आपण मांडलेली तीन तत्त्वे मार्गदर्शक आहेत, निर्बंधात्मक नाहीत. ''

विज्ञान तसे तटस्थ आहे. ते हुकूमशाहीच्या हातातील शस्त्र होऊ शकते. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या हातात विधायक साधनहि होऊ शकते. विज्ञान जितके अधिक प्रगत तितकी त्याची ही दोन्ही प्रकारची शक्ति अधिक. आजची हुकूमशाही ( मग ती एकाच व्यक्तीची असो की एखाद्या गटाची असो ) विज्ञानाने दिलेली शस्त्राचाराची, प्रचाराची, संघटनेची सर्व साधने वापरून जनतेच्या तनमनधनावर अमर्याद सत्ता चालवू शकते. अल्पसाही विरोधी आवाज उठवणारे सर्व लोक निर्घृणपणे चिरडले जातात. या आपत्तीत सापडलेली जनता एखाद्या परचक्रामुळेच या हुकूमशाहीच्या तावडीतून सुटली तर सुटू शकते.

जनता या आपत्तीत सापडू नये असे वाटत असेल तर त्यासाठी लोकशाही आवश्यक आहे. परंतु केवळ लोकशाहीचा सांगाडा अस्तित्वात आणून ही आपत्ति टळणार नाही. या सांगाड्यात व्यक्तिमात्राच्या विकासाला प्रेरणा देणारा लोकशाही समाजवादाचा प्राण संचरला पाहिजे. यासाठी आपल्या जीवनमूल्यातहि परिवर्तन झाले पाहिजे असे रसेल यानी सांगितले आहे. या मूल्यात शास्त्रशुद्ध विचार, निर्भय आचार, मनुजमात्राविषयी प्रेम, अशा मूल्यांचा रसेल समावेश करतात. या मूल्यांची जोपासना करणे आणि क्रूरता, स्पर्धा, हेवादावा, लोभ, अंधश्रद्धा यासारख्या गोष्टींपासून दूर राहणे हाच नव्या मंगल समाजरचनेचा पाया होऊ शकेल असे रसेल यांनी आर्जवून सांगितले आहे.

# विज्ञानाचा समाजधारणेवरील परिणाम

त्यानंतरही आजपर्यंत त्यांचे अविरत कार्य आणि लेखन ही चालूच आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अणु-अस्त्रांचा शोध लागल्यानंतर मानवजातीच्या दृष्टीने सर्वसंहारक अशा या अस्त्रांवर निर्बंध रहावेत, अशा अस्त्रांच्या साहाय्याने होणाऱ्या युद्धाला आळा बसावा म्हणून या वृद्धाने निरंतर आपली वाणी, लेखणी आणि शरीर झिजवले. अणु-अस्त्रसंन्यास राष्ट्रांनी घ्यावा म्हणून केलेल्या निदर्शनात पुढाकार घेतला. त्यासाठी १९६१ मध्ये त्यांना अटकही करण्यात आली होती. २४ व २५ ऑक्टोबर १९६२ या दोन दिवसातील त्यांचे कार्य म्हणजे याच सर्व पूर्व तयारीचा परमोच्च बिंदु होय.

### करुणा आणि विवेक

करुणा व विवेक हे रसेल याच्या जीवनचिंतनाचे स्थायी भाव आहेत हे आपण सतत लक्षात ठेवले पाहिजे. हे लक्षात ठेवले तरच त्यांची विचारधारा नीटपणे समजू शकते. त्याचप्रमाणे या दोन गोष्टींचे अवधान राखले तरच त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील गोष्टींकडेहि अधिक समजूतदारपणे आपल्याला पाहता येते. ईश्वराच्या बाबतीत रसेल यांना नास्तिकच म्हणावे लागेल. ‘स्वतःला नास्तिक म्हणावे की अज्ञेयवादी म्हणावे हे सांगणे काही काही वेळा मला कठीण वाटते,’ असे ते स्वतः म्हणतात. परंतु त्यांच्या वृत्तीचा व विचाराचा मुख्य कल नास्तिक्याकडेच झुकणारा. धर्मपंथांनी जगाचे हित करण्याऐवजी अनहित किती केले याची जाणीव त्यांच्या लेखनातून अनेकदा करून देण्यात येते. विवाहासारख्या समाज संस्थातून स्त्रीवर केवढा अन्याय करण्यात आला आहे व तो दूर करण्यासाठी जुन्या रूढी किती बदलल्या पाहिजेत याची मांडणी ‘विवाह आणि नीति’ यासारख्या ग्रंथात ते आतिरेकी आग्रहाने करतात व वाचकांना एक जबरदस्त धक्का मिळतो. साम्यवादी समाजरचनेतील हुकूमशाही त्यांना नको असते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दलितांचे शोषणहि त्यांना पहावत नाही. म्हणून, गत वर्षी १९६३ मध्ये, माझी भूमिका ‘लोकशाही समाजवादाची’ आहे असे ते सांगताना आढळतात. सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दुःखमाप्नुयात् ।’ ही सनातन मनीषाच

रसेलनाहि कार्यप्रवण करीत आहे. रसेलनी यामध्ये आणखी थोडी दुहेरी भर घातली असेहि आपल्याला म्हणता येईल. ' सर्वेऽपि सुखिनः सन्तु । ' याच्या आधी, आजच्या अणु युद्धाच्या काळात ' सर्वत्र सन्तु ' एवढी प्राथमिक मर्यादित प्रार्थना करणेहि अगत्याचे झाले आहे. ही ढोबळ गोष्ट जगाच्या पुढे मांडण्याचा रसेल निकराने प्रयत्न करीत आहेत. साम्यवाद व भांडवलशाही यांच्या जागतिक अणुयुद्धात शेवटी तांत्रिक विजय कोणाचाहि झाला तरी त्यापूर्वी अखिल मानवजातीचा सर्वनाश होणार आहे असाच सर्व वैज्ञानिकांचा व रसेल यांचा इशारा आहे. म्हणून लोक सुखी असण्याआधी ते अस्तित्वात तरी असले पाहिजेत अशी आजची भयावह परिस्थिति आहे. रसेलच्या बाबतीत दुसरा विशेष असा की ते केवळ अशी मनीषा प्रगट करून थांबत नाहीत तर मानवाने जर आपला विवेक जागृत ठेवला तर हे सर्व कसे घडवून आणता येईल याचे मार्गहि ते सुचवितात.

रसेलनी एके ठिकाणी म्हटले आहे : ' माझ्या जीवनात मी एक स्वप्न सदैव उराशी बाळगले आहे. या स्वप्नाची दोन अंगे आहेत. एक व्यक्तिगत व दुसरे सामाजिक. जे जे सत्य, शिव, सुंदर, कोमल असेल त्याची जीवापलीकडे जपणूक करावी असे माझे व्यक्तिगत ध्येय आहे. स्वप्नाच्या सामाजिक अंगात मी एका आदर्श समाजाची रचना पहात असतो. या समाजाची घडणच अशी असेल की तिच्यात असूया, लोभ, द्वेष यासारख्या दुष्ट प्रवृत्ति, त्यांची गरजच त्या समाजरचनेत न उरल्यामुळे, आपोआप विलय पावतील. या स्वप्नावर माझा नितान्त विश्वास आहे. आणि जगातील अनेक भयानक दुर्घटनांनंतरहि माझी श्रद्धा अजून तशीच अढळ राहिलेली आहे. '

ईश्वराच्या अस्तित्वाविषयी शंका प्रदर्शित करतांना रसेल विचारतात: 'ईश्वराने हे जग निर्माण केले असे तुम्ही म्हणता. समजा, तुम्ही ईश्वराप्रमाणे सर्वज्ञ सर्वशक्तिमान असे असता, व जगाची घडण करण्यासाठी युगानुयुगांचा अवधि तुम्हाला मिळाला असता, तर शेवटी हे आज आपल्या सभोवताली दिसत आहे असेच जग तुम्ही निर्माण केले असते का ? आणि अशा ठिकाणी आजच्या जगात अकारण दिसणाऱ्या अनेक दुःखांची यादी

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

ते देतात. रसेल यांचा हा प्रश्न निरुत्तर करणारा आहे असे अस्तिक्य-वादी मानणार नाहीत. तत्त्वचर्चा कितीहि चालवता येते आणि 'वैषम्य-नैर्घृण्यप्रसंगात' या आक्षेपाची चर्चा शंकराचार्यांनीहि केली आहे. रसेल-नीहि या गोष्टी एवढ्याच तत्त्वचर्चेवर सोडलेल्या आहेत असे नाहीं. परंतु या ठिकाणी त्या चर्चेत आपल्याला शिरावयाचे नाही.

रसेलच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीच्या दृष्टीने अधिक विलोमनीय गोष्ट कोणती असेल तर ही की असा ईश्वराविषयी नास्तिक्यभाव बाळगणारे रसेल मनुजमानातील मांगल्याविषयी किती उत्कट आस्तिक्यभाव प्रगट करतात ही आहे. नाही तर नास्तिक माणसे अनेक वेळा सर्वच गोष्टीत श्रद्धाहीन, तुरट व तिरसटलेली होण्याचाच संभव अधिक असतो. रसेलनी या विपरीत परिणामांचा स्पर्शहि आपल्याला होऊ दिलेला नाही. 'अश्रद्धाचे मुक्तिसाधन' (ए फ्री मॅन्स वर्शिप) हा रसेल यांचा निबंध म्हणजे या मांगल्यावरील श्रद्धेने ओसंडणारे एक उत्कट काव्य आहे. आपण कोठून आलो माहीत नाही, कोठे जाणार माहीत नाही, विश्वशक्तीच्या आंधळ्या खेळात आपल्या जीवनमरणाचे फासे कसे पडणार हे सांगता येत नाही. स्वप्ने उराशी बाळगावीत आणि कठोर नियतीच्या आघातांनी ती धुळीला मिळावीत असे वारंवार अनुभवाला येते. अशा वेळी थकल्या भागल्या एकाकी जीवाने कोठे आसरा शोधावा? आधार म्हणून एक काल्पनिक ईश्वर निर्माण करून त्याला शरण जावे काय? या जीवाने जावे तरी कुठे?

रसेलनी आपले उत्तर स्पष्ट आणि निश्चयात्मक रीतीने दिले आहे. या परिस्थितीत माणूस देवाच्या कल्पनेला शरण गेला तर एक स्वाभाविक दुबळेपणा म्हणून ते कदाचित क्षम्य मानता येईल. परंतु खरा पुरुषार्थ असा दुबळा काल्पनिक आश्रय शोधण्यात नाही, तर प्राप्त परिस्थितीत, आपण असहाय्य आहोत, एकाकी आहोत, जरामरण यासारख्या अजिंक्य शक्तीं-समोर पराभूत आहोत हे पाहूनहि आपले मानसिक धैर्य कायम ठेवण्यात आहे. ईश्वरावर श्रद्धा नसताना जीवनातील मांगल्यावरील आपली श्रद्धा ढळू न देणे व ते मांगल्य अधिक प्रभावी कसे होईल यासाठी आपली सर्व शक्ति पणाला लावणे हा खरा मानवी पुरुषार्थ आहे. 'आपल्या व्यक्तिगत

सुखासाठी धडपड न करता, क्षणिक आशा, आकांक्षा, वा लालसा यांच्या आहारी न जाता, मानवी जीवनातील भव्य, दिव्य आदर्शांच्या उत्कट ओढीने अंतःकरण सतत प्रज्वलित ठेवणे यातच नास्तिकाची मुक्तिसाधना आहे व त्यातच त्याची मुक्तीहि सामावलेली आहे.'

मानवतेच्या मांगल्यावर इतकी श्रद्धा असणारा माणूस नीतीच्या क्षेत्रात विपरीत 'पापी' भूमिका घेईल अशी शंकाहि घेण्याचे खरोखर कारण नाही. रसेलनी नीतीला असलेला देवाचा आधार तोडला, धर्मांचा आधार तोडला, परलोकाचा आधार तोडला, रुढींचा, परंपरेचा आधार तोडला, परंतु एवढे विध्वंसाचे काम करूनच ते थांबले नाहीत. नीतीला त्यांनी शुद्ध विवेकाचा आधार देण्याचा प्रयत्न केला. देव, धर्म, स्वर्ग इत्यादि असोत किंवा नसोत परंतु सुखी जीवनासाठी मनुष्याला समाजात राहणे आवश्यक आहे व समाजरचना म्हटली की त्याठिकाणी काही नियम-निर्बंध आवश्यक होतात. हे नियम पाळण्याची सुबुद्ध जाणीव ही देखील नीतीचा आधार होऊ शकते व सुसंस्कृत समाजात इतर कोणतेहि काल्पनिक आधार न घेता या आधारावरच नीति उभी केली पाहिजे असा रसेल यांचा आग्रह होता.

परंतु समाजधारणेसाठी नीतिनियम आवश्यक असतात असे रसेल मानीत असले तरी समाजात प्रचलित असलेला प्रत्येक रूढ नियम हा इष्टच असतो असे रसेल मानीत नाहीत. समाजाकडे जागरूकपणे पाहणाऱ्या कोणालाहि हे सहजपणे मान्य होईल. काही नियम अज्ञानाने चुकीचे तयार झालेले असतात, काही समाजातील प्रबळ गटाने इतरांवरील आपली सत्ता कायम टिकविण्यासाठी लादलेले असतात, काही समाजाच्या मूळच्या अवस्थेत उपयोगी असले तरी नंतरच्या बदललेल्या परिस्थितीत जाचक झालेले असतात. अशा सर्व नियमांची कसोशीने पाहणी होऊन त्यात प्रत्येक वेळी सर्वांच्या हिताच्या दृष्टीने विवेकनिष्ठ कसोटी ठेऊन योग्य ते बदल आपण करीत राहिले पाहिजे असे रसेल यांचे सांगणे आहे.

या मांडणीला तात्त्विक विरोध असा सहसा कोणाचा नसतो. परंतु प्रत्यक्ष नियम बदलण्याची ज्यावेळी पाळी येते त्यावेळी अनेकांना अनेक कारणांनी धक्के बसू लागतात. कोणाचे जुन्या नियमाप्रमाणे सुरक्षित असलेले

हितसंबंध धोक्यात येतात, कोणाच्या मनावर जीर्ण संस्कृतीचा इतका पगडा असतो की त्यातील परिवर्तन बुद्धीला पटले तरी भावनेने ते स्वीकारू शकत नाहीत. अशा विरोधाच्या परिस्थितीत मग नवविचारांना अनेक वेगवेगळ्या मार्गांनी शह देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. नवविचाराच्या मांडणीत किंवा आचारात एखादी चूक कधी शिरली तर त्याचा प्रचाराच्या दृष्टीने फारच उपयोग करून घेता येतो. रसेलच्या वैवाहिक नवनीतीच्या वादचर्चेत या सर्व गोष्टी अनुभवास आल्या. पाश्चात्य राष्ट्रात जे विचार प्रक्षोभक वाटले ते भारतासारख्या राष्ट्रात वाटले तर नवल नाही. परंतु, वैवाहिक सबंधात स्त्रीला जे गुलामांचे स्थान समाजरचनेत दिले गेले आहे त्याऐवजी पुरुषाला जे स्वातंत्र्य आपण उपभोगू देतो ते स्त्रीलाहि दिले पाहिजे, व विवाहविषयक सर्वच बाबतीतला दृष्टिकोन आपण पुन्हा नीट तपासून घेतला पाहिजे, ही रसेल यांची भूमिका समाजरचनेविषयी चिंतन करणाऱ्या कोणालाहि विचारणीयच वाटेल; व अलीकडे, १९४० साली, अमेरिकेसारख्या राष्ट्रातील एका न्यायाधीशाने रसेल हा अश्लील वाङ्मयाचा, हीन वृत्तीचा लेखक आहे असे सांगून विद्यापीठाला त्यांना नोकरीतून काढण्यास भाग पाडावे या घटनेचा खेदच होईल.

एखाद्या कुशल शस्त्रवैद्याने आपले करुणहस्त शस्त्र वापरावे त्या पद्धतीने रसेलनी सामाजिक, राजकीय दुःखाचे विश्लेषण केले आहे. विवेकाच्या आधाराने आपण दुःखविमोचनाचा मार्ग शोधला पाहिजे असे त्यांनी सांगितले असले तरी मानवी जीवनात प्रबळ भावनाहि मोठ्या प्रमाणात कार्यकारी होऊ शकतात हेहि त्यांनी ओळखले आहे. किंबहुना मंगल भावना दडपल्या न जाता विकसित होतील अशा रीतीने समाजरचनेकडे आपण पाहिले पाहिजे असे त्यांचे सांगणे आहे. सामाजिक पुनर्रचनेची मूलतत्त्वे ( प्रिन्सिपल्स ऑफ सोशल रिकन्स्ट्रक्शन. १९१६ ) या आपल्या ग्रंथात त्यांनी या दृष्टीने विचार केला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेल्या संस्कृतीने मानवाला अधिक भौतिक सुखसोयी उपलब्ध करून दिल्या. परंतु त्याबरोबरच एक प्रकारची निरन्तरची अशान्तता माणसाच्या हृदयाला व्यापून राहू लागली यांचे स्पष्ट दिग्दर्शन त्यांनी केले आहे. पुन्हा भूतकालीन मध्ययुगीन अर्थव्यवस्थेकडे मागे फिरणे हा या

मानसिक अस्वस्थतेतून बाहेर पडण्याचा मार्ग नव्हे. औद्योगिक विकासामुळे साध्य झालेल्या सुखसोयी कायम राखून आपल्याला मानसिक अस्वस्थता दूर करावयाची आहे. यासाठी समाजात सर्जनशील मानवी प्रेरणांना वाव दिला पाहिजे, स्पर्धेएवजी सहकाराचे वातावरण जोपासले पाहिजे व समाजरचनेत मानवाच्या स्वार्थी संकुचित वृत्तींना कमी वाव राहील अशी ती समाजरचना असली पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. 'सामाजिक पुनर्रचनेची मूलतत्त्वे' या पुस्तकात हे कसे साध्य करावे याचाच काही अधिक तपशील दिला आहे.

याच विचारसरणीची अधिक मांडणी त्यांच्या सर्व सामाजिक व राजकीय विवेचनात आढळते. या विचारांचा मागोवा आपल्याला त्यांच्या 'राजकीय ध्येये' (पोलिटिकल आयडिअल्स), 'मुक्ततेचा मार्ग' (रोड्स टू फ्रीडम), 'औद्योगिक संस्कृतीचे भवितव्य' (दि प्रॉस्पेक्ट्स ऑफ इन्डस्ट्रिअल सिव्हिलायझेशन), 'सत्ता' (पॉवर), या सारख्या ग्रंथातून आढळते. बी. बी. सी. आकाशवाणीवरील 'रीथ' व्याख्यानमालेतील 'ॲथॉरिटी ॲन्ड द इन्डिव्हिज्युअल' या व्याख्यानसत्रात त्यांनी याच दृष्टिकोनाचे विवेचन केले आहे. मानवाच्या मानदंडानेच समाजव्यवस्थेचे मूल्यमापन केले पाहिजे ही रसेल यांची पहिल्यापासूनची विचाराची व भावनेची पक्की बैठक आहे. व्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या विकासाला जे जे बंधनकारक असेल त्याला रसेल यांनी सर्वत्र विरोध केला आहे. या भूमिकेतून रशियातील साम्यवादी समाजरचनेतील संभाव्य धोक्यांचा अंतर्वेध त्या क्रांतीच्या अगदी सुरुवातीच्या काळातच ते घेऊ शकले. जीवनात जे जे क्षेत्र समोर आले त्या त्या क्षेत्रात त्यांनी करुणा आणि विवेक या निष्ठांच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न केला. आपल्या दोन मुलांच्या शिक्षणाच्या निमित्ताने ते शिक्षणक्षेत्राकडे वळले. 'सानुल्याचे शिक्षण' (एज्युकेशन स्पेशली इन अर्ली चाइल्डहुड) व 'शिक्षण आणि समाजव्यवस्था' (एज्युकेशन ॲन्ड द सोशल ऑर्डर) हे त्यांचे शिक्षणक्षेत्रातील ग्रंथ आहेत. केवळ ग्रन्थ लिहूनच ते थांबले नाहीत तर आपल्या कल्पनेप्रमाणे शिक्षण देणारी शाळा चालविण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या पत्नीच्या साहाय्याने केला. हा प्रयोग

यशस्वी झाला असे म्हणता येणार नाही. परंतु कृतिशील मानवतावादी विचारवंत हे रसेलचे वर्णन कसे यथार्थ आहे हे त्यावरून कळून येते.

'विज्ञानाचा समाजधारणेवरील परिणाम' हे रसेल यांचे पुस्तक त्यांनी दिलेल्या वेगवेगळ्या व्याख्यानांवर आधारित आहे. ही व्याख्याने प्रथम १९५२ मध्ये पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाली. त्यानंतर या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. या पुस्तकातील रसेल यांची विचारधारा पूर्वीपासून चालत आलेली आहे तीच आहे. करुणा आणि प्रज्ञा या दोन तीरांच्यामधून हा विचारप्रवाह वाहत आहे. वाचताना याचा प्रत्यय येईलच. परंतु तरीहि, हे विचार मांडले त्या काळापासून आजपर्यंत सुमारे पंधरा वर्षे उलटून गेलेली आहेत ही गोष्ट वाचताना आपण लक्षांत ठेवणे उपयोगी होईल. असे न केल्यास त्यांनी केलेले कांही उल्लेख, किंवा त्यांनी दिलेली कांही उदाहरणे आजच्या संदर्भात तितकीशी समर्पक वाटणार नाहीत अशीहि शक्यता आहे.

काळाची गति झपाट्याने वाढली आहे व उत्तरोत्तर वाढतच आहे. इतर प्राणी सृष्टीच्या आदिकालात जसे होते तसेच काहीसे उत्क्रांत अवस्थेत आजहि दिसतात. मानवाने मात्र आपल्या पहिल्या मर्यादा ओलांडत ओलांडत उत्क्रांतीचे अनेक टप्पे पार केले. परंतु, मानव या पृथ्वीतलावर दहा लाख वर्षे अस्तित्वात असला तरी, संघटित समाजजीवनापर्यंत येऊन पोचल्याला त्याला पांच हजार ( फार तर दहा हजार ) वर्षांहून अधिक काळ झालेला नाही. यातहि भौतिक प्रगतीची मुख्य गति मानवाने गेल्या केवळ दोनशे वर्षांतच घेतली आहे हेहि आपण जाणतो. या दोनशे वर्षांतहि वैज्ञानिक प्रगतीची फार मोठी पाउले आपण विसाव्या शतकातच टाकलेली आहेत. यातहि दुसऱ्या महायुद्धानंतर सर्व शास्त्रांच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झालेली आहे. हा वेग यापुढे कमी होईल असे मानावयाचे कारण नाही. कदाचित् असाच पुढे वाढतहि जाईल. तशा परिस्थितीत एका शतकानंतरच्या जगाचे स्वरूप कसे राहील हे कल्पनेनेहि रेखाटणे आज अशक्य वाटावे अशा गतीने या घटना घडत आहेत. विज्ञानाचे वरदान मानवतेने मिळविले आहे. परंतु या प्रगतीची सर्व पथ्ये पाळली गेली नाहीत तर संपूर्ण विनाशहि काही फार

दूर ठेवलेला नाही. याच दृष्टिकोनातून विज्ञानाच्या समाजधारणेवरील परिणामांचे रसेल यानी विवेचन केले आहे.

मनुष्याचे मन प्रत्येक गोष्टीची उपपत्ति शोधत असते. विज्ञान नसले की त्या जागी केवळ अज्ञान रहात नाही तर विपरीत ज्ञान ती पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करीत असते. आधिभौतिक कारणे सापडली नाहीत की आधिदैविक कारणाकडे मनुष्याचे मन वळते. मग ‘ इंद्र ’ ही पर्जन्याची देवता निर्माण होते. असेच इतरहि बाबतीत घडले. शास्त्रीय प्रगति जसजशी होत जाईल तसतसा सृष्टीतील चमत्कारांचा उलगडा होऊ लागतो, काही चमत्कार तर शास्त्रीय ज्ञानाच्या साहाय्याने मानवहि करू शकेल अशी परिस्थिति निर्माण होते. विज्ञानाच्या प्रगतीचा पहिला आघात यामुळे जुन्या अंधश्रद्धांवर बसतो. या श्रद्धा मनुष्याच्या अंतःकरणात त्याच्या भावजीवनात खोलवर जाऊन रुजलेल्या असल्यामुळे विज्ञानाच्या प्रकाशात त्या लागलीच लोप पावतात असे सहसा घडत नाही. परंतु जी प्रक्रिया सुरू होते ती विलोप पावण्याचीच असते. सूर्याच्या प्रकाशात सर्वच हिमखंड अल्पकाळात विलय पावत नाहीत तसेच हे आहे. परंतु त्या प्रक्रियेपासून मात्र कोणत्याच हिमखंडाची सुटका नसते.

विज्ञानाच्या क्षेत्रात देवाची काल्पना बाजूला जाऊन निसर्गशक्तीशी मानवाचा सरळ सामना सुरू होतो. या युद्धात मानव उत्तरोत्तर विजयी होत आलेला आहे व अधिकाधिक विजयी होत राहील. कारण हा सचेतनाचा अचेतनाशी चाललेला झगडा आहे. निसर्ग कितीहि सामर्थ्यशाली असला तरी अचेतन आहे; त्याच्या नियमांचा शोध घेणे व ते नियम आपल्या सोयी-प्रमाणे कारणी लावणे हे सचेतन मानवाला शक्य आहे. निसर्गावर विजय म्हणजे निसर्गाच्या प्रक्रियेचे अधिकाधिक सम्यक् ज्ञान व तदनुरूप इष्ट आचार एवढाच त्याचा अर्थ आहे. त्या अर्थाने या युद्धात मानव पराभूत होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

वैज्ञानिक प्रगतीमुळे खरे प्रश्न निर्माण होतात ते समाजधारणेच्या क्षेत्रात. विज्ञानामुळे समाजाची जीवनपद्धति बदलते आणि जीवनपद्धति बदलली की समाजपद्धतीहि बदलणे आवश्यक होते. काही वेळा आपोआप कालक्रमाने

प्रकरण पहिले

# विज्ञान आणि परंपरा

जवळजवळ दहा लाख वर्षांपासून पृथ्वीवर मानव वास करीत आहे. लिहिण्याची कला मानवाला अवगत होऊन सुमारे सहा हजार वर्षे झाली. तो शेती करायला लागून याहून अधिक काळ लोटला असला तरी फार अधिक नसावा. सुविद्य माणसांच्या श्रद्धा निश्चित करणाऱ्या वेगवेगळ्या घटकांमध्ये गेली जवळपास तीनशे वर्षे विज्ञान हा अग्रगण्य घटक राहिलेला आहे. अर्थोत्पादनाच्या कामी लागणाऱ्या तंत्रविद्येला विज्ञानाची बैठक लाभल्याला दीडएकशे वर्षे झाली. या अल्प कालावधीतच, विज्ञान ही एक कल्पनातीत सामर्थ्यशाली व क्रांतिकारक शक्ति असल्याचे सिद्ध झाले आहे. विज्ञानाचा उत्कर्ष ही अगदी अलिकडच्या काळातील घटना आहे हे लक्षात घेतले तर, मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या कार्याला विज्ञानाने नुकतीच कोठे सुरवात केली आहे हे मान्य केल्यावाचून गत्यंतर उरत नाही. भविष्यात विज्ञानाचे परिणाम काय होणार आहेत याविषयी

आज फक्त अंदाजच बांधता येईल, पण विज्ञानाच्या आजवरच्या परिणामांचा अभ्यास केला तर पुढील परिणामांचा अंदाज अगदीच धाडसी ठरू नये.

विज्ञानामुळे घडून आलेले परिणाम अनेकविध आणि अतिशय वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. काही परिणाम प्रत्यक्ष बौद्धिक स्वरूपाचे आहेत. उदाहरणार्थ, अनेक पारंपरिक श्रद्धा ढासळून त्यांच्या जागी वैज्ञानिक पद्धतीच्या यशाने सूचित होणाऱ्या श्रद्धांचा स्वीकार झाला. याशिवाय औद्योगिकतंत्र आणि युद्धतंत्र यांच्यावर झालेले परिणाम आहेतच. त्याचप्रमाणे, प्रामुख्याने, उत्पादनाच्या नव्या तंत्रांमुळे सामाजिक संघटनेत खोलवर परिवर्तन घडून आले असून या सामाजिक संघटनेतील परिवर्तनाला अनुरूप असे परिवर्तन राजकीय संघटनेतहि धीरे धीरे घडून येत आहे. शास्त्रीय ज्ञानामुळे भौतिक जगावर प्रभुत्व प्राप्त झाले आहे. त्याचा परिणाम म्हणून चराचर सृष्टीतील मानवाच्या स्थानाबद्दल पारंपरिक कल्पनांहून भिन्न कल्पना मांडणारे एक नवे तत्त्वज्ञान उदयास येत आहे.

मानवी जीवनावरील विज्ञानाच्या या भिन्न भिन्न स्वरूपाच्या परिणामांचा मी क्रमशः विचार करणार आहे. जादुटोणा व तत्सम पारंपरिक भ्रामक श्रद्धांचा निचरा करणारे विज्ञानाचे बौद्धिक परिणाम मी प्रथम निवेदन करीन. त्यानंतर तंत्रविद्येच्या, विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळातील तंत्रविद्येच्या, परिणामांचा विचार मी करेन. शेवटी, विज्ञानाच्या विजयी वाटचालीतून प्रेरणा घेणाऱ्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप विशद करीन. त्याचवेळी, या तत्त्वज्ञानाच्या प्रसाराला अटकाव झाला नाही तर, त्यातून अेक प्रकारच्या अविवेकाला प्रोत्साहन मिळेल, आणि त्याचे फार अनर्थावह परिणाम संभवण्याची शक्यता आहे या माझ्या भूमिकेचे प्रतिपादन करीन.

संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेतील माणसांच्या जीवनावर प्रभुत्व गाजविणाऱ्या भ्रामक श्रद्धांची स्पष्टता मानवी संस्कृतीच्या अभ्यासामुळे आज आपणास झाली आहे. त्या अवस्थेत रोगाचा कार्यकारण संबंध जादूटोण्याशी जोडला जातो; पिके बुडाली तर त्यामागे देवतांचा प्रकोप किंवा दुष्टबुद्धि पिशाच्चांची लीला आहे असे मानले जाते; नरबलि दिल्याने

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८९१७ वि: निबंध
क्रमांक १५६८ नो: दि: २०/२/६५

युद्धात विजय प्राप्त होतो, वा जमीन सुपीक बनते असे मानले जाते; ग्रहण आणि धूमकेतूंचे दर्शन या भावी विनाशाच्या अशुभ सूचना मानल्या जातात. संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेतील माणसांचे जीवन वेगवेगळ्या निषिद्धतेच्या कल्पनांनी घेरलेले असते. निषिद्ध गोष्टींचा भंग केल्यास भोगावे लागणारे परिणाम अत्यंत घातक असतात असे मानले जाते.

मानवी संस्कृतीचा उदय झाला त्या त्या ठिकाणी काही बाबतीत हा दृष्टिकोन नष्ट झाला. यहुदी लोकांच्या ‘ जुना करार ’ (ओल्ड टेस्टमेंट)[१] या धर्मग्रंथांतील जेप्ताहाच्या मुलीच्या आणि आब्राहाम व ऐझॅकच्या कथेत[२] नरबलि-प्रथेच्या खुणा आढळतात. यहुदी समाजाने ऐतिहासिक काळात प्रवेश केला त्या वेळपावेतो नरबलि देण्याची प्रथा यहुदी लोकात पूर्णपणे नष्ट झालेली होती. ख्रिस्तपूर्व सुमारे सातव्या शतकात ग्रीकांनी या प्रथेचा त्याग केला. पण प्युनिक युद्धांच्या काळातहि कार्थेजीनियन्स[३] लोकात ही प्रथा अस्तित्वात होती. भूमध्यसामुद्रिक राष्ट्रात नरबलि प्रथेचा ऱ्हास विज्ञानाच्या उदयामुळे झाला असे म्हणता येत नाही; भूतदयेची भावनाच त्याच्या बुडाशी असावी. इतर पुराण अंधश्रद्धा नष्ट करण्याच्या बाबतीत मात्र विज्ञानच प्रमुख कारण राहिले आहे.

अंधश्रद्धेची कास सोडून ज्या काही नैसर्गिक घटनांचे अगदी सुरवातीस वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले गेले त्यापैकी ग्रहण ही एक घटना आहे. बाबिलोनियन[४] लोक ग्रहणे वर्तवू शकत; त्यांची सूर्यग्रहणविषयक भाकिते नेहमीच खरी ठरत असे मात्र नाही. पण तत्कालीन पुरोहित वर्गाने हे ज्ञान आपल्यापाशी गुप्त राखले आणि लोकांवरील आपले प्रभुत्व अधिक बळकट करण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग केला. पुढे, बाबिलोनियन लोकांकडून शिकण्यासारखे होते ते ज्ञान आत्मसात केल्यावर, अल्पावधीतच ग्रीकांनी खगोलविज्ञानात आश्चर्यकारक शोध लावले. थुसिडाईडिजच्या[५] लेखनात सूर्यग्रहणाचा उल्लेख आहे. तो असेहि लिहितो की हे ग्रहण लागले तो दिवस प्रतिपदेचा होता. सूर्यग्रहण फक्त प्रतिपदेच्या दिवशीच लागू शकते असे अनुमानहि त्याने पुढे काढले आहे. यानंतर लवकरच पायथॅगोरसपंथीयांनी[६] सूर्यग्रहण व चंद्रग्रहण यांची शास्त्रशुद्ध उपपत्ति शोधून काढली आणि चंद्रावर

पडणाऱ्या पृथ्वीच्या छायेच्या आकारावरून पृथ्वी गोलाकार असावी असा निष्कर्षहि काढला.

तेव्हापासून, प्रगल्भ व बुद्धिनिष्ठ व्यक्तींच्या पुरती ग्रहणे विज्ञानाच्या कक्षेत आली हे खरे असले तरी, समाजातील सर्वसामान्य माणसाला ही गोष्ट मान्य व्हायला प्रदीर्घ कालावधि लागला. सतराव्या शतकातील मिल्टनच्या[७] काव्यातील पुढील ओळींवरून तत्कालीन समाजात ग्रहणविषयक भ्रामक समजुती प्रचलित असाव्यात असे दिसते. मिल्टन लिहितो :

In dim eclipse, disastrous twilight sheds
On half of the nations, and with fear of change
Perplexes Monarchs

( ग्रहणाने ग्रासलेला सूर्य, अर्ध्या जगावर अशुभाचे काळवंडणाऱ्या प्रकाशाचे जाळे टाकतो, आणि काहीतरी प्रचंड उलथापालथ होणार या भीतीने राजाधिराजांची पांचावर धारण बसते. )

अर्थात् खुद्द मिल्टनचा या भ्रामक समजुतीवर विश्वास नव्हता. त्याने ही केवळ एक कविकल्पना म्हणून वापरली.

धूमकेतूंना विज्ञानाच्या कक्षेत आणण्यास प्रदीर्घ कालावधि जावा लागला. न्यूटन[८] आणि त्याचा समकालीन मित्र हॅली[९] यांनीच वस्तुतः ते काम पूर्णत्वाला नेले. धूमकेतूच्या दर्शनाने सीझरच्या[१०] मृत्यूची सूचना दिल्याचा प्रवाद आहे. शेक्सपिअरची[११] कॅलपुर्निया म्हणते,

When beggars die, there are no comets seen;
The heavens themselves blaze forth the death of
Princes.

( भिकारी मरतात तेव्हा धूमकेतू कोठे दिसत नाहीत. सम्राटांच्या मृत्यूच्या वेळी सगळे अंतराळ लख्खकन उजळते. )

सातव्या शतकात होऊन गेलेला बीड हा धर्मगुरु लिहितो, धूमकेतूचे दर्शन म्हणजे राज्यक्रांत्या, रोगराई, युद्ध, तुफान आणि उन्हाचा कडाका

यांच्या आगमनाची पूर्वसूचना होय. सोळाव्या शतकातील प्रॉटेस्टंटपंथयी धर्मगुरु जॉन नॉक्स[१२] धूमकेतू ही ईश्वरी प्रकोपाची खूण मानीत असे. रोमन कॅथॉलिक पंथीयांचा समूळ उच्छेद करण्याचे, धूमकेतू हे, इंग्लंडच्या राजाला मिळणारे इषारे असल्याचे नॉक्स पंथीयांचे म्हणणे होते. शेक्सपिअरहि धूमकेतूंबाबत अंधश्रद्धांवर विश्वास ठेवीत असावा असे दिसते. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाचा अंमल धूमकेतूंवर चालतो, आणि काही धूमकेतूंची तरी भ्रमण कक्षा निश्चित करता येते, या गोष्टी सिद्ध झाल्या तेव्हाच सुशिक्षित माणसे धूमकेतूंना ' अशुभ चिन्ह ' मानण्यापासून परावृत्त झाली.

वैज्ञानिक दृष्टिकोनाधारे पारंपरिक भ्रामक समजुतींचा त्याग करण्याच्या प्रवृत्तीचा प्रसार सुशिक्षित वर्गात दुसऱ्या चार्ल्सच्या[१३] काळात सार्वत्रिक झाला. क्रॉमवेलची राजवट धिक्कारणाऱ्या सनातनी जरखड मंडळींच्या विरुद्ध आघाडी उघडण्यात विज्ञानाचे साहाय्य आपल्याला होईल ही गोष्ट दुसऱ्या चार्लसच्या चाणाक्ष बुद्धीला दिसली होती. त्याने रॉयल सोसायटीची[१४] स्थापना करून विज्ञानाला प्रतिष्ठित बनविले. विज्ञाननिष्ठ दृष्टीचा फैलाव राजदरबारापासून समाजाच्या इतर थरात होण्यास हळूहळू प्रारंभ झाला. राजाशी तुलना करता कॉमन्स ( पार्लमेंटच्या ) सभासदांची दृष्टि त्यावेळी जुनाट अंधश्रद्धावादी होती. उदाहरणार्थ, प्लेगची साथ, आणि त्या पाठोपाठ झालेला लंडनमधील अग्निप्रलय[१५], या दुर्घटनांमागील कारणे शोधण्यासाठी हाऊस ऑफ कॉमन्सने एक चौकशी समिति नेमली होती. या समितीने या दुर्घटना हा ईश्वरी कोपाचाच परिणाम आहे असे आपले मत व्यक्त केले. मात्र, हा कोप का झाला याचे निर्विवाद कारण स्पष्ट नव्हते. समितीने असा निर्णय दिला की थॉमस हॉब्स[१६] या लेखकाच्या ग्रंथातील विचारांनी ईश्वराला सर्वांत अधिक राग आलेला आहे. तेव्हा थॉमस हॉब्स या लेखकाचे कोणतेहि लिखाण इंग्लंडमध्ये प्रकाशित केले जाऊ नये असे फर्मान निघाले. जणू काही याच उपाययोजनेमुळे त्यानंतर लंडनमध्ये पुन्हा कधीहि प्लेगची साथ वा अग्निप्रलय उद्‌भवलेला नाही. हॉब्सने आपल्याला गणित शिकविले असल्याने चार्लसला हॉब्सबद्दल लोभ वाटत असे. कॉमन्सच्या या निर्णयामुळे चार्ल्सला विषाद वाटला. पण, आकाशातील बापाशी चार्ल्सचे

घनिष्ठ संबंध नाहीत, सबब ईश्वराचे मानस राजाला ठाऊक नाही, असे पार्लमेंटचे मत पडले.

याच सुमारास जादुटोण्यावर विश्वास ठेवणे हे अंधश्रद्धेचे लक्षण मानले जाऊ लागले. चेटकीणींचा छळ करणे, शिरच्छेद करणे वा जिवंत जाळणे याबाबतीत पहिल्या जेम्सची[१७] धर्मनिष्ठा अतिशय कडवी, झपाटलेली होती. शेक्सपिअरच्या 'मॅकबेथ' नाटकात राजेशाहीचा प्रचार होता; त्यातील चेटकिणींच्या पात्रांमुळे ते नाटक राजाची तळी उचलून धरणारे म्हणून अधिक चटकन् ग्राह्य ठरले असावे हे निःसंशय. बेकनदेखील[१८] जादुटोण्यावर आपला विश्वास असल्याचे भासवीत असे. चेटकिणींना करावयाच्या शिक्षा अधिक जालीम कराव्यात अशा अर्थाचे विधेयक पार्लमेंटमध्ये पास झाले त्यावेळी, पार्लमेंटचा सभासद असूनहि, बेकनने त्या विधेयकाला विरोध केला नाही. कॉमनवेल्थच्या[१९] काळात ही गोष्ट कळसाला जाऊन पोचली,कारण सैतानाच्या[२०] सामर्थ्यावर प्युरिटनपंथीयांचा[२१] विशेष विश्वास होता. या पूर्वेतिहासामुळेच बहुधा, दुसऱ्या चार्ल्सच्या सरकारने चेटकीणींचा पाठपुरावा व छळ करण्यात फारसा रस कधी घेतला नाही; यद्यपि, चेटुक विद्या हे थोतांड आहे असे सांगण्याचे धैर्य दुसऱ्या चार्ल्सच्या सरकारला झाले नाही. चेटुक केल्याच्या आरोपावरून १६६४ साली चाललेल्या इंग्लंडमधील शेवटच्या खटल्यात सर टॉमस ब्राऊन[२२] यांनी चेटकिणींविरुद्ध साक्ष दिली होती. चेटुक विद्येवरील कायद्यांखाली त्यानंतरच्या काळांत कोणावर खटले भरले गेले नाहीत. १७३६ मध्ये शेवटी ते कायदे रद्दबातल करण्यात आले. तथापि, अगदी परवापर्यंत, म्हणजे १७६८ साली, मेथॉडिस्ट पंथाचा संस्थापक जॉन वेस्ले[२३] या अंधश्रद्धेचा पुरस्कार करीत असताना आढळतो. स्कॉटलंडमध्ये चेटुकावरील श्रद्धा अधिक काळपर्यंत टिकून राहिली. चेटूक केल्याच्या आरोपावरून शेवटची शिक्षा तेथे १७२२ साली दिली गेली.

या प्रकरणात भूतदया आणि समंजस दृष्टि यांचा झालेला विजय हा सर्वस्वी वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसाराचा परिणाम होय. त्यासाठी अमुक एका युक्तिवादाचा विशेष उपयोग झाला असे नाही. दुसऱ्या चार्ल्सच्या

कारकीर्दीत सुरू झालेल्या विवेकनिष्ठेच्या युगात त्या वेळपर्यंत स्वाभाविक वाटणारी विचारसरणी लोकांना अगदी चुकीची वाटू लागली हेच त्याचे कारण होय. चार्ल्सच्या कारकीर्दीत विवेकाचे युग सुरू होऊ शकले याचे काही श्रेय मात्र त्या काळातील अत्यंत जाचक, बंदिस्त नीतिनियमांविरुद्ध झालेल्या बंडखोरीला द्यायला हवे हे इथे नमूद करायला पाहिजे.

चेटुक विद्येवरील विश्वासाला जन्म देणाऱ्या अंधश्रद्धांशी जुळत्यामिळत्या असलेल्या अंधश्रद्धांशी विज्ञानप्रणीत वैद्यकशास्त्राला प्रारंभीच्या काळात झगडावे लागले. सोळाव्या शतकात व्हेसॅलियसने[२४] शवच्छेदनास प्रथम सुरवात केली तेव्हा युरोपभर खिश्चन धर्मसंस्थेमध्ये संतप्त घृणेची लाट उसळली. व्हेसॅलियसला वास्तविक देहदंडच सोसावा लागायचा. पण, व्हेसॅलियस हा एकच डॉक्टर आपल्याला बरा करू शकेल अशी सम्राट पांचव्या चार्ल्सची[२५] मनोमन श्रद्धा असल्याने व्हेसॅलियस बचावला. पुढे, सम्राट पाचव्या चार्ल्सच्या मृत्यूनंतर, जिवंत माणसाचे शवच्छेदन केल्याचा आरोप व्हेसॅलियस वर ठेवण्यात आला. त्याचे प्रायश्चित्त म्हणून व्हेसॅलियसने मध्यपूर्वेतील जेरुसलेम या पवित्र खिश्चन तीर्थक्षेत्राची यात्रा करावी अशी आज्ञा झाली. या प्रवासात असताना त्याचे गलबत फुटले आणि त्या अपघातात व्हेसॅलियस मेला. व्हेसॅलियस आणि त्याच्या काळातील हार्वे[२६] व इतर थोर संशोधकांच्या कामागिरीनंतरहि वैद्यकशास्त्र बराच काळपर्यंत अंधश्रद्धांवरच आधारित राहिले. उदाहरणार्थ, माणसाच्या अंगात पिशाच्चांचा संचार झाला म्हणजे माणसाला वेड लागते अशी समजूत होती; आणि मग पिशाच्चांना शरीरात राहणे अशक्य व्हावे म्हणून वेड्याच्या शरीरावर अनन्वित अत्याचार केले जात. तिसऱ्या जॉर्ज[२७] या इंग्लंडच्या राजाला वेड लागले त्या वेळी त्याच्यावर केलेले उपचार या समजुतीच्या आधारेच केले गेले. सामान्य जनतेच्या मनावरील अज्ञानाचे आवरण तर अधिक काळपर्यंत दूर झाले नाही. माझ्या मावशीच्या नवऱ्याचे एकदा युद्धखात्यातील कोणा अधिकाऱ्याशी भांडण झाले. तेव्हा मनस्तापामुळे आपल्या नवऱ्याला आता टायफॉइड रोग होणार अशी भीति माझ्या मावशीला वाटली. थेट लिस्टर[२८] आणि पाश्चर[२९] यांच्या काळापर्यंत वैद्यकशास्त्र विज्ञानाच्या कक्षेत आले होते असे म्हणता येत

नाही. त्या नंतरच्या काळात वैद्यकशास्त्राला विज्ञानाची बैठक लाभली. वैद्यकशास्त्रातील शोधांमुळे कमी झालेल्या मानवी यातना व क्लेश यांचे पुरेसे मोजमाप होऊ शकणार नाही.

सतराव्या शतकातील अनेक थोर संशोधक व विचारवंत यांच्या कार्यामुळे जगाविषयी अेक नवा दृष्टिकोन पुढे आला. कोणत्याहि विशिष्ट युक्तिवादामुळे नव्हे तर, या समग्र दृष्टिकोनामुळे शकून, चेटुक, पिशाच्चबाधा व अशाच अितर अंधश्रद्धांवरील विश्वास नष्ट होत गेला. अठराव्या शतकापर्यंत उत्क्रांत झालेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे पुढील तीन घटक महत्वाचे होते असे मला वाटते.

( १ ) घटनाविषयक ( वा स्थितिविषयक ) विधान निरीक्षणावर आधारलेले असावे, निराधार प्रामाण्यावर आधारलेले नसावे.

( २ ) अचेतन विश्व स्वयंचलित व स्वयंजीवि रचना असून त्यात घडून येणारे बदल निसर्गनियमांनुसार होतात.

( ३ ) पृथ्वी हा विश्वाचा केंद्रबिंदू नाही, आणि विश्वाला ( उद्देश कारण असलेच तरी ) मानव हे उद्देश कारण नसावे. उद्देश कारणाची कल्पनाच विज्ञानदृष्ट्या निरर्थक होय.

हे तीन घटक मिळून ‘ यंत्रवादी दृष्टिकोन ’ ( mechanistic outlook ) तयार होतो. या दृष्टिकोनाचा खिश्चन धर्मसंस्था धिक्कार करते. या दृष्टिकोनाचा प्रसार झाल्याने धार्मिक श्रद्धांच्या कारणांवरून माणसांचा छळ होण्याचे थांबले आणि समाजात व्यापक मानवतावादी भूमिका रुजण्यास मदत झाली. तथापि, आज या दृष्टिकोनाला पूर्वीइतकी मान्यता राहिलेली नाही. माणसांचा छळ करण्याच्या प्रथेचेहि आज पुनरुज्जीवन झालेले आहे. या दृष्टिकोनाचे परिणाम नैतिकदृष्ट्या अत्यंत विघातक झाले आहेत असे मत बाळगणाऱ्या मंडळींच्या निदर्शनास मी वरील वस्तुस्थिति आणू इच्छितो.

यंत्रवादी दृष्टिकोनाच्या प्रत्येक घटकाविषयी थोडे विस्ताराने लिहिण्याची आवश्यकता आहे.

( १ ) **निरीक्षण विरुद्ध प्रामाण्य :** घटनांचे (वा स्थितीचे) ज्ञान, प्राचीन ग्रंथांच्या आधारे करून घ्यायचे नसून, प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे प्राप्त करून घ्यायचे असते ही गोष्ट आज सुशिक्षित माणसांना सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट वाटते. पण ही कल्पना सर्वस्वी आधुनिक आहे. सतराव्या शतकापूर्वी ती अस्तित्वात नव्हती. बाईला पुरुषापेक्षा कमी दात असतात असे विधान ॲरिस्टॉटलने[३०] केलेले आहे. वास्तविक त्याचे दोनदा लग्न झाले. पण असे असूनहि, बायकांचे दात मोजून आपल्या विधानाची सत्यता पडताळून पाहावी, ही गोष्ट त्याला सुचली नाही. वारा उत्तर दिशेला वाहत असताना गर्भधारणा झाल्यास मुले अधिक आरोग्यसंपन्न निपजतात असेहि त्याचे एक मत होते. रोज रात्री झोपण्यापूर्वी ॲरिस्टॉटलच्या बायका वातकुक्कुटाचे तोंड कोणत्या दिशेला आहे ते बहुधा बाहेर जाऊन बघत असल्या पाहिजेत ! तो असेहि म्हणतो की, पिसाळलेल्या कुत्र्याच्या चाव्याने माणूस पिसाळत नाही, इतर कोणतेहि जनावर मात्र पिसाळेल; घुशीचा चावा घोड्याला प्राणघातक असतो, घूस गरोदर असेल तर अधिकच घातक; निद्रानाशाचा विकार झालेल्या हत्तीचे खांदे मीठ, ऑलिव्ह तेल आणि गरम पाणी लावून रगडले तर विकार बरा होतो; अशा अनेक गोष्टी ॲरिस्टॉटलने सांगितल्या आहेत. इतके असूनहि, आपल्या आयुष्यात ज्यांनी कुत्रा आणि मांजर यांच्याशिवाय तिसरा प्राणी पाहिलेला नसेल असे, ग्रीक व रोमन वाङ्मयाचे प्राध्यापक निरीक्षणाशी एकनिष्ठ राहण्याच्या ॲरिस्टॉटलच्या स्वभावाची स्तुति करण्याचे काही सोडत नाहीत.

अलेक्झांडरच्या[३१] दिग्विजयाचा एक परिणाम असा झाला की, ग्रीकांच्या ( सांस्कृतिक ) जगावर पूर्वेकडून अंधश्रद्धांचा एक लोंढाच आला. विशेषतः, फलज्योतिषविद्येच्या बाबतीत हा परिणाम स्पष्टपणे जाणवतो. अलेक्झांडरच्या दिग्विजयानंतरच्या तत्कालीन सर्व खिस्तपूर्व समाजांचा फलज्योतिषावर विश्वास होता. खिश्चन धर्मसंस्थेने फलज्योतिषविद्येचा धिक्कार केला खरा; पण तो विज्ञाननिष्ठेमुळे नव्हे तर, फलज्योतिषामुळे लोक दैववादी बनतात म्हणून. सेंट ऑगस्टिन[३२] या धर्मशास्त्र्याच्या लिखाणात मात्र फलज्योतिषविद्येविरुद्ध विज्ञाननिष्ठ प्रतिपादन केलेले आढळते. खिस्तपूर्व काळातील एका अश्रद्ध

टीकाकाराच्या लिखाणातून हे प्रतिपादन उचललेले आहे. जुळ्या भावंडांच्या आयुष्याचे आलेख परस्परांशी जुळणारे नसतात हा नित्याचा अनुभव आहे. पण फलज्योतिषविद्या खरी असली तर जुळ्यांचे आयुष्य एकसारखेच असायला हवे असे या टीकाकाराचे प्रतिपादन आहे.

रेनेसान्सच्या[३३] काळात फलज्योतिषविद्येवर विश्वास असणे हे युरोपात नास्तिक माणसाचे लक्षण मानले जाई. रोमन कॅथॉलिक चर्च फलज्योतिषविद्येचा धिक्कार करते त्या अर्थी ती विद्या खरी असणारच असा तर्क यामागे होता. निरीक्षण केलेल्या घटनांचा आधार घेण्याच्या बाबतीत ही नास्तिक मंडळी आपल्या विरोधकांच्यापेक्षा त्या वेळपर्यंत तरी तसूभरहि अधिक विज्ञाननिष्ठ नव्हती.

आपल्यापैकी बहुतेक जण, वस्तुतः निराधार असलेल्या अनेक गोष्टींवर, केवळ प्राचीन ग्रंथात त्या लिहून ठेवल्या आहेत म्हणून अद्यापिहि विश्वास ठेवतात. शहामृगे खिळे खातात असा एक प्रवाद फार दिवस रूढ होता. मला नेहमी प्रश्न पडे की, घनदाट जंगलात शहामृगांना खिळे सापडतात कोठून; पण तरीहि, या सांगण्यावर विश्वास ठेवू नये असे कधी मला सुचले नाही. शेवटी, एक दिवस मला शोध लागला, प्लिनीने[३४] सांगून ठेवलेली ही गोष्ट असून प्रत्यक्षात त्याला काडीचाहि आधार नाही.

काही गोष्टींवर लोक श्रद्धा ठेवतात. कारण त्यांच्या मनाची खात्री पटलेली असते की, त्या खऱ्या असल्याच पाहिजेत. अशा अंधश्रद्धांचा निचरा करण्यासाठी सर्व बाजूंनी विरुद्ध पुराव्याचे दडपण निर्माण होणे आवश्यक असते. गरोदर मातेच्या मनावर होणाऱ्या आघातांचे उदाहरण आपल्याला घेता येईल. गरोदरपणी मातेच्या मनावर झालेल्या खोलवर आघातांचा परिणाम अपत्यावर होतो अशी समजूत रूढ आहे. प्रत्यक्ष बायबलमध्ये याला आधार सापडतो. ही समजूत खरी आहे का असे तुम्ही शास्त्रज्ञ नसलेल्या, किंवा शास्त्रीय संशोधनाशी संबंध नसलेल्या, बाईला विचारा. या समजुतीला पुष्टि देणारी असंख्य उदाहरणे ती तुमच्या तोंडावर फेकील. ती म्हणेल, 'अहो, एवढेच काय, सौ. अमुक–अमुक यांनी पिंजऱ्यात अडकलेला कोल्हा पाहिला तर त्यांना कोल्ह्याच्या पाया-

सारखे पाय असलेले मूल झाले.' तुम्ही जर विचारलेत, सौ. अमुक–अमुक तुमच्या माहितीच्या आहेत का ? तर ती बाई म्हणते, 'माझ्या माहितीची नाही. पण सौ. आपल्या–ह्या त्यांच्या माहितीची आहे ती.' या गोष्टीचा पिच्छा पुरवायचा ठरवून, तुम्ही सौ. आपल्या – ह्या त्यांना विचारलेत तर, त्यांचे उत्तर ठरलेले असते, 'छे, हो. मला स्वतःला सौ. अमुक–अमुक काही माहितीच्या नाहीत; पण सौ. काय–त्यांचं–नांव यांच्या ओळखीतल्या होत्या त्या.' सौ. अमुक–अमुक यांच्या शोधार्थ उभा जन्म भटकलात तरी ती बाई काही तुम्हाला सापडत नाही; ती मुळी एक कल्पनाच असते.

अर्जित गुण वंशपरंपरेने पुढच्या पिढीत उतरतात या समजुतीच्या बाबतीतहि परिस्थिति अशीच आहे. या गोष्टीवर विश्वास ठेवण्याची भावना एवढी दृढ दिसते की, ती निराधार आहे हे पटवून देणे जीवशास्त्रज्ञांना कर्मकठीण होऊन बसले आहे. रशियन शास्त्रज्ञ हे सत्य खुद्द स्टालिनलाच[३५] पटवून देऊ शकलेले नाहीत. त्यामुळे रशियन शास्त्रज्ञांना, या समजुतीच्या बाबतीत, विज्ञाननिष्ठेची कास सोडावी लागली आहे.

गुरूला उपग्रह असल्याची गोष्ट गॅलिलिओच्या[३६] दुर्बिणीने नजरेस आणून दिली तेव्हा सनातनी लोकांनी त्या दुर्बिणीतून पाहण्याचेच नाकारले. प्रमाण-ग्रंथांनुसार गुरूला उपग्रह असणे संभवत नाही याबद्दल त्यांची इतकी खात्री होती की, त्या दुर्बिणीतून दिसणारे दृश्य दिशाभूल करणारे असले पाहिजे असा ठाम निष्कर्ष त्यांनी काढला.

परंपरेच्या विरोधात निरीक्षण प्रमाण मानणे ही गोष्ट अतिशय अवघड आहे, आणि (जवळजवळ शंभर टक्के) मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध आहे. विज्ञान निरीक्षणाचा आग्रह धरते. सत्ताधिष्ठित धर्मप्रामाण्य आणि विज्ञान यांच्यातील सर्वांत निकराचे लढे या आग्रहाच्या पोटी उद्भवलेले आहेत. अद्यापिहि अनेक बाबतीत विज्ञानाची शिकवणूक माणसाने आत्मसात केलेली नाही. कोणतीहि वाईट खोड, उदाहरणार्थ आत्मप्रौढीसारखी, शिक्षा करून सुटत नाही ही गोष्ट आजहि फार थोड्या लोकांना पटवून देता येते. आपल्या मनाविरुद्ध वागणाऱ्याला शिक्षा करण्यात मजा येते, त्यामुळे या आनंदाचा

उपभोग सामाजिकदृष्ट्या नेहमीच इष्ट नसतो, ही गोष्ट कबूल करायला आपल्याला आवडत नाही.

( २ ) **भौतिक सृष्टीची स्वायत्तता :** विज्ञानपूर्व दृष्टिकोनाचा बीमोड करण्याचे सर्वांत अधिक श्रेय गतीच्या पहिल्या नियमाला आहे. या सदृश नियम लिओनार्दो द व्हिंची[३७] याने अंशतः मांडला होता हे खरे असले तरी, या नियमासाठी जग गॅलिलिओचे ऋणी आहे.

कोणतीहि गतिमान वस्तु बाह्य अडथळा निर्माण होत नाही तोवर आपल्या मूळ दिशेने आणि मूळ गतीने कायम जात राहील असे गतीच्या पहिल्या नियमात म्हटलेले आहे. गॅलिलिओच्या पूर्वी, जड वस्तू स्वयंप्रेरणेने गतिमान होऊ शकत नाही, आणि ती जर गतिमान असेल तर हळू हळू तिची गति कमी कमी होत ती स्थिर होईल, असे मानले जात होते. फक्त सचेतन वस्तूच बाह्य प्रेरणेशिवाय स्वतःहून गतिमान होऊ शकेल अशी समजूत होती. परमेश्वरी चालनेने अवकाशात खगोल भ्रमण करतात असे ॲरिस्टॉटलचे मत होते. या उलट, पृथ्वीतलावर, सचेतन प्राणी स्वयंप्रेरणेने भ्रमण करतात, आणि अचेतन वस्तूंना चालना देऊन गतिमान करतात. जड पदार्थांत काही प्रकारची हालचाल उपजतच असते हे मान्य केले गेले होते. उदाहरणार्थ, माती आणि पाणी यांची स्वाभाविक हालचाल ‘ अधो ’ दिशेने होते तर अग्नि आणि वायु यांची हालचाल ‘ ऊर्ध्व ’ दिशेने होते. या साध्या, प्राथमिक ‘ उपजत ’ हालचाली सोडल्या तर, इतर सर्व प्रकारची गतिमानता सचेतन प्राण्यांकडून मिळणाऱ्या चालनेवर अवलंबून असते याबद्दल एकमत होते.

जोपर्यंत हा दृष्टिकोन प्रचलित होता, म्हणजेच भौतिक सृष्टि ही कार्य कारण दृष्ट्या स्वयंपूर्ण आहे हे मान्य झालेले नव्हते, तोपर्यंत पदार्थविज्ञान हे स्वतंत्र शास्त्र म्हणून अस्तित्वात येणे शक्य नव्हते. परंतु गॅलिलिओ आणि न्यूटन या दोघांनी सिद्ध करून दाखविले की, खगोलांच्या किंवा पृथ्वीवरील सर्व अचेतन वस्तूंच्या हालचाली पदार्थविज्ञान शास्त्राच्या नियमानुसार होतात आणि कोणतीहि वस्तु, एकदा गतिमान झाल्यावर, अनंतकाळपर्यंत गतिमान राहते. त्यासाठी वस्तूंमध्ये चित्‌शक्ति असण्याची गरज नाही. तथापि,

या अचेतन सृष्टीला गतीची प्रथम प्रेरणा ईश्वराने दिली; नंतर मात्र त्याने अचेतन सृष्टीला गतीच्या अंगभूत नियमांच्या स्वाधीन केले; असे न्यूटनला वाटत असे.

अचेतन वस्तूच काय पण प्राण्यांची शरीरेसुद्धा पदार्थविज्ञानाच्या नियमाधीन असतात असे मत देकार्तने[३८] मांडले. तत्कालीन ख्रिस्ती धर्म-शास्त्रीय सिद्धांतांच्या बंधनामुळेच केवळ, मानवी शरीरहि पदार्थविज्ञानाच्या नियमाच्या अधीन असते असे प्रतिपादन करायला देकार्त धजला नसावा. अठराव्या शतकातील फ्रेंच नास्तिकांनी हे पुढचे पाऊलहि उचलले. त्यांच्या मते जड वस्तु ( मॅटर ) व चित्‌शक्ति ( माइंड ) यांच्यातील परस्परसंबंध, ॲरिस्टॉटल आणि मध्ययुगीन धर्मपंडितांनी सांगितल्याप्रमाणे नाहीत; ते नेमके उलटे आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते कोणत्याही कृतीची मूळ चालना चित्‌शक्तीकडून मिळालेली असते. उदाहरणार्थ, इंजिन ड्रायव्हर प्रथम गाडी सुरू करतो, आणि मग त्याने दिलेली ही चालना गाडीच्या डब्यांना मिळून, डबे गतिमान होतात. अठराव्या शतकातील जडवादी मंडळींचे मत अगदी उलटे होते. त्यांच्या मते, सर्व कृतींची मूळ चालना जड सृष्टीतून मिळते आणि जड सृष्टीतील क्रियांचा एक दुय्यम परिणाम म्हणून मानसिक किंवा चैतन्यशाली क्रिया निष्पन्न होतात, ज्या क्रिया कशालाच चालना देऊ शकत नाहींत.

( ३ ) **उद्देशकारणाची पदच्युति** : ॲरिस्टॉटलने कारणांचे चार प्रकार केले आहेत. आधुनिक विज्ञान यापैकी एकाचाच स्वीकार करते. ॲरिस्टॉट-लच्या चार कारणांपैकी दोन कारणांचा विचार इथे आपल्याला प्रस्तुत नाही. ( १ ) कार्यकारी ( एफिशियन्ट ) आणि ( २ ) अंतिम ( फायनल ) या दोन कारणांचाच विचार तेवढा आपल्याला प्रस्तुत आहे. आज आपण ‘कारण’ शब्द ज्या अर्थाने वापरतो, त्याच अर्थाने ॲरिस्टॉटल ‘ कार्यकारी कारण ’ हा शब्द वापरतो. ‘ अंतिम कारण ’ म्हणजेच उद्देशकारण होय. सामान्य मानवी व्यवहारात हा भेद सार्थ ठरतो. उदाहरणादाखल पर्वत शिखरावरील एक उपहारगृह घ्या. या उपहारगृहाच्या बाबतीत, सर्व साधनसामग्री वर चढवून तेथे उपहारगृह थाटणे हे ‘ कार्यकारी कारण ’

होईल आणि प्रवाशांची तहानभूक भागविणे हे ‘ अंतिम कारण ’ ठरेल. मानवी व्यवहारांच्या बाबतीत ‘ का ’ या प्रश्नाचे, सामान्यतः, कार्यकारी कारण स्पष्ट न करता, फक्त अंतिम कारणाचा (उद्देशकारण) निर्देश करून उत्तर देणे अधिक स्वाभाविक ठरते. ‘ पर्वतशिखरावर उपहारगृह का उघडले ’ या प्रश्नाला ‘ भुकेलेले–तहानलेले अनेक प्रवासी तिथे येतात ’ हे स्वाभाविक उत्तर मिळेल. मानवी इच्छेने घडणाऱ्या व्यवहारांच्या बाबतीतच फक्त अंतिम करणावर आधारलेले उत्तर योग्य ठरते. ‘ कॅन्सरमुळे इतके लोक का मरतात ? ’ या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर तुम्हाला मिळणार नाही; पण, येथे तर कार्यकारी कारणवर बोट ठेवता येईल असे उत्तर तुम्हाला हवे असते.

‘ का ’ या शब्दाच्या अर्थातील संदिग्धतेमुळे ॲरिस्टॉटलने कारणांचे ‘ कार्यकारी ’ व ‘ अंतिम ’ असे दोन प्रकार पाडले. त्याला वाटले, आणि अजूनहि अनेकांना वाटते की, सर्वच घटनांमध्ये दोन्ही कारणांचा आढळ होतो. त्यांच्या मते, अस्तित्वात असलेली प्रत्येक गोष्ट, एका बाजूला ती गोष्ट निर्माण करणाऱ्या पूर्वघटनांद्वारा, आणि दुसऱ्या बाजूला त्या गोष्टीने पूर्ण होणाऱ्या उद्देशाद्वारा, विशद केली जाऊ शकते. तत्त्वज्ञानी आणि धर्मशास्त्री यांना प्रत्येक गोष्टीला ‘ उद्देश ’ असतो असे मानण्याची मोकळीक अद्यापहि असली तरी, शास्त्रीय नियमांच्या शोध करताना मात्र ‘ उद्देशाची ’ कल्पना निरुपयोगी असल्याचे दिसून आले आहे. रात्री प्रकाश देण्यासाठी चंद्राची उत्पत्ति झाली आहे असे बायबलमध्ये सांगितले आहे. पण शास्त्रज्ञ, मग तो जरी धार्मिक वृत्तीचा असला तरी, चंद्राच्या उत्पत्तीची ही उपपत्ति शास्त्रशुद्ध म्हणून स्वीकारत नाही. किंवा, पुन्हा कॅन्सरचेच उदाहरण घ्यायचे तर, आपल्या पापी कृत्याचे शासन म्हणून कॅन्सर रोग होतो असे खाजगी जीवनात एखादा शास्त्रज्ञ मानीत असला तरी, शास्त्रज्ञाच्या भूमिकेत काम करीत असताना तो आपली श्रद्धा प्रमाण म्हणून स्वीकारणार नाही. मानवी व्यवहारातील ‘ उद्देश ’ कल्पना आपल्या परिचयाची आहे; आणि आपण असे म्हणू की, सृष्टीतील घडामोडींमागे काही वैश्विक उद्देश असेलहि, पण विज्ञानाच्या क्षेत्रात पूर्वघटनाच भावी घटनांचे स्वरूप निश्चित करीत

असतात. भविष्यातील हेतू भूतकालातील घटना निश्चित करू शकत नाहीत. म्हणून, जगासंबंधीच्या वैज्ञानिक उपपत्तीत 'अंतिम कारणा'ला (उद्देश कारणाला) स्थान असत नाही.

या संदर्भात डार्विनचे[३९] कार्य निर्णायक स्वरूपाचे ठरले आहे. गॅलिलिओ व न्यूटन यांच्या खगोलशास्त्रातील कार्याइतकेच क्रांतिकारी महत्त्व डार्विनने जीवशास्त्रात केलेल्या कामगिरीला आहे. सभोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेत असताना वनस्पतीत व प्राण्यात होत असलेले फेरबदल व समायोजन हा, अठराव्या व एकोणिसाव्या शतकांच्या सुरुवातीच्या काळातील धार्मिक वृत्तीच्या निसर्गशास्त्रज्ञांचा, आवडीचा चर्चा-विषय होता. जीवसृष्टीतील हे फेरबदल 'ईश्वरी उद्देशा'ने घडून येतात असे स्पष्टीकरण दिले जाई. हे खरे की, काही वेळा, या स्पष्टीकरणातून गंमतीदार पेच निर्माण होई. समजा, ससे धर्मपंडित आहेत. तरी वीझलची[४०] शरीररचना, सशांना टिपून मारण्यासाठी अगदी बेमालूम अशी असावी, यात ईश्वरी कृपाहेतूचे दर्शन सशांना कसे व्हावे ? पोटात राहून माणसाचे रक्तशोषण करणाऱ्या जंतांच्या यशस्वी शरीररचनेत काय ईश्वरी उद्देश होता याबद्दल 'आळिमिळी गुपचुळी' असा या मंडळींचा प्रकार होता. तथापि, डार्विनच्या संशोधनापूर्वी सजीवांची शरीररचना परिस्थिति आणि गरज यांना अनुरूप कशी बनते व बदलते ही गोष्ट 'ईश्वरी उद्देश' या कल्पनेचा आधार न घेता विशद करणे कठीण होते हे खरे.

डार्विनच्या संशोधनामुळे सिद्ध झालेल्या उत्क्रांतिवादाच्या सिद्धान्तामुळे नाही तर, जीवनार्थ कलह आणि त्यात अधिकात अधिक समर्थ ठरेल त्याची नैसर्गिक निवड व टिकाव या उत्क्रांतीच्या डार्विनप्रणीत प्रक्रियेमुळे, कोणत्याहि 'उद्देशा'चा आधार न घेता, सजीवांचे भोवतालच्या परिस्थितीशी दिसून येणारे समायोजन स्पष्ट करून सांगता येणे शक्य झाले. अनियत फेरबदल आणि नैसर्गिक निवड या प्रक्रिया फक्त 'कार्यकारी कारणा'चाच आधार घेतात. या कारणास्तव, अनेक जण, उत्क्रांतिवाद मान्य करीत असताहि, उत्क्रांतीमागील प्रक्रियेची डार्विनप्रणीत उपपत्ति मान्य करीत नाहीत. सॅम्युअल बटलर,[४१] बर्गसाँ,[४२] बर्नार्ड शॉ[४३] आणि लायसेंको[४४] यांना सजीव

सृष्टीच्या उत्क्रांतीमागे 'उद्देश' नाही हे प्रतिपादन मान्य नाही. (लायसेंकोची गोष्ट अर्थात इतरांहून निराळी होती. हिवाळी गव्हातील अनुवांशिकता लायसेंकोकरता, ईश्वराच्या नव्हे तर, स्टालिनच्या 'उद्देशा'ने नियंत्रित झालेली होती.)

(४) **विश्वरचनेतील मानवाचे स्थान** : विश्वरचनेतील मानवाचे स्थान काय या संबंधीच्या आपल्या कल्पनांवर विज्ञानाचा, परस्परविरोधी असा, दुहेरी परिणाम झाला आहे. एकाच वेळी, एका हाताने विज्ञानाने मानवाला अत्युच्च स्थान दिले आहे; तर, दुसऱ्या हाताने त्याला क्षुद्रतम बनवून टाकले आहे. अमर्याद विश्वाचे चिंतन करीत असताना त्याचे स्थान क्षुद्रतम बनते; तेच, कर्तृत्वाच्या दृष्टीने विचार करता, चराचर सृष्टीत त्याला सर्वोच्च स्थान मिळते. दुसरा परिणाम हळूहळू पहिल्यावर मात करीत असला तरी दोन्ही परिणाम महत्वाचेच होत.

प्रथम अमर्याद विश्वाच्या चिंतनातून उद्‌भवणाऱ्या परिणामाचा विचार करूं.

या परिणामाचे सम्यक् दर्शन होण्यासाठी दांतेचा[४५] 'डिव्हाइन कॉमेडी' आणि हबल्[४६] याचा 'रेल्म ऑफ द नेब्यूला' हे दोन ग्रंथ एकाच वेळीं वाचायला हवेत. दोन्ही ग्रंथातील 'विश्वदर्शन' पाहत असता आपली कल्पनाशक्ति जागृत आणि ग्रहणशक्ति तीव्र राखण्याची आवश्यकता आहे. पृथ्वी हे दांतेच्या विश्वाचे केंद्र आहे. या केंद्राभोवती फिरणारे एका बाहेर एक बसणारे दहा गोल आहेत. मृत्युनंतर पापी लोकांना पृथ्वीच्या केंद्रस्थानी शिक्षा ठोठावल्या जातात. जे थोडे पुण्यवान असतील त्यांचे शुद्धीकरण जेरुसलेम समोरील माउंट ऑफ पर्गेटरीवर[४७] केले जाते. शुद्धीकरणानंतर पुण्यवानांना त्यांच्या पुण्याच्या साठ्यानुसार पृथ्वीसभोवतीच्या दहा गोलांपैकी कोणत्या तरी एका गोलावर चिरकाल सुखात वास करता येतो. दांतेचे विश्व नेटके आणि छोटे आहे. चोवीस तासांच्या आत या सर्व विश्वाचा फेरफटका दांतेने (आपल्या ग्रंथात) केलेला आहे. दांतेच्या विश्वात सगळ्या गोष्टी मानवाला मध्ये ठेवून रचलेल्या आहेत. या विश्वाची सगळी रचना पाप्याला शिक्षा आणि पुण्यवंताला बक्षीस देण्यासाठीच आहे. या विश्वात

रहस्ये नाहीत, गुपिते नाहीत, की खोल गर्ता, कडेकपाऱ्या नाहीत. दांतेचे विश्व बाहुल्यांच्या घरासारखे आखीव आहे, आणि माणसे त्यातील बाहुल्या आहेत. पण, माणसांना या विश्वात बाहुल्यांचे स्थान असले तरी, या बाहुल्यांच्या खेळात घरमालक ( ईश्वर ) रममाण असल्याने त्या बाहुल्यांचे जीवितहि महत्त्वाचे होते.

आधुनिक कल्पनेनुसार रेखाटलेले विश्वाचे चित्र सर्वस्वी वेगळे आहे. कोपार्निकसच्या[४८] सिद्धांताचा विजय झाल्यापासून पृथ्वी हे विश्वाचे केंद्र नसल्याचे आपल्याला माहीत आहे. काही काळ सूर्याला विश्वाचे केंद्र मानले गेले. नंतर असा शोध लागला की, सूर्य हा, विश्वाचा सम्राट तर नव्हेच, तो दुय्यम दर्जाचा देखील तारा नाही. विश्वामध्ये अपरंपार पोकळी आहे. सूर्याला सर्वांत जवळ असलेला तारा सूर्यापासून ४·२ प्रकाशवर्षे[४९] किंवा $२५ \times १०^{१२}$ मैल दूर आहे. आपली पृथ्वी अवकाशातील गर्दीच्या वस्तीत, म्हणजे आकाशगंगेत, वास करीत असूनहि ही अवस्था आहे. आकाशगंगा म्हणजे ३०,००० कोटी ताऱ्यांचा पट्टा आहे. अशा अगणित तारकासमूहांपैकी आकाशगंगा केवळ एक आहे. आजवर तीन कोटी तारका समूहांचे अस्तित्व ज्ञात असून आजच्यापेक्षा अधिक शक्तिमान दुर्बिणी निर्माण झाल्या तर याहूनहि अधिक समूह दृग्गोचर होतील अशी शक्यता आहे. दोन तारकासमूहांमधील अंतर सरासरी वीस लक्ष प्रकाशवर्षे इतके असते. तरी त्यांना फारच गर्दी झाल्यासारखे वाटत असावे. कारण ते सर्व परस्परांपासून फार प्रचंड वेगाने दूर जात आहेत; काही तर, सेकंदाला सुमारे १४००० मैल वेगाने दूर जात आहेत. आजवरच्या निरीक्षणानुसार यापैकी सर्वांत दूरचा तारकासमूह आपल्यापासून ५० कोटी प्रकाशवर्षे अंतरावर असल्याचे मानले जाते. म्हणजे, आज आपण दुर्बिणीतून पाहतो वस्तुतः ते त्या तारका समूहाचे ५० कोटी प्रकाशवर्षांमागचे चित्र पाहतो. आता, वजनाच्या दृष्टीने पुढील आंकडे लक्षात घ्या : सूर्याचे वजन $२·१०^{२७}$ टन भरते, आकाशगंगेचे वजन सूर्याच्या १६,००० कोट पटीने अधिक भरते; अशा ३ कोटी आकाशगंगा आपल्याला माहीत आहेत; ( न माहीत

असलेल्या सोडा). विश्वाच्या परिमाणाचे हे प्रचंड आंकडे पाहिल्यावर आपल्या स्वतःचे स्थान वैश्विक महत्त्वाचे आहे ही समजूत कायम राखणे सोपे नाही.

विश्वाच्या चिंतनातून निष्पन्न होणाऱ्या मानवाच्या विश्वरचनेतील स्थाना बद्दल इतके विवेचन केल्यावर मानवी कर्तृत्वाच्या अंगाकडे वळू.

व्यवहारी माणसाला तारकासमूहांच्या या अगणित पुंजक्यांचे महत्त्व वाटत नाही. खगोलशास्त्रज्ञांनी ग्रहताऱ्यांच्या गोष्टी कराव्यात हे तो समजू शकतो, त्यांचा तो व्यवसायच आहे. पण या क्षुल्लक गोष्टींबद्दल आपल्या डोक्याला त्रास करून घेण्याचे काही कारण त्याला दिसत नाही. आपल्या सुखासमाधानाकरता भोवतालच्या जगाचा कसा उपयोग करून घेता येईल हे त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. विज्ञानाचे संस्कार न झालेला माणूस जगाचा जितका लाभ करून घेऊ शकतो, त्यापेक्षा कितीतरी अधिक पटींनी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला माणूस जग आपल्या उद्दिष्टांसाठी राबवू शकतो.

विज्ञानपूर्व जगात ईश्वराजवळच काय ती शक्ति होती. अत्यंत अनुकूल परिस्थितीचाहि माणूस फारसा फायदा उठवू शकत नसे. तशात, ईश्वरी कोप ओढवून घेतला तर, क्षणात, ही अनुकूल परिस्थिति अत्यंत प्रतिकूल बनण्याची धास्ती सतत असे. भूकंप, रोगराई, दुष्काळ, युद्धातील पराभव, अशा संकटांच्या रूपाने ईश्वरी कोप प्रकट होत असे. त्या काळात अशा घटना नेहमीच घडत. त्यामुळे लोकांची, स्वाभाविकच, ईश्वराला राग फार चटकन येत असावा अशी खात्री झाली. पृथ्वीवरील राजेमहाराजे हे, त्यातल्यात्यात, ईश्वराशी साधर्म्य असणारे; त्यावरून लोकांनी अर्थ लावला की, नम्रतेचा अभाव ही ईश्वराचा प्रकोप सर्वांत अधिक ओढवून घेणारी गोष्ट होय. जीवनात विपत्ति टाळावयाच्या असल्या तर माणसाने लीनता अंगी बाणविली पाहिजे; आपल्या निराधार अवस्थेची स्वतःला सतत आठवण द्यायला पाहिजे; आणि नित्य आपल्या अगतिक अवस्थेची लोटांगण घालून कबूली दिली पाहिजे. अशी त्यावेळच्या लोकांची श्रद्धा होती. पण, ज्या ईश्वरासमोर तत्कालीन माणसे लीन होत असत, त्या ईश्वराची कल्पना

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम वि:
क्रमांक ........................ नों दि: ........



मनुष्यसदृश केलेली होती. त्यामुळे, आयुष्यात क्लेश, दुःख, संकटे यांचा भाग असला तरी, हे विश्व माणसाच्या आकारात घडविलेले, ओळखीचे, ऊबदार आणि सुखद होते. उदाहरणार्थ, मोठ्या भरलेल्या घरातील लहान मुलाला घर जसे वाटेल तसे माणसांना जग दिसे. या जगात दुःख होते; पण हे जग माणसांना परके आणि अगम्य कधी वाटत नसे.

विज्ञानाने ' निर्माण ' केलेल्या जगात सारेच काही वेगळे आहे. लीनता अंगी बाणवून, वा प्रार्थना करून, इष्ट घटना घडवून आणता येत नाहीत; निसर्ग नियमांचे ज्ञान प्राप्त झाल्यानेच घटनांना इष्ट ते वळण देता येते. या मार्गाने प्राप्त होणारी शक्ति, प्रार्थनेने लाभणाऱ्या शक्तीहून, कितीतरी मोठी व अधिक विश्वासार्ह; कारण, शेवटी, तुमची प्रार्थना ईश्वर ऐकेलच याबद्दल काही खात्री देता येत नसे. शिवाय, प्रार्थनेने प्राप्त होऊ शकणाऱ्या फळाला मर्यादा असते हे सर्वांच्या माहितीचे होते. ईश्वराजवळ फार जास्त मागणे अधार्मिकपणाचे लक्षण मानले जाई. या उलट, विज्ञानाने प्राप्त होणाऱ्या शक्तीला ज्ञात मर्यादा नाहीत. पर्वत इकडचा तिकडे करण्याचे सामर्थ्य श्रद्धेत असल्याचे सांगितले जात असे. पण, त्यावर कोणीच कधी विश्वास ठेवला नाही. उलटपक्षी, पर्वत जमीनदोस्त करण्याची शक्ति अॅटमबॉम्बमध्ये आहे असे आज आपल्याला सांगितले जाते, तेव्हा आपण सर्व जण त्यावर विश्वास ठेवतो.

आता, हे मात्र खरे की, कधी काळी, आपण एकूण विश्वाचा विचार करू लागलो तर आपल्या मनाचे स्वास्थ्य टिकेलच असे नाही. विश्वाच्या भविष्यासंबंधी वेगवेगळी निदाने केलेली आपल्या समोर येतील. सूर्याची उष्णता कमी होत आहे, किंवा सूर्याची शकले होण्याची शक्यता संभवते, किंवा, पृथ्वीभोवतीचे वातावरणाचे आवरण नष्ट होईल व मानवासकट सर्व सजीव सृष्टीचा विनाश होईल, वगैरे वगैरे. किंवा, आपल्या लक्षात हेही येईल की, विश्वाच्या एका कोनाकोपऱ्यातले हे आपले जीवन क्षणजीवि, क्षुल्लक आणि नाशिवंत आहे. आणि आपण स्वतः गुंतलेले नसतो तर, फार वेळ खर्च करण्याइतक्या मोलाची जीवन ही गोष्ट नाही. विज्ञानवादी माणूस यावर असे उत्तर देतो की, लक्षावधि वर्षांनंतर घडण्याची शक्यता

असणाऱ्या, आणि भीतीने आजच माणसाचे जीवन गोठून टाकणाऱ्या, गोष्टींची चिंता करणे व्यर्थ आणि सुतकी वैराग्याचे लक्षण होय. तो म्हणेल, वाळवंटे सुपीक बनविणे, आर्क्टिक महासागर वाहतुकीला खुला करणे, आणि, दिवसेंदिवस अधिकाधिक सुधारलेल्या शस्त्रांनिशी एकमेकांची हत्या करणे— अशा किती तरी कामांचे डोंगर पडले आहेत. त्या कामांना तर हात लावा, पुढचे पुढे. आपल्या काही कृति कल्याणकारक असतील, तर दुसऱ्या काही विघातक असतील; पण सगळ्याच कृतीतून आपल्या शक्तीचा आविष्कार होणार आहे. आणि मग, ईश्वर हद्दपार झालेल्या या जगात, आपणच बनणार आहोत सर्वशक्तिमान ईश्वर.

सजीव सृष्टीतील घडामोडींमध्ये ईश्वरी उद्देश आहे या कल्पनेला हद्दपार करण्याव्यतिरिक्त, जगाकडे व जीवनाकडे पाहण्याच्या मानवी दृष्टिकोनावर डार्विनच्या सिद्धान्ताचे अनेक परिणाम झालेले आहेत. माकड आणि मानव या दोहोत प्राणिशास्त्रदृष्ट्या मूलभूत भेद नाही ही वस्तुस्थिति धर्मशास्त्राला अडचणीत टाकणारी आहे. माणसाला आत्मा केव्हा प्राप्त झाला? 'हरवलेल्या दुव्या[५०]' च्या हातून पाप घडणे शक्य होते का, आणि, त्याला नरकवासात धाडावे, अशी त्याची लायकी होती काय? पिथिकॅन्थ्रॉपस इरेक्टसला[५१] नैतिक जबाबदाऱ्यांची जाणीव होती काय? होमो पेकिनिए- न्सिसला[५२] नरकवासाची शिक्षा झाली होती का? पिल्टडाऊन मॅन[५३] स्वर्गाला गेला काय? असे प्रश्न उपस्थित होतात. या प्रश्नांना दिले जाणारे कोणतेही उत्तर, देणाऱ्याच्या लहरीनुसार असणार.

डार्विनच्या सिध्दांतांनी सनातनी धर्मप्रामाण्यावर व धर्मशास्त्रावर मूले कुठारः आघात केला. पण, त्याच वेळी, अपरिपक्व बुद्धीने केलेल्या डार्विनच्या सिद्धान्तांच्या गैर विश्लेषणामुळे अठराव्या शतकातील उदारमत- वादी विचारप्रणालिवरहीं गंभीर आघात झाला. कोंदोर्से[५४] हा अठराव्या शतकातील उदारमतवादाच्या पठडीतील तत्त्वज्ञ होता. कोंदोर्सेच्या प्रतिपाद- नाचे खंडन करण्यासाठी माल्थसने[५५] आपला सिद्धान्त मांडला. आणि माल्थसच्या सिद्धान्तावरून डार्विनला आपल्या सिद्धांताची उभारणी सुचली. तत्कालीन ख्रिस्ती धर्मशास्त्राप्रमाणे, अठराव्या शतकातील उदारमतवादी

तत्त्वज्ञानातहि मनुष्य हाच विश्वाचा परमोच्च (वा केंद्र) बिंदू मानलेला होता. उदाहरणार्थ, 'मानवी हक्कांच्या सनदे'ची[५६] भाषा उदारमतवादांत आढळते. सगळी माणसे समान आहेत हे त्यांचे घोषवाक्य होते. आपला मुलगा घमेंडखोर बनू नये म्हणून जेम्स मिल्ने[५७] केलेल्या उपदेशानुसार, एका माणसाने दुसऱ्यापेक्षा अधिक हुशारी दाखविली तर, त्याचे सगळे श्रेय त्या एकाला मिळालेल्या चांगल्या शिक्षणाला आहे असे प्रतिपादन उदारमतवादी करीत. अठराव्या शतकातील उदारमतवादाची मूलभूत वैशिष्ट्ये ही अशी होती.

वर उपस्थित केलेले प्रश्न पुन्हा एकदा, पण या वेळी, या उदारमतवाद्यांना, विचारले पाहिजेत. पिथिकॅन्थ्रॉपस आज जिवंत असता तर तुम्ही त्याला 'मानवी हक्क' बहाल कराल काय ? होमो पेकिनिएन्सिसचे शिक्षण केंब्रिज विद्यापीठात[५८] झाले असते तर तो न्यूटनच्या तोडीचा शास्त्रज्ञ बनला असता काय ? ससेक्स[५९] परगण्यातील आजच्या रहिवाशांइतकीच पिल्टडाऊन माणसाची बुद्धि व जाणीव प्रगल्भ होती काय ? शुद्ध लोकशाहीवादी भूमिकेला जागून तुम्ही या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी दिलीत तर, गोरिला चिंपांझी, ओरांगउटान या व अशा मानवसदृश माकडांबाबतीतहि हेच पुन्हा विचारता येईल. याहिवेळी उत्तरे होकारार्थी मिळाल्यास, याच पद्धतीने, मागे मागे जात थेट अमीबापर्यंत[६०] पोचता येईल, जो उघडच, युक्लीडचे[६१] म्हणणे उद्धृत करायचे तर, शुद्ध मूर्खपणा होईल. सर्व माणसे जन्मतः सारखी नसतात आणि अनुरूप फेरबदलाच्या निवडीतून उत्क्रांति होत असते, या गोष्टी आपण स्वीकारल्याच पाहिजेत. असामान्य व्यक्ति निर्माण करण्यात, चांगले व उच्च दर्जाचे शिक्षण हा विचारात घेण्याचा एकमेव मुद्दा नसून, अनुवंशिकतेचाहीं त्यात भाग असतो हे आपण मान्य केले पाहिजे. राजकारणात, प्रस्थापित संकेत म्हणून, सर्व माणसे समान मानावयाची असल्यास त्या गोष्टीला हरकत नाही. जीवशास्त्रदृष्ट्या ती वास्तविक समान आहेत हे मात्र त्या संकेतामागचे कारण असू नये. विशिष्ट राजकीय स्वरूपाच्या कारणामुळे सर्वांना समान लेखावयाचे आहे हे स्पष्ट असावे. अशा (गैर) प्रतिपादनांमुळे राजकीय उदारमतवादाला आघात

पोचला आहे. यात माझ्या समजुतीप्रमाणे उदारमतवादाला अन्यायच झालेला आहे.

एखादा मानवसमूह श्रेष्ठ वा हीन म्हणून निवडला जातो त्या वेळी, सर्व माणसे जन्मतः सारख्या गुणांची नसतात हे गृहीतकृत्य भयावह अर्थ धारण करते. गरीबांपेक्षा श्रीमंत, स्त्रीपेक्षा पुरुष, काकवर्णीयापेक्षा ( किंवा पीत, सांवळ्या वर्णीयापेक्षा ) गौरवर्णीय, किंवा, इतर सर्व राष्ट्रातील मानवसमूहांपेक्षा जर्मन राष्ट्र, श्रेष्ठ आहे असा सिद्धांत तुम्ही घोषित केलात तर, आणि ज्या सिद्धांताला डार्विनच्या सिद्धान्ताचा काडीमात्र आधार नाही, त्याचा अपरिहार्य परिणाम युद्धात किंवा गुलामीतच होणार आहे. पण अशी तत्त्वे, मुळी सुद्धा समर्थनीय आधार नसताना, डार्विनवादाच्या नांवावर घोषित केली गेली आहेत. दुर्बल लोक टाचा घासून मेले तर ती निसर्गाची उत्क्रांतीची प्रक्रियाच आहे हा निर्घृण सिद्धान्तहि डार्विनच्या नांवावर विकला जातो. या मंडळींचे म्हणणे असे की, मानववंशाची उत्क्रांति, अस्तित्वासाठीच्या कलहातून होत असेल तर, युद्धे जितकी अधिक संहारक तितकी चांगली; आपण युद्धाचे स्वागतच केले पाहिजे. अशा रीतीने आपण परत हेरॅक्लिटस-[६२] पाशी येऊन पोचतो. हा आद्य फासिस्ट[६३] म्हणतो. “देवादिकात आणि माणसामाणसात चालणारे कलह संपुष्टात आले आहेत असे होईल तर काय बहार होइल असे होमर[६४] म्हणाला ते गैर होते.” आपण विश्वाच्या विनाशाची मागणी करीत आहोत हे हिरॅक्लिटसला उमगले नाही...युद्ध ही स्वाभाविक अवस्था असून संघर्ष हाच न्याय आहे...युद्ध हाच सर्व गोष्टीचा उगम आणि सर्व घटनांचा सम्राट. आहे. काहींना तो माणसाच्या अवस्थेत ठेवतो, काहींना देव बनवितो, कांहींना स्वतंत्र ठेवतो, तर काहींना गुलाम; हेरॅक्लिटसचे विचार हे असे होते.

खिस्तपूर्व पांचव्या शतकात प्रचलित असलेल्या तत्त्वज्ञानाचे पुनरुज्जीवन हा विज्ञानाच्या प्रगतीचा अंतिम परिणाम ठरणार असेल तर हा योग विचित्रच म्हणायला हवा. जर्मन तत्त्वज्ञ नीत्शे[६५] आणि जर्मनीतील नाझीवादी[६६] यांच्या बाबतीत या तत्त्वज्ञानाचे पुनरुज्जीवन झाले होते असे काही प्रमाणात म्हणता येईल. पण जगातील आजच्या बलाढ्य गटांबद्दल हा आरोप खोटा

ठरेल. खरे काय झाले आहे की, विज्ञानामुळे आपली शक्ति अमर्याद वाढली असल्याची भावना माणसात निर्माण झाली आहे. हा विज्ञाननिष्ठ तत्त्वज्ञानाचा परिणाम नसून, विज्ञानाच्या तंत्रविद्येच्या पैलूशी या परिणामाचा घनिष्ठ संबंध आहे. या प्रकरणात, तत्त्वज्ञानाशी संबंधित असलेल्या विज्ञानाच्या पैलूच्याच मर्यादेत स्वतःला ठेवून विचार करण्याचा मी प्रयत्न केला आहे. विज्ञानाच्या तंत्रविद्येच्या पैलूचा विचार पुढील प्रकरणात करावयाचा आहे. विज्ञानाच्या या पैलूचा विचार पुरा झाल्यावर, विज्ञाननिष्ठेतून भासमान होणाऱ्या मानवी सत्तेच्या तत्त्वज्ञानाकडे मी लक्ष वळवीन. हे तत्त्वज्ञान महाविनाशक आहे अशी माझी धारणा आहे आणि ते तत्त्वज्ञान मी स्वीकारू शकत नाही; पण त्यासंबंधी आताच अधिक सांगत नाही.

★ ★ ★

## टीपा

१. बायबल या आद्य ख्रिश्चन धर्मग्रंथाचे दोन भाग आहेत, ख्रिस्तपूर्वकालीन प्रारंभीच्या ३९ पवित्र पुस्तकांना 'जुना करार' या नांवाने संबोधले जाते. ख्रिस्त आणि त्याच्या शिष्यांची शिकवणूक ही 'नवा करार' या नांवाने ओळखली जाते.

२. ॲमोनाईट्स टोळीविरुद्धच्या लढाईत इझरायली सैन्याचे सेनापतित्व करीत असता जेप्ताहाने अशी शपथ घेतली की, युद्धात विजय झाल्यास, घरी परतल्यावर स्वतःच्या कुटुंबियापैकी ज्याचे प्रथम दर्शन होईल त्याचे मी ईश्वराच्या चरणी हवन करीन. आब्राहामच्या ईश्वरनिष्ठेची परीक्षा पाहण्यासाठी ईश्वराने आब्राहामला स्वतःच्या मुलाचे हवन करण्यास सांगितले. ईश्वराज्ञेचे पालन करण्याची आब्राहामने तयारी केली. आब्राहाम परीक्षेस उतरल्याचे पाहून ईश्वराने मुलाचे ऐवजी कोंकरू बळी देण्यास सांगितले.

३. रोमन प्रजासत्ताकाच्या काळात (ख्रिस्तपूर्व ५०९ ते १३३) उत्तर आफ्रिकेत (आधुनिक ट्युनिस शहराच्या जागी) कार्थेज नांवाचे बलाढ्य शहर होते. त्या शहराच्या रहिवाशांना कार्थेजीनियन्स म्हणत. रोम आणि कार्थेज या

दोन बलाढ्य राज्यात खिस्तपूर्व २६४ ते १४६ झालेल्या युद्धांना प्युनिक युद्धे म्हणतात. या युद्धात अखेरीस खिस्तपूर्व १४६ मध्ये रोमचा विजय होऊन कार्थेज शहर संपूर्णतः बेचिराख करण्यात आले.

४. पश्चिम आशियातील युफ्राटिस नदीच्या किनारी खिस्तपूर्व दोन हजार वर्षापूर्वी वसलेले बाबिलोन हे आमोराईट्स टोळीचे राजधानीचे शहर. राजधानीच्या नांवामुळे या लोकांच्या साम्राज्याला बाबिलोनियन साम्राज्य असे नांव पडले. या साम्राज्यातले रहिवासी ते बाबिलोनियन.

५. खिस्तपूर्व पांचव्या शतकातील ग्रीक इतिहासकार. याने पेलोपोन्नेशियन युद्धाचा इतिहास लिहिला.

६. पायथॅगोरस ( खिस्तपूर्व ५७० ते ५४० ) चे शिष्य. सूर्याभोवती पृथ्वी व इतर ग्रह फिरतात अशी या पंथीयांची श्रद्धा होती.

७. ( १६०८–७४ ) श्रेष्ठ इंग्लिश कवि. याच्या 'पॅरडाईज लॉस्ट' या महाकाव्यातून हे अवतरण घेतलेले आहे.

८. ( १६४२–१७२७ ) प्रख्यात इंग्लिश शास्त्रज्ञ तत्त्वचिंतक. गुरुत्वाकर्षणाच्या शोधाकरता हा विशेष प्रसिद्ध आहे.

९. ( १६५६–१७४२ ) खगोलशास्त्रज्ञ.

१०. ( खिस्तपूर्व १००–४५ ) रोमन साम्राज्याचा प्रथम सम्राट. अव्वल दर्जाचा सेनापति, इतिहासकार आणि विधिज्ञ.

११. ( १५६४–१६१६ ) इंग्लिश भाषेतील सर्वश्रेष्ठ नाटककार. याच्या 'ज्युलियस सीझर' या नाटकातून हे अवतरण घेतले आहे.

१२. ( १५०५–७२ ) प्रॉटेस्टंट पंथाचा स्कॉटलंडमधील एक अध्वर्यु. या काळात प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक या दोन खिश्चन पंथांमधून विस्तव जात नसे. हे लक्षात घेतले म्हणजे नॉक्सचे विधान स्पष्ट होईल.

१३. १६६०–१६८५ या काळातील इंग्लंडचा राजा.

१४. भौतिक शास्त्रज्ञांची इंग्लंडमधील अत्युच्च संस्था. हिची स्थापना १६६२ मध्ये राजाश्रयाने झाली.

१५. १६६५–६६ साली लंडनमध्ये प्रथम प्लेगची सांथ फार जोरात पसरली. हजारो माणसांचा बळी या सांथीत पडला. त्या पाठोपाठ लंडनमध्ये प्रचंड आग

लागून निम्मेशिम्मे लंडन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. पण आग लागल्याने काही महिने बेबंदपणे फोफावलेला प्लेग मात्र गेला.

१६. ( १५८८–१६७९ ) इंग्लिश तत्त्वज्ञ, आधुनिक राज्यसंस्थेची चिकित्सा करणारा ' लेवियाथन ' हा त्याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

१७. १६०३-२६ या काळात इंग्लंडचा राजा.

१८. ( १५६१–१६२५ ) इंग्लिश राजकारणी मुत्सद्दी व प्रख्यात तत्त्वज्ञ. आधुनिक ' प्रयोगनिष्ठ तत्त्वज्ञाना 'चा जनक म्हणून याची प्रसिद्धि आहे.

१९. पहिल्या चार्ल्सचा १६४९ मध्ये शिरच्छेद केल्यानंतर पार्लमेंटमधील राजनिष्ठ सभासदांना बडतर्फ करून इंडिपेंडंट पक्षाने आपल्या हाती पार्लमेंटचा कब्जा घेतला. या पार्लमेंटने १६४९ ते १६५२ पर्यंत इंग्लडचे राज्य चालविले. या राजवटीस कॉमनवेल्थ असे म्हणतात. १६५३ मध्ये क्रॉम्वेलने आपल्या हाती सर्वाधिकार घेऊन पार्लमेंट बरखास्त केले.

२०. ख्रिश्चन धर्माच्या वैश्विक दृष्टिकोनात सैतानाला ( Satan ) ईश्वराच्या बरोबरीने स्वतंत्र व्यक्तित्व व अस्तित्व आहे. माणसांना वेगवेगळ्या प्रकारच्या मोहात पाडून ईश्वरोपासनेपासून परावृत्त करणे हे याचे कार्य. सैतान हा अतिशय धूर्त असून वेगवेगळ्या रूपात तो आपले कार्य बजावीत असतो. चेटकिणी सैतानाचेच एक रूप असा प्रवाद होता. म्हणून चेटकिणींना जिवंत जाळले जाई.

२१. पहिला जेम्स कॅथॉलिक होता. त्याने प्रॉटेस्टंटपंथीयांचा छळ करण्याचे धोरण अवलंबिले. जे प्रॉटेस्टंटपंथीय ' चर्च ऑफ इंग्लंड ' या अधिकृत इंग्लिश धर्मसंस्थेची सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत त्यांना त्यांच्या साध्या, कडव्या व नीतिमान् श्रद्धेमुळे प्युरिटन असे नांव पडले.

२२. ( १६०५–८२ ) प्रख्यात इंग्लिश डॉक्टर.

२३. ( १७०३–९१ ) धर्मप्रसारक. मेथॉडिस्ट या ख्रिश्चन पंथाचा संस्थापक.

२४. ( १५१४–६४ ) डच डॉक्टर. शरीररचनाशास्त्राचा ( Anatomy ) प्राध्यापक.

२५. ( १५१९–१५५६ ) मध्ययुगात रोमन कॅथॉलिक चर्च ही ख्रिश्चन धर्मसंस्था अत्यंत बलाढ्य होती. सर्व युरोपभर स्थानिक राजकीय सत्ता लहान मोठ्या सरंजामदारांच्या हाती होती. या सरंजामदारातून एकाची निवड ख्रिश्चन युरोपचा ( Holy Roman Empjre ) सम्राट म्हणून केली जाई.

१५१९ मध्ये स्पेनचा राजा पहिला चार्ल्स याची निवड सम्राट पांचवा चार्ल्स म्हणून करण्यात आली.

२६. (१५७८–१६५७) इंग्लिश डॉक्टर. याने रुधिराभिसरणाचा शोध लावला.

२७. १७६०–१८२० या काळात इंग्लंडचा राजा.

२८. (१८२७–१९१२) इंग्लिश सर्जन. शल्यक्रियेच्या वेळीं शल्यक्रियेची साधने, कपडे, इत्यादि निर्जंतुक असावीत या बाबतीत याने विशेष कार्य केले. यामुळे शल्यक्रियेनंतर पू होऊन होणाऱ्या मृत्यूंची संख्या घटली.

२९. (१८२२–९५) फ्रेंच बॅक्टिरिऑलॉजिस्ट व श्रेष्ठ संशोधक. याने रोग जंतु व रोगप्रतिबंधक लस यांचा शोध लावला. या शोधामुळे सांथीच्या रोगावर प्रभावी उपाययोजना करणे शक्य झाले.

३०. (खिस्तपूर्व ३८४–३२३) प्लेटोचा शिष्य. श्रेष्ठ ग्रीक तत्त्वज्ञ. मध्ययुगाच्या अंतापर्यंत याचे ग्रंथ काव्य, राजकारण, नीतिशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, अशा अनेक विषयांवर प्रमाण मानले जात.

३१. (खिस्तपूर्व ३३६–३२३) जग जिंकण्याची अलेक्झांडरची आकांक्षा होती. खि. पू. ३३४ मध्ये हा पूर्व दिग्विजयावर निघाला. खि. पू. ३२३ मध्ये हा जग जिंकण्याची आकांक्षा पूर्ण होण्याआधीच मेला.

३२. (इ. स. ६५४–४३०) खिश्चन धर्मातील एक अधिकारी पुरुष.

३३. तुर्कांच्या हल्ल्यांपासून पळणाऱ्या ग्रीक निर्वासितांनी चौदाव्या-पंधराव्या शतकात अनेक शतकांनंतर परत ग्रीक ज्ञानभांडार युरोपियन विद्वानांना खुले केले. सांचेबंद व भ्रष्ट धर्मसंस्थेने लादलेल्या श्रद्धेच्या तमोयुगात बुद्धिवादी, वैज्ञानिक व मानवनिष्ठ ग्रीक ज्ञानाची प्रभा फांकून युरोपभर नवचैतन्य संचारले. या घटनेस ‘ रेनेसान्स ’ म्हणतात कारण प्राचीन ग्रीक वाङ्मयाचे पुनरुज्जीवन केल्याने ही क्रांति घडून आली. रेनेसान्स म्हणजे पुनरुज्जीवन.

३४. (इ. स. २३–७९) प्रख्यात रोमन मुत्सद्दी. हा ‘ नॅचरल हिस्टरी ’ या तत्कालीन ज्ञानकोशासाठी हा प्रसिद्ध आहे.

३५. १९२७ ते १९५३ या काळात सोव्हिएट रशियाचा सर्वाधिकारी.

३६. (१५६४–१६४२) इटालियन खगोलशास्त्रज्ञ. आधुनिक, प्रयोगनिष्ठ विज्ञानाचा जन्मदाता. पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा सिद्धान्त प्रत्यक्ष निरीक्षणानंतर मांडल्याने त्याचा ख्रिश्चन धर्मसंस्थेकडून छळ झाला.

३७. (१४५२–१५१९) इटालियन. सव्यसाची प्रतिभावंत. चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यशास्त्र, ऑर्किटेक्चर, गणित अशा अनेक विषयात आपले नांव अजरामर करून ठेवले आहे. अव्वल दर्जाचा संशोधक.

३८. (१५९६–१६५०) फ्रेंच गणितज्ञ तत्त्वज्ञानी.

३९. (१८०९–८२) निसर्गशास्त्रज्ञ. उत्क्रांतिवादाचा जनक. 'द ओरिजिन ऑफ स्पेशीज' हा याचा नांवाजलेला ग्रंथ आहे.

४०. एक लहान चपल मांसभक्षक प्राणी.

४१. (१८३५–१९०२) इंग्लिश साहित्यिक. आदर्श समाजाचे चित्र रंगविणारे 'एरव्होन' हे याचे पुस्तक प्रसिद्ध आहे.

४२. (१८५९–१९४१) फ्रेंच तत्त्वज्ञ.

४३. (१८५६–१९५०) प्रख्यात इंग्लिश नाटककार व ब्रिटिश समाजवादी चळवळीचा प्रवर्तक. 'फेबियन सोसायटीचा' एक संस्थापक.

४४. (१८९८– ) रशियन शेतीशास्त्रज्ञ व उच्च प्रशासक. स्टालिनच्या काळात अनुवंशिकतेवरील याची मते प्रमाण मानली गेली होती. अनुवांशिक गुणांपेक्षा बाह्यपरिस्थितीचा प्रभाव प्रणिमात्रांच्या संघटनेत निर्णायक ठरतो असे याचे मत होते. हे मत वादग्रस्त आहे.

४५. (१२६५–१३२१) श्रेष्ठ इटालियन कवि.

४६. (१८८९– ) अमेरिकन शास्त्रज्ञ संशोधक.

४७. जेरुसलेम हे ख्रिश्चनधर्मीयांचे पवित्र तीर्थस्थान असून तेथील एका टेकडीला दांतेने 'माऊंट ऑफ पर्गेटरी' हें नांव दिले आहे.

४८. (१४७३–१५४३) जर्मन खगोशास्त्रज्ञ. पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे याने प्रथम सिद्ध केले.

४९. प्रकाशाची गति एका सेकंदास २,९९,८६० किलोमीटर इतकी आहे.

५०, ५१, ५२, ५३. अति प्राचीन मानवांच्या सांगाड्यांना ही वेगवेगळी नांवे आहेत. वानर आणि माणूस यांच्यात प्रत्यक्ष जीवशास्त्रीय संबंध प्रस्थापित करणारा सांगाडा सापडलेला नाही. म्हणून या, अद्याप हाती न आलेल्या,

दुव्यास ‘ हरवलेला दुवा ’ असे म्हणतात. एकोणिसाव्या शतकात जावा बेटावर सापडलेल्या काही हाडांवरून माकड आणि माणूस यांच्यामधील अवस्थेतील मानवी प्राण्याची जी आकृति तयार केली तिला उद्देशून पिथिकॅन्थ्रॉपस इरेक्टस हे नांव आहे. पेकिन जवळ १९२६ मध्ये सांपडलेल्या हाडांच्या अवशेषांवरून तयार केलेल्या सांगाड्यास होमो पेकिनिएन्सिस व इंग्लंमधील ससेक्स परगण्यातील पिल्टडाऊन येथे १९१२ मध्ये सांपडलेल्या हाडांच्या अवशेषांवरून तयार केलेल्या सांगाड्यास पिल्टडाऊन मॅन असे नांव आहे. १९५४ साली ‘ पिल्टडाऊन मॅन ’ हा एक बनवाबनवीचा प्रकार होता असे सिद्ध झाले.

५४. ( १७४३–९४ ) फ्रेंच गणितज्ञ व उदारमतवादी तत्त्वज्ञ.

५५. ( १७६६–१८३४ ) इंग्लिश धर्मोपदेशक. अन्नधान्याचा पुरवठा अंकगणिति श्रेढीने वाढतो तर लोकसंख्या भूमिति श्रेढीने वाढते; जगात शेवटी इतकी लोकसंख्या होईल की सर्वांना अन्नान्नदशेत राहावे लागेल; रोगराई, उपासमार, युद्धे, इत्यादींमुळे अन्नधान्य व लोकसंख्या यांचा अत्यंत निकृष्ट पातळीवरील समतोल कायम राखला जाईल; अशा प्रकारचा सिद्धान्त माल्थसने मांडला.

५६. अठराव्या शतकातील विवेकयुगाच्या उत्कर्षकाळीं माणसाला काही हक्क हे उपजत, निसर्गतःच प्राप्त आहेत हा विचार फार प्रभावी होता. १७७६ साली अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचे वेळीं जाहीर केलेली स्वातंत्र्याची घोषणा हा या विचाराच्या प्रभावाचा उच्च बिंदू आहे. या घोषणेत ‘ सर्व माणसे निसर्गतः समान आहेत. विधात्याने मानवांना काही अविच्छेदनीय अधिकार प्रदान केले असून त्यात जीवन, स्वातंत्र्य व सुखसंपादनाचा शोध हे हक्कहि समाविष्ट आहेत असे म्हटले आहे, ‘ स्वातंत्र्य, मालमत्तेचा उपयोग, सुरक्षितता व अन्यायाचा प्रतिकार ’ हे मानवाचे ‘ अभंग नैसर्गिक हक्क ’ असल्याचे फ्रेंच राज्यक्रांतीने घोषित केलेल्या मानवी हक्क सनदेत म्हटले आहे.

५७. ( १७७३–१८५६ ) इतिहासकार. सुप्रसिद्ध उदारमतवादी तत्त्वचिंतक. जॉन स्टुअर्ट मिल्चा बाप.

५८. प्रख्यात इंग्लिश विद्यापीठ.

५९. इंग्लंडमधील एका परगण्याचे नांव.

६०. सजीवाचा एक अत्यंत प्राथमिक प्रकार.

६१. ( खि. पू. ३३० ते २६० ) भूमितिशास्त्राचा जनक.

६२. खिस्तपूर्व पांचव्या शतकातील ग्रीक तत्त्वज्ञ.

६३. इटालियन हुकूमशाहा मुसोलिनी याने मांडलेल्या 'एक राष्ट्र, एक पक्ष, एक नेता' तत्त्वज्ञानाचे नांव.

६४. खिस्तपूर्व नवव्या शतकातील ग्रीक कवि. 'इलियड' व 'ओडिसी' ही ग्रीक महाकाव्ये याने रचिली असे मानले जाते.

६५. ( १८४४–१९०० ) जर्मन तत्त्वज्ञ व कवि. पाश्चिमात्य राष्ट्रातील खिश्चन संस्कृति ही निःसत्त्व, दीनदुबळ्यांची संस्कृति असून त्या जागी तेजस्वी व बलदंड नरपुंगवांची ( Supermen ) संस्कृति निर्माण केली पाहिजे असे याचे एक प्रतिपादन होते.

६६. हिटलरच्या नेतृत्वाखाली १९३३ साली सत्तेवर आलेला जर्मन पक्ष. आर्य वंश श्रेष्ठ असून जगात शुद्ध आर्य जर्मनांचे अधिराज्य प्रस्थापित झाले पाहिजे अशी या पक्षाची भूमिका होती. जर्मन वंश हा सर्वश्रेष्ठ नरपुंगवांचा आहे असे हिटलरचे प्रतिपादन होते. ज्यू हा सर्वात हीन वंश मानून ज्यूंना निर्वंश करण्याचा कार्यक्रम हिटलरने हाती घेतला होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..............

प्रकरण दुसरे

# तंत्रविद्येचे सामान्य परिणाम

अरबांच्या कालापासून आजतागायत विज्ञानाचे कार्य दुहेरी राहिले आहे : ( १ ) विज्ञानामुळे आपणास वस्तुमात्रासंबंधी ज्ञान होऊ शकते. ( २ ) विज्ञानामुळे आपल्याला नव्या वस्तूंची निर्मिति करणे शक्य होते. आर्किमिडीजचा[1] तेवढा अपवाद सोडला तर ग्रीक लोकांना विज्ञानाने साध्य होणाऱ्या पहिल्याच गोष्टीत रस होता. जगाबद्दल ग्रीकांना फार मोठी जिज्ञासा होती. पण त्या काळातील सुविद्य, उच्चवर्गीय लोकांचे जीवन गुलामांच्या जीवावर सुखासीनपणे चालत असल्याने विज्ञानाने साध्य होणाऱ्या दुसऱ्या गोष्टीत, म्हणजे वैज्ञानिक तंत्रविद्येत, त्यांना स्वारस्य नव्हते. भ्रामक समजुती, अभिचार व जादूटोणा यातून विज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगांकडे लोकांचे प्रथम लक्ष वेधले गेले. परीस, चिरयौवन देणारे अमृत, आणि हलक्या धातूंपासून सोने बनविण्याची युक्ति, या गोष्टी हस्तगत करण्याची अरबांची महत्त्वाकांक्षा होती. या गोष्टींकरता संशोधन करीत

असता त्यांना रसायनशास्त्रातील बऱ्याच प्रक्रियांचा शोध लागला; तथापि, त्यांच्या संशोधनाची मजल महत्त्वाचे तथ्यपूर्ण सर्वसामान्य शास्त्रीय नियम शोधून काढण्यापर्यंत गेली नाही. अरबांची तंत्रविद्या प्राथमिक अवस्थेतच राहिली.

मध्ययुगाच्या[२] शेवटी शेवटी मात्र दोन महत्त्वाचे शोध लागले. या शोधांचे परिणाम फार क्रांतिकारक व दूरगामी झाले. बंदुकीची दारू व होकायंत्र हे ते दोन शोध होत. या शोधांचा जनक कोण हे अद्यापि गूढच आहे; रॉजर बेकनने[३] ते लावले नाहीत एवढे मात्र निश्चित.

बंडखोर जहागिरदार–सरंजामदारांना शरण आणण्याच्या कामी बंदुकीच्या दारूचे केंद्रीय राजसत्तेला फार मोलाचे साहाय्य झाले. हे या शोधाचे प्रारंभीच्या काळातील महत्त्वाचे कार्य आहे. इंग्लंडच्या जॉन राजाजवळ तोफखाना असता तर, इंग्लिश जहागिरदार–सरंजामदार त्यांचे हक्क प्रस्थापित करणारी मॅग्नाचार्टा[४] सनद राजाकडून कधीच मिळवू शकले नसते. या विशिष्ट उदाहरणात, (इंग्लिश लोकशाहीची सुरुवात या सनदेपासून झाली असल्याने,) जहागिरदार–सरंजामदारांची बाजू आपण उचलून धरायला हरकत नाही. पण व्यापक दृष्टीने मध्ययुगाचा विचार करता, अराजकापासून समाजाची सोडवणूक करून शांतता व सुव्यवस्था टिकवून कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याची आवश्यकता पार पाडण्यास त्या काळात राजसत्ताच एकमात्र योग्य संस्था होती. जहागिरदार–सरंजामदार आपली सर्व भिस्त आपापल्या किल्ल्यांवरच ठेवून राहिले. पण राजांच्या सैन्याजवळील तोफखान्यापुढे किल्ले टिकाव धरू शकले नाहीत. इंग्लंडमधील पूर्वीच्या राजांपेक्षा ट्यूडर राजे[५] अधिक बलिष्ठ बनले ते त्यांच्याजवळ तोफखाना होता म्हणून. या काळात फ्रान्स या देशातील राजसत्ताहि याच कारणाने तद्देशीय जहागिरदार–सरंजामदारांपेक्षा बलिष्ठ बनली. राज्यसंस्थेच्या आधुनिक बलाढ्यतेची मुहूर्तमेढ पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात रोवली गेली. ही गोष्ट बंदुकीच्या दारूच्या जोरावरच होऊ शकली. तेव्हापासून आजतागायत राज्यसंस्थांच्या सत्तेत सतत वाढ होत आली आहे. युद्धोपयोगी शस्त्रास्त्रात होत गेलेल्या सुधारणांमुळेच आजपर्यंत

प्रामुख्याने ही वाढ होऊ शकलेली आहे. शस्त्रास्त्रातील सुधारणांचा पाया इंग्लंडचा राजा सातवा हेन्री[६], फ्रान्सचा राजा नववा लुई[७], आणि स्पॅनिश राजाराणी फर्डिनांड व ईझाबेला[८] यांनी घातला. पण तोफखान्याचे सामर्थ्य त्यांच्या मदतीला होते म्हणूनच मुळात त्यांचा विजय होऊ शकला.

होकायंत्राचा शोधहि तितकाच महत्त्वपूर्ण ठरला. इतिहासात ‘ नवखंड पृथ्वी ’च्या शोधाचे युग अवतरले ते केवळ होकायंत्रामुळेच. त्यामुळे ‘ नव्या जगा ’चा ( अमेरिका खंडाचा ) शोध लागून युरोपियन लोकांच्या वसाहतींना नवे जग खुले झाले. केप ऑफ गुड होपला वळसा घालून पूर्वेकडे जाण्याचा मार्ग खुला झाल्याने हिंदुस्थान जिंकून घेणे शक्य झाले आणि युरोप व चीन यांच्यात महत्त्वपूर्ण संबंध प्रस्थापित करता आले. सागरी सत्तेचे महत्व प्रचंड प्रमाणात वाढून या सागरी सत्तेच्या जोरावर पश्चिम युरोपने जगावर स्वामित्व प्रस्थापित केले. आज या विसाव्या शतकातच काय ते संपुष्टात येत आहे.

औद्योगिक क्रांति आणि बाष्पशक्तीचे युग निर्माण होईपर्यंतच्या काळात वैज्ञानिक तंत्रविद्येच्या क्षेत्रात या दोन शोधांच्या इतके क्रांतिकारी महत्त्वाचे नवे शोध लागले नाहीत. ॲटम बॉंबच्या शोधापासूनच्या गेल्या सात वर्षांच्या काळात वैज्ञानिक तंत्रविद्या अतिरेकाला तर जात नाही अशी अनेकांना चिंता वाटत आली आहे. हा अनुभव इतिहासाला नवीन नाही. इंग्लंड आणि अमेरिका या दोन्ही देशात औद्योगिक क्रांतीचा परिणाम दारुण दुःख निर्माण होण्यात झाला. उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी, त्या आधीच्या शंभर वर्षांपूर्वीच्या तुलनेत, इंग्लिश माणसाच्या सुखाची सरासरी कमी भरली असती हे आर्थिक इतिहासाचा कोणीहि विद्यार्थी मान्य करील; आणि हे मुख्यतः तंत्रविद्येतील प्रगतीमुळे घडले.

औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभीच्या काळातले सर्वात महत्त्वाचे उदाहरण कापडाच्या उद्योगधंद्यांचे आहे. लँकेशायरमधील[८] कापडगिरण्यातून लहान मुले दिवसाकाठी बाराबारा सोळासोळा तास काम करीत. बरीच मुले वयाच्या सहाव्या सातव्या वर्षापासूनच गिरणीत कामाला लागत. काम करता करता झोपू नये म्हणून मार देऊन मुलांना जागे ठेवावे लागे, या

उपरहि पुष्कळ मुले झोपेच्या गुंगीत यंत्रात सापडून त्यांचे हातपाय तुटत वा ती मृत्यूमुखी पडत. आईबापांना आपल्या मुलांचे अमानुष्र हाल मुकाट-पणे पाहावे लागत, कारण त्यांची स्वतःची अवस्था केविलवाणी असे. यंत्रामुळे हस्तव्यवसायातील कारागिर बेकार झाले; तर, 'एन्क्लोझर ॲक्ट[१०]' चा उपयोग पार्लमेंटने जमीनदारांच्या पदरात अधिक जमिनी टाकण्यासाठी केल्याने, ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर परागंदा होऊन शहराचा रस्ता धरणे त्यांना भाग पडले. १८२४ पर्यंत इंग्लंडमध्ये कामगारांची संघटना बनविणे बेकायदेशीर होते. इतकेच काय, कामगारातील क्रांतिकारक विचाराच्या कामगारांचा छडा लावण्यासाठी सरकार गिरण्यातून आपले हस्तक पेरीत असे. या हस्तकांच्या जाळ्यात सापडणाऱ्या कामगारांना हद्दपार तरी केले जाई किंवा फाशी दिले जाई. हेतू हा की, इतर काम-गारांना वचक बसावा.

इंग्लंडमध्ये यंत्राचा वापर करू लागल्याचा पहिला परिणाम हा असा घडून आला. अमेरिकेत याच काळात घडून आलेले परिणामहि इतकेच अनर्थकारक ठरले.

अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाच्या[११] वेळी, आणि नंतरहि काही काळपर्यंत, गुलामगिरीची प्रथा नष्ट करायला दक्षिणेकडील राज्यांची तयारी होती. १७८७ मध्ये उत्तर व पश्चिम भागातील राज्यांनी गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्याचा ठराव एकमताने केला. तशीच ती दक्षिणेतहि नष्ट होईल अशी जेफर्सनला[१२] साधार आशा होती. पण १७९३ मध्ये व्हिटनीने[१३] कापसा-तील सरकी काढण्याचे यंत्र शोधून काढले, आणि, जिथे दिवसभरात एक निग्रो मजूर जेमतेम एक पौंड कापूस साफ करीत असे, तिथे आता तो पन्नास पौंड कापूस नीट करू लागला. श्रमाची 'बचत' करणाऱ्या यंत्रांच्या शोधाचा परिणाम इंग्लंडमध्ये मुलांना पंधरा पंधरा तास काम करावे लागण्यात झाला, तर अमेरिकेत, व्हिटनीने लावलेल्या तसल्याच शोधामुळे निग्रो गुलामांच्या कष्टाच्या जिण्यात अनेक पटींनी भर पडली. १८०८ साली गुलामांचा व्यापार कायद्याने बंद झाला. पण त्या नंतरच्या काळातहि

दक्षिणेतील राज्यात कापसाच्या लागवडीत जी प्रचंड वाढ होत राहिली ती कापूस न पिकणाऱ्या लगतच्या दक्षिणी राज्यातून[१४] निग्रोंची आवक करूनच होऊ शकली होती. अमेरिकेच्या दक्षिण टोकाला असलेल्या राज्यातील हवामान रोगट होते. कापसाच्या मळ्यांवर निग्रो गुलामांना निर्दयपणे अपार कष्ट करायला लावीत. स्वाभाविकच या अतिश्रमांना आणि रोगट हवामानाला बळी पडून निग्रो गुलाम पटापट मरत. दक्षिणेच्या सरहद्दीवरील या अत्यंत किफायतशीर पण प्राणघातक मळ्यांना गुलाम मजुरांचा कायम पुरवठा करण्यासाठी गुलामगिरीची प्रथा कायम असलेल्या दक्षिणेकडील वरच्या अंगाच्या राज्यात निग्रो गुलामांचे उत्पादन करणे हा एक प्रतिष्ठित व्यवसाय बनला. गुलामांच्या या खरेदी-विक्री व्यवहाराची एक अत्यंत किळसवाणी बाजू अशी की, एखाद्या गोऱ्या माणसाच्या मालकीच्या गुलाम निग्रो स्त्रिया असल्या तर, प्रजोत्पादनासाठी त्यांचा वापर करणे त्याच्या अधिकारात असे. ही प्रजा आपोआप त्याच्याच मालकीची होई. त्याला पैशाची गरज पडली म्हणजे ही मुले दक्षिणेकडील मळेवाल्यांना त्याला विकता येत असत. ही मुले पीतज्वर, मलेरिया, जंत या रोगांना दिले जाणारे बळीच होते असे म्हणता येईल.

या सर्व घटनांचा अखेरचा परिणाम म्हणजे अमेरिकन यादवी युद्ध[१५] होय. कापडाच्या उद्योगात वैज्ञानिक तंत्रविद्येचा प्रवेश झाला नसता तर यादवी युद्ध झाले नसते असे जवळजवळ खात्रीपूर्वक म्हणता येते.

इतर खंडातहि अशा प्रकारचे परिणाम घडून आले. हिंदुस्थानात आणि आफ्रिकेत ब्रिटिश कापडाला बाजारपेठ मिळाल्यास ब्रिटिश कापडयंत्राच्या अमर्याद विस्ताराला मार्ग खुला होणार होता. साम्राज्यवादाच्या प्रसाराला या व्यापारी प्रलोभनाने प्रेरणा मिळाली. आफ्रिकेत कापडाला बाजारपेठ निर्माण होण्याआधी आफ्रिकन लोकांना नग्नावस्थेत वावरणे पाप आहे ही शिकवणूक देणे प्रथम आवश्यक होते. (एरवी ते लोक कापड विकत कशाला घेणार ?) ख्रिश्चन धर्मप्रसारकांमुळे हे काम फारच स्वस्तात पार पडले. कापडाबरोबरच इंग्रज लोकांनी आफ्रिकेत गुप्त रोग आणि क्षयरोग यांचीहि निर्यात केली. त्याबद्दल मात्र त्यांनी काही मोबदला घेतला नाही.

कापडाच्या उद्योगधंद्यासंबंधी मी इतके विवेचन करण्याचे कारण असे की, नव्या वैज्ञानिक तंत्राच्या उपयोगामुळे काही अनिष्ट दुष्परिणाम घडून येतात ही गोष्ट आजची नाही हे स्पष्ट व्हावे. ज्या दुष्परिणामांची मी चर्चा केली त्यांचे कालांतराने निराकरण झाले. इंग्लंडमध्ये मुलांना मजूर म्हणून ठेवण्यावर बंदी घालण्यात आली. अमेरिकेत गुलामगिरीच्या प्रथेला मूठमाती मिळाली. भारतातील इंग्रजांचे साम्राज्यहि आता संपुष्टात आले आहे. आफ्रिकेत शोषणादि ज्या अनिष्ट गोष्टी आजही आढळतात त्यांचा कापड-उद्योगाशी काही संबंध उरलेला नाही.

बाष्पशक्ति हा औद्योगिक क्रांतीमधील एक अत्यंत महत्त्वाचा कार्यकारी घटक होता. बाष्पशक्तीचे विशेष कार्य वाहतुकीच्या क्षेत्रात घडून आले. वाफेवर चालणारी आगबोट आणि आगगाडी ही दोन ठळक उदाहरणे होत. बाष्पशक्तीच्या वापराने दळणवळणाच्या साधनात घडून आलेल्या क्रांतीचे खऱ्या अर्थाने दूरगामी व व्यापक परिणाम एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत घडून आले नाहीत. या सुमारास अमेरिकेतील मध्य–पश्चिम राज्यात रेल्वे जाऊन पोचली. मध्य–पश्चिम राज्यात पिकणारे अमाप अन्न-धान्य अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील 'न्यू इंग्लंड[१६]' भागातील लोकांची, व इंग्लंडमधील औद्योगिक लोकसंख्येची भूक भागविण्यासाठी, रेल्वे व आगबोटी-द्वारा निर्यात होऊ लागली. दळणवळणाच्या साधनात घडून आलेल्या परिवर्तनाचे क्रांतिकारी परिणाम यानंतरचे आहेत. अमेरिकेच्या मध्य-पश्चिमेतून येणाऱ्या या अन्नाच्या गंगेमुळे इंग्लंडमधील (व 'न्यू इंग्लंड'-मधील) सुबत्तेत सार्वत्रिक वाढ झाली. राणी व्हिक्टोरियाच्या काळातील आशावादी व समाधानी दृष्टिकोनासाठी सुबत्तेतील ही सार्वत्रिक वाढ सर्वात जास्त कारणीभूत आहे. अन्नधान्याची मुबलकता निर्माण झाल्याने सर्व पुढारलेल्या देशात लोकसंख्येची झपाट्याने वाढ होऊ शकली. याला अपवाद फक्त फ्रान्सचा होता. नेपोलियनने केलेल्या कायद्यांन्वये प्रत्येकाच्या इस्टेटीची वांटणी मरणोत्तर त्याच्या सर्व मुलात सारखी करणे बंधनकारक होते; फ्रान्समधील बहुसंख्य शेतकरी लहान, थोडी जमीनवाले असल्याने कुटुंबात अधिक मुले नसावीत अशी काळजी त्या देशात त्यामुळे अधिक घेतली गेली असावी.

युरोप-अमेरिकेत लोकसंख्येचे अमाप पीक आल्यानंतरहि औद्योगीकरणाच्या प्रारंभीच्या काळातील दुष्परिणामांची पुनरावृत्ति घडून न येण्याची प्रमुख कारणे माझ्या मते दोन आहेत. या वेळेपर्यंत गुलामगिरीची प्रथा नष्ट झालेली होती हे पहिले, आणि पाश्चिमात्य राष्ट्रांचा लोकशाहीच्या दिशेने झालेला विकास हे दुसरे, कारण होय. उलट स्वतःच्या देशात परतंत्र असलेले आयरिश शेतकरी आणि रशियातील भूदास हे मात्र दारिद्र्यांतच पिचत राहिले. कॉब्डेन आणि ब्राईट[१७] यांचा पार्लमेंटमध्ये पराभव करून पूर्वीपासून अस्तित्वात असलेले धान्याच्या आयातीवरील निर्बंध इंग्रज जमीनदारांनी कायम ठेवले असते तर कापड गिरण्यातून काम करणाऱ्या कामगारांचीही दैन्यावस्था अशीच कायम राहिली असती.

तंत्रविज्ञानाच्या प्रगतीतील यापुढील महत्त्वाचा टप्पा वीज, खनिज तेल आणि अंतर्ज्वलन इंजिन ( इन्टर्नल कंबस्शन इंजिन ) यांच्या शोधाशी निगडीत आहे.

औद्योगिक शक्ति म्हणून विजेचा उपयोग होण्याच्या किती तरी आधी संदेशवाहनासाठी तारायंत्रात विजेचा उपयोग होऊ लागला. संदेशवाहनाच्या कामी विजेचा उपयोग केला गेल्याने दोन महत्त्वाचे परिणाम झाले. ( १ ) माणसांचे संदेश माणसापेक्षा अधिक वेगाने प्रवास करू लागले. ( २ ) यापुढे मोठ्या संघटनांना आपल्या लांब लांब पसरलेल्या व्यवहारांवर एकाच प्रमुख केंद्रातून नियंत्रण ठेवणे पूर्वीच्या मानाने किती तरी अधिक सुकर झाले.

माणसापेक्षा संदेश अधिक तीव्र गतीने जाऊ शकतो या सोयीचा उपयोग पोलिसांना सर्वांत अधिक झाला. तारायंत्राच्या शोधापूर्वी एखादा वाटमाऱ्या घोड्यावरून त्याचा गुन्हा अजून माहीत झाला नाही अशा ठिकाणी निसटून जाऊ शकत असे; अर्थातच त्याला पकडणे त्यामुळे फार अवघड जाई. मात्र, दुर्दैवाने, पोलिसांना ‘ हवी असलेली ’ माणसे पुष्कळ वेळा मानवजातीची उपकारकर्ती असतात. तारायंत्राची सोय असती तर पॉलिक्लॅटसने[१८] पॉयथॅगोरसला, अथेन्स सरकारने ॲनॅक्झेगोरसला[१९], पोपने विल्यम ऑफ ओकॅमला[२०], आणि फ्रान्सला पळून जात असताना १७९२ साली टॉम पेनला[२१]

पिटने पकडून शिक्षा केली असती. जर्मनी आणि रशियातील किती तरी चांगली चांगली माणसे हिटलर[२२] आणि स्टालिन यांच्या छळाला बळी पडली. जलद गतीने फर्माने पोचविणारी तारायंत्रे वा संदेशवाहनाची अन्य साधने नसती तर, प्रत्यक्षात पळून जाऊ शकले त्यापेक्षा, कितीतरी अधिक लोक या हुकूमशहांच्या तावडीतून सुटून जाऊ शकले असते. तारायंत्रामुळे पोलिसांची 'पोच' लांबली खरी, पण ते सर्वस्वी मानवजातीच्या हिताचेच झाले असे म्हणता येणार नाही.

एका केंद्रातून अधिक विस्तीर्ण क्षेत्राचे नियंत्रण, आणि तेहि अधिक प्रभावीरित्या करता येणे, तारायंत्रामुळे शक्य झाले हा तारायंत्राचा महत्त्वाचा परिणाम आहे. प्राचीन काळच्या साम्राज्यात दूरवरच्या प्रांतातील सुभेदार किंवा मांडलिक राजे मध्यवर्ति सत्तेविरुद्ध बंड करीत त्या वेळी, त्यांच्या द्रोहाची वार्ता राजधानीत पोचेपर्यंत, आपले आसन बळकट करण्याइतका अवसर त्यांना सापडे. यॉर्क येथे आपण सम्राट असल्याची द्वाही फिरवून कॉन्स्टंटाईन[२३] रोमवर चालून गेला त्या वेळी, रोम शहराच्या तटबंदीला येऊन भिडेपर्यंत, त्याच्या द्रोहाची वार्ताहि रोमन सत्ताधाऱ्यांना नव्हती. मात्र हेही खरे की, त्या काळी तारायंत्र अस्तित्वात असते तर पाश्चिमात्य राष्ट्रे ख्रिस्ती झाली नसती. १८१२ च्या ॲंग्लो-अमेरिकन युद्धातील न्यू ऑर्लिन्सची[२४] लढाई तहनाम्यावर सह्या झाल्यावर खेळली गेली, कारण उभय पक्षाच्या सैन्यांना तहनाम्याची वार्ता पोचलेली नव्हती. तारायंत्राच्या शोधापूर्वीच्या काळात परराष्ट्रीय वकिलांना असलेला अधिकार व निर्णय-स्वातंत्र्य आज उरले नाही. त्या जमान्यात संदेशवाहनाला वेळ लागत असल्यामुळे, दोन राष्ट्रात आणिबाणीची परिस्थिति निर्माण झाल्यास तातडीने उपाययोजना व्हावी असे वाटत असल्यास, वकिलांना अधिकार स्वातंत्र्य देणे भागच होते.

तारायंत्रामुळे घडून आलेला बदल शासनसंस्थेपुरताच मर्यादित नव्हता. दूरवर पसरलेले कार्यक्षेत्र असलेल्या मोठमोठ्या संघटनातहि याच स्वरूपाचे बदल घडून आले. पहिल्या एलिझाबेथच्या कारकीर्दीत इंग्लिश व्यापारी कंपन्यांनी रशियाशी व्यापार वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची हकीकत

हाकल्यूतच्या[२३] 'सफरी' या पुस्तकात वर्णिलेली आहे. उत्साही व चतुर प्रतिनिधी नेमून माल, पैसे व ओळखपत्रे त्याच्या स्वाधीन करावीत आणि पुढची सर्व कामगिरी त्याच्या भरंवशावर सोडून स्वस्थ बसावे एवढेच त्या व्यापाऱ्यांच्या हातात असे. रशियातील त्याच्या वास्तव्यात, त्याचे मालक या एजंटाला क्वचित् केव्हा तरी पत्र वा निरोप देऊ शकत असत. अशा पत्रातून वा निरोपातून त्यांनी दिलेल्या सूचना त्याला बहुधा नेहमीच वेळ निघून गेल्यावर मिळत. (तारायंत्राच्या शोधानंतर, तारायंत्राची सोय असेल तेथे सूचना त्वरित देता येऊ लागल्या. त्यामुळे दूरवर पसरलेल्या आपल्या धंद्यावर कंपन्यांना नियंत्रण ठेवता येणे शक्य झाले).

तारायंत्रामुळे केंद्रीय शासनसंस्थेची सत्ता वाढली आणि दूरस्थ दुय्यम अधिकाऱ्यांच्या स्वयंकर्तृत्वाला व स्वायत्ततेला आळा बसला. राज्यसत्ते-प्रमाणेच इतरहि भौगोलिक दृष्ट्या विशाल क्षेत्र व्यापणाऱ्या संघटनांच्या बाबतीत याच प्रकारचे परिवर्तन घडून आले. तंत्रविद्येतील इतरहि बऱ्याच शोधांचा परिणाम या स्वरूपाचाच असल्याचे आपल्याला आढळून येईल. असल्या दर शोधागणिक निर्णयाचे व इतर कार्यकारी अधिकार हाती एक-वटणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी होत जाते, मात्र या थोड्या व्यक्तींच्या हातात पूर्वीच्या अधिकारी वर्गाच्यापेक्षा अधिक सत्ता एकवटलेली असते.

तारायंत्राने आरंभिलेले हे कार्य नभोवाणीने सर्वार्थाने पूर्णावस्थेस नेले.

औद्योगिक शक्ति म्हणून विजेचा उपयोग अलिकडच्या काळातील असून त्या क्षेत्रात विजेची ताकद अजून पूर्णपणे कामी लागावयाची आहे. वीज उत्पादन व वाटप या दृष्टीने विद्युत्‌निर्मिति केंद्रांना असलेले निर्णायक स्थान व महत्त्व, हे, सामाजिक संघटनेवरील परिणामांच्या दृष्टीने, विजेचे सर्वांत लक्षणीय वैशिष्ट्य आहे. विद्युत्‌निर्मितीच्या केंद्रीकरणाचा अपरिहार्य परिणाम समाजसंघटनेत केंद्रीकरण वाढीस लागण्यात होतो. स्विफ्टच्या 'गलीव्हरचे प्रवास' या पुस्तकातील तरंगत्या लापुटा बेटावरील सत्ताधारी तत्त्वज्ञ आपले तरंगते बेट बंडखोर मांडलिक प्रदेशाच्या व सूर्याच्या मध्ये पडद्यासारखे धरून बंडाचा बीमोड करीत असतात. (बंडखोरांना सूर्यप्रकाशच मिळू न शकल्याने बिचाऱ्यांना दांती तृण धरून शरणागति पत्करावी लागे.) दिवाबत्ती, स्वयंपाकपाणी आणि ऊब या गोष्टींसाठी विजेवर

अवलंबून राहण्याची संवय रूढ झालेल्या समाजात, स्विफ्टच्या लापुटा बेटा-वरील तत्त्वज्ञांप्रमाणे, विद्युत्निर्मिति केंद्रांचे नियंते हवे तेव्हा दांती तृण धरायला लावू शकतील. अमेरिकेत असताना मी एका शेतावरील बंगलीत राहत होतो. तेथील जीवन सर्वस्वी विजेवर अवलंबून होते. कधी कधी हिमवादळात तारा तुटत. अशा वेळी होणारी गैरसोय अगदी असह्य असे. समजा, आम्ही बंडखोर असतो, आणि आमची नाकेबंदी करण्यासाठी वीजपुरवठा तोडला गेला असता तर, थोड्याच दिवसात आम्ही शरणागति पत्करली असती.

खनिज तेल व अंतर्ज्वलन इंजिन यांचे आजच्या तंत्रविद्येतील स्थान किती महत्त्वपूर्ण आहे हे सर्वांच्या परिचयाचे आहे. तंत्रदृष्ट्या तेल कंपन्या प्रचंड आकाराच्या असणे फायद्याचे आहे, अन्यथा मैलोगणति तेलवाहू नळ टाकण्यासारखे अवाढव्य खर्च त्यांना परवडणार नाहीत. तेलकंपन्यांचे गेल्या तीस वर्षांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाचे स्थान आता सर्वमान्य झाले आहे. पश्चिम आशिया आणि इंडोनेशिया या प्रदेशात ही गोष्ट विशेष जाणवते. पाश्चात्य राष्ट्रे आणि सोव्हिएट रशिया यांच्यातील संघर्षांचे एक बीज खनिज तेलात आहे. आणि त्यातूनच पाश्चिमात्य राष्ट्रांसाठी लष्करी-दृष्ट्या मोक्याच्या असलेल्या प्रदेशातील कम्युनिझमबद्दलचे प्रच्छन्न प्रेमहि निर्माण होते.

या संदर्भात सर्वात महत्त्वाची घटना विमान विद्येच्या विकासाची आहे. विमानांच्या योगाने शासनसंस्थांची सत्ता अपरंपार वाढली आहे. विमान-दलातील एखाद्या गटाचा तरी पाठिंबा असल्याखेरीज कोणचेहि बंड आज यशस्वी होऊ शकत नाही. वैमानिक युद्धामुळे शासनसंस्थांची सत्ताच वाढली आहे असे नसून छोटी राष्ट्रे आणि मोठी राष्ट्रे यांच्या बळाचे व्यस्त प्रमाण किती तरी अधिक व्यस्त झाले आहे, बडी राष्ट्रेच मोठे विमानदल ठेवू शकतात, आणि अंतराळात निर्विवाद वर्चस्व असलेल्या बड्या राष्ट्रांविरुद्ध कोणतेहि छोटे राष्ट्र टिकाव धरू शकत नाही.

भौतिक ज्ञानातून निर्माण झालेल्या सर्वात अलिकडल्या तंत्रविद्येपर्यंत, म्हणजेच अणु ऊर्जेच्या व्यावहारिक उपयोगापर्यंत आपण इथे येऊन पोचतो.

अणुशक्तीच्या विधायक उपयोगाचा नेमका अंदाज अद्यापि आलेला नाही. काही क्षेत्रात तिचा उपयोग इंधनशक्ति म्हणून होईल. विद्युत्‌निर्मिति केंद्रांनी निर्माण केलेले केंद्रीकरण अणुऊर्जेच्या उपयोगाने अधिकच वाढेल. रशियन सरकारने जाहीर केलेल्या इराद्याप्रमाणे भूपृष्ठरचना बदलण्यासाठी, पर्वत जमीनदोस्त करण्यासाठी, वाळवंटातून सरोवरे निर्माण करण्यासाठी, अणुशक्तीचा उपयोग केला जाईल अशी शक्यता आहे. तथापि, आजची प्रत्यक्ष परिस्थिति लक्षात घेता, अणुशक्तीचे विधायक उपयोग युद्धकारणासाठी होणाऱ्या उपयोगांपेक्षा अधिक महत्त्वाचे राहतील अशी शक्यता दिसत नाही.

आजवरच्या इतिहासात युद्ध ही सामाजिक एकजुटीमागील मूल प्रेरणा राहिलेली आहे. तसेच, विज्ञानाचा उदय झाल्यापासून तंत्रविद्येच्या प्रगती-मागील मुख्य प्रेरक शक्तीहि युद्ध हीच राहिली आहे. युद्धात लहान समूहां-पेक्षा मोठ्या समूहांना विजय मिळण्याचा संभव अधिक असतो. त्यामुळे, युद्धांचा सर्वसामान्य परिणाम उत्तरोत्तर मोठ्या आकाराची राष्ट्रे वा राज्ये निर्माण होण्यात झालेला आढळतो. तंत्रविद्येच्या विशिष्ट पातळीने राज्य-विस्ताराला कमाल मर्यादा पडते. जर्मनीतील अरण्ये आणि आफ्रिकेतील वाळवंट यांनी पूर्वी रोमन साम्राज्याची[२६] वाटचाल थोपविली; हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या विजिगीषेला हिमालयामुळे बांध पडला. रशियातील गोठवून टाकणाऱ्या कडक थंडीने नेपोलियनच्या[२७] दिग्विजयी सैन्याचा पराभव केला. तारायंत्राच्या शोधापूर्वी मोठ्या साम्राज्यांचे सहजासहजी तुकडे पडत कारण केंद्रीय सत्ता साम्राज्याचे प्रभावीपणे नियंत्रण करू शकत नसे.

साम्राज्य विस्ताराला मर्यादा निर्माण करणाऱ्या घटकांमध्ये दळणवळणाची साधने हा आजवर प्रमुख घटक राहिलेला आहे. प्राचीनकाळी रोमन व पर्शियन सत्ताधाऱ्यांची भिस्त खुष्कीच्या मार्गावर होती. त्या काळात घोडा हेच सर्वात जलद जाणारे वाहन होते. राजधानीपासून सरहद्दीपर्यंतचे अंतर जितके अधिक तितके साम्राज्यावर नियंत्रण ठेवणे अशक्यप्राय बनत असे. रेल्वे व तारायंत्र यांनी या अडचणीचे बऱ्याच प्रमाणात निवारण केले. लांब पल्ल्याच्या बॉंबफेक्या विमानात झालेल्या अलीकडील सुधारणांनी ही

अनुक्रम ३०९९७ वि: निबंध
क्रमांक १५६६ नों दि: २१२।६५



अडचण होती की नव्हती असे करून टाकले आहे. पृथ्वीवर एकच जागतिक साम्राज्य प्रस्थापित करण्यात कसलीहि तांत्रिक आडकाठी आता उरलेली नाही. अलीकडील काही शतकातील युद्धांपेक्षा भावी कालातील युद्धे उत्तरोत्तर अधिक संहारक बनत जाण्याची शक्यता असल्याने, मानवजातीचा संहार किंवा रानटी अवस्थेची पुनरावृत्ति टाळावयाची असेल तर अखिल मानवजातीचे विश्वराज्य बनाविण्याखेरीज दुसरा पर्याय उरलेला नाही.

जागतिक सरकार स्थापन करण्याच्या मार्गात एक मानसशास्त्रीय स्वरूपाची अडचण आहे ही गोष्ट मात्र मान्य केली पाहिजे. पूर्वीच्या काळी सामाजिक एकजूटीची युद्ध ही प्रमुख प्रेरणा होती हे मला पुन्हा एकवार सांगितले पाहिजे. उत्कट भय आणि कडवा द्वेष या विकारातून एकात्मतेच्या भावना जागृत होतात. द्वेष आणि भय हे विकार उद्भवण्यासाठी खऱ्या किंवा काल्पनिक शत्रूचे आस्तित्व लागते. युद्धकाली जसे उत्स्फूर्तपणे राष्ट्रांतर्गत ऐक्य प्रकट होते, टिकून राहते तसे जागतिक सरकार झाले म्हणजे होणार नाही; कारण त्या स्थितीत ' शत्रू 'च उरणार नाही. त्या अर्थी दंडबलाचा वापर करूनच जागतिक सरकारचे स्थैर्य टिकवून धरावे लागेल असे दिसते. या प्रश्नाचा अधिक विचार मी पुढे करणार आहे.

पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र या दोन विज्ञानशाखांपासून निर्माण झालेल्या तंत्रविद्येचा विचार आपण आतापर्यंत केला. या दोन शास्त्रांपासून मिळालेली तंत्रे आजवरच्या तंत्रविद्येत जास्त महत्वाची अशी होती. पण भावी काळात जीवशास्त्र, शरीरविज्ञानशास्त्र आणि मानसशास्त्र या शास्त्रांपासून उपलब्ध होणाऱ्या तंत्रांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम उपरोक्त दोन शास्त्रांच्या इतकाच मूलभूत व दूरगामी ठरेल असे दिसते.

जागतिक लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येला लागणारे अन्नधान्य ही समस्या प्रथम विचारात घेऊ. सध्या दरवर्षी दोन कोटी या प्रमाणात जगाच्या लोकसंख्येत भर पडत आहे. यापैकी बहुतेक वाढ रशिया व आग्नेय आशियाई देशात होत आहे. पश्चिम युरोप व अमेरिका या देशातील लोकसंख्या जवळजवळ स्थिर आहे. दुसरीकडे, अशास्त्रीय पद्धतीने केलेली शेती आणि जंगलतोड यामुळे, एकूण जागतिक अन्नपुरवठ्यात घट

होण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिस्थिति स्फोटक बनली आहे. या समस्येकडे दुर्लक्ष केले तर एक दिवस अन्नधान्याची टंचाई निर्माण होईल आणि त्याचा परिणाम जागतिक महायुद्धात होईल. पण आपल्या जवळ उपलब्ध असलेल्या नवीन तंत्रविद्येमुळे या समस्येची सोडवणूक जागतिक युद्ध टाळून अन्य प्रकारे करता येणे शक्य आहे.

वैद्यकशास्त्र आणि संततिनियमन या दोन गोष्टींमुळे पाश्चात्य देशातील लोकसंख्या नियंत्रित झाली आहे. औषधपाण्यामुळे मृत्यूसंख्या घटते, तर संततिनियमनामुळे जननाचे प्रमाण घटते. दोन्ही गोष्टींचा परिणाम सरासरी वयोमान वाढण्यात होत आहे. पाश्चात्य देशात तरुणांचे प्रमाण कमी असून वृद्धांचे जास्त आहे. काही जणांच्या मते याचे परिणाम अनिष्ट होणार पण एक वृद्ध या नात्याने सांगायचे तर, परिणाम अनिष्टच होतील असे काही मला वाटत नाही.

शेतीच्या तंत्रविद्येत सुधारणा करून जागतिक अन्नधान्य तुटीचा धोका काही काळ टाळता येईल. पण लोकसंख्येची वाढ याच वेगाने होत राहिली तर या सुधारणा फार काळ पुऱ्या पडणार नाहीत. त्या परिस्थितीत जगात दोन गट निर्माण होतील : वाढत्या लोकसंख्येच्या दरिद्री राष्ट्रांचा एक आणि स्थिर लोकसंख्येच्या श्रीमंत राष्ट्रांचा दुसरा. जगात असे दोन गट पडले तर त्यांच्यात आज ना उद्या युद्ध न उद्‌भवणे ही अशक्य गोष्ट आहे. युद्धांचा अखंड क्रम चालत राहू नये असे वाटत असेल तर जगभर लोकसंख्या स्थिर राहिली पाहिजे पुष्कळ देशात यासाठी सरकारी पातळीवरून उपाय योजावे लागतील. या प्रयत्नात यश येण्यासाठी वैज्ञानिक तंत्रविद्येचा प्रवेश मानवी जीवनाच्या अत्यंत खाजगी व नाजुक व्यवहारांपर्यंत न्यावा लागेल. लोकसंख्येच्या प्रश्नांची सोडवणूक होण्याचे आणखी दोन पर्याय संभवतात. युद्ध इतके संहारक बनेल की लोकसंख्या फाजील होण्याची शक्यता नष्ट होईल, किंवा विज्ञानप्रणीत राष्ट्रांचा पराभव होऊन त्यानंतरच्या अराजकात विज्ञाननिष्ठ तंत्रविद्येचाच नाश होईल.

अनुवंशिकतेवरील संशोधनाद्वारा जीवशास्त्राचे मानवी जीवनावर महत्त्वाचे परिणाम घडून येतील. विज्ञान हाताशी नसतानाहि मानवाने

पाळीव प्राण्यात व खाद्य वनस्पतीत प्रचंड प्रमाणात इष्ट फेरबदल घडवून आणले. प्रजननशास्त्राच्या सहाय्याने असेच फेरबदल अधिक मोठ्या प्रमाणात व जलद गतीने घडवून आणण्यात माणूस यशस्वी होईल असे मानण्यास हरकत नाही. कदाचित, कृत्रिमरित्या जनुकांमध्ये (जीन्स) इष्ट असे परिवर्तन घडवून आणणे देखील पुढे शक्य होईल. (आज जनुकांमध्ये कृत्रिमरित्या घडवून आणता येत असलेले परिवर्तन अपायकारक किंवा परिणाम-शून्य असते.) तथापि, आज निश्चितपणे इतके खासच म्हणता येईल की, वैज्ञानिक तंत्रविद्या मानवाला उपयुक्त असणाऱ्या प्राण्यांमध्ये आणि वनस्पतीं-मध्ये नजिकच्या भविष्यकाळात मोठ्या प्रमाणावर इष्ट सुधारणा घडवून आणू शकेल.

वनस्पति आणि प्राणि यांच्या जन्मजात गुणांमध्ये बदल घडवून आणण्याच्या यशस्वी पद्धति दीर्घ कालाच्या अनुभवाने सिद्ध झाल्या म्हणजे मानवी प्रजननासाठीहि या शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला जावा म्हणून जोरदार चळवळ निर्माण होण्याचा संभव आहे. समाजाने हे धोरण स्वीकारण्याला धार्मिक दृष्टिकोनातून आणि भावनात्मक भूमिकेवरून प्रारंभी सक्त विरोध होईल. पण कल्पना करा की, सर्व प्रकारचा अंतर्गत विरोध मोडून रशियाने शास्त्रीय प्रजननपद्धतींचा वापर केला व त्यातून अधिक समर्थ, बुद्धिमान व रोगानिरोधक जातीची माणसे निर्माण केली; आणि, आपण याच मार्गाचा अवलंब केला नाही तर, युद्धात आपला पराभव होईल अशी इतर राष्ट्रांची खात्री पटली. मग, एकतर स्वेच्छेने ही राष्ट्रे आपले पूर्वग्रह बाजूला ठेवतील, किंवा पराभवानंतर पूर्वग्रह सोडण्याची त्यांच्यावर सक्ती होईल. युद्धांचा वीट येऊन इतःपर शांततापूर्ण मार्गांनीच जगायचे असा मानवजातीचा निर्णय होत नाही तोवर, कोणतेहि वैज्ञानिक तंत्र, मग ते कितीहि पाशवी असो, जर युद्धोपयोगी आहे असे ठरले तर, त्याचा प्रसार होणे अटळ आहे. आज तरी असा दिवस नजरेच्या टप्प्यात नाही. तेव्हा शास्त्रीय पद्धतींनी मानवांचे प्रजनन सुरू होईल अशी अपेक्षा बाळगायला हवी. या विषयाचा मी पुढे एका प्रकरणात पुन्हा विचार करेन.

शरीरविज्ञानशास्त्र आणि मानसशास्त्र या दोन शास्त्रात तंत्रविद्येला खूप वाव आहे, पण अद्यापि या शास्त्रांच्या आधारे वैज्ञानिक तंत्रे विकसित

व्हावयाची आहेत. पावलॉव्ह[२८] आणि फ्राइड[२९] या दोन शास्त्रज्ञांनी या शास्त्रांतील तंत्रविद्येची पायाभरणी केली. या दोघांच्या भूमिकात वा कार्यात कोणचाहि मूलगामी संघर्ष आहे असे मला वाटत नाही. मात्र, त्यांनी घातलेल्या पायावर रचल्या जाणाऱ्या वास्तूचे चित्र काय असेल ते अद्याप पुरेसे स्पष्ट झालेले नाही.

भावी काळात समूहमानसशास्त्राला राजकीयदृष्ट्या फार मोठे महत्त्व प्राप्त होईल असे मला वाटते. शास्त्राचा दर्जा प्राप्त होण्याइतकी समूहमानसशास्त्राची प्रगति झालेली नाही. या विषयातील अधिकारी व्यक्ति विद्यापीठातून नाहीत; जाहिरात व्यवसायातील तज्ज्ञ, राजकारणी आणि, सर्वांत अधिक, हुकूमशहा ही मंडळी या विषयातील अधिकारी व्यक्ति होत. धन किंवा सत्ता हस्तगत करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या व्यवहारी माणसाला समूह मानसशास्त्राचा अभ्यास अतिशय उपयोगी पडतो. व्यक्तीच्या मानसशास्त्रावरच समूहमानसशास्त्र आधारलेले आहे. पण आजवर जन्मजात अक्कलहुशारी आणि व्यवहारी शहाणपण यातून सुचलेल्या आडाख्यांचा, कामचलाऊ पद्धतींचा व कृत्यांचाच उपयोग प्रामुख्याने या शास्त्रात केला गेला आहे. प्रचारतंत्राच्या आधुनिक साधनपद्धतींची वाढ झाल्यापासून समूह मानसशास्त्राचे महत्त्व फार वाढले आहे. 'शिक्षण' हे आधुनिक प्रचारतंत्रातले सर्वांत अधिक प्रभावी साधन आहे. धार्मिक भावना व समजुती यांचाहि समूहाला वळण लावण्यासाठी उपयोग होतो, पण अलीकडे त्यांचा वापर कमी कमी होत चालल्याचे दिसते. वृत्तपत्रे, चित्रपट व नभोनाट्ये यांचा वाढत्या प्रमाणावर प्रचारासाठी उपयोग केला जात आहे.

मने वळविण्याची कला हा समूहमानसशास्त्रातील सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. उदाहरणार्थ,एडमंड बर्कच्या[३०] भाषणाची तुलना हिटलरच्या भाषणांशी जर तुम्ही केलीत तर अठराव्या शतकानंतरच्या काळात ही कला किती झपाट्याने प्रगत झाली आहे ते तुम्हाला स्पष्ट दिसेल. त्या काळच्या लोकांनी पुस्तकातून असे वाचले होते की माणूस हा विवेकनिष्ठ प्राणी आहे आणि ही व्याख्या खरी मानून आपले सर्व युक्तिवाद ते करीत. त्यांचे चुकले ते इथेच. आज आपल्याला माहीत झाले आहे की अत्यंत मनोहर व तर्कशुद्ध प्रतिपा-

दनापेक्षा डोळे दिपवून टाकणारा सभारंभाचा झगमगाट आणि भावनोद्दीपक संगीत ही लोकांना आपल्या बाजूला वळविण्याची प्रचाराची अधिक प्रभावी साधने आहेत. उद्या एखाद्याला राज्यसंस्थेकडून प्रचारसाधने व पैसा उपलब्ध झाला, आणि कोवळ्या वयाचे 'पेशंट' त्याच्या हाती आले, तर त्यापैकी कोणालाही कोणतीहि गोष्ट तो पटवून देऊ शकेल असे आज दिसत आहे.

विज्ञानप्रणीत हुकूमशाही राजवटीतील शास्त्रज्ञांनी एकदा हा विषय हाती घेतला की समूह-मानसशास्त्राची जलद प्रगति होईल. 'बर्फ काळे असते' असे ॲनॅक्झॅगोरसचे ठाम मत होते, पण त्याच्या काळी त्याच्या म्हणण्यावर कोणी विश्वास ठेवला नाही. 'बर्फ काळे असते' अशी अविचल श्रद्धा निर्माण करणाऱ्या वेगवेगळ्या पद्धतींचा प्रयोग करण्यासाठी भावी समाजात मानसशास्त्र्यांच्या हाती शालेय विद्यार्थ्यांचे वर्ग सोपविले जातील. या प्रयोगातून अल्प कालावधीत काही निष्कर्ष निष्पन्न होतील बहुधा ते पुढीलप्रमाणे असतील. ( १ ) अशी श्रध्दा निर्माण करण्यात कौटुंबिक संस्कारांचा मोठा अडथळा होतो. ( २ ) दहा वर्षांच्या आतील मुलांपासून पढवायला सुरुवात केल्याशिवाय अशी श्रद्धा निर्माण करण्याचे प्रयत्न फारसे सफळ ठरणार नाहीत. ( ३ ) 'बर्फ काळे असते' अशा अर्थाची गाणी रचून लयबद्ध चालीवर त्यांचा सारखा जप करवून घेता आला तर त्याचा परिणाम फार प्रभावी होतो. ( ४ ) 'बर्फ पांढरे असते' हे मत चक्रमपणाच्या रोगट विकृतीचे लक्षण मानले जाईल अशी व्यवस्था केली पाहिजे. पण मी नुसते अंदाज वर्तवीत आहे. मत बनविण्याच्या सर्वसाधारण पद्धति व तत्त्वे अचूकपणे मांडण्याचे, तसेच 'बर्फ काळा असतो' किंवा 'बर्फ गडद करड्या रंगाचा असतो' यापैकी कोणती श्रद्धा मुलांमध्ये रुजवायला तुलनात्मक दृष्ट्या दरडोई खर्च किती येईल व कोणती श्रद्धा रुजविणे किती कमी खर्चाचे होईल, हे बिनचूकपणे सांगण्याचे काम भावी शास्त्रज्ञांचे आहे.

या शास्त्राचा अभ्यास कसून होईल हे निश्चित; पण सत्ताधारी वर्गाच्या बाहेर या शास्त्रातल्या ज्ञानाचा प्रसार कटाक्षाने होऊ दिला जाणार नाही. आपल्या श्रद्धा कोणत्या पद्धतीने निर्माण केल्या जात आहेत त्याचे ज्ञान

सर्वसामान्य जनतेला होऊ नये अशी खबरदारी घेतली जाईल. मानस-नियंत्रणाचे तंत्र पूर्णावस्थेस पोचल्यावर, एका पिढीचे शिक्षण होण्याइतका काळ सत्ता हाती राखू शकणाऱ्या शासनसंस्थेला, पोलिस किंवा सैन्यदले यांची मदत न घेताच, प्रजेला पुरते आपल्या काबूत ठेवता येईल. आजपावेतो राजकारणी माणसांच्या दृष्टीने असा स्वर्ग निर्माण करण्यात एकाच देशाने यश मिळविले आहे.

वैज्ञानिक तंत्रविद्येचे आजपावेतो झालेले सामाजिक परिणाम अनेक व महत्त्वपूर्ण आहेत. भविष्यकाळात तर ते अधिकच लक्षवेधी बनतील. यापैकी काही परिणाम त्या त्या देशाच्या अर्थ– व राज्य– व्यवस्थेच्या प्रकारांवर अवलंबून असतात, तर काही परिणाम हे अपरिहार्यपणे सर्वच समाजात घडून येतात. प्रस्तुत प्रकरणात अशा अपरिहार्य, देशनिरपेक्ष परिणामांचाच विचार करावयाचा आहे.

वैज्ञानिक तंत्रविद्येचा सर्वश्रुत आणि अटळ असा परिणाम म्हणजे, तिच्या योगाने समाजातील विविध घटकांचे परावलंबित्व वाढते. या अर्थाने विज्ञानप्रणीत समाजाची संघटना सजीव प्राण्याच्या शरीराशी जुळती अशी बनते. उत्पादनाच्या क्षेत्रात हे परस्परावलंबित्व दोन प्रकारचे असते. एकतर एकाच कारखान्यात काम करणाऱ्या व्यक्तींमधील परस्परसंबंध अधिक घनिष्ठ बनतात. दुसरीकडे, तितक्याच प्रमाणात घनिष्ठ नसला तरी, दोन वेगवेगळ्या उद्योगधंद्यातील परस्परसंबंधहि अत्यावश्यक ठरतो. तंत्रविद्येतील प्रत्येक सुधारणेबरोबर या दोन्ही प्रकारच्या परस्परावलंबनाला अधिक महत्त्व येत जाते.

औद्योगीकरण न झालेल्या देशातील शेतकरी त्याच्या स्वतःपुरते जवळ जवळ सगळे अन्नधान्य अत्यंत कमी किंमतीच्या औजारांच्या साहाय्याने पिकवू शकतो. ही औजारे, कापडचोपड व मीठासारखे काही जिन्नस एवढ्याच वस्तू त्याला विकत घ्याव्या लागतात. बाह्य जगाशी त्याचा संबंध कमीतकमी येतो. आपल्या बायका–मुलांच्या मदतीने कुटुंबाच्या गरजेपेक्षा थोडे अधिक अन्नधान्य पिकविले की, त्याच्या इतर गरजाहि भागतात. असे अधिक पिकवीत आहे तोवर तो जवळजवळ संपूर्णपणे स्वतंत्र असतो, मात्र

त्यासाठी अपार कष्ट आणि दारिद्य या गोष्टी त्याला पत्करान्या लागतात. दुष्काळ पडला म्हणजे मात्र त्याची उपासमार होते आणि पुष्कळ वेळा त्याची मुलेबाळे मृत्यूमुखी पडतात. आपल्या स्वातंत्र्याकरता त्याला चुकवात्री लागणारी किंमत इतकी जबर आहे की क्वचितच कोणी पुढारलेला माणूस त्याचा हेवा करील. औद्योगीकरणाच्या उदयापूर्वी पुढारलेल्या देशातील बहुसंख्य प्रजेच्या नशिबी असलेच जीवन होते.

शेतकऱ्याचे जीवन नेहमीच खडतर असते, पण सावकार आणि जमीनदार या त्याच्या दोन शत्रूंपैकी कोणीहि एक त्याचे आयुष्य अधिक क्लेशमय बनविण्यास पुरेसा ठरतो. कुठल्याहि देशाच्या इतिहासात कोणत्याहि काळातील शेतकऱ्याच्या स्थितीचे पुढीलसारखे केविलवाणे चित्र दृष्टीस पडते : " घरंदाज व कष्टाळू शेतकरीवर्गाला या काळात फार फार वाईट दिवस आले. पिके बुडाली होती, उपासमार होऊ नये म्हणून त्यांच्यातील बहुतकांनी शहरातील जमीनदारांकडून कर्जे काढली. शेतकऱ्यांच्या घराण्यालाशोभणारा कुळाचार, हाडाची माणुसकी, आणि असीम धैर्य या गुणांचा त्या नगरवासी जमीनदारात अभाव होता. ज्यांनी कर्ज काढण्याची आत्मघातकी चूक केली ते या नव्या, पैशाची पूजा करणान्या वर्गाचे अपरिहार्यपणे गुलाम किंवा भूदास बनले. अशा रीतीने, त्या काळपर्यंत राष्ट्राचा कणा असलेले ते स्वाभिमानी शेतकरी पार बुडाले आणि येनकेन प्रकारेण पैसा करणान्या चतुर, लोभी लोकांचे राज्य चालू झाले." एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील इंग्लंड, किंवा ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभाच्या काळातील हिंदुस्थान, या प्रदेशांचा तत्कालीन इतिहास वाचाल तर याच दारुण शब्दात ही घटना वर्णिलेली आढळेल. चीनमधील शेतकरी साम्यवादाचे स्वागत करायला तयार झाला त्यामागचीहि कारणे नेमकी हीच होती. ही अवस्था कितीहि हृदयविदारक असली तरी विशाल अर्थव्यवस्थेशी शेतीची सांगड घालीत असताना ती अपरिहार्य असते.

या मागस शेतकऱ्यांच्या पार्श्वभूमीवर आजच्या कॅलिफोर्निया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया अगर अर्जेंटिना या प्रदेशातील शेती व्यवसायाचे स्वरूप पाहण्यासारखे आहे. या प्रदेशातील पिके निर्यातीसाठीच प्रामुख्याने काढली जातात.

युरोपातील युद्ध, मार्शल एड योजना[३१], पौंडाचे अवमूल्यन, या व असल्या घटनांवर शेतकी मालाच्या निर्यातीपासून होणाऱ्या आर्थिक भरभराटीचे प्रमाण अवलंबून असते. सर्व गोष्टी राजकारणाच्या खेळावर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, अमेरिकन राजकारणात शेतकऱ्यांचा गट किती प्रभावी आहे, अर्जेंटिना रशियाशी हातमिळवणी करेल अशी भीति आहे किंवा काय, असल्या गोष्टींवर या देशातल्या शेतकऱ्यांची बरकत होणे न होणे अवलंबून असते. तेथील शेतकरी हा नांवाला स्वतंत्र असला तरी प्रत्यक्षात आपल्या स्वार्थासाठी राजकारणाला वळण देणाऱ्या बड्याबड्या पुंजीपतींच्या डावातील सोंगट्या-पलिकडे त्याला फारशी किंमत आज राहिलेली नाही. वैयक्तिक शेतकऱ्यांचे हे संपूर्ण परावलंबन समाजवादी देशात कमी असते असे नाही. उदाहरणार्थ, रशिया आणि ब्रिटन या दोन देशांनी रशियान अन्नधान्याच्या बदली इंग्लिश यंत्रसामग्री पुरविण्याचा करार केला तर, त्यामुळे, रशियातील शेतकऱ्याचे परावलंबित्व कमी होत नसून ते अधिकच सर्वंकष होते. नव्या वैज्ञानिक तंत्रांच्या साहाय्याने शेती करू लागल्याचा हा परिणाम आहे. " युरोपने आपली अन्नधान्याची गरज अमेरिकेतील अन्नधान्यावर भागवावी आणि युरोपात फक्त औद्योगिक उत्पादन आणि व्यापार यांचेवर लक्ष केंद्रित करावे असे कोणी म्हणतात. ' उचलली जीभ आणि लावली टाळ्याला ' असलाच हा प्रकार आहे." एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस माल्थसने हे लिहिले. पण, कोणी का लढविली असो, ही कल्पना मुळीच अचाट ठरली नाही हे आज दिसते आहे.

विशाल अर्थव्यवस्थेशी तंत्रविद्येच्या विकासामुळे शेतीची सांगड कशी घातली जाते व तिचे काय परिणाम होतात ते आपण पाहिले. वैज्ञानिक तंत्रविद्येमुळे औद्योगिक क्षेत्रात घडून आलेली संभरणाची प्रक्रिया अधिक व्यापक व अधिक खोलवरची आहे.

पूर्वीच्या मानाने शहरातून राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण खूप वाढले आहे. हा औद्योगीकरणाचा एक चटकन लक्षात येणारा परिणाम होय. शहरात राहणारा माणूस हा ग्रामीण शेतकऱ्याहून अधिक ' समाजशील ' असतो आणि सभोवतालच्या चालणाऱ्या विचार मंथनाने तो पुष्कळच

अधिक प्रभावित होतो. तो पोटासाठी काम करतो. त्याठिकाणी बहुधा अनेकांच्या जमावात त्याला काम करावे लागते. आणि करमणूकीसाठी तो जिथे जातो तिथे तर माणसांची खूप गर्दीच असण्याची शक्यता पुष्कळ असते. ऊन-पाऊस, दिवस-रात्र, ऋतुबदल या नैसर्गिक फेरबदलांचा त्याच्या चाकोरीमय दिनचर्येवर फरक पडत नाही. अतिवृष्टि, अतिगारठा वा पावसाचे दुर्भिक्ष्य यामुळे आपला सर्वनाश होईल अशी भीति वाटण्याचे त्याला कारण नसते. त्याच्या भोवतालचे मानवनिर्मित जग आणि विविध संस्थांमधील त्याचे स्थान या गोष्टींचेच त्याच्या लेखी महत्त्व असते.

कारखान्यात काम करणारा एक साधा माणूस घ्या आणि त्याच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या अनेकविध संस्था व संघटनांचा विचार करा. तो काम करतो तो कारखाना आणि तो कारखाना ज्या उद्योगसमूहाचा भाग आहे तो उद्योगसमूह यांचा क्रमांक पहिला. त्याची कामगार संघटना आणि राजकीय पक्ष या त्याच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या दुसऱ्या क्रमांकाच्या संघटना होत. याखेरीज, त्याचे राहते घर बहुधा एखाद्या घर-बांधणी संस्थेकडून किंवा सरकारी वा स्थानिक स्वराज्य संस्थेकडून त्याला उपलब्ध झालेले असते. त्याची मुले शाळात जातात. तो वाचतो ते वर्तमान पत्र, पाहतो तो चित्रपट, किंवा पाहतो तो फुटबॉलचा सामना, या सर्वच गोष्टी विराट संघटनांकडून त्याला पुरविल्या जातात. या कामगाराच्या कारखान्याचा मालक ज्यांच्याकडून कच्चा माल विकत घेतो व ज्यांना आपला पक्का माल विकतो त्या संघटनांवरहि पर्यायाने या कामगाराचे जीवन अवलंबून असते. या सर्वांहून वरचढ अशी शासनसंस्था असतेच. ती त्याच्या-कडून कर वसूल करते, आणि कोणत्याहि क्षणी त्याला लष्करात भरती करून मारायला वा मरायला आघाडीवर पाठवू शकते. याच्या मोबदल्यात शांततेच्या काळात ती खून आणि चोरीमारी यापासून त्याला संरक्षण देते आणि पोटापाण्यास पुरेल इतके अन्नपाणी पुरविते.

आजच्या इंग्लंडमधील एखादा भांडवलदार जरी घेतलात तरी त्याचेही जीवन या सामान्य मजुराइतकेच बंदिस्त झालेले आहे. किंबहुना अशी तक्रार

तो स्वतः सारखा करीतच असतो. ज्या शासनसंस्थेचा त्याला तिटकारा त्याच शासनसंस्थेला तो आपल्याला होणाऱ्या नफ्याचा निम्मा वा निम्म्याहून अधिक भाग कर म्हणून देतो. त्याच्याकडून होणाऱ्या भांडवलगुंतवणुकीवर कडक नियंत्रण असते. प्रत्येक गोष्टीसाठी त्याला परवाना मिळवावा लागतो, आणि परवाना मिळविण्यासाठी कारणे दाखवावी लागतात. आपला पक्का माल कोठे विकावा याबद्दलहि सरकारचे त्याला काही तरी सांगणे असतेच. त्याचा कच्चा माल जर डॉलर-चलन प्रदेशातून आयात होत असेल तर कच्चा माल मिळविणेही प्रसंगी त्या बिचाऱ्याला कठीण असते. नोकरांचा संप उद्‌भवण्याची टांगती तलवार एकीकडे त्याच्या डोक्यावर लोंबकळत असते, तर दुसरीकडे बाजारात अचानक मंदी येऊन आपला व्यापार बसेल की काय या काळजीने तो सदैव ग्रासलेला असतो. आपले विम्याचे हप्ते आपल्याला न चुकता भरता येतील की नाही याची त्याला चिंता असते. युद्ध सुरू झाले असून आपला कारखाना उध्वस्त झाला आहे, आपले घर धुळीला मिळाले असून बायकामुले त्यात सापडून मेली आहेत, अशा भलत्यासलत्या स्वप्नांनी भयभीत व घामाघूम होऊन तो रात्री अपरात्री जागा होतो. अशा अनेकविध संस्था आणि संघटनांनी त्याच्या स्वातंत्र्याचे अपहरण होत असतानाहि दुसरीकडे अशा नवनवीन संघटना निर्माण करण्याचे त्याचे उद्योग चालूच असतात. नाटो करार[३२], नवीन सैन्यदले, कारखानदारांच्या संघटना, पार्लमेंटमध्ये आपल्या बाजूने भांडणारे गट, अशा विविध संघटना तो उभारीत असतो. कधी कधी, जुन्या आठवणी येऊन पूर्वीसारखी खुली अनिर्बंध स्पर्धा असती तर किती बरे झाले असते असे तो तोंडाने म्हणत असला तरी, त्याला एक गोष्ट पक्की माहीत असते की, ते दिवस कधीच गेले. ज्या संघटना व संस्था आपल्या हितसंबंधांच्या आड येतात त्यांच्यापासून प्रभावी संरक्षण हवे असेल तर प्रतिस्पर्धी संघटना उभ्या करून लढत देणे हा एकच मार्ग आहे. आपण एकाकी पडलो, किंवा आपले राष्ट्र एकाकी पडले, तर आपले हाल कुत्रा खाणार नाही, या दोन्ही गोष्टी त्याला माहीत आहेत.

समाजात संघटनांचे जाळे वाढत आहे तसतशी नवी सत्तास्थाने निर्माण होत आहेत. कोणत्याही संघटनेचे कामकाज पाहण्यासाठी पदाधिकारी

०३७२६

नेमावे लागतात; दैनंदिन व्यवहारात त्या संघटनेची सत्ता त्यांच्या हातात केंद्रित होणे मग अपरिहार्य ठरते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांवर नियंत्रण नसते असे नाही. पण संघटनेची चक्रे फिरून नियंत्रण प्रभावी होण्यास बराच कालावधि लागतो, क्वाचित् असे नियंत्रण फार दूरस्थ असते. पोस्ट ऑफिसात तिकिटे विकणाऱ्या मुलीपासून ते पंतप्रधानापर्यंत प्रत्येक अधिकाऱ्याच्या हातात त्या त्या क्षणापुरता राज्यसंस्थेच्या सत्तेचा काही एक अंश असतो. पोस्टातल्या मुलीने उद्धटपणे वर्तन केल्यास तिच्याविरुद्ध तुम्हाला तक्रार करता येते. आणि पंतप्रधानांचे धोरण नापसंत असले तर पुढील निवडणुकीत त्याचा तुम्ही पराभव करू शकता. पण तुमच्या तक्रारींचे निवारण होईपर्यंत ( ते झाले असे आपण गृहीत धरले तरी ) दरम्यानच्या काळात ती मुलगी किंवा तो पंतप्रधान आपापल्या हातातली सत्ता गाजवीतच असतात. प्रशासकांच्या हातातील वाढत्या सत्तेचा जाच इतर सर्वांना सारखा वाटत असतो. सर्वच देशातील अधिकारी इंग्लिश अधिकाऱ्याइतके विनयशील नसतात. विशेषतः पोलिस, आणि त्यातल्या त्यात अमेरिकन पोलिस, तुम्ही गुन्हेगार आहात असे गृहीत धरूनच तुमच्याशी वागतो. सज्जन माणूस फारच विरळा आहे अशी त्याची जणू खात्री झालेली असावी. समाजाची संघटना दिवसेंदिवस अधिक व्यामिश्र, गुंतागुंतीची होत चालल्यामुळे घडून येणारा सगळ्यात धोकादायक परिणाम प्रशासकांची वाढती अरेरावी व दंडेली हा आहे. सत्तेचा मद चढलेली मूठभर वशिल्याची तट्टे सोडून इतर सर्वसामान्य नागरिकांना विज्ञानप्रणीत समाजरचनेत राहणे असह्य व्हावयाचे नसेल तर प्रशासकांना वेसण घालण्याचे मार्ग शोधून काढणे अतिशय महत्त्वाचे आहे. पण, मी विज्ञानाचे परिणाम निवेदन करीत असून सुधारणांचा कार्यक्रम सुचवीत नसल्याने, इथेच थांबतो.

तात्त्विक दृष्ट्या जनतेची सत्ता ही अंतिम व निर्णायक मानली गेली असली तरी प्रत्यक्षात प्रशासकांची सत्ता ही जनतेच्या सत्तेहून वेगळी आणि स्वतंत्र असते. बड्या कॉर्पोरेशन्सच्या डायरेक्टर मंडळींची निवड औपचारिक दृष्ट्या कॉर्पोरेशनचे भागधारक करीत असले तरी प्रत्यक्षात, नाना युक्त्या प्रयुक्त्यांचा उपयोग करून, या व्यक्ति संचालकत्व आपल्या

हाती कायम ठेवीत असतात आणि त्यांना हव्या असलेल्या व्यक्तींनाच नव्याने संचालक-मंडळावर दाखल करून घेतात. वरपांगी अर्थात् निवडणुकीचा औपचारिक देखावा पार पाडण्यात येतो. पक्षांने जाहीरपणे स्वतःला बांधून घेतलेले कार्यक्रम सोडले तर इतर सर्व बावींवर कायम सनदी नोकरच आपली धोरणे मंत्र्यांवर लादीत असतो, सनदी नोकरांवर नियंत्रण ठेवणे मंत्र्यांना शक्य होत नाही ही गोष्ट ब्रिटिश राजकारणात तर सर्वश्रुत आहे. पुष्कळ देशातून लष्कर नागरी सत्तेला धाब्यावर बसवील अशी शक्यता अधिक आहे. पोलिस खात्याबद्दल मी वर सांगितले आहेच, पण याच स्वरूपाचे याहूनहि अधिक पोलिसांबद्दल लिहिता येण्यासारखे आहे. ज्या राष्ट्रात संयुक्त मंत्रिमंडळात कम्युनिस्टांचा प्रवेश होतो तेथे ते पोलीस आणि अंतर्गत सुरक्षा दल ही खाती आपल्या हाती येतील असा प्रयत्न करतात. एकदा या खात्यांवर प्रभुत्व मिळाले की बनावट कट 'उघडकीला' आणणे, त्या निमित्ताने धरपकडीचे सत्र सुरू करणे, आणि कबुलीजबाब मिळविणे या गोष्टी राजरोस सुरू होतात. या पद्धतीने, संयुक्त मंत्रिमंडळातील खोटे सहभागी पक्ष ही आपली जुनी भूमिका बदलून, लौकरच सर्व सरकारच आपल्या हाती ते घेतात. पोलिसांनी कायद्याचे उल्लंघन करू नये म्हणून काय उपाय योजना करावी हा प्रश्न बिकट आहे, आणि त्याची सोडवणूकही अद्याप होऊ शकलेली नाही. उदाहरणार्थ, निरपराध नागरिकांवर अत्याचार करून न केलेल्या गुन्ह्यांचे कबुलीजबाब मिळविल्याचे अनेक प्रकार अमेरिकेसारख्या लोकशाहीतही घडल्याची उदाहरणे आहेत.

प्रशासकांची वाढती सत्ता हा समाजसंघटनेच्या वाढत्या व्यामिश्रतेचा अपरिहार्य परिणाम आहे. पूर्वीच्या काळी सम्राटांच्या खाजगीकडील कंचुकी वा राण्या पडद्याआडून राज्य चालवीत. आधुनिक समाजात प्रशासकांच्या हाती एकवटणारी सत्ता देखील अशी पडद्याआडचीच असते आणि म्हणून तीहि कंचुकी वा राण्या यांच्या हातातील सत्तेसारखी बेजबाबदार असण्याचा संभव अधिक असतो. प्रशासकांच्या हाती सत्ता असण्याचा हा एक गंभीर धोका आहे. प्रशासकांवर नियंत्रण कसे ठेवता येईल हा आजच्या युगातील सर्वांत महत्त्वाचा राजकीय प्रश्न आहे. राजा आणि उमराव यांच्या हातातील सत्ते-

विरुद्ध उदारमतवाद्यांनी यशस्वी झगडा दिला, भांडवलदारांच्या हातातील सत्तेविरुद्ध समाजवादी झगडले; पण प्रशासकांच्या सत्तेवर जर नियंत्रण ठेवता आले नाही तर समाजवाद्यांची मेहनत फुकट जाईल. काय होईल की, पूर्वी भांडवलदारांच्या हाती असलेली सत्ता प्रशासकांच्या हाती जाईल, म्हणजे, एक मालक सोडून दुसरा मालक उरावर बसवून घेतला एवढेच कार्य समाजवादी लढ्याने केले असे होईल. १९४२ साली अमेरिकेतल्या ग्रामीण भागात मी राहत होतो. त्यावेळी एक माळी थोडा वेळ येऊन माझे बागकाम करीत असे. हा माळी दारुगोळ्याच्या कारखान्यात नोकरीला होता. एके दिवशी त्याने मला अभिमानाने सांगितले की त्याच्या कामगार संघटनेला एकमेव अधिकृत संघटना म्हणून कारखान्याच्या चालकांनी मान्यता दिली आहे. पुढे काही दिवसांनी तो कडवट चेहरा करून सांगत आला की युनियनची वर्गणी वाढविली गेली असून युनियनच्या वाढलेल्या उत्पन्नाचा उपयोग चिटणीसाची पगारवाढ करण्यात पूर्णपणे खर्ची पडणार आहे. कामगार आणि भांडवलदार यांच्यातील ‘ युद्ध परिस्थिति ’ लक्षात घेता, चिटणीसाच्या या कृत्याबद्दल चळवळ केल्यास तो द्रोह ठरला असता. ज्या संघटनेची कार्यपद्धति कागदावर तरी संपूर्णपणे लोकशाहीची आहे अशा ठिकाणीहि आपणच निवडून दिलेल्या अधिकाऱ्यांसमोर सर्वसामान्य माणसांची कशी असहाय्य अवस्था होते ते या लहानशा उदाहरणावरून स्पष्ट होईल.

आपल्या अधिकारात असलेल्या गोष्टींशी प्रशासकांचा फार दूरान्वयाने संबंध असण्याचा संभव असतो हा सनदी प्रशासक पद्धतीचा मुख्य दोष आहे. शिक्षणखात्यात काम करणाऱ्या अधिकाऱ्याला शिक्षणक्षेत्रातील अनुभव वा ज्ञान कितीसे असते? पांचपंचवीस वर्षांपूर्वीच्या शाळेतल्या वा कॉलेजच्या काही पुसट आठवणी तेवढ्या फारतर असतात. शेतकी मंत्रालयाला मॅंगोल्डवूझेल्सबद्दल[३३] काय माहीत असते; त्यांना बहुधा या शब्दाचे स्पेलिंग माहीत असावे ! परराष्ट्रीय खात्याला आधुनिक चीनमधील घडामोडींची प्रत्यक्ष माहिती किती आहे? १९२१ साली चीनमधून परतल्यावर अतिपूर्वेसंबंधी धोरण ठरविणाऱ्या परराष्ट्रीय खात्याच्या काही सनदी नोकरांशी मला काम पडले. त्यावेळी, त्यांच्या चीनबद्दलच्या अज्ञानापेक्षा एक त्यांची

घमेंडच जास्त होती असे मला आढळले. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची 'हांजी हांजी' करणारांची एक ' होयबा ' जातच अमेरिकन लोकांनी बनवून टाकली आहे. कल्पक, साहसी आणि बुद्धिमान लोकांनी सुचविलेल्या गोष्टी चतुराईने हाणून पाडणे, त्यांना धूर्तपणाने विरोध करणे यासाठी आपल्या अज्ञानाचा हुशारीने उपयोग करणे हाच ज्यांनी आपला पेशा केला आहे अशा 'नाहीबा' लोकांचा जाच इंग्लंडला अधिक आहे. अमेरिकेतील ' होयबा ' पेक्षा आमचे ' नाहीबा ' शतपटीने घातकी ठरतील अशी मला भीति आहे. स्वभावतः अंगचुकार असलेल्या मूर्खपंडितांच्या जीवघेण्या नियंत्रणाखालून साहस आणि उपक्रमशीलता यांची मुक्तता केल्याशिवाय इंग्लंडची पुन्हा भरभराट होणार नाही.

व्यक्तिस्वातंत्र्याला सामाजिक संघटनेमुळे पडणाऱ्या मर्यादांची चर्चा मिल्[३४] आणि इतर उदारमतवाद्यांनी केली होती. पण आज संघटनांचा समाजातला वाढलेला पसारा व गुंतागुंत पाहता व्यक्तिस्वातंत्र्यावरील मर्यादांची चर्चा सर्वस्वी नव्याने करावी लागेल. सामान्यपणे वैयक्तिक कृतींना फारसे महत्त्व आज उरलेले नाही. संघटित गटांकडून होणाऱ्या कृति पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाच्या बनल्या आहेत. उदाहरणार्थ, काम न करण्याची गोष्ट घ्या. जर एखाद्या व्यक्तीने आपणहून बेकार राहण्याचे ठरविले तर ती त्याची वैयक्तिक खुषी मानली जाईल. अर्थात स्वतःची मिळकत त्याला गमवावी लागेल. पण समाजाला त्याच्या कृतीची पर्वा करण्याचे कारण नाही. तेच, समजा एखाद्या मूलभूत निकडीच्या उद्योगधंद्यात संप घडून आला तर, त्याचा परिणाम सगळ्या समाजाला भोगावा लागतो. संपाचा हक्कच काढून घेतला जावा असे मला सुचवावयाचे नाही. पण, कामगारांना संपाचा हक्क द्यायचा असेल तर, तो त्या उद्योगधंद्यातील कामाच्या परिस्थितीशी संबंधित प्रश्नांवरच फक्त दिला जावा, व्यक्तिस्वातंत्र्याच्या व्यापक तत्त्वासाठी दिला जाऊ नये. औद्योगिक-दृष्ट्या पुढारलेल्या आणि व्यामिश्र समाजसंघटन असलेल्या देशात अशा अनेक गोष्टी असतात की ज्यांचा सर्वच लोकांच्या जीवनाशी घनिष्ठ संबंध येतो. अशी एखादी गोष्ट जर बंद पडली तर लोकांचे फार हाल होतात. म्हणून एकंदर समाजव्यवस्थाच अशी असावी की मोठमोठ्या गटांना आपले हितसंबंध

सुरक्षित राखण्यासाठी संपावर जाण्याची गरज सहसा पडू नये. कम्युनिस्ट हुकूमशाहीत दंडेली किंवा भूकमार करून संप मोडून काढले जातात. हा एक मार्ग आहे. दुसरा मार्ग लवाद व तडजोडीचा आहे. औद्योगिक समाजाची भरभराट व्हावयाची असेल तर वरील दोनपैकी कोणता तरी एक मार्ग पत्करायलाच हवा.

संपाच्या तुलनेत युद्ध ही फार आत्यंतिक कृति आहे. पण, तत्त्वतः, युद्धाने निर्माण होणारे प्रश्न संपाच्या उदाहरणाशी समांतर असे आहेत. दोन माणसे आपापसात द्वंद्वयुद्ध खेळतात तेव्हा समाजाच्या दृष्टीने ती घटना अतिशय किरकोळ असते. पण वीस कोटी माणसे दुसऱ्या वीस कोटी माणसांशी युद्ध करतात तेव्हा ती घटना गंभीर स्वरूप धारण करते. समाजाची संघटना जितकी अधिक व्यामिश्र तेवढीच युद्ध ही अधिकाधिक गंभीर बाब बनते. विसाव्या शतकापूर्वीच्या युद्धात, नेपोलियनच्या कारकीर्दीतील युरोपीय युद्धांचे उदाहरण घेतले तरी, प्रत्यक्ष युद्धात भाग घेणाऱ्या राष्ट्रातील बहुसंख्य नागरिकांचे दैनंदिन व्यवहार आणि उद्योगव्यवसाय युद्धकालातदेखील नेहमीच निर्वेधपणे चालू राहत. आज, युद्धकालात, जवळजवळ प्रत्येक स्त्रीपुरुषाला कमीअधिक प्रमाणात युद्धोपयोगी कार्यात भाग घ्यावाच लागतो. युद्धकालात पूर्वीच्या दैनंदिन जीवनाची घडी इतकी विस्कटून गेलेली असते की, दीर्घकाळानंतर, जेव्हा युद्ध संपून शांततेचा काळ अवतरतो तेव्हा, युद्ध पुरवले पण पुन्हा नव्याने जीवन सुरु करणे नको असे होऊन जाते. दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाल्यानंतरच्या काळात मध्य युरोपीय राष्ट्रातील असंख्य स्त्रिया, पुरुष व मुले समाजाची घडी उध्वस्त झाल्याने निर्माण झालेल्या रोगराई, उपासमार, थंडी या आपत्तींनी हालहाल होऊन मेली. यातून जे लक्षावधि लोक जगले वांचले ते निर्वासित व बेकार अवस्थेत निराश होऊन उध्वस्त, भटके जीवन जगत राहिले. त्यांचे जीवन त्यांना एक ओझेच आहे; त्यांना खाऊपिऊ घालणाऱ्यांनाहि ते भारभूत होऊन बसले आहे. व्यामिश्र व अतिशय संघटित समाजात युद्धकालीन विध्वंस आणि युद्धातील पराभव यामुळे जेव्हा अराजक माजते तेव्हा त्याचा वरील सारखा परिणाम घडून येणे साहजिक आहे.

वैज्ञानिक तंत्रविद्येवर चालणाऱ्या जगात संपाच्या हक्कासारखाच, पण त्याहून हजारोपटींनी, युद्ध करण्याचा हक्क हा महाघातकी हक्क आहे. दोन्ही प्रकारचे हक्क लेखणीच्या फटकाऱ्याने नष्ट करता येणार नाहीत, कारण, हे हक्क असे नष्ट केले तर सर्वंकष हुकूमशाहीला मुक्तद्वार होईल. स्वातंत्र्याच्या नांवाखाली दुसऱ्यांच्या हितावर किंवा जीवितावर आघात करण्याचा हक्क कोणत्याहि सबबीवर समर्थनीय ठरत नाही हे, संप आणि युद्ध या दोन्ही प्रकारच्या हक्कांच्या बाबतीत मान्य व्हायलाच हवे. राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा आत्यंतिक व अमर्याद आग्रह, एक तत्त्व म्हणून, एकोणिसा व्या शतकातील उदारमतवाद्यांनी राखला होता आणि आजचे रशियाचे राज्यकर्ते तसा आग्रह धरीत आहेत. पण या आग्रहातून युद्ध उद्‌भवण्याची शक्यता असल्याने तो यापुढे सोडला पाहिजे. राष्ट्राराष्ट्रातील संबंधात ‘ कायद्याचे अधिराज्य ’ निर्माण करण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे, ज्यायोगे आजच्याप्रमाणे प्रत्येक राष्ट्र आपल्या स्वार्थासाठी ‘ करीन ती पूर्व ’ असे वागायला स्वतंत्र राहणार नाही. ‘ कायद्याचे अधिराज्य ’ प्रस्थापित करण्यात आपण यशस्वी झालो नाही तर पुन्हा लौकरच जगात ‘ बळी तो कान पिळी ’ हा जंगलचा कायदा सुरु होईल. त्या परिस्थितीत होणाऱ्या युद्धात विज्ञान आणि वैज्ञानिक तंत्रविद्या या दोहोंचाहि नाश होईल. युद्धोत्तर उध्वस्त जगात वैज्ञानिक तंत्रविद्यांच्या अभावी समाज संस्कृतिपूर्व प्राथमिक अवस्थेत परत जाऊन पोचेल. अशा विघटित समाजात माणसाला मनसोक्त मारामाऱ्या करता येतील. कारण या मारामाऱ्यांनी सारा समाज धोक्यात येईल इतकी एकजीव संघटना असलेला समाजच अस्तित्वात नसेल. दुर्दशावस्थेत सर्वनाश करून घेण्यापेक्षा जिवंत राहून सुखाचे जीवन जगावे अशा प्रकारचा निवाडा मानवजात करेल अशी शक्यता अर्थातच आहे. तसा निवाडा मानवजातीने केला तर राष्ट्रीय सार्वभामत्वावर प्रभावी मर्यादा घालाव्या लागतील.

स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा सर्वस्वी नव्या दृष्टिकोनातून विचार केला जाण्याची आवश्यकता असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट झाले आहेच. ज्या मुद्यांवर व्यक्तीला स्वातंत्र्य असायला हवे त्या बाबींसंबंधी नेमके

व्यक्तिस्वातंत्र्याचे अपहरण होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या उलट, काही स्वातंत्र्याचे प्रकार अनिष्ट आहेत, पण त्यांच्यावर बंधन घालणे दुष्कर बनले आहे. दोन दिशांनी संकट चालून येत आहे आणि दोन्ही संकटे अधिक गंभीर बनत चालली आहेत. कसल्याहि संघटनेत अधिकाऱ्यांची सत्ता (विशिष्ट संघटनेच्या संदर्भात 'अधिकार रूढ गटा' ची किंवा 'शासनयंत्रणे' ची सत्ता असे म्हणता येईल) सर्वंकष होत जाण्याकडे कल आढळतो. या वाढत्या सत्तेच्या जुलमी दास्याला प्रत्येक संघटनेतील सभासद व्यक्ति बळी पडत आहेत. त्याचवेळी, संघटनेमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींवरील संघटनेच्या वाढत्या हुकुमतीच्या समप्रमाणात, संघटनांचे आपसातील संघर्ष समाजस्वास्थ्याला अधिकाधिक अपायकारक होत चालले आहेत. संघटनांतर्गत दडपशाही आणि संघटनासंघटनांमधील हानिकारक संघर्ष या अेकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्ही प्रवृत्तींचा उगम सत्तेच्या लालसेतून होतो. अंतर्गत राज्यकारभारात हुकूमशाही पद्धतींचा अवलंब करणारे राज्य आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आक्रमक युद्धपिपासू भूमिका घेते. कारण देशांतर्गत आणि जगात, दोन्ही ठिकाणी, अधिकाधिक माणसांच्या जीवनावर सर्वांगीण व सर्वंकष सत्ता गाजविण्याची आकांक्षा अशा राज्यातील राज्यकर्त्यांची असते. राज्यांतर्गत व्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण करायचे आणि त्याचवेळी आंतरराष्ट्रीय व्यवहारात प्रत्येक राष्ट्राला असलेल्या स्वातंत्र्याचा संकोच घडवून आणावयाचा अशी दुहेरी समस्या जगापुढे आहे. विज्ञानप्रणीत समाजांचा सर्वनाश टाळायचा असेल तर या दुहेरी समस्येची सोडवणूक लौकरात लौकर केली पाहिजे.

व्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण करणे आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाला मर्यादा घालणे या दुहेरी समस्येच्या सोडवणुकीशी निगडित असलेल्या समूहमानस-शास्त्राचा विचार करू या.

संघटनांचे दोन प्रकार असतात. काही संघटनांची उद्दिष्टे भावात्मक असतात. त्यांना काही गोष्टी घडवून आणावयाच्या असतात. दुसऱ्या काही संघटना असतात, ज्यांचे काम प्रतिबंधात्मक असते. घडणाऱ्या काही गोष्टी त्यांना थोपवून धरायच्या किंवा हाणून पाडावयाच्या असतात. पोस्ट

ऑफिस हे पहिल्या प्रकारच्या तर फायर ब्रिगेड हे दुसऱ्या प्रकारच्या संघटनेचे उदाहरण आहे. या दोन्ही प्रकारच्या संघटनांबद्दल वादंग माजत नाही. पत्रे पोचविण्याच्या कामाला कोणाचा विरोध नसतो. इमारती जाळून खाक व्हाव्यात अशी इच्छा आगलाव्या गुंडांना देखील जाहीरपणे प्रकट करण्याची हिंमत होण्याची शक्यता नाही. पण प्रतिबंध करावयाची घटना नैसर्गिक आपत्तीच्या स्वरूपाची नसून मानवी कृतीच्या स्वरूपाची असते तेव्हा निवाडा करणे सोपे नसते. प्रत्येक राष्ट्र आग्रहाने असे सांगत असते की आमची सैन्यदले ही केवळ आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी आहेत. त्याचवेळी, त्या राष्ट्रातील नागरिकांची अशी पक्की खात्री असते की, परराष्ट्राची सैन्यदले मात्र आक्रमण करण्यासाठी आहेत. मायदेशाच्या सैन्याविरुद्ध तुम्ही टीका केलीत तर पारतंत्र्यात देश चिरडलेला पाहण्याची इच्छा असलेला राष्ट्रद्रोही म्हणून तुमची संभावना होते. दुसरीकडे, संभाव्य शत्रू राष्ट्राजवळचे सैन्य त्या राष्ट्राला स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे असे तुम्ही म्हणालात तर, स्वतःच्या देशाच्या अविचल शांततावादी भूमिकेविरुद्ध संशय घेणारी तुमची बुद्धि विकृत द्वेषगंडाने पछाडलेली आहे या संशयाला, आणि मायभूमीची बदनामी करीत आहोत, या आरोपाला, तुम्ही पात्र ठरता. १९३६ साली, हिटलरवर स्तुतिसुमने उधळण्याच्या ओघात, एका सभ्य, कुलीन जर्मन स्त्रीने जर्मनीच्या संदर्भात नेमकी अशा अर्थाची टीका जर्मन व्यक्तींवर केलेली मी स्वतः ऐकली आहे.

इतर आक्रमक, लढाऊ संघटनांनाहि हे विवेचन लागू पडते. इतर संघटनांच्या बाबतीत राष्ट्रद्रोहासारखे गंभीर आरोप केले जात नाहीत हे वेगळे. भांडवलदारांच्या विरुद्ध चाललेल्या झगड्यात आपली कामगार संघटना दुबळी ठरू नये म्हणून पेनसिल्व्हानियामधील माझा माळी जाहीर पणे आपल्या युनियनच्या सेक्रेटरीवर टीका करीत नसे. उत्कट राजकीय निष्ठा असलेल्या व्यक्तीला आपल्या राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांचे दोष किंवा प्रतिस्पर्धी पक्षाच्या पुढाऱ्याचे गुण मोकळेपणे मान्य करणे हे अवघड जाते.

वरील विवेचनातून निष्पन्न होणारे तात्पर्य असे की, ज्यावेळी एखादी संघटना आक्रमक पवित्रा घेते त्यावेळी त्या संघटनेतील सभासद संघटनेच्या

पदाधिकाऱ्यांवर टीका करण्यास अनुत्सुक असतात; आणि एरवी अधिकाऱ्यांच्या हडेलहप्पीविरुद्ध, आपल्या हाती सर्वाधिकार घेण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध ज्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला असता अशा व्यक्तींचा कलदेखील, संघटना युद्धसज्ज आहे असे पाहून, सर्वाधिकारशाही आणि हडेलहप्पी निमूटपणे मान्य करण्याकडे होतो. युद्धपिपासू वृत्ति जागृत झाली की अधिकारी आणि राज्यकर्ते यांचे फावते. आपल्या सभासदात युद्धपिपासू वृत्ति जागृत करण्याकडे संघटनातील अधिकारी आणि राज्यकर्ते यांचा कल असावा हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. जास्तीतजास्त संघर्षांचा निकाल बाहुबलाच्या जोरावर न लागता सनदशीर मार्गांनी, म्हणजेच, कायद्याच्या आधारे, लावला जाणे हा विनाशक परिणामातून बचावण्याचा एकमेव मार्ग आहे. इथेहि आपण हेच अनुभवतो की, संघटनांतर्गत व्यक्तिस्वातंत्र्याचे संरक्षण आणि संघटनाबाह्य स्वातंत्र्याला मर्यादा या दोन्ही गोष्टी अन्योन्याश्रयी आहेत. आणि या दोन्ही स्वातंत्र्यांचे अस्तित्व ‘कायद्याच्या अधिराज्या’ चा विस्तार करण्यावर, म्हणजे वरकरणी स्वातंत्र्यावर बंधने मान्य करण्यावर, आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक लोकशक्ति निर्माण करण्यावर, अवलंबून आहे.

या प्रकरणातील येथवरच्या माझ्या विवेचनात वैज्ञानिक तंत्रविद्येपासून झालेल्या उपकारक परिणामांवर मी पुरेसा भर दिला नाही असे मला वाटते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सर्वसामान्य अमेरिकन नागरिकाचे जीवनमान अठराव्या शतकातील इंग्लंडमधील सामान्य नागरिकाच्या जीवनमानापेक्षा कितीतरी अधिक संपन्न आहे. या अभूतपूर्व प्रगतीचे श्रेय सर्वस्वी वैज्ञानिक तंत्रविद्येला आहे. इंग्लंडमधील आजच्या सामान्य नागरिकाचे जीवनमान, अठराव्या शतकाच्या मानाने अधिक संपन्न असले तरी, अमेरिकेइतकी संपन्नतेत वाढ झालेली नाही. ती कमी असण्याचे कारण, जर्मनीशी दोन महायुद्धे खेळण्यात इंग्लंडची फार मोठी शक्ति कामी आली. पण इंग्लंडमध्येहि भौतिक सुखात झालेली वाढ प्रचंड आहे. टंचाईची परिस्थिति असूनहि जवळ जवळ सर्वांना आरोग्यसंपन्न व सशक्त राहण्यास पुरेल इतका आहार मिळतो. हिवाळ्यात थंडीत गारठण्याची पाळी क्वचितच कोणावर येते, आणि सायंकाळ झाल्यावर दिवाबत्तीशिवाय कोणाला रात्री

काढाव्या लागत नाहीत. युद्धाचे दिवस सोडले तर रस्त्यात मिट्ट काळोख असत नाही. सगळी मुले शाळेत जातात. औषधपाणी प्रत्येकाला मिळू शकते. अठराव्या शतकापेक्षा शांततेच्या काळात जीवितवित्ताची सुरक्षितता आज अधिक आहे. पूर्वीच्या मानाने फार थोडे लोक गलिच्छ वस्त्यातून राहतात. प्रवास अधिक जलद व सुखाचा झाला आहे. पूर्वीच्यापेक्षा किती तरी विविध करमणुकीचे प्रकार उपलब्ध आहेत. निव्वळ आरोग्यसंपन्नतेचा जरी विचार केला तरी गतकालापेक्षा, (ज्याच्याविषयी काही हळहळून आठवणी काढतात,) आजचे दिवस केव्हाहि परवडले. अमीर-उमराव सोडले तर इतरांच्या दृष्टीने पूर्वीच्या कोणत्याहि युगापेक्षा आजचे युग सरस आहे असे मला वाटते.

विज्ञानपूर्व कालापेक्षा श्रमाची अनेक पटींनी वाढलेली उत्पादनक्षमता हे आपल्या युगाच्या वरचढपणाचे जवळजवळ एकमेव कारण आहे, त्याच वेळात पूर्वीपेक्षा आज किती तरी अधिक काम उरकता येते. मी एका टेकडीवर राहत असे. सभोवती गर्द झाडी होती. सरपण मला हवे तेवढे सहज या झाडीतून मी गोळा करू शकत असे. आणि तरी देखील, झाडीतून इन्धनशक्तीची क्ष मापे होतील इतके सरपण गोळा करायला जेवढे श्रम लागत त्यापेक्षा, तेवढ्याच इंधनशक्तीचा कोळसा खाणीतून काढून व अर्धे इंग्लंड ओलांडून माझ्या दारात आणून पोचविण्यास कमी श्रम लागत. कारण, खाणीचे आणि वाहतुकीचे काम वैज्ञानिक तंत्रविद्येच्या साहाय्याने केले जात होते. या उलट, झाडीतून सरपण गोळा करायचे म्हणजे माझे हात मला वापरावे लागत. जुन्याकाळी आपल्या गरजेइतकेच जेमतेम एक माणूस स्वतःच्या श्रमातून पिकवू शके. मूठभर श्रीमंत ऐषआरामात आणि ओंजळभर मध्यमवर्ग बऱ्यापैकी सुखात राही; बाकी सर्व लोकांचे जीवनमान जिवंत राहून अंगुळभर वर राहता येईल इतकेच जेमतेम असे. आज आधुनिक तंत्रामुळे आपल्या जवळ जे श्रम 'वांचतात' त्यांचा आपण नेहमीच शहाणपणाने उपयोग करतो असे नाही. आपल्या पूर्वजांपेक्षा आपला किती तरी अधिक वेळ आणि शक्ति आपण युद्धावर खर्च करीत आहोत. 'कायद्याचे अधिराज्य' संघटना संघटनांमधील भांडणातहि लागू करण्यात

आजवर आलेल्या अपयशातून आजच्या युगातील प्रचंड प्रमाणावरील जवळ जवळ सर्व विध्वंस व हानि निर्माण होत आहे असे म्हणता येईल. बाहुबलाच्या जोरावर निवाडा सोपविल्याने कोणत्याहि संघर्षाचे परिणाम आमच्या कार्यक्षमतेच्या समप्रमाणात अधिक विनाशक बनतात. आजच्या वैज्ञानिक तंत्रविद्येची वाढती कार्यक्षमताच अशा रीतीने विध्वंसाचे प्रमाण वाढवीत आहे. मानवी संस्कृति जिवंत राहावयाची असेल तर विज्ञानपूर्व काळात सह्य असलेली दंडेलीची प्रथा आम्हाला मोडली पाहिजे. स्वातंत्र्य जिथे जीवन धोक्यात आणते तिथे आम्ही कायद्याचा आश्रय घेतला पाहिजे.

* * *

## टीपा

१. (ख्रिस्तपूर्व २८७–२१२). श्रेष्ठ ग्रीक गणितज्ञ व संशोधक.

२. रोमन साम्राज्याच्या अस्तापासून, म्हणजे सहाव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंतच्या काळाला मध्ययुग असे म्हणतात.

३. (इ. स. १२१४–९२). इंग्लिश तत्त्वज्ञ व संशोधक. (याचा उल्लेख रसेल यांनी गंमतीने केला आहे.)

४. इंग्लंडच्या जॉन राजाने १२१५ मध्ये आपल्या सरंजामदारांना मूलभूत व्यक्ति स्वातंत्र्य व इतर काही हक्क या सनदेद्वारा बहाल केले. इंग्लिश पार्लमेंटरी राजवटीला या घटनेतून प्रतिष्ठा व वजन प्राप्त झाल्याने इंग्लिश लोकशाहीचा प्रारंभ येथून झाला असे मानता येते.

५. १४८५–१६०३ या काळांतील इंग्लंडचे राजघराणे.

६. ७. ८. सातवा हेन्री (१४८५–१५०८), अकरावा लुई (१४६१–८३), आणि फर्डिनांड व इझाबेला (पंधराव्या शतकाचा उत्तरार्ध) यांनी अनुक्रमे इंग्लंड, फ्रान्स व स्पेन या तीन राष्ट्रांत आपल्या हातात सर्व सत्ता एकत्रित करून आधुनिक राज्यसत्तेचा पाया घातला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...................... वि: ......

९. इंग्लंडमधील या परगण्यात इंग्लिश कापडउद्योग केंद्रित झालेला आहे.

१०. या कायद्याने इंग्लिश जमीनदारांना आपल्या जहागिरीतील गांवकुरणे व जमिनी याना कुंपणे घालून परंपरागत वारसाने शेती करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना बेदखल करणे शक्य झाले.

११. १७७६ साली अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील तेरा ब्रिटिश वसाहतींनी इंग्लंडच्या अन्याय्य राजवटीविरुद्ध पुकारलेल्या लढाईस स्वातंत्र्ययुद्ध म्हटले जाते. या युद्धाचे शेवटी आपल्या अमेरिकन वसाहतींना स्वातंत्र्य देण्याचे इंग्लंडने मान्य केले.

१२. (इ. स. १७४३–१८२६). अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा एक लेखक व अमेरिकेचा तिसरा अध्यक्ष.

१३. (इ. स. १७६५–१८२५). इंग्लंडमधील गिरण्यातून कापूस साफ करण्याच्या यंत्राचे डिझाईन पळवून आणून अमेरिकेत प्रथम कापसाची जीन याने सुरू केली.

१४. ज्या राज्यात गुलामीची प्रथा १८६० पर्यंत अस्तित्वात होती अशी राज्ये पुढील प्रमाणेः **त्यातल्या त्यात उत्तरेकडील** व्हर्जिनिया, केंटुकी, मिसूरी टेनेसी, उत्तर कॅरोलिना, अर्कान्सस, या राज्यातून निग्रो गुलामांची निर्यात कापूस पिकविणाऱ्या ज्या **अगदी दक्षिणेकडील राज्यात** होत असे ती राज्ये अशी मिसिसिपि, अलाबामा, जॉर्जिया व दक्षिण कॅरोलिना.

१५. (१८६१ ते १८६४). गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्यापेक्षा आपण फुटून निघून स्वतंत्र राष्ट्र प्रस्थापित करणार अशी भूमिका अमेरिकेतील दक्षिणी राज्यांनी घेतली. दक्षिणी राज्यांच्या या बंडाचा बीमोड करण्यासाठी झालेली लढाई. या वेळीच अब्राहाम लिंकन हा अमेरिकेचा अध्यक्ष होता.

१६. अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रारंभीच्या वसाहतींच्या प्रदेशाला ' न्यू इंग्लंड ' असे नांव आहे.

१७. (१८०४–६५) कॉब्डेन व ब्राईट (१८११–८९). ब्रिटिश पार्लमेंटचे उदारमतवादी सभासद; खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते. हे दोघेही स्वतः कारखानदार होते.

१८. खिस्तपूर्व सहाव्या शतकातील सामोस या शहर-राज्याचा सुलतान. पृथ्वी सूर्याभोवती फिरत असावी हा पायथॅगोरसचा विचार पाखंडी असल्याने त्याला पॉलिक्रॅटसच्या राज्यातून परागंदा व्हावे लागले.

१९. (खिस्तपूर्व ४२८ मध्ये मृत्यु). ग्रीक तत्त्वज्ञ. सूर्य हा ज्वालाग्राही पदार्थांचा गोळा असून ग्रहांना मिळणारा प्रकाश सूर्यापासून प्राप्त होतो. या व इतर अशा पाखंडी मतांवरून अथेन्स सरकारने ॲनॅक्झॅगोरसला हद्दपार केले होते.

२०. (१२७०–१३४९). फ्रान्सिस्कनपंथीय इंग्लिश धर्मोपदशक. धर्मबाह्य बाबींमध्ये पोपला (रोमन कॅथॉलिक पंथांतील सर्वोच्च धर्मपुरुषाला) अधिकार नसावेत असे याचे मत होते.

२१. (१७३७–१८३९). इंग्लिश विचारवंत. अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांत्यांचा कडवा पुरस्कर्ता. १७९२ साली, प्रख्यात इंग्लिश पंतप्रधान विल्यम पिटच्या कारकीर्दीत टॉम पेनवर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरला असता टॉम पेन फ्रान्सला पळून गेला.

२२. १९३३ ते १९४५ या काळात नाझी जर्मनीचा सर्वाधिकारी.

२३. (इ. स. २७४–३३७). रोमन साम्राज्यातील पहिला ख्रिश्चन सम्राट याने कॉन्स्टॅटिनोपल या शहराची स्थापना केली.

२४. अमेरिकेच्या दक्षिणी राज्यातील एक शहर.

२५. (१५५३–१६१६). इंग्लिश इतिहासकार. राणी पहिल्या एलिझाबेथच्या कारकीर्दीतील सागरी पराक्रमांची कहाणी हाकल्यूतने लिहिली.

२६. रोमन साम्राज्याच्या काळात युरोपच्या मोठ्या प्रदेशात घनदाट अरण्ये होती व या अरण्यातून रानटी टोळ्या वास करीत होत्या. उत्तर आफ्रिकेतहि आजच्यासारखे वाळवंट नसून घनदाट अरण्ये होती.

२७. फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या काळात १८१२ मध्ये फ्रान्सचा सर्वाधिकारी नेपोलियन याचे दिग्विजयी सैन्य मॉस्कोच्या वेशीपर्यंत जाऊन पोंचले. पण रशियातील कडक हिवाळ्याने सैन्याचे हाल इतके भयानक वाढले की लढाई न होताच नेपोलियनला माघार घ्यावी लागली. या परतीच्या प्रवासात लाखो सैनिक थंडीने, उपासमारीने हाल हाल होऊन मेले.

२८. ( १८४९-१९३६ ). श्रेष्ठ रशियन शरीरविज्ञानशास्त्रज्ञ. शरीरातील मज्जासंस्था, मेंदू व पचनक्रिया.या संबंधी याचे संशोधन विशेष महत्त्वाचे आहे. प्राण्यांच्या प्रतिक्रिया ( Reflexes ) कशा नियंत्रित करता येतात या संबंधीच्या प्रयोगांमुळे याला खूप पण काहीशी अपप्रसिद्धि मिळाली. १९०४ साली याला नोबेल पारितोषिक मिळाले.

२९. ( १८५६-१९३९ ). मनोविश्लेषणशास्त्राचा जनक. अप्रकट मनाच्या व्यवहारांसंबंधी आयुष्यभर संशोधन केले. ते सर्वार्थाने युगप्रवर्तक ठरले आहे. फ्राईडच्या सिद्धांताचे साहित्य, कला, समाजशास्त्रे, मानसशास्त्र, इत्यादि अनेक विषयात क्रांतिकारी परिणाम झालेले आढळतात.

३०. ( १७२८-९७ ). प्रख्यात इंग्लिश मुत्सद्दी व उत्कृष्ट वक्ता. उदार मतवादी विचारवंत.

३१. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपच्या आर्थिक पुनरुत्थानासाठी अमेरिकेने जी प्रचंड आर्थिक मदत दिली ती मार्शल एड या नांवाने ओळखली जाते. त्यावेळचे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्रि जनरल मार्शल यांनी ही योजना मांडली म्हणून या योजनेस त्यांचे नांव पडले.

३२. पाश्चिमात्य युरोपीय राष्ट्रे आणि अमेरिका यांनी कम्युनिस्ट रशिया विरूद्ध संयुक्त संरक्षणाची उभारलेली फळी.

३३. बीटरूट या कंदमुळाचा एक प्रकार

३४. ( १८०६-७३ ). प्रख्यात उदारमतवादी विचारवंत.

प्रकरण तिसरे

# गटशाही आणि वैज्ञानिक तंत्रविद्या

समाजातील एकाच गटाच्या हाती सर्व सत्ता केंद्रित झालेली असेल तर त्या राज्यव्यवस्थेला मी गटशाही म्हणतो. उदाहरणार्थ, सर्व सत्ता गरीबांना वगळून श्रीमंतांच्या हाती असली, कॅथॉलिकांना वगळून प्रॉटेस्टंट पंथीयांच्या[1] हाती असली, सामान्य जन वगळून उमराव सरंजामदारांच्या हाती असली, गौरेतरांना वगळून गौरवर्णीयांच्या हाती असली, स्त्रियांना वगळून पुरुषांच्या हाती असली, किंवा इतर राजकीय पक्षांना वगळून एकाच राजकीय पक्षाच्या हाती असली तर त्या राज्यव्यवस्थेला मी अनुक्रमे श्रीमंतांची, वा प्रॉटेस्टंटांची, वा उमरावांची, वा गौरवर्णीयांची, वा पुरुषांची, वा त्या राजकीय पक्षाची, गटशाही म्हणेन. गटशाही राज्यव्यवस्थेत सत्तेच्या भागीदारीतून किती टक्के लोकांना वगळले आहे त्यावर गटशाही संकुचित आहे की व्यापक हे अवलंबून राहील. अनियंत्रित राजसत्ता हे गटशाहीचे आत्यंतिक स्वरूप होय.

पुरुषवर्गाची गटशाही विसाव्या शतकाच्यापूर्वी सर्व जगात सर्वकाळी अस्तित्वात असल्यामुळे पुरुषवर्गाचे वर्चस्व गृहीत धरूनच इतिहासाचा विचार करायला हवा. तसा तो केल्यास आजवरच्या गटशाह्या जन्म, वंश वा धन यांच्यावर आधारलेल्या असत असे आढळते. सतराव्या शतकातील यादवी युद्धात[२] इंग्लंडमध्ये प्युरिटन पक्षाने एका नव्या प्रकारची गटशाही प्रस्थापित केली. ' साधु संतांचे राज्य ' असे नांव त्यांनी या गटशाहीला दिले. एकाच राजकीय पंथीयांच्या हातात शस्त्रे ठेवून बाकीच्यांना नि:शस्त्र करण्यावर त्यांची राजवट उभारलेली होती. या मार्गाने, पारंपरिक दृष्ट्या राज्यसत्तेवर त्यांचा हक्क पोचत नसताना, आणि स्वत:चा पंथ अल्पसंख्य असूनहि, सरकारात ते आपली हुकूमत प्रस्थापित करू शकले. इ. स. १६६० मध्ये दुसऱ्या चार्ल्सला गादीवर बसवून राजसत्तेचे पुनरुज्जीवन[३] केल्याने इंग्लंडमध्ये या गटशाहीचा अंत झाला. पण याच प्रकारची सशस्त्र राजकीय पंथावर आधारलेली गटशाही १९१८ साली रशियात, १९२२ साली इटालीत व १९३३ साली जर्मनीत[४] अस्तित्वात आली. आजच्या काळातील गटशाहीचा हाच एक महत्त्वाचा प्रकार असल्याने मी याच प्रकारच्या गटशाहीचे तपशीलवार विश्लेषण इथे करणार आहे.

वैज्ञानिक तंत्रविद्येमुळे संघटनेला वाढते महत्त्व प्राप्त होऊन व्यक्तिजीवनावर बाह्य अधिसत्तेची अधिकाधिक बंधने पडत जातात हे आपण मागील प्रकरणात पाहिले. विज्ञानपूर्व काळातील कोणत्याहि गटशाहीपेक्षा विज्ञानाधिष्ठित गटशाही बलाढ्य असणार हे उघड आहे. इतर संघटनांना आपल्यात सामावून घेण्याची एक अंगभूत प्रवृत्ति प्रत्येक संघटनेत असते. प्रयत्नपूर्वक या प्रवृत्तीला प्रतिबंध केला नाही तर विविध संघटना एकमेकात विलीन होत होत शेवटी त्या सर्वच संघटना एका विराट राज्यसंस्थेत विलीन होतात. विज्ञानाधिष्ठित गटशाही अपरिहार्यपणे सर्वंकष बनते; म्हणजे, महत्त्वाच्या सर्व प्रकारच्या सत्तांवर राज्यसंस्था आपली मक्तेदारी प्रस्थापित करते. या एकतंत्री सर्वंकष राज्यपद्धतीचे अनेकांना आकर्षण वाटावे असे तिच्यात गुण आहेत. माझ्या मते मात्र गुणांपेक्षा या पद्धतीतील दोष अधिक आहेत. पुष्कळांना रशियातील कम्युनिस्टांची सत्ता सर्वंकष असलेली प्रिय होऊ शकते, पण त्याच प्रकारची सर्वंकष राज्यसत्ता जर्मनीत (नाझी

लोकांची ) स्थापन झालेली त्यांना पसंत पडली नाही, या मागचा तर्क मी तरी समजू शकलो नाही. ही ‘ लेबल ’ची जादू आहे असे म्हणणे मला भाग पडते. ज्यावर ‘ डावे, पुरोगामी ’ असे लेबल डकविलेले असेल ते या मंडळींना प्रिय होते, ते विशेषण खरोखर सार्थ आहे की नाही याचा ते लोक विचार करीत नाहीत.

गटशाही आपल्या गटस्वार्थाला अग्रहक्क देऊन समाजाच्या हिताचा विचार नेहमीच दुय्यम मानते हा गतकालातील इतिहासाचा अनुभव आहे. नैतिक दृष्टिकोनातून या प्रवृत्तीबद्दल गटशाहीवर आग पाखडण्यात अर्थ नाही. माणसाचा आणि मानवी समूहांचा स्वभाव मूलतः स्वयंकेंद्री असून जीवनकलहात टिकून राहण्यासाठी हे स्वयंकेंद्रित्व पुष्कळ प्रसंगात अत्यावश्यकहि ठरते. राजकीय गटशाह्यांच्या अप्पलपोट्या स्वार्थी धोरणाविरुद्धच्या तीव्र प्रतिक्रियेतून अर्वाचीन उदारमतवादी चळवळीचा जन्म झाला. आणि आर्थिक क्षेत्रातील गटशाह्यांच्या विरुद्ध झालेल्या संघर्षातून समाजवादी चळवळीचा जन्म झाला. पुरोगामी विचारांचा नुसता स्पर्श झालेल्यांचेदेखील मानवेतिहासात गटशाह्यांनी आजवर केलेल्या अन्याय व पिळवणूक यासंबंधी एकमत होते. आणि तरीहि अनेक पुरोगामी व्यक्ति एका अभिनव प्रकारच्या गटशाहीच्या कल्पनेने आकृष्ट झालेल्या आढळतात. या अभिनव गटशाहीच्या पुरस्कर्त्यांचे प्रतिपादन सारांशाने असे असते : ‘ आपण शहाणे आणि समाजहितदक्ष. जगात कोणत्या सुधारणा घडवून आणायला हव्यात त्याची समज आपल्याला आहे. आपल्या हाती सत्ता असेल तर जगात आपण नंदनवन निर्माण करू. ’ अशाप्रकारे, आपल्याच उपकार बुद्धीच्या आणि सर्वज्ञतेच्या चिंतनाने स्वतःवर लुब्ध झालेल्या या मंडळींनी आजवर इतिहासाला परिचित नव्हती अशी एक नवी जालीम हुकूमशाही रशियात निर्माण केली. या नव्या हुकूमशाही राजवटीत विज्ञानाचा उपयोग कशाप्रकारे होण्याची शक्यता आहे त्याचा विचार या प्रकरणात मी करू इच्छितो.

हे नवे झोटिंगशहा विशिष्ट विचाराचे व संप्रदायाचे कट्टर अनुयायी आहेत. अंतिम सत्याचे अचूक दर्शन आमच्या संप्रदायात आहे, सबब,

सत्तेवर फक्त आमचाच हक्क पोचतो असा त्यांचा दावा असल्याने त्यांची राजवट सर्वस्वी प्रामाण्यावर आधारलेली राहते. राज्यसत्तेच्या अधिकृत सिद्धांतांचे प्रामाण्य नाकारणारा, वस्तुतः, राजकर्त्यांच्या सत्तेवरील नैतिक व राखीव अधिकारालाच आव्हान करीत असल्याने बंडखोर व राजद्रोही ठरतो. गटशाही सत्तेवर आल्यानंतर आरंभीच्या दिवसात अन्य विचार संप्रदायावर निष्ठा असलेले गट अद्यापि समाजात असतात. संधि मिळाल्यास सत्ता काबीज करण्याचा त्यांचाहि मनोदय असतो. बहुसंख्येची प्रातिनिधिक राज्यपद्धति त्याज्य ठरवूनच गटशाही प्रस्थापित होत असल्याने समाजातील इतर संप्रदाय दंडशक्तीच्या जोरावर निपटून काढणे हे सत्ताधारी गटाला बंधनकारक होऊन बसते. अर्थातच, भाषण स्वातंत्र्य, वृत्तपत्रीय स्वातंत्र्य, प्रकाशन स्वातंत्र्य या स्वरूपाची कोणतीच स्वातंत्र्ये या राजवटीत दिली जाऊ शकत नाहीत. अधिकृत विचार कोणता आणि पाखंडी मत कोणते हे जाहीर करण्यासाठी, आणि पाखंडी मतप्रदर्शन करणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी, एक सरकारी यंत्रणा आवश्यक ठरते. मध्ययुगात रोमन कॅथॉलिक धर्मसंस्थेची 'इन्क्विझिशन'[५] नांवाची यंत्रणा या कामासाठी होती. कॅथॉलिक युरोपात, व विशेषतः इटाली, स्पेन, पोर्तुगाल व त्यांच्या मांडलिक प्रदेशात, या 'इन्क्विझिशन' संस्थेने क्षुल्लक कारणांवरून केलेले असंख्य लोकांचे अमानुष छळ डोळ्यापुढे आणले तर आधुनिककालीन गटशाहीतील विचारनियंत्रण करणाऱ्या खात्याला कोणते काम अपरिहार्यपणे शेवटी करावे लागेल त्याची कल्पना येईल. अधिकाधिक सत्ता आपल्याकडे घेण्याची माणसात स्वाभाविक हांव आहे. या इच्छेची पूर्ति करण्याच्या ईर्षेत बारीकसारीक उद्‍गार देखील पाखंडी ठरविण्याकडे आपोआप त्याचा कल होतो. मध्ययुगीन युरोपात ख्रिश्चन धर्मसंस्थेच्या हाती राजकीय सत्ता आल्यावर थोड्याच काळात प्रमाण सिद्धान्तांचे श्लेष काढण्याची मजल ज्या बारिकसारीक गोष्टींपर्यंत गेली त्यावर विश्वास बसत नाही. अधिकृत सिद्धान्तापासून वेगळे पाखंडी मत मांडल्याबद्दल शिक्षा झालेल्यांचे पाखंडीपण शोधायला अतिसूक्ष्मदर्शक यंत्र लागेल इतक्या क्षुल्लक व बारीक गोष्टीपर्यंत प्रामाण्य-अप्रामाण्याची मर्यादा जाऊन पोचली होती. विशिष्ट सांप्रदायिकांच्या हातीच फक्त सत्ता एकवटणाऱ्या आधुनिक राजवटीमध्येहि सांप्र-

दायिक प्रामाण्य अगदी तंतोतंत असेच बारीकसारीक, क्षुल्लक गोष्टींपर्यंत जाऊन पोचते; आणि प्रामाण्याचा भंग केल्याबद्दल होणाऱ्या शिक्षांचाहि प्रकार ' इन्क्विझिशन ' च्या कारकीर्दीशी तंतोतंत जुळतो.

लोकमतावर सर्वंकष व पूर्ण नियंत्रण ठेवण्यातील यश अनेक प्रकारे वैज्ञानिक तंत्रविद्येवर अवलंबून आहे. ज्या देशातील सर्व मुले शाळेत जातात आणि सर्व शाळा जेथे सरकारी नियंत्रणाखाली आहेत तेथे अधिकृत विचारांखेरीज इतर विचारांना मुलांच्या मनाचे दरवाजे बंद राहावेत अशा प्रकारचे शिक्षण सरकार लहान वयात मुलांना देऊ शकते. कागदच नसला तर स्वतंत्र प्रकाशन शक्य नाही आणि कागद तर सगळा शासनसंस्थेच्या मालकीचा. नभोवाणी आणि चित्रपट या माध्यमांवरहि सरकारची मक्तेदारी असते. एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला काही चोरून सांगावे हा अनधिकृत प्रचाराचा एकमेव मार्ग उरतो. पण हेरगिरीच्या कलेत अलिकडच्या काळात झालेल्या वृद्धीमुळे प्रचाराच्या या मार्गातील धोकेहि भयावह प्रमाणात वाढले आहेत. घराच्या बालेकिल्ल्यात शासनसंस्थेवर टीका करण्याची मोकळीक घेणाऱ्या पालकांविरुद्ध हेरगिरी करणे हे मुलांचे कर्तव्य आहे अशी शिकवण शाळेत दिली जाते. आपला अगदी जिवलग मित्रदेखील पोलिसात जाऊन आपल्याबद्दल माहिती देणार नाही असा विश्वास माणसाला बाळगता येत नाही; कारण, हा मित्रहि, कोणत्या तरी प्रकरणात गोत्यात आल्यामुळे, आपल्या बायकामुलांचे हाल थांबविण्यासाठी मित्रांच्या बाबतीतहि हेरगिरी करण्यास कबूल झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातली कोणतीच गोष्ट काल्पनिक नाही. या प्रत्यक्ष घडत असलेल्या गोष्टी आहेत. एकदा गटशाहीचे अस्तित्व मान्य केले तर याहून काही वेगळे होण्याची अपेक्षा बाळगण्याचे कारण नाही.

कॅलिगुला आणि नेरो[६] यांच्या अमानुष कृत्यांचा पाढा वाचून माणसांना शहारे येतात. पण आधुनिक सुलतानांच्या कृत्यांपुढे या जुन्या सुलतानांची कृत्ये फिकी पडतात. रोमन साम्राज्यातील अगदी नीचाहून नीच सम्राटांच्या कारकीर्दीतहि, उच्चवर्णीय रोमनांचा अपवाद सोडला तर, सामान्य माणसाच्या जीवनाची घडी तशीच कायम राहत असे. दरवेळी नवीन

शत्रू माणसाचे डोके उडवावे लागते, एका घावात सगळ्या शत्रूंची मुंडकी छाटता येत नाहीत, याचा कॅलिगुलाला विषाद होता. हिटलरला उपलब्ध असलेल्या ऑशविट्झच्या[७] विषारी वायूंच्या अद्ययावत वैज्ञानिक कोठड्या आणि एका वेळी शेकडो लोकांना गुदमरून मारण्याचे तंत्र पाहून कॅलिगुलाला हिटलरचा किती हेवा वाटला असता! द्रोही माणसांच्या कपटाचा वास लागावा म्हणून हेरगिरीचे जाळे सर्वत्र पेरण्याचा आटोकाट प्रयत्न नेरोने केला. पण इतके करूनहि अखेरीस कपटानेच त्याचा घात झाला. रशियन गुप्त सुरक्षा दलाचे जर नेरोला संरक्षण असते तर परिपक्व वयात राजशय्येवर शांतपणे मरण्याचे भाग्य त्याला लाभले असते. हुकूमशहांना विज्ञानाने दिलेल्या कृपाप्रसादापैकी ही काही फळे.

आर्थिक क्षेत्रातील गटशाहीचा आता विचार करू. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्लंडमध्ये अशी गटशाही अर्थव्यवस्था अस्तित्वात होती. हॅमन्ड पतिपत्नींनी लिहिलेल्या पुस्तकातून[८] ही अर्थव्यवस्था किती घृणास्पद पिळवणूक करणारी होती ते तुम्हाला कळून येईल. जमीनदार आणि कारखानदार या दोन वर्गातील संघर्षात या गटशाही अर्थव्यवस्थेचा अंत झाला. जमीनदारांनी शहरातील कामगारांची बाजू उचलून धरली आणि कारखानदारांनी ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुरांची बाजू उचलून धरली. या दोन बड्यांच्या भांडणामुळे कामगारांच्या हिताचे औद्योगिक कायदे पास झाले आणि ग्रामीण रहिवाशांचे अहित करणारे धान्य आयातीवरील निर्बंध उठविले गेले. या भांडणाचा शेवट इंग्लंडमध्ये लोकशाही प्रस्थापित होण्यात झाल्याने सर्वांना काही प्रमाणात तरी आर्थिक न्याय देणे अपरिहार्यच ठरले.

रशियातील घडामोडींची हकीकत वेगळी आहे. स्वतःला कामगारांच्या हिताचे प्रवक्ते म्हणविणाऱ्या बोल्शेविक[९] मंडळींच्या हाती तेथील राज्यसत्ता आली. रशियातील यादवी युद्धामुळे या गटाला आपली लष्करी हुकूमशाही प्रस्थापित करणे शक्य झाले. अनियंत्रित सत्तेचे कालांतराने पुढील परिचित परिणाम घडून आले. लष्कर व सुरक्षादलांच्या सर्वाधिकाऱ्यांना सामान्य जनतेला आर्थिक न्याय देण्याचे प्रयोजन आहेसे वाटले नाही. अर्धपोटी

शेतकऱ्यांच्या घरातील अन्नधान्य जबरदस्तीने वसूल करण्यासाठी त्यांनी लष्कराला खेडोपाडी पाठवायला कमी केले नाही. लाखो माणसे या प्रकाराने मृत्युमुखी पडली. कामगारांचा संपाचा हक्क काढून घेतला गेला. आपली बाजू मांडण्यासाठी प्रतिनिधि निवडून पाठविण्याचा अधिकार त्यांना राहिला नाही. जगण्यास जेमतेम पुरेशा राहणीमानावर त्यांना जबरदस्तीने काम करायला लावले गेले. कोणत्याहि पाश्चिमात्य राष्ट्रातील लष्करांत जवान आणि अधिकारी यांच्या वेतनात असलेल्या विषमतेपेक्षा रशियातील विषमता अधिक तीव्र आहे. उद्योगधंदे व व्यापार या क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकारी ऐषआरामात राहतात, सामान्य कारकून वा कामगार मात्र दीडशे वर्षांपूर्वीच्या इंग्लंडमधील कारकून किंवा कामगाराइतक्या हालअपेष्टात राहतो. याहिपेक्षा वाईट अवस्थेत राहणारे वर्गच्या वर्ग रशियात आहेत.

नागरिक स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या कामगार वर्गाहून कनिष्ठ पातळीवरील वेगळा एक ‘ मजुरां ’चा वर्ग रशियात आहे. विजेरी तारांच्या कुंपणाआड कैद भोगणाऱ्या व वेठबिगार करणाऱ्या लोकांचा हा ‘ मजूर ’ वर्ग होय. या ‘ वेठबिगार ’ पद्धतीला बळी पडलेल्या लोकांचे जीवन ही एक हृदयद्रावक कहाणी आहे. दिवसाकाठी अठराअठरा तास त्यांना अतिश्रमाचे काम करावे लागते. जेमतेम जिवंत राहता येईल इतपत खायला मिळते आणि इंग्लंडमधील उन्हाळ्यात पुरेसे होतील एवढ्या थोडक्या कपड्यात आर्क्टिक प्रदेशातील गोठून टाकणारा हिवाळा काढावा लागतो. रात्रीअपरात्री स्त्री-पुरुषांना पकडून नाहीसे केले जाते; त्यांचा खटला तर चालत नाहीच पण बहुतेक वेळा आपल्यावर काय आरोप ठेवला आहे याचाहि त्यांना पत्ता लागत नाही. त्यांच्या कुटुंबियांच्या चौकशीला कोणी उत्तर देत नाही. पूर्वोत्तर सायबेरियात किंवा श्वेत सागराच्या किनाऱ्यावर वर्ष दीडवर्ष वेठबिगारी व कैद भोगल्यावर अतिश्रमाने, उपासमारीने किंवा थंडीने ते मृत्युमुखी पडतात. पण छावण्यांच्या अधिकाऱ्यांना त्याची पर्वा वाटत नाही; कारण त्यांना माणसांचा अखंड पुरवठा सतत चालू राहतो.

या छावण्यांचा आणि वेठबिगारीच्या पद्धतीचा झपाट्याने विस्तार होत आहे. वेठबिगारीची शिक्षा भोगीत असलेल्या लोकांचा आकडा केवळ

अंदाजानेच सांगता येणे शक्य आहे. काही लोकांच्या मते रशियातील प्रौढ पुरुष लोकसंख्येच्या जवळपास सोळा टक्के लोकसंख्या याप्रकारे वेटबिगारी करीत जीवन कंठीत आहे. ( रशिया आणि त्याची दोस्त राष्ट्रे सोडून ) या विषयातील सर्व अधिकारी व्यक्तींच्या मते किमान आठ टक्के लोकसंख्या तरी अशा वेठबिगार पद्धतीखाली निश्चितच राहत आहे. आठ टक्क्यावर सर्वांचे एकमत आहे. स्त्रिया आणि मुलांचे प्रमाणहि बरेच आहे. पण प्रौढ पुरुषांइतके नाही.

वेठबिगार ही स्वस्तात पडत असल्यामुळे स्वाभाविकच राज्यकर्त्यांची भूमिका वेठबिगारीने कामे करवून घेण्यास अनुकूल राहते आणि, वेठ-बिगारीशी स्पर्धा करायची असल्यामुळे, परिणामी सवेतन कामगारांच्या परिस्थितीवर तिचा प्रतिकूल परिणाम होतो. वेठबिगारीची ही प्रथा जर मोडली नाही तर या पद्धतीची व्याप्ति वाढत जाऊन अखेरीस पोलिस, सरकारी अधिकारी आणि सैन्यांतील शिपाई हे वर्ग सोडून बाकी सर्वजण या वेठबिगार श्रमव्यवस्थेत समाविष्ट होतील. स्वस्त वेठबिगारीतून मिळ-णाऱ्या जादा नफ्याने राजकर्त्यांना या पद्धतीच्या विस्ताराचा मोह व्हावा हे त्या पद्धतीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत अंगभूतच आहे.

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या उभारणीच्या दृष्टीने वेठबिगार श्रमव्यवस्थेचे फायदे स्पष्ट आहेत. माणसांना सक्तीनें वेठबिगार करायला लावली नसती तर आर्क्टिक-व्हाईट सी कालवा खोदला गेला नसता. सैबेरियन जंगलातले लाकूड निर्यात करून यंत्रसामग्रीची आयात करणे रशियाला शक्य झाले कारण या जंगलात लाकूड तोडायला वेठबिगारी श्रम वापरता आले. एरवी राजीखुषीने सैबेरियाच्या गारठ्यात लाकूडतोड्याचे काम करायला कोण गेले असते ? युद्धसामग्रीचे उत्पादन करायला लागणारी जादा श्रमशक्ति या सक्तीच्या वेठबिगारीतूनच उपलब्ध होऊ शकते. वेठबिगारीसाठी निरपराध माणसे पकडून नेण्याच्या धोरणामुळे सामान्य नागरिकांना शासनसंस्थेबाबत जी दहशत असते त्यामुळे शासनसंस्थेविरुद्ध असलेला असंतोष दडपला जातो हा शिवाय लाभ आहे. नजिकच्या भविष्यकाळात रशियाने ज्या महत्त्वा-कांक्षी कामांचा संकल्प सोडला आहे तो पाहता वेठबिगारीने करवून घेण्याची

खरी कामे पुढच्या काळातच व्हावयाची आहेत असे वाटू लागते. येनिसै नदीचे पाणी आज आर्क्टिक महासागराला जाऊन मिळते. त्यामुळे त्या पाण्याचा रशियाला उपयोग करता येत नाही. अणुशक्तीच्या साहाय्याने या नदीचा प्रवाह उलटवून तो दक्षिणमुखी करावा आणि मध्य आशियातील विस्तीर्ण वाळवंटाचा प्रदेश सुजलाम् सुफलाम् करून सोडावा अशी भव्य योजना रशियन राज्यकर्त्यांच्या डोळ्यापुढे आहे असे सांगतात.

जर रशियातील गटशाही कायम राहिली तर हा भगीरथ प्रकल्प पूर्ण झाल्यावरहि बहुजनसमाजाचे नशीब उजळेल असे मानण्याचे कारण नाही. रेडिओॲक्टिव्ह किरणांचा मारा करून उत्तर ध्रुव प्रदेशातील बर्फ वितळवता येईल असा शोध तोपर्यंत लागेल, किंवा सैबेरियाच्या उत्तरेकडे पर्वतरांगा निर्माण करता आल्या तर, उत्तरेकडून येणारे शीत वारे अडविले जाऊन, सैबेरियाची भूमि शेतीला अनुकूल होईल असा शोध लागेल. येनिसै नदीचे पाणी मध्य आशियात खेळविण्यासाठी कालवे खोदणे किंवा उत्तर सैबेरियात पर्वतांची रांग उभी करणे ही कामे माणसांना वेठबिगार करायला लावून करवून घेणे ' फार महाग पडणार नाही ' अशा निर्णयाला राज्यकर्ते येतील. अगदीच समजा सत्तीच्या ' जादा ' श्रमशक्तीचा उपयोग करण्यासाठी प्रकल्प हाती नसलेच तर युद्ध हा प्रकल्प आहेच. राज्यकर्त्यांचे जीवन ऐषआरामी आहे तोपर्यंत गुलामांची स्थिति सुधारावी असे त्यांना वाटण्याचे कारणच काय ?

विज्ञानप्रणीत राज्यसत्ता जिथे सुप्रतिष्ठित आहे, आणि जिथे ती आपल्या अस्तित्वासाठी लोकमताच्या पाठिंब्यावर अवलंबून नाही, अशा कोणत्याहि देशांत रशियातील जुल्म आणि शोषणाचे प्रकार फोफावतील. वैज्ञानिक तंत्रविद्या प्रगत झाली नव्हती त्या काळच्या मानाने अनेक पटींनी अधिक अन्याय्य व जुलमी कारभार चालविणे आजच्या शासनसंस्थेला शक्य आहे. प्रचाराच्या आधुनिक तंत्रसाधनांमुळे लोकांची मने आपल्याला अनुकूल करून घेता येणे आजच्या शासनसंस्थेला सुलभ जाते. देशातील सगळी सभागृहे आणि कागद सरकारच्याच मालकीच्या असल्यामुळे सरकारविरोधी प्रचार मात्र अशक्यप्राय होऊन बसतो. जनतेने उत्स्फूर्त बंड करून उठायचे म्हटले तर आधुनिक शस्त्रास्त्रांच्या संहारकतेमुळे तेहि आज शक्य उरलेले नाही.

सैन्य दलांच्या शाखोपशाखांपैकी पुरेशा शाखांचा पाठिंबा असल्याखेरीज आधुनिक राज्यसत्तेविरुद्ध कोणतीहि क्रांति यशस्वी होऊ शकत नाही. सर्वमान्य कामगारापेक्षा सैनिकांचे राहणीमान उंच ठेवून सैन्यदलांची स्वामिनिष्ठा टिकविता येते. सामान्य जनांचे जीवन जितके अधिक हलाखीचे तितके उंच राहणीमानाचे आमिष अधिक प्रभावी. अशा रीतीने गटशाहीचे राजकीय स्थैर्य टिकवून धरण्यात जुलूम आणि पिळवणूक या गोष्टी सहाय्यभूतच ठरतात. बाह्य परिस्थितीचे दडपण नसले तर अशा राजवटी प्रदीर्घ काळपर्यंत टिकून राहण्यास काहीच आडकाठी निर्माण होण्याचे कारण नाही.

विज्ञानप्रणीत समाज अद्याप बाल्यावस्थेत आहेत. त्यापैकी गटशाही अधिकारारूढ असलेल्या समाजांची भावी वाटचाल कोणत्या दिशेने होण्याची शक्यता आहे ते पाहणे उद्‌बोधक ठरेल.

शरीरविज्ञानशास्त्र व मानसशास्त्र यांच्या ज्ञानात भर पडत जाईल तसे हुकुमशाही राष्ट्रात व्यक्तिमानसावर आजच्यापेक्षा कितीतरी अधिक सर्वगामी नियंत्रण ठेवणे शासनसंस्थांना शक्य होईल. विद्यार्थ्यांची स्वतंत्र इच्छाशक्ति पूर्णपणे खुडून टाकणे हे सर्व शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असे फिक्टे[१०] याने प्रतिपादन केले होते. म्हणजे शाळामास्तरांच्या शिकवणुकीनुरूप उर्वरित आयुष्यात ही मुले विचार करतील व वागतील, त्या शिकवणुकीच्या विरुद्ध त्याना वागता वा विचार करता येणारच नाही. कारण, स्वतंत्र विचारशक्ति त्यांची जिवंत नसेलच. पण फिक्टेच्या काळी हे ध्येय अप्राप्य राहिले. ज्या जर्मन शिक्षणपद्धतीला तो तत्कालीन सर्वोत्कृष्ट मानीत होता त्यातूनच प्रस्थापित समाजरचनेला सुरुंग लावणारा कार्ल मार्क्स[११] निर्माण झाला. भविष्यकालीन हुकूमशाही राजवटीत अशा अपयशाची पुनरावृत्ति होणार नाही. आहार, औषधपाणी आणि उपदेश या तीनहि साधनांच्या संयुक्त वापरातून अगदी बालवयापासूनच शासनसंस्थेच्या दृष्टीने इष्ट अशा शील व श्रद्धा माणसात बिंबविल्या जातील. यामुळे सत्ताधारी वर्गाची मूलगामी व प्रक्षोभक टीका ही मानसशास्त्रीय दृष्ट्या अशक्य व असंभवनीय गोष्ट बनेल. हालअपेष्टात राहूनहि आपण खूप सुखी आहोत अशी लोकांची भावना असेल, कारण ‘ तुम्ही सुखी आहात ’ असेच मुळी सरकारने त्यांना पढविलेले असेल.

विज्ञानाला अनुकूल असलेली हुकूमशाही राजवट अभद्र व किळसवाण्या मानल्या गेलेल्या अनेक गोष्टी करू शकेल. आजच्या रशियन राजकर्त्यांपेक्षा नाझी सत्ताधीशांची प्रत्येक कृति अधिक शास्त्रशुद्ध असे. ज्या प्रकारचे अनन्वित अत्याचार मला अभिप्रेत आहेत ते करण्याकडे नाझी सत्ताधीशांचा कल अधिक होता. कितपत सगळे खरे आहे मला सांगता येणार नाही, पण असे म्हटले जाते की, अनेक प्रकारचे प्रयोग करण्यासाठी नाझी राज्यकर्ते कैदी छावण्यातील माणसांचा उपयोग करीत. यापैकी काही प्रयोगांचे शेवटी येणारे मरण अनन्वित हाल झाल्यावर येई. नाझी जर्मनीचा जय झाला असता तर थोड्याच अवधीत मानवांच्या शास्त्रशुद्ध पैदाशीचे काम त्यांनी हाती घेतले असते असे वाटते. मानवांची शास्त्रशुद्ध पैदास करण्याचे काम करणाऱ्या राष्ट्राला एका पिढीच्या कालावधीत त्याचे लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने मोठे फायदे होतील. मानवांच्या पैदाशीची शास्त्रशुद्ध पद्धति काहीशी पुढीलप्रमाणे राहण्याची शक्यता आहे. राज्यकर्त्या उच्चवर्णीयांचा अपवाद सोडला तर पंचाणव टक्के पुरुष आणि सत्तर टक्के स्त्रिया यांच्यावर शस्त्रक्रिया करून त्यांना प्रजोत्पादनाच्या दृष्टीने निकामी करण्यात येईल. प्रजननासाठी निवडलेल्या तीस टक्के स्त्रियांना आयुष्याची अठरा ते चाळीस वयापर्यंतची वर्षे प्रजोत्पादनात घालवावी लागतील. त्यायोगे माणसांचा पुरेसा पुरवठा होत राहील. गर्भधारणेसाठी सामान्यतः नैसर्गिक संभोगापेक्षा कृत्रिम गर्भधारणेच्या पद्धतीवर भर देण्यात येतील. जननक्षम व्यक्तींना संभोगसुख हवे असेल तर 'निकामी' जोडीदारांबरोबर असे सुख उपभोगण्याला मुभा असेल.

शारीरिक शक्ति, बौद्धिक हुशारी, इत्यादि विविध गुणांच्या दृष्टीने मानवी वळूंची निवड केली जाईल. निवडलेले पुरुष सगळे सुदृढ व निकोप आहेत यावर कटाक्ष असेल. मात्र, भावी राजकर्त्या झोटिंगशहांना जन्म द्यायचा नसेल तिथे हे मानवी वळू स्वभावाने गरीब आणि आज्ञाधारक आहेत हे पाहिले जाईल. प्लेटोच्या[१२] 'रिपब्लिक' या ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे मुलांना आयांपासून वेगळे करून संगोपनासाठी व्यावसायिक तज्ज्ञ दायांच्या हाती सुपूर्द केले जाईल. शास्त्रशुद्ध व योजनाबद्ध पैदास केल्यामुळे राज्यकर्ते आणि प्रजाजन यांच्यातील उपजत अंतर वाढत जाऊन कालांतराने मानवांच्या

जवळजवळ दोन वेगळ्या जातीच निर्माण होतील. मटण खाण्याच्या चाली-विरुद्ध सर्व शेळ्यांनी संघटित होऊन उठाव केला आहे ही गोष्ट जितकी अद्‌भूत व मुळातच असंभवनीय आहे तितकीच कनिष्ठ 'जातीं 'कडून उठाव होणे ही गोष्ट असंभवनीय होऊन बसेल. मेक्सिकोमधील ॲझटेक[१३] समाजात नरभक्षणासाठी ( आपण कोंबड्या पाळतो तशी ) एक परकी टोळीच 'पाळलेली ' होती. या ॲझटेक लोकांची राजवटहि हुकूमशाही पद्धतीची होती.

आज आपल्याला ऑस्ट्रेलियातील आदिवासी जमातींची दैवते, समाज संघटना व चालीरीती या गोष्टी चमत्कारिक व अगम्य वाटतात. उद्या, मानवी पैदाशीच्या या नव्या पद्धतींना रुळलेल्यांना आजची आपली कुटुंब-संस्था चमत्कारिक व अगम्य वाटेल. फ्राईडचे मानसशास्त्रीय सिद्धान्त बाद ठरतील. आणि मला वाटते, ॲडलरचे[१४] प्रतिपादन हे या नव्या समाजातील परिस्थितीला अधिक लागू पडेल. श्रमजीवि वर्गाचे कामाचे तास इतके धिक आणि त्यांना मिळणारे अन्न इतके तोकडे असेल की निद्रा आणि आहार याखेरीज इतर सुखांची जाणीवच मरून जाईल. कुटुंबसंस्थेचे उच्छेदन, आणि राज्यसत्तेला जीवन समर्पित करणाऱ्या परम धर्माचे पालन, या दोन्हींमुळे शरीराचे चोचले पुरविणाऱ्या नाना सुखोपभोगांपासून उच्च वर्गाचे सभासदहि वंचित राहून त्यांची मनोवृत्ति विरागी माणसासारखी होईल : एकाग्रचिताने ते सत्तेची उपासना करतील आणि सत्तेची सिद्धि प्राप्त करून घेण्याकरता कोणतेहि क्रूर कर्म करायला मागेपुढे पाहणार हनीत. क्रौर्याची संवय पडलेल्या माणसांची कातडी दिवसेंदिवस अधिकाधिक घट्ट बनेल आणि अशा माणसांच्या अंगावर रोमांच उभे करण्यासाठी छळाचे अधिकाधिक क्रूर प्रकार शोधून काढावे लागतील.

अशा प्रकारच्या घटना सर्रास घडणे ही गोष्ट भयंकर स्वप्नांइतकी अद्‌भुत व अशक्य वाटण्याचा संभव आहे. पण माझ्या मनाची खात्री आहे की, गेल्या महायुद्धात नाझी जर्मनीचा विजय होऊन जगावर त्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले असते तर वर उल्लेखिलेली पद्धति त्यांनी लौकरच प्रत्यक्ष अंमलात आणली असती. रशियन आणि पोलिश लोकांचा वापर त्यांनी

कळसूत्री बाहुल्यांसारखा श्रमाच्या कामांसाठी केला असता. त्यांचे साम्राज्य स्थिर झाल्यावर त्यांनी निग्रो व चिनी लोकांनाहि कळसूत्री मजूर बनवून टाकले असते. १९४० ते १९४४ च्या दरम्यान ज्या मार्गांनीं त्यांनी फ्रेंचांना आपले हस्तक बनविले त्याच प्रकारे सर्व पाश्चिमात्य समाजाला त्यांनी आपल्या या कार्यात हस्तक बनविले असते. तीस वर्षांपर्यंत त्यांचे राज्य चालले असते तर अशा राजवटीविरुद्ध उठाव करण्याची प्रवृत्ति पाश्चिमात्य जगातून समूळ नष्ट झाली असती.

वैज्ञानिक तंत्रविद्येचा हा किळसवाणा आविष्कार थांबविण्यास लोकशाही आवश्यक आहे. पण एकटी लोकशाही या कामाला पुरी पडणार नाही. 'निसर्गसिद्ध' मानवी हक्कांची कल्पना व्यक्तिमात्राविषयीच्या ज्या पावित्र्याच्या व प्रतिष्ठेच्या भावनेतून जन्माला आली त्याच प्रकारची श्रद्धा समाजात रुजलेली असणे त्यासाठी आवश्यक आहे. केवल व शुद्ध सिध्दान्त म्हणून पाहिले तर निसर्गसिद्ध हक्कांचे तत्त्व मान्य करता येण्यासारखे नाही. बेंथॅमने[१५] म्हटले आहे : ' निसर्गसिध्द मानवी हक्क ? निव्वळ मूर्खपणा. अभंग, अबाधित मानवी हक्क ? शतमूर्खपणा. ' काही प्रसंगी विशिष्ट कृतींपासून साऱ्या समाजाला होणारा फायदा इतका मोठा असतो की त्यासाठी व्यक्तीला अन्याय करण्याचा हक्क समाजाला पोचतो हे आपण कबूल करायला हवे. उदाहरणार्थ, जेत्या शत्रूने, ' काही व्यक्ति ओलीस दिल्यास आम्ही अमुक शहराला धक्का लावणार नाही ' असे म्हटले तर, तेवढी किंमत, त्या व्यक्तींना अन्याय करूनहि, समाजाने चुकविणे शहाणपणाचे होईल हे उघड आहे. त्या शहराच्या अधिकाऱ्यांनी जर कबूल केलेल्या व्यक्ति ओलीस म्हणून अशा परिस्थितीत शत्रूच्या हवाली केल्या तर त्या अधिकाऱ्यांना आपण खचितच दूषण देऊ शकत नाही. सार्वजनिक हिताला अग्रक्रम देऊन व्यक्तींचे मानवी हक्क सामान्यत: दुय्यम गणले गेले पाहिजेत. एकदा ही गोष्ट मान्य केल्यावर आपण, पुढे जाऊन मात्र अशी स्पष्टता केली पाहिजे, इतकेच नाही तर त्यासंबंधी आग्रह धरला पाहिजे, की निरपराध व्यक्तींवर काही प्रकारचा अन्याय करणे कोणत्याहि परिस्थितीत सार्वजनिक हिताचे होऊ शकत नाही. या उपसिद्धांताचे महत्त्व अशा करता की, सत्ताधारी व्यक्तींना, विशेषत: गटशाहीतील सत्ताधीशांना, प्रत्येक प्रसंगाचे वेळी, या प्रसंगी सार्वजनिक

हिताचे दृष्टीने निरपराध व्यक्तींवर अन्याय केल्यास चालेल, असे वाटण्याचा संभव आहे.

हुकूमशाहीची स्वतःची कार्यपद्धति आहे तसेच स्वतःचे तत्त्वज्ञान पण आहे. येनकेनप्रकारेण, विशेषतः पोलिस आणि सैन्यदलांच्या साहाय्याने, एकदा सत्ता हातात आल्यावर तो गट आपल्या वरचढ भूमिकेचा अधिकात अधिक फायदा घेऊन प्रत्येक गोष्ट अशी हाताळतो की, इतर गटांवरील त्या गटाचे नियंत्रण सर्वंकष होत जाते. ही हुकूमशाहीची मूळ कार्यपद्धति झाली. पण हुकूमशाहीचे तत्त्वज्ञान काही वेगळेच आहे. या तत्त्वज्ञानानुसार, राष्ट्र, राज्यसत्ता वा समाज या संस्थांचे त्यातील सभासदांहून वेगळे असे स्वयंभू व्यक्तित्त्व असून राज्य संस्थेकडून घडणारे कल्याणकारी कार्य कोणतीहि व्यक्ति अगर व्यक्तींचा गट स्वतंत्रपणे करू शकत नाही. ते व्यक्तींच्या आणि व्यक्तिगटांच्या बौद्धिक व ऐहिक कुवतीबाहेरचे आहे या सिद्धांताचे प्रतिपादन हेगेल[१६] या तत्त्वज्ञाने विशेष आग्रहाने केले. आपल्या तत्त्वज्ञानात राज्यसंस्थेला त्याने अत्युच्च स्थान दिले, आणि समाजाची संघटना ही अधिकाधिक सजीव प्राणीसदृश व्हायला हवी असे मत मांडले. सजीव सदृश समाजाचा प्राण समाजाच्या समष्टिरूपात, म्हणजेच राज्यसंस्थेत, वास करीत असतो असे त्याचे प्रतिपादन होते. उदाहरणार्थ, माणूस ही एक सजीव संघटना आहे. माणसाच्या शरीरातील वेगवेगळ्या अवयवांना स्वतंत्र जाणीव वा चैतन्य आहे असे आपण कधी मानत नाही. दुखापत पायाच्या अंगठ्याला झाली तरी दुःख साऱ्या माणसाला होते. प्रत्येक अवयवाचे सुखदुःख, हिताहित वेगळे असते असे आपण मानीत नाही. त्याचप्रमाणे, सजीव सदृश समाजाचे हित-अनहित, सुखदुःख त्यातील व्यक्तींकरता स्वतंत्र, वेगवेगळे असणार नाही. राज्यसंस्था हे या समाजाचे हृदय व बुद्धि दोन्ही होय. सर्वंकष हुकूमशाहीचे तात्त्विक अधिष्ठान हे असे आहे.

व्यक्तीच्या शरीररचनेचे रूपक सामाजिक संघटनेला लागू करण्याचा अव्यापारेषू व्यापार हे तत्त्वज्ञान करते हा या तत्त्वज्ञानाचा मूलभूत दोष आहे. समाजातील व्यक्तींना चैतन्यशील जाणीव आहे, पण राज्यसंस्था, त्यात भाग घेणाऱ्या व्यक्ति बाजूला केल्यास, अशी चैतन्यशील जाणीव

असलेली गोष्ट नाही. जयापराजयाने राज्यसंस्थेला हर्षखेद होत नाही. एखाद्या राष्ट्रावर आपत्ति कोसळल्यास त्या आपत्तीचा आघात व्यक्तींना वेगवेगळा सहन करावा लागतो. तो ‘ राष्ट्रपुरुष ’ ( म्हणजे शासनसंस्था ) सगळ्या समाजाकरता दुःख अनुभवू शकत नाही. व्यक्तीच्या बाबतीत परिस्थिति वेगळी आहे. इजा शरीराच्या एखाद्या भागाला झाली तरी त्याची वेदना केंद्रस्थ जाणीवेच्या रूपाने सर्व शरीर अनुभवते. शरीराच्या अवयवांची सुखदुःखे केंद्रस्थ ‘ अहं ’पासून वेगळी असती तर, प्रत्येक अवयवाचे हितसंबंध वेगवेगळे होऊन, त्यांच्यातील श्रेष्ठकनिष्ठतेचा वाद सोडवायला एक पार्लमेंट बसवावे लागले असते. प्रत्यक्ष रचना अशी नाही म्हणून नीतिशास्त्रदृष्ट्या व्यक्ति हा मूळ घटक ठरतो. व्यक्तीला नीतिदृष्ट्या असलेले हे महत्त्वाचे स्थान व्यक्तीच्या सुद्धा अवयवांना वा व्यक्तींच्या मिळून बनलेल्या संघटनांना प्राप्त होऊ शकत नाही. सर्वांचे हित त्या ‘ सर्वां ’त समाविष्ट असलेल्या व्यक्तींच्या हिताचीच बेरीज असते. सर्वांचे एकत्रित हित वेगळे, स्वतंत्र आणि उच्चतर असत नाही. राष्ट्राचे हित राष्ट्राच्या नागरिकांच्या हिताहून वेगळे, स्वतंत्र व उच्चतर असते असा दावा केला जातो तेव्हा शासनसंस्थेचा किंवा राज्यकर्त्या वर्गाचा स्वार्थ हा समाजातील व्यक्तींच्या हितापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे असेच वास्तविक म्हणावयाचे असते. अनियंत्रित सत्तेचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वज्ञानातच केवळ हा दृष्टिकोन प्रमाणभूत मानला जाऊ शकेल.

विज्ञानप्रणीत हुकूमशाही हा राज्यव्यवस्थेचा टिकाऊ प्रकार होऊ शकेल का, किंवा लोकशाही राज्यव्यवस्थेपेक्षा ती अधिक टिकावू ठरण्याचा संभव आहे काय, हे प्रश्न वरील अध्यात्मवादी गूढगुंजनापेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत.

युद्धाची बाब सोडली तर, अशा प्रकारची हुकूमशाही राजवट टिकावू न ठरण्याला काही कारण मला दिसत नाही. इतिहासाला परिचित अशा बहुतेक पुढारलेल्या समाजांमध्ये लहान राज्यकर्ता मालक वर्ग आणि त्यांच्या मालकीचा मोठा गुलामांचा अगर भूदासांचा वर्ग अशीच रचना नाहीतरी होती असे आढळते. अशी समाजव्यवस्था प्रदीर्घ काळ टिकून राहणे मानवी स्वभावाशी मूलतः विसंगत वा विरोधी आहे असे म्हणण्यास आधार नाही.

अल्पसंख्य लोकांची जुलमी राजवट टिकवून धरणे वैज्ञानिक तंत्रविद्येतील आजवरच्या प्रगतीने किती तरी सोपे करून ठेवलेले आहे. अन्नधान्याच्या वाटपावर पूर्ण नियंत्रण असलेल्या सरकारची सत्ता, पोलिस आणि सैन्यदले यांची स्वामिनिष्ठा अभंग असेपर्यंत, सर्वंकष राहू शकते. उच्चवर्गीय राज्यकर्त्या वर्गांना उपलब्ध असलेली काही सुखे व हक्क पोलिस व सैनिक यांना देऊ केली की त्यांची स्वामिनिष्ठा विकत घेता येते. आधुनिक विज्ञानप्रणीत हुकूमशाही राजवटीत अंतर्गत उठाव करून पददलित जनतेला स्वातंत्र्य प्राप्त कसे होऊ शकेल हे मला कळत नाही.

परदेशाशी युद्धाचा प्रसंग आल्यास मात्र या परिस्थितीत फरक पडेल. नैसर्गिक साधनसंपत्तीची समान देणगी असलेले दोन देश आहेत अशी कल्पना करा. एका देशात हुकूमशाही राजवट आहे आणि दुसऱ्या देशात व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली लोकशाही आहे. या दोन राष्ट्रांत युद्ध उद्भवल्यास पाहता पाहता व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिष्ठित राष्ट्र युद्धतंत्रात वरचढ ठरेल असे निश्चितपणे सांगता येते. रशिया आणि जर्मनी यांच्या उदाहरणावरून आपण असे म्हणू शकतो की स्वतंत्र बुद्धीने वैज्ञानिक संशोधन करण्यास हुकूमशाही राजवटीत वाव असू शकत नाही. ज्यू शास्त्रज्ञांना हिटलरने हाकलले नसते वा त्यांचा छळ केला नसता तर जर्मनीने युद्ध जिंकलेहि असते कदाचित. लायसेंकोच्या सिद्धांतांना स्टालीनने आपल्या पाठिंब्याने प्रामाण्य प्राप्त करून दिले नसते तर रशियाची अशी अन्नान्नदशा खचित झाली नसती. अणुऊर्जा संशोधनाच्या क्षेत्रात रशियन सरकार असाच हस्तक्षेप करील अशी चिन्हे आज दिसत आहेत. पुढील पंधरा वर्षांच्या काळात युद्ध झाले नाही तर पंधरा वर्षांच्या शेवटी युद्ध तंत्रात रशिया पाश्चिमात्य राष्ट्रांच्या खूप मागे पडलेला असेल, आणि रशियाच्या या पिछेहाटीला हुकूमशाही राजवट कारणीभूत झालेली असेल असे माझे भविष्य आहे. म्हणून मला असे वाटते की, जगातील काही देशात बलाढ्य लोकशाही राजवटी अस्तित्वात आहेत तोपर्यंत, अंतिम विजय लोकशाहीचाच होईल. विज्ञानप्रणीत हुकूमशाहींचा विनाश त्यांची विज्ञाननिष्ठा अर्धवट असल्याने होणार आहे. या निष्कर्षांचा आधार घेऊन जगाच्या भवितव्याविषयी मी माफक आशा बाळगून आहे.

पुढे जाऊन आपण असे म्हणू शकतो की, ज्या कारणाने वैज्ञानिक तंत्रविद्येच्या शर्यतीत हुकूमशाही राजवटी मागे पडतील, त्याच कारणास्तव हुकूमशाही तटबंदीला इतरहि खिंडारे पडतील. कोणताहि नवा विचार पाखंडी ठरविण्याच्या पद्धतीमुळे कालांतराने बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची शक्ति अशा व्यवस्थेत राहणार नाही. आपले स्वास्थ्य सुरक्षित आहे असे पाहून राज्यकर्ता वर्ग आळशी बनेल. या उलट, राज्यकर्त्या वर्गातील उच्चपदस्थ व्यक्तींमध्ये उपक्रमशीलतेला आणि स्वतंत्र निर्णयबुद्धीला प्रोत्साहन दिले तर राज्यकर्त्यांच्या वर्तुळातच अंतस्थ क्रांति होण्याचा धोका कायम टांगलेला राहील. रोमन साम्राज्याच्या उत्तरकाळी कोणीहि यशस्वी सेनापति, थोडा नशिबाने हात दिला तर, सम्राटाला पदच्युत करून स्वतः मुकूट धारण करू शकत असल्यामुळे आपल्या यशस्वी सेनापतींना ठार मारण्याला सिंहासनावरील सम्राटाला नेहमीच सबळ कारण असे. अशा प्रकारचा धोका हुकूमशाही राजवटीत सहजी निर्माण होऊ शकतो. रशियातील घटनांनी या म्हणण्याची प्रचीति आणून दिली आहेच.

विज्ञानप्रणीत हुकूमशाहीने सर्व जग आपल्या अंकित केले नाही तर, ( आणि ही महत्त्वाची शर्त आहे, ) वर उल्लेखिलेल्या वेगवेगळ्या कारणांमुळे विज्ञानप्रणीत समाजव्यवस्थेचा हुकूमशाही हा चिरकाल टिकणारा प्रकार ठरणार नाही माझी श्रद्धा आहे.

* * *

## टीपा

१. ख्रिश्चन धर्मातील दोन प्रमुख पंथ.

२. १६४४–४५. पहिल्या चार्ल्सच्या कारकीर्दीत पार्लमेंट आणि राजा यांच्यात झालेले युद्ध. प्रॉटेस्टंटपंथीय ‘ प्युरिटन ’ गटाकडे पार्लमेंटचे नेतृत्व होते. यादवी युद्धात पहिल्या चार्ल्सचा पराभव झाला. ऑलिव्हर क्रॉम्वेलच्या नेतृत्वाखाली पार्लमेंटने इंग्लंडमध्ये प्रजासत्ताक राज्य स्थापन केले. याला उद्देशून

'साधूसंतांचे राज्य' असा शब्दप्रयोग केला जातो. प्युरिटन नेते हे कडवे धर्मनिष्ठ व विरागी वृत्तीचे होते म्हणून हे नांव पडले.

३. १६४९ मध्ये पहिल्या चार्ल्सचा शिरच्छेद केल्यापासून १६५३ पर्यंत इंग्लंडमध्ये प्रथम पार्लमेंटरी प्रजासत्ताकाचे (कॉमनवेल्थ) राज्य होते व १६५३ नंतर क्रॉम्वेलची हुकूमशाही राजवट होती. १६५८ मध्ये क्रॉम्वेलच्या मृत्यूनंतर इंग्लंडमध्यें बेदिली माजली. तेव्हा पार्लमेंटने १६६० साली पहिल्या चार्ल्सच्या मुलाला पाचारण करून इंग्लंडमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित केली. या घटनेस राजसत्तेचे पुनरुज्जीवन (रेस्टोरेशन) असे म्हणतात.

४. रशियात १९१८ साली लेनिनच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट पक्षाची, इटालीत १९२२ साली मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली फासिस्ट पक्षाची, व जर्मनीत १९३३ साली हिटलरच्या नेतृत्वाखाली नाझी पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली.

५. पाखंडी मताच्या व्यक्तींची चौकशी करून त्यांना शिक्षा ठोठावणारे न्यायासन. इ. स. १२३५ मध्ये रोमन कॅथालिक चर्चचा प्रमुख पोप नववा ग्रेगरी याने याची स्थापना केली. इटाली, स्पेन, पोर्तुगाल व त्यांच्या मांडलिक राष्ट्रात या न्यायासनाद्वारा स्वतंत्र आचार विचारांच्या मंडळींचा अनन्वित छळ झाला.

६. कॅलिगुला (इ. स. १२–४१) व नेरो (इ. स. ३७–६८). कुप्रसिद्ध रोमन सम्राट.

७. हिटलरच्या राजवटीत उभारलेल्या अनेक कैदी छावण्यांपकी एक अत्यंत गाजलेली कुप्रसिद्ध छावणी. अत्याधुनिक पद्धतींनी विषारी वायूप्रयोग करून एकाच वेळी शेकडो कैद्यांना मारण्याचे तंत्र या छावणीत वापरले जात असे.

८. हॅमंड पतिपत्नींनी इंग्लिश औद्योगिक क्रांतीच्या काळाशी संबंधित लिहिलेली पुस्तके पुढीलप्रमाणे आहेत. 'द राईज ऑफ मॉडर्न इंडस्ट्री', 'द व्हिलेज लेबरर', 'द टाऊन लेबरर' व 'द ब्लीक एज' या चारहि पुस्तकात औद्योगिक क्रांतीने घडून आलेल्या सामाजिक आर्थिक स्थित्यंतराचे तपशीलवार सखोल मार्मिक विवेचन केलेले आहे.

९. रशियन समाजवादी पक्षात लेनिनवादी समाजवाद्यांचा गट बोल्शेविक या नांवाने ओळखला जात असे. रशियन राज्यक्रांतीनंतर प्रथम केरेन्स्कीच्या

नेतृत्वाखाली प्रातिनिधिक राज्य अस्तित्वात आले. हे राज्य उलथून पाडून लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक गटाने लष्करी पाठिंब्याच्या जोरावर सर्व रशियावर आपली सत्ता प्रस्थापित केली. त्यावेळीं लेनिनचा बोल्शेविक गट हा अल्पसंख्य गट होता. म्हणून रशियातील कम्युनिस्टांची सत्ता ही वास्तविक गटशाहीच आहे.

१०. ( १७६२–१८१४ ) जर्मन तत्वज्ञ.

११. कार्ल मार्क्स ( १८१८–१८८३ ) कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाचा आद्य प्रणेता.

१२. खिस्तपूर्व (४२९–३२७) श्रेष्ठ ग्रीक तत्वज्ञ. सॉक्रेटिसचा शिष्य. पाश्चिमात्य संस्कृतीवर याच्या विचारांचा खोलवर परिणाम झालेला आहे. ‘ रिपब्लिक ’ या ग्रंथात आदर्श जीवन व आदर्श राज्यसंस्था यासंबंधी प्लेटोने विवेचन केले आहे.

१३. सोळाव्या शतकात अमेरिका खंडाचा शोध लागला त्यावेळी, आजच्या मेक्सिकोमध्ये ॲझटेक जमातीचे साम्राज्य होते. ॲझटेक लोकांची ‘ माया ’ संस्कृति सोळाव्या शतकातील स्पॅनिश आक्रमणात नष्ट झ.ली.

१४. (१८७०–१९३७) ऑस्ट्रियन मनोविश्लेषणशास्त्रज्ञ. फ्राईडने मानवी वर्तनाच्या बुडाशी कामवासना आहे असे प्रतिपादन केले तर सत्तालालसा ही सर्व मानवी वर्तनाच्या बुडाशी असते असे ॲडलरचे प्रतिपादन होते.

१५. ( १७३४–१८३२ ) इंग्लिश विचारवंत. उपयुक्ततावादी व उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा प्रणेता. माणसाची सहज प्रवृत्ति दुःख टाळून सुख साधण्याकडे असते, आणि या सहज प्रवृत्तीचा आधार घेऊन अधिकांचे अधिक सुख साधणारी समाजरचना निर्माण करणे शक्य आहे असे याचे मुख्य प्रतिपादन होते.

१६. ( १७७०–१८३१ ) जर्मन तत्त्वज्ञ. विकासाची प्रक्रिया ‘ द्वंद्वात्मक स्वयंचलित ’ असते; मानवी इतिहास म्हणजे एका चित्‌तत्त्वाच्या ( Idea ) विकासाचाच इतिहास होय; आणि, राज्यसंस्था हे या चित्‌तत्त्वाचे वर्तमान काळांतील परमोच्च रूप असे सारांशाने हेगेलचे प्रतिपादन होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ............ विः ......

प्रकरण चवथे

# लोकशाही व वैज्ञानिक तंत्रविद्या

लोकशाही या शब्दाला निःसंदिग्ध अर्थ उरलेला नाही. ' गुप्त पोलिस खात्याच्या निरंकुश सत्तेच्या जोरावर प्रस्थापित केलेली अल्पसंख्य गटाची लष्करी हुकूमशाही, ' असा एल्ब नदीच्या पूर्वेकडील प्रदेशात लोकशाहीचा अर्थ आहे. एल्बच्या पश्चिमेला[1] लोकशाहीचा अर्थ इतका सुस्पष्ट नाही. सामान्यतः, ' वेडे, गुन्हेगार आणि तत्सम लोकांना वगळून समाजातील सर्व प्रौढ व्यक्तींमध्ये अंतिमतः राजकीय सत्तेचे वांटप ' असा या प्रदेशात लोकशाहीचा अर्थ होतो. पण ' अंतिमतः ' या शब्दाचा वापर केल्याने ही व्याख्या कांटेकोर राहत नाही. उदाहरणार्थ, दर पांच वर्षांनी सार्वत्रिक निवडणुका घेण्याऐवजी दर तीस वर्षांनी सार्वत्रिक निवडणुका घेतल्या जाव्यात अशी एकच दुरुस्ती ब्रिटिश राज्यघटनेत करण्यात आली असे समजा. या एकाच दुरुस्तीने लोकमतावरील पार्लमेंटचे परावलंबन इतके कमी होईल की, या नव्या राज्यव्यवस्थेचे लोकशाही राज्यव्यवस्था असे वर्णन

करता येणार नाही. बहुसंख्य समाजवादी विचारवंतांच्या मते लोकशाही-मध्ये राजकीय सत्तेबरोबर आर्थिक सत्तेचेहि समवितरण व्हायला हवे. व्याख्येवरून होणारी ही शब्दचर्चा आपण बाजूला ठेवू. सत्तेचे समविभाजन हा लोकशाहीचा गाभा आहे इतके स्पष्ट झाले म्हणजे पुरे. सत्तेचे शंभर टक्के समविभाजन होणे अशक्यच आहे. तेव्हा, कोठेहि झाले तरी, कमी-अधिक प्रमाणातच लोकशाही अस्तित्वात असणार.

लोकशाहीचा विचार करताना, सामान्यतः, व्यक्ति व गट स्वातंत्र्य आणि लोकशाही यांचे समीकरण घालण्याची प्रवृत्ति लोकात आढळते. उदाहरणार्थ, ज्या देशात धार्मिक श्रद्धांवरून माणसांचा छळ होतो त्या देशात लोकशाही आहे असे लोक कल्पनेत देखील मानायला तयार होणार नाहीत. पण वर केलेल्या व्याख्येनुसार लोकशाहीमध्ये अल्पसंख्यांकांचा धार्मिक छळ ही गोष्ट सहजी बसते. अठराव्या व एकोणिसाव्या शतकातील 'स्वातंत्र्य' शब्दाच्या अर्थाने लोकशाही व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून 'स्वातंत्र्य' या परिकल्पनेचा निर्देश करणे आज योग्य होईल असे मला वाटत नाही.[२] त्याऐवजी 'स्वयंकर्तृत्वाला समान संधि' हे लोकशाहीचे व्यवच्छेदक लक्षण आहे असे म्हटल्यास ते अधिक वास्तविक होईल. विज्ञानप्रणीत समाजाचे व्यक्तित्त्व लक्षात घेऊन हा बदल करावा असे मी सुचवीत आहे.

लोकशाहीच्या नुसत्या कल्पनेने रूसो[३] व फ्रेंच राज्यक्रांतीच्या[४] पुढाऱ्यांना विलक्षण स्फुरण चढत असे. लोकशाहीचे ध्येय आज कोणाच्याच मनात फारशी स्फूर्ति निर्माण करीत नाही ही वस्तुस्थिति नाकारता येणार नाही. लोकशाही राज्यव्यवस्था प्रस्थापित करण्यात आलेल्या यशाचाच अर्थात हा मुख्यत्वेकरून परिणाम आहे. कोणत्याही सुधारणेचा पुरस्कार करणारे लोक ती सुधारणा घडून आली म्हणजे सर्वांची इच्छा पूर्ण होईल असे साधारणतः सांगतात. त्यामुळे, त्यांच्या पक्षाला मिळणाऱ्या नव्या अनुयायांची अपेक्षा नंदनवन निर्माण झालेले पाहण्याची असते. प्रत्यक्ष सुधारणेच्या अंमलबजावणीमुळे समाजाला भरीव लाभ झाला पण नंदनवन निर्माण झाले नाही तर, त्यामुळे या अनुयायात विफलता निर्माण झाल्याखेरीज राहात नाही. सोळाव्या लुईच्या राजवटीतील अनेक फ्रेंच लोकांना समाजातला सारा अन्याय

आणि पिळवणूक राजे, उमराव आणि धर्मोपदेशकांमुळेच आहे असे वाटले. म्हणून त्यांनी राजाचे ( आणि अनेक उमरावांची ) डोके उडविले आणि धर्मोपदेशकांना पळता भुई थोडी केली. पण इतके करूनहि त्यांच्या वांट्याला स्वर्गीय सुख आले नाही. तेव्हा, राजा वाईट, पण जग जिंकायला निघालेल्या सम्राट नेपोलियनच्या हाती आपले भाग्य निश्चितच उजळणार, असा निर्णय त्यांनी घेतला.

लोकशाहीच्या बाबतीतहि लोकांची झालेली प्रतिक्रिया याच प्रकारची आहे. बेंथॅमने व त्याच्या विचाराच्या मंडळींनी लोकशाहीचा पुरस्कार मर्यादा राखून केला. लोकशाही राज्यव्यवस्थेत काही प्रकारच्या अन्यायांचे परिमार्जन होईल असे त्यांनी म्हटले. आणि इंग्लंडमध्ये लोकशाही आल्या-वर त्यांनी सांगितलेल्या सुधारणा घडूनहि आल्या. पण लोकशाहीच्या अत्युत्साही पुरस्कर्त्यांनी, विशेषतः रूसोच्या अनुयायांनी, लोकशाहीबद्दल अकारण फार मोठ्या अपेक्षा निर्माण केल्या. परिणामी, अनेक उपयुक्त सुधारणा घडवून आणण्यात लोकशाहीने मिळविलेल्या यशाकडे दुर्लक्ष झाले. अन्यायांचे परिमार्जन झाल्याने लोकशाही येण्यापूर्वी अन्याय होता याचेच लोकांना विस्मरण झाले. या मनोवस्थेत कार्लाईलने[५] केलेली लोकशाहीची टिंगल टवाळी आणि नीत्शेने[६] ‘ गुलामांची नीतिमत्ता ’ म्हणून लोकशाही तत्त्व-ज्ञानावर केलेली विखारी टीका, दोघांचेहि म्हणणे लोकांना खरे वाटले. आधी लोकांनी मनांत सामान्य माणसाभोवती आदर्शांचे वलय निर्माण करून ठेवले होते. कार्लाईल आणि नीत्शेनंतर विभूतिपूजेने त्याची जागा घेतली. विभूतिपूजेच्या कल्पनेचा मूर्त राजकीय आविष्कार म्हणजेच फासिस्ट[७] पद्धतीची सर्वंकष हुकूमशाही होय.

विभूतिपूजेचा संप्रदाय मुळात प्रतिगामी व बेबंद असून विज्ञानप्रणीत समाजव्यवस्थेशी त्याचे सूत जमण्यासारखे नाही. पण ते जमण्याचे कारण असे की, कम्युनिझममध्ये विभूतिपूजेशी विसंगत अशी दुसरी एक निष्ठा समाविष्ट झालेली आहे. विभूतिपूजेप्रमाणेच ही दुसरी निष्ठाहि पण लोकशाहीविरोधी असली तरी, आधुनिक उद्योगव्यवसायातील तंत्रविद्येच्या आशयाशी मात्र ती सुसंगत आहे. या दुसऱ्या प्रवृत्तीचा विचार करणे आवश्यक आहे.

सामान्य माणसे आणि विभूति दोघांनाहि सारखेच बाजूला ठेवून संघटनांना महत्त्वाचे अग्रगण्य स्थान देणारी निष्ठा कम्युनिझममध्ये आढळते. या तत्त्वानुसार समाज वेगवेगळ्या वर्गांचा बनलेला असून सामाजिक वर्गालाच फक्त महत्त्व असते. व्यक्तीला सामाजिक वर्गाहून स्वतंत्र, स्वयंभू अस्तित्व असत नाही. असा प्रत्येक वर्ग कोणत्या तरी एका सामाजिक हितसंबंधाशी निगडित शक्तीचे प्रतिनिधित्व करीत असतो असे म्हटले जाते. अशा सामाजिक शक्तीचा, प्रवाहाचा, एक घटक म्हणूनच केवळ व्यक्तीला स्थान आहे.

अशा रीतीने तीन भिन्न भिन्न राजकीय तत्त्वज्ञानांना जन्म देणारे व्यक्ति-विषयक दृष्टिकोन आपल्यापुढे आहेत. या दृष्टिकोनांनुसार व्यक्तीकडे तुम्ही ( १ ) सामान्य माणूस, ( २ ) विभूति, किंवा ( ३ ) समाजयंत्रातील एक कळसूत्री घटक यापैकी कोणत्यातरी एका दृष्टिकोनातून पाहू शकता. पहिल्या दृष्टिकोनातून लोकशाहीचा, दुसऱ्यातून फासिस्ट विभूतिनिष्ठ हुकूमशाहीचा, आणि तिसऱ्यातून कम्युनिस्ट सर्वंकष राज्यसत्तेचा जन्म झाला. माझ्या मते, सामान्य माणसांना क्रियाशील जीवनाला उद्युक्त करणारी स्फूर्तिदायी शक्ति लोकशाहीला परत प्राप्त करून द्यावयाची असेल तर, माणसाकडे पाहण्याच्या दुसऱ्या दोन दृष्टिकोनातील तथ्यांश लोकशाहीने स्वीकारला पाहिजे.

प्रत्येक व्यक्ति वेगवेगळ्या परिस्थितीनुसार आळीपाळीने या तीन भूमिका वठवीत असते. आजच्या कवींमध्ये सर्वश्रेष्ठ महाकवि म्हणून तुमची गणना होत असली तरी रेशनकार्डावर किंवा मतदान केंद्रात तुमची गणना एक सामान्य माणूस म्हणूनच होत असते. या उलट, तुमचे दैनंदिन जीवन घाण्याच्या बैलासारखे कंटाळवाण्या चाकोरीत फिरत असेल, आणि तरीहि, तुमच्या जीवनात मधून मधून असे क्षण येतील जेव्हा तुमच्याही हातून वीरोचित तेजस्वी कृत्य घडेल. तुम्ही गटांगळ्या खाऊन मरणाऱ्याचा जीव वांचवाल किंवा देशाची सेवा करीत असताना तुम्हाला धारातीर्थी वीराला साजेसे मरण येईल. ( आजच्या काळी हा क्षण सामान्य माणसाच्या आयुष्यात येण्याची पुष्कळच शक्यता आहे. ) तुम्ही अेखाद्या संघटनेत, उदा. खाणीत किंवा सैन्यात, नोकरीला असलात तर नोकरीच्या ठिकाणी

तुमचे स्थान एका मोठ्या यंत्रातील कळसूत्री बाहुलीचे राहील. वैज्ञानिक तंत्रविद्येच्या प्रगतीमुळे कळसूत्री भूमिकेत जाणारा आयुष्याचा काळ माणसाच्या जीवनात इतका वाढत चालला आहे की, सामान्य व्यक्ति किंवा वीरपुरुष म्हणून माणसाच्या वांट्याला येणारे क्षण अत्यंत दुर्मिळ होत चालले आहेत. आधुनिक काळात लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या व्यक्तींनी लोकशाही समाजात माणसाच्या या दोन भूमिकांना योग्य अवसर राहील अशी लोकशाहीची मांडणी करण्याची दक्षता घेतली पाहिजे.

आदर्श समाजव्यवस्थेत प्रत्येक माणूस एकाच वेळी सामान्य व्यक्ति, वीरपुरुष आणि कळसूत्री बाहुली अशा तिन्ही भूमिका अधिकाधिक प्रमाणात वटवू शकेल. यापैकी कोणत्याहि एका भूमिकेशी त्याचा स्वभावधर्म अलौकिक प्रमाणात जुळत असेल तर दुसऱ्या दोन भूमिकांचे ओझे त्याच्यावर कमीत कमी टेवलें जाईल. वीरपुरुषाच्या भूमिकेत माणसाच्या स्वयंकर्तृत्वाला पूर्ण वाव असावा, सामान्य व्यक्तीच्या भूमिकेत त्याला सुरक्षितता लाभावी, आणि कळसूत्री बाहुलीच्या भूमिकेत तो उपयोगी ठरावा. कोणत्याहि एका प्रकारचीच माणसे असणाऱ्या समाजात संस्कृतीचा अत्युच्च उत्कर्ष होऊ शकत नाही. पोलंडची फाळणी[८] होण्यापूर्वी तेथील सर्वच माणसांची ( निदानपक्षी पोलिश उमरावांची ) भूमिका वीरपुरुषांची होती; अमेरिकेतील मध्य-पश्चिम राज्यात सगळ्या माणसांची भूमिका सामान्य व्यक्तींची आहे; आणि रशियात, कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ति समितीचे सभासद सोडून, बाकी सर्वांची भूमिका कळसूत्री बाहुल्यांची आहे. या तिन्हींपैकी कोणतीच व्यवस्था समाधानकारक नाही.

माणसांना सर्वकाळ कळसूत्री बाहुल्यांची भूमिका घ्यायला लावणे तांत्रिकदृष्ट्या शक्य कोटीतले असले तरी समाजधारणेकडे पाहण्याची ही दृष्टि मानवी कल्याणाच्या दृष्टीने अधिक विध्वंसक आहे. यंत्रवत् भूमिकेत माणूस **उपयोगी** ठरावा असे आपण म्हटले खरे. पण कोणत्या कामासाठी **उपयोगी** ? स्वयंकर्तृत्वाला चालना देण्यासाठी कळसूत्री माणसाचा उपयोग होऊ शकेल असे काही तुम्ही म्हणू शकत नाही. कारण यंत्रवत् भूमिकेतील कळसूत्री मनोवृत्ति ही वीरपुरुषाच्या मनोवृत्तीच्या बरोबर उलटी असते.

कळसूत्री माणसाचा उपयोग सामान्य माणसाच्या सुखासमाधानाच्या निर्मिती-साठी व्हावा असे तुम्ही म्हणालात तर, मानवी भावनांच्या परिपोषाला महत्त्वाचे स्थान देऊन यंत्राला गौण लेखता आहात असा अर्थ होतो. पण मानवी भावनांना अग्रस्थान दिलेत तर सर्व माणसांचे रूपांतर कळसूत्री बाहुल्यात करू पाहणारे तत्वज्ञान नाकारल्यासारखे होते. यंत्रपूजा हे तुम्ही समाजधारणेचे प्रधान उद्दिष्ट केलेत तरच माणसांना सर्वकाळ कळसूत्री बाहुल्या बनवू पाहणारे तुमचे तत्वज्ञान समर्थनीय ठरते. त्यातून निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाचे साधन एवढेच यंत्राचे स्थान ठेवून चालणार नाही. यंत्र हेच तुम्ही साध्य मानले पाहिजेत. अरेबियन नाईट्स गोष्टीतल्या जादूच्या दिव्याच्या गुलामांची[९] भूमिका मग जगातील माणसांना प्राप्त होते. यंत्राच्या साहाय्याने काय निर्माण होऊ शकेल या गोष्टीला महत्त्व उरत नाही. तरी पण अन्नधान्याच्या निर्मितीपेक्षा बाँबगोळ्यांच्या निर्मितीसाठी यंत्रे वापरावीत हे इष्ट; कारण बाँबगोळे तयार करण्याची प्रक्रिया गुंतागुंतीची असल्याने माणसांचे रूपांतर कळसूत्री बाहुल्यात करायला हे काम अधिक योग्य. कालांतराने मग माणसे यंत्राचीच करुणा भाकतील, ‘ हे सर्वशक्तिमान कृपाळू यंत्रा, निखळून पडलेल्या खिळ्यांप्रमाणे आम्ही तुझ्या सेवेपासून विचलित झालो. सेवेत चुकलो. जे नट-बोल्ट बसवायला हवे होते ते सोडून दुसरेच नट-बोल्ट बसविण्याचे काम लक्ष विचलित झाल्यामुळे आमच्या हातून घडले. हे यंत्रदेवा, पुरेसा कळसूत्रीपणा अजून आमच्यात मुरलेला नाही.—वगैरे वगैरे. ’

ही सारी कल्पनाच असह्य आहे. यंत्रपूजा ही अत्यंत गर्हणीय गोष्ट आहे. दैवताच्या जागी बसविलेले यंत्र हा सैतानाचा आधुनिक अवतार असून यंत्रपूजा ही आधुनिक पिशाच्चलीला होय.

याचा अर्थ असा नव्हे की सॅम्युअल बटलरच्या ‘एरव्होन’[१०] लोकावरील समाजाप्रमाणे आपणहि यंत्रांवर बंदी घालावी. इजिप्शियन लोक वृषभाची दैवत म्हणून पूजा करीत. आपण इंग्लिश लोक ही गोष्ट चूक मानतो; पण म्हणून बैलांची आपण कत्तल केलेली नाही. यंत्राने देवाची जागा घेऊ पाहिली तरच यंत्राला माझा विरोध आहे. जीवनाची इतर अंगे यंत्रवत्

असतील कदाचित, पण मानवी मूल्यांचा आशय कधीच यांत्रिक असत नाही. ही गोष्ट कोणत्याहि राजकीय विचारवंताने कधीहि विसरता कामा नये.

हा सर्व कल्पनेचा रम्य खेळ सोडून आपण आपल्या मुख्य विषयाकडे म्हणजे लोकशाहीच्या विचाराकडे वळू या.

वैज्ञानिक तंत्रविद्येची जशी प्रगति होत जाते तशी समाजाची संघटना सजीव प्राणि संघटनेप्रमाणे एकजीव होत जाते. या एकजीव समाजात माणूस हा अधिकाधिक कळसूत्री बाहुल्यासारखा बनत जातो. या प्रक्रियेत शेवटी माणसाचे माणूसपणच हरवून जायचे नसेल तर तो **पुरता** कळसूत्री बाहुली बनणार **नाही** यासाठी काही मार्ग शोधून काढला पाहिजे. संघटनेची व्यामिश्रता व व्याप वाढत असताहि माणसांच्या स्वयंकर्तृत्वाला वाव राहिला पाहिजे असा याचा अर्थ आहे. बहुतांश प्रसंगात सामान्य माणसांच्या स्वयंकर्तृत्वाचा आविष्कार राजकीय स्वरूपाचा राहील. आपण सभासद असलेल्या संघटनेच्या ध्येय धोरणावर आपल्या मतांचा प्रभाव पाडणे हे स्वयंकर्तृत्वाच्या आविष्काराचे सामान्यतः स्वरूप राहील. अशा स्वयंकर्तृत्वाला अवसर मिळावयाचा असला तर प्रत्येक संघटनेचा कारभार अधिकाधिक प्रमाणात लोकशाही पद्धतीने चालविला गेला पाहिजे. इतकेच नाही तर, संघराज्याचे तत्त्व अधिक कनिष्ठ पातळ्यांवरील शासनसंस्थांनाहि लागू करायला हवे. म्हणजे स्थानिक स्वराज्य संघटना पुरेशा स्वायत्त बनतील आणि कोणत्या ना कोणत्या स्थानिक स्वराज्य संघटनांच्या कारभारात उत्साही सभासद व्यक्तीला प्रभावीपणे भाग घेता येईल.

आज वेगवेगळ्या शासनसंस्थांचे मतदारसंघ इतके विस्तीर्ण पसरलेले आहेत की लोकशाहीची मूळ उद्दिष्टे साध्य होऊ शकत नाहीत. अध्यक्षीय निवडणुकीत भाग घ्यावा अशी आस्था असणारे तुम्ही एक अमेरिकन नागरिक आहात असे समजा. तुम्ही सिनेटचे किंवा कॉंग्रेसचे[११] सभासद असाल तर या निवडणुकीवर तुम्ही बराच प्रभाव टाकू शकाल. पण दहा लाखांमध्ये एकजण या पदांवर असू शकतो, तेव्हा बहुधा तुमचे इतके भाग्य नसणार. एखाद्या वॉर्डात तुम्ही पुढारी असलात तर थोडाबहुत

प्रभाव तुमचा पडेल. पण तुम्ही जर एक सामान्य नागरिकच असाल तर मत देण्यापलिकडे तुम्ही काही करू शकत नाहीं. आणि, एका माणसाने मत दिले किंवा दिले नाही म्हणून निवडणुकीचा निकाल बदलला आहे अशी एकहि अध्यक्षीय निवडणूक दाखविता येईल असे मला वाटत नाही. म्हणून हुकुमशाही राजवटीत राहणाऱ्या नागरिकाइतकीच अगतिकता तुम्ही प्रत्यक्षात अनुभवता. तुमच्या प्रतिक्रियेत परिचित तर्कदोष आहे. 'ढिगाऱ्यात एका दाण्याचें काय होय ' असे प्रत्येक दाण्याने म्हटले तर मुळात ढिगारा बनणारच नाही. पण सामान्यतः बहुतेक माणसांच्या प्रतिक्रिया अशा तर्कदुष्ट असतात ही वस्तुस्थिति आहे. इंग्लंडमधील परिस्थिति इतकी प्रतिकूल नाही. सर्व राष्ट्रच एक मतदारसंघ आहे अशी कोणतीच निवडणूक इंग्लंडमध्ये होत नाही. १९४५ साली ज्या उमेदवाराच्या बाजूने मी प्रचार केला तो अवघ्या शेहेचाळीस मतांनी निवडून आला. माझ्या प्रचारामुळे चोवीस मतदारांनी आपले मत बदलले असले तर मी बसून राहण्याने निवडणुकीचा निकाल फिरला असता. समजा की, पार्लमेंटमध्ये मजूर पक्षाची एकाच संख्येने सरशी झाली असती तर, मला माझे भलतेच महत्त्व वाटले असते. ( पण, प्रत्यक्षात, विजयी पक्षाच्या गोटातला मी एक आहे एवढ्या आनंदावरच समाधान मानून घ्यावे लागले. )

स्थानिक राजकारणात अधिक लोकांनी क्रियाशील भाग घेतला तर लोकशाहीची उद्दिष्टये साध्य होण्यात भर पडेल. दुर्दैवाने फार थोड्या व्यक्ति स्थानिक राजकारणात भाग घेतात. यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. बहुतेक सर्वच महत्त्वाचे प्रश्न राष्ट्रीय पातळीवरून सोडविले जातात, स्थानिक स्वराज्य संस्थांचा त्यात सहभाग असत नाही, हे या उदासीनतेचे एक प्रमुख कारण आहे. आपल्या नागरिकत्वाचा अभिमान पूर्वीप्रमाणे अलिकडे लोकांना वाटत नाही ही खरोखरी दुर्भाग्याची गोष्ट आहे. आपल्या शहरात सर्वोत्तम, भव्य प्रार्थनामंदिर असले पाहिजे अशी मध्ययुगीन युरोपातल्या शहरांमध्ये चढाओढ लागलेली असे. या चढाओढीतून सर्व युरोपभर उभारल्या गेलेल्या एकाहून एक सरस प्रार्थनामंदिरांच्या सौंदर्याचा आस्वाद आजहि आपण घेत आहोत. आलिकडच्या

काळात, स्टॉकहोमच्या[१२] नागरिकांनाहि आपल्या शहरातील टाऊन हॉल जगात पहिल्या क्रमांकाचा असला पाहिजे अशी ईर्षा वाटली आणि त्यांनी भव्य टाऊन हॉल बांधला. दुर्दैवाने इंग्लंडमधील मोठ्या शहरातील नागरिकात आपल्या शहराबद्दल अशी अभिमानाची व ईर्षेची भावना असल्याचे आढळत नाही.

औद्योगिक क्षेत्रात सत्ता विभाजनाला खूपच वाव आहे. गेली अनेक वर्षे रेल्वे राष्ट्रीय मालकीची करावी या धोरणाचा ब्रिटिश मजूर पक्षाने आग्रहाने पुरस्कार केला. मजूर पक्षाच्या या मागणीला बहुसंख्य रेल्वे नोकरांनी व कामगारांनी पाठिंबा दिलेला होता. आता अनेकांना असे अनुभवाला येत आहे की खाजगी कंपनी आणि राज्यसंस्था यांच्यामध्ये वर्तणुकीत फारसा फरक पडत नाही. खाजगी कंपनीप्रमाणेच राज्यसंस्था हा मालकहि दूरस्थ असतो. हुजूर पक्षाचे सरकार आले तर कामगार संघटनांशी त्या सरकारचे संबंध खाजगी कंपनीप्रमाणेच वितुष्टाचे राहतील अशी चांगलीच शक्यता आहे. वस्तुतः, राष्ट्रीयीकरण करीत असतानाच रेल्वे व्यवसायाला मर्यादित प्रमाणात स्वयंशासनाचा अधिकार दिला जायला हवा होता. रेल्वेत काम करणाऱ्या नोकरांनी व कामगारांनी लोकशाही पद्धतीने निवडलेल्या ‘सरकार’ने रेल्वे व्यवसायाचा अंतर्गत कारभार चालवावा अशी व्यवस्था निर्माण करायला हवी होती.

संघराज्याच्या धर्तीवर उभारलेल्या सर्वच संघटनांचे कारभार (आणि आज सर्वच बड्या संघटना आणि राष्ट्रे संघराज्याच्या धर्तीवरच प्रत्यक्ष व्यवहार करीत आहेत) चालविण्याचे सर्वसामान्य मार्गदर्शक तत्त्व पुढीलप्रमाणे असावे. प्रत्येक पातळीवरील घटकसंस्थेच्या व्यवहारांची अंतर्गत बाबी व परघटकांशी संबंधित बाबी अशा पद्धतीने खातेवांटणी व्हावी. अंतर्गत बाबींपुरती प्रत्येक घटकसंस्थेला पूर्ण स्वायत्तता असावी, आणि परघटकांशी संबंधित तेवढ्याच बाबी त्या पातळीवरील वेगवेगळ्या घटकांच्या मिळून बनलेल्या संघाच्या अखत्यारात असाव्यात. हा संघहि अधिक उच्चतर पातळीवरील संघराज्याचा एक घटक असावा, आणि पुन्हा, संघ आणि संघराज्य यांच्यातील अधिकार वांटप अंतर्गतबाबी व परघटकांशी

संबंधित बाबी या तत्त्वावर केले जावे. अशी ही मालिका प्रत्येक उच्चतर पातळीवर अधिक व्यापक होत होत विश्वराज्यापर्यंत जाऊन पोचेल. सध्या तरी आपल्या पृथ्वीवरील विश्वराज्याला 'परराष्ट्रखाते' असणार नाही. कोणती बाब अंतर्गत आणि कोणती परघटकांशी संबंधित आहे यांचा निर्णय करणे नेहमीच सोपे जाते असे नाही. पण आज अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशात अधिकार वांटपाच्या क्षेत्रातील वादग्रस्त मुद्यांसंबंधी निर्णय देण्याकरता न्यायालये आहेत. त्याच धर्तीवर विश्वराज्यातहि ही बाब न्यायालयाधीन ठेवता येईल.

संघराज्याचे तत्त्व भौगोलिक क्षेत्राच्या दृष्टीनेच केवळ अंमलात आणणे पुरेसे नसून व्यवसायवारहि ते लागू केले जाण्याची आवश्यकता आहे. पूर्वीच्या काळी प्रवास मंदगतीने होत असे आणि अनेक कारणांनी रस्ते दुर्लंघ्य असत. त्यामुळे केंद्रीय सत्तेची उपकेंद्रे भौगोलिकदृष्ट्या वेगवेगळ्या ठिकाणी प्रस्थापित करण्याला विशेष महत्त्व होते. पण आज, विशेषतः इंग्लंडसारख्या छोट्या देशात, शासनसंस्थेला आपली काही कामे कामगार संघटनांवर सोपविणे मुळीच अशक्य नाही. कामगार संघटनांचे सभासद व्यवसायवार नोंदविलेले असल्याने भौगोलिकदृष्ट्या एका फार मोठ्या क्षेत्रात, प्रसंगी देशभर, विखुरलेले असतात. पण आधुनिक जलद प्रवासी साधनांमुळे देशभर विखुरलेल्या सभासदांपर्यंत पोचणे आज सहज शक्य आहे. उद्योगधंद्याच्या दृष्टीने परघटकांशी संबंध येणाऱ्या बाबी म्हणजे कच्च्या मालाचा पुरवठा, आणि तयार मालाची बाजारपेठ (कोणत्या प्रकारच किती माल हवा). या दोन गोष्टींवर त्या उद्योगधंद्याचे नियत्रंण अस्चे कामा नये. या दोन बाबी सोडल्या तर इतर सर्व बाबींमध्ये त्या उद्योगधंद्याला अंतर्गत स्वायत्तता द्यावी.

रखेच

आवश्यक तिथे नियंत्रणाचे केंद्रीकरण कायम ठे...े तरी अंथव्यवस्थेत वैयक्तिक स्वयंकर्तृत्वाला खूप अधिक संधि मिळेल. य... गरजेअशी विकेंद्रित राज्यव्यवस्था राबविणे कठीण जाईल हे उ... अडचण जोपर्यंत युद्धाचे सावट कायम आहे तोवर राज्यसंस्थेच्या स...च्या आड फारच मार्यादित प्रमाणात विभाजन करता येण्याची आशा ...ठी कोणती

पाठोपाठ होत गेलेल्या चढ्या श्रेणीच्या युद्धांमुळेच प्रामुख्याने आधुनिक राज्यसंस्थांच्या हाती फाजील सर्वंकष सत्ता अेकवटली. युद्धाचे भय कायम असेपर्यंत तांतडीची उद्दिष्टे साध्य करण्यात कार्यक्षम ठरणाऱ्या कार्यपद्धतींनाच अग्रहक्क मिळावा हे अटळ आहे. पण युद्धाचे संकट निवारण्यात यशस्वी झालेल्या विश्वराज्यातील व्यवहार कसे चालतील त्याचे चित्र रेखाटण्याला अेक महत्त्व आहे असे मला वाटले.

ज्या संघराज्यपद्धतीचे मी आतापर्यंत विवेचन केले त्यापेक्षा, थोडी वेगळी संघटना काही विशिष्ट क्षेत्रात, किंवा विशिष्ट कारणास्तव, वापरणे उपकारक ठरू शकेल. म्हटले तर या संस्था शासनसंस्थेचाच एक भाग असतात, आणि तरीहि, काही बाबतीत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य असते. इंग्लिश विद्यापीठे, रॉयल सोसायटी, बी. बी. सी.[१३] आणि लंडन बंदराच्या कारभार पाहणारी पोर्ट ऑफ लंडन ॲथॉरिटि ही अशा काही संस्थांची उदाहरणे आहेत. समाजात किमान एकजिनसीपणा असला तरच या स्वायत्त संस्था निर्वेधपणे काम करू शकतात. उद्या जर रॉयल सोसायटी किंवा बी. बी. सी. या संस्थांमध्ये कम्युनिस्टांचे बहुमत होऊन त्यांच्या हाती या संस्थांचा कारभार गेला तर, या संस्थांच्या स्वायत्ततेवर पार्लमेंट बंधने घालील यात शंका नाही. पण अशी संघर्षाची स्थिति निर्माण होत नाही तोवर या संस्थांना स्वातंत्र्य आहे, ही गोष्ट सर्वांच्या अत्यंत हिताची आहे. इंग्लंडमधील प्राचीन विद्यापीठांचा कारभार हाती असलेल्या व्यक्तींना ज्ञानाबद्दल आदर असल्याने विद्यापीठातून काम अरणाऱ्या ज्ञानी पंडितांना, मग ते कम्युनिस्ट असले तरी, आपले ज्ञानदानाचे व्यवम निर्वेधपणे करता येते हे पाहून मला आनंद होतो. अमेरिकेतील प्रमाणे पीठातून पुष्कळ विद्यापीठांचा कारभार ज्ञानाच्या क्षेत्राशी संबंधित बाबी ल्या व्यक्तींच्या हाती असल्याने तेथे मात्र विरोधी किंवा पाखंडी अंतर्गत ाच्या ज्ञानी माणसाला अत्यंत असहिष्णु वागणूक मिळताना दिसते.

घटकांशी निक ळात, ललितकला आणि साहित्य या क्षेत्रातील कलावंतांची मिळून बनैशिष्ट्यपूर्ण अशी की, पूर्वीच्या काळातील अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य उच्चतर पातळपल्या व्यवसायात ते उपभोगू शकतात. सिनेमाच्या क्षेत्रात जर आणि संघराज्हीत तर वैज्ञानिक तंत्रविद्येचा संपर्कहि त्यांना होत नाही.

इतर कलावंतांच्या मानाने लेखकांना स्वातंत्र्य अधिक आहे. धनाढ्य राजे-रजवाडे आणि भांडवलदार यांचा आश्रय आता पूर्वीसारखा मिळत नसल्यामुळे कलावंतांना आपल्या उपजीविकेकरता शासनसंस्थेवर अधिकाधिक अवलंबून राहावे लागत आहे. पण उपासमार सहन करण्याची ज्या कलावंतांची तयारी असेल तो आपल्या मनाप्रमाणे अस्सल कलेच्या निर्मितीचा आनंद उपभोगायला आजहि स्वतंत्र आहे. तथापि, भविष्याकडे नजर टाकल्यास, लेखक–कलावंतांची परिस्थिति गंभीर असल्याचे लक्षात येते. रशियात आजच लेखक–कलावंतांची स्थिति परवानाधारी पगारी भाटांची आहे. इतरत्रहि, एकदा शासनसंस्थेने सर्व प्रौढांची श्रमशक्ति सरकारच्या मालकीची केली की, कोणालाहि बहुधा बारा न्यायाधीशांच्या वा मंत्र्यांच्या सहीचे सर्टिफिकेट दाखविल्याशिवाय लेखन करता यावयाचे नाही की चित्रे रंगविता यावयाची नाहीत. आता, या उच्चपदस्थ धेंडांची अभिरुचि उच्च दर्जाची असेलच अशी खात्री देता येईल असे मला वाटत नाही.

उदारमतवादी दृष्टिकोनातून विचार केला तर ऐहिक सुखोपभोगापेक्षा वैचारिक क्षेत्रात स्वातंत्र्याचे महत्त्व अधिक आहे. या तरतमभेदाचे कारण उघड आहे. मन आणि बुद्धि यांच्याशी निगडित असलेल्या गोष्टी दुसऱ्यांच्या काढून घेऊन माझ्या मालकीच्या करायच्या नसतात. माझ्या जवळचे ‘ धन ’ मी वाढवीत असता दुसऱ्याच्या पोटावर मी पाय आणीत नसतो. भौतिक सुखाची गोष्ट निराळी आहे. उदाहरणार्थ, अन्नधान्याचा सांठा मर्यादित असला तर, ‘ सामाजिक न्याया ’च्या तत्त्वानुसार त्याचे वांटप व्हावे ही गोष्ट उघड आहे. प्रत्येकाला हवे तेवढे अन्नधान्य घेण्याचे स्वातंत्र्य देता येणार नाही. न्याय्य वांटप म्हणजे दर माणशी सर्वांना सारखेच अन्न वांटप असा मात्र नाही. मेहनतीचे काम करणाऱ्या मजुराला अंथरुणाला खिळलेल्या म्हाताऱ्या माणसापेक्षा अधिक अन्न दिले जाईल. गरजेनुसार दाम या उक्तीनुसार वांटप केले जाईल. पण इथे एक अडचण उद्भवते. उदाहरणार्थ, समाजवादाचे विरोधक अशा समवांटपाच्या आड येणाऱ्या एका समस्येवर भर देत असतात. उत्पादक श्रमासाठी कोणती

प्रेरणा पुरेशी समर्थ ठरू शकेल ही ती समस्या होय. भांडवलशाहीत उपाशी मरण्याच्या भीतीने माणूस काम करतो. कम्युनिस्ट राजवटीत जबर शिक्षेच्या भयाने माणूस काम करतो. माणसाने भुकेच्या वा शिक्षेच्या भीतीने काम करावे ही गोष्ट लोकशाही समाजवाद्यांना खटकते. पण, मला नाही वाटत, शुद्ध सार्वजनिक सेवेच्या प्रेरणेतून उद्योगधंदे किफायतशीरपणे चालतील. वैयक्तिक हिताशी त्यापेक्षा अधिक घनिष्ठ संबंध असलेल्या प्रेरणेची सामान्यतः आवश्यकता राहील. माझे स्वतःचे असे मत आहे की, समाजवादातील सार्वजनिक हिताच्या तत्त्वाची सामूहिक नफ्याच्या प्रलोभनाशी सांगड घालणे आवश्यक आहे, आणि ते शक्यहि आहे. कोळशाच्या खाणींचे उदाहरण घ्या. वेगवेगळ्या प्रतीचा कोळसा आपण कोणत्या दराने खरेदी करणार ते सरकारने वर्षाच्या आरंभी ठरवून द्यावे. खाणीतून कोळसा काढण्यासाठी कोणते तंत्र वापरावयाचे ते कोळसा खाण उद्योगातील माणसांवर सोपवावे. असे केले तर तांत्रिक सुधारणांमुळे खाण कामगारांची मिळकत तरी वाढेल किंवा त्यांचे कामाचे तास तरी कमी होतील. एका नव्या स्वरूपात नफ्याचे प्रलोभन कायम राहील; पण नफ्याच्या प्रलोभनापायी समाजाला भोगाव्या लागणाऱ्या दुष्परिणामांचे परिमार्जन होईल. सत्ता विभाजनाचे तत्त्व लागू केले तर प्रत्येक खाणीला सामूहिक नफ्याच्या पद्धतीने स्वतंत्रपणे काम करण्याची मोकळीक देता येईल.

वैचारिक व मानसिक गोष्टीत ‘ सामाजिक न्याय ’ किंवा ‘ समूह प्रेरणा ’ दोहोंचे महत्त्व नाही. आपापल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाची प्रत्येकाला पूर्ण संधि मिळणे या गोष्टीलाच त्या ठिकाणी महत्त्व आहे. माणूस जिवंत राहिला तरच त्याला संधीचा लाभ घेता येणार; या अर्थाने भौतिक वस्तूंचाहि समावेश ‘ संधि ’ या शब्दामध्ये केला पाहिजे ही गोष्ट अलाहिदा. अव्वल दर्जाची सर्जनशक्ति असणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींना ऐषआरामाच्या जीवनाचे आकर्षण नसते. तेव्हा साधारण सुखी जीवन जगण्यासाठी आवश्यक इतक्याच भौतिक वस्तूंचा समावेश संधि या शब्दात केला तरी पुरे. या व्यक्तींचे जीवितकार्य पूर्ण झाल्यावर, सॉक्रेटिसप्रमाणे[१४], शासनसंस्थेने त्यांना यमसदनी पाठविले तर कोणाचे काहीच नुकसान होत नाही की

कोणाला इजा पोचत नाही. पण जिवंतपणी, त्यांचे कार्य अपुरेच राहिलेले असताना, जर शासनसंस्थेने त्यांच्या कामात अडथळा उत्पन्न केला तर फार मोठी हानि होते. कलावंतावर मानसन्मानांचा वर्षाव करून त्याच्या मोबदल्यात त्याला शासनसंस्थेचा मिंधा बनविणे हा देखील कलावंताच्या जीवनकार्यात अडथळा उत्पन्न करण्याचाच मार्ग आहे. बंडखोरीचे मोहन पडल्याखेरीज कोणत्याहि समाजाचा विकास होत नाही आणि आधुनिक तांत्रिक प्रगतीमुळे तर बंडखोरीला समाजात काम करणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

समाजात बंडखोरी टिकवून धरणाच्या मार्गातील अडचणी फार मोठ्या आहेत. विज्ञानाच्या क्षेत्रात तर यावर पूर्ण समाधानकारक उत्तर आहे असे मला वाटत नाही. समाजाने प्रमाण मानलेली राजकीय भूमिका ज्याची असेल त्यालाच फक्त अमेरिकेत अणु पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन करता येते. रशियात, राजकीय क्षेत्रातील अधिकृत प्रमाण भूमिकेच्या जोडीला, शासनसंस्थेने विज्ञानाच्या क्षेत्रात प्रमाण ठरविलेली भूमिका स्वीकारल्याशिवाय विज्ञानाच्या कोणत्याच क्षेत्रात संशोधन करता येत नाही. रशियात विज्ञानक्षेत्रातील अधिकृत भूमिका स्वीकारली तर स्टालीनच्या सर्वप्रकारच्या अडाणी पूर्वग्रहांना शिरोधार्य मानावे लागते. शास्त्रीय उपकरणांवरील खर्च अफाट असल्याने आज विज्ञानाच्या क्षेत्रात बंडखोर व्यक्तीला स्वतंत्रपणे संशोधन करता येत नाही ही खरी अडचण आहे. कर्ज-फेडीकरता कोणावर दावा केला असता त्याची उपजीविकेची औजारे लिलावात काढली जाऊ नयेत असा कायदा आहे, किंवा निदान पूर्वीच्या काळी होता; पण आज उपजीविकेची (किंवा व्यवसायाची) साधने कोट्यावधि रुपये किंमतीची असल्याने अठराव्या शतकातील कारागिराला मिळणारे संरक्षण संशोधकाला कसे मिळावे ?

अणु पदार्थविज्ञान क्षेत्रात संशोधन करू इच्छिणाऱ्या शास्त्रज्ञाने अधिकृत राजकीय भूमिकेशी एकनिष्ठ असले पाहिजे असा आग्रह धरण्याबद्दल, आजच्या जागतिक परिस्थितीत, कोणत्याहि देशाच्या सरकारला बोल

लावता येणार नाही. आपल्या व्यवसायाचे साधन म्हणून गी फॉक्सने[१५] जर बंदुकीच्या दारूची मागणी हक्क म्हणून केली असली तर पहिल्या जेम्सने त्याच्या मागणीकडे संशयानेच पाहिले असते. आण्विक संशोधनाच्या बाबतीत तर शासनसंस्थेने सर्वांकडे संशयित नजरेने बघण्याला आज किती तरी अधिक सबळ कारण आहे. आण्विक संशोधनाने उपलब्ध होणाऱ्या शक्तीचा उपयोग कोणाचा विनाश करण्यासाठी वापरला जाईल त्याची आपल्याला अनुकूल हमी शास्त्रज्ञाकडून मिळण्याचा आग्रह राज्यसंस्थेने धरलाच पाहिजे अशी परिस्थिति आहे. पण, विज्ञानाच्या क्षेत्रातहि शासन-संस्थेच्या अधिकृत भूमिकेचे प्रामाण्य प्रत्येक शास्त्रज्ञाने स्वीकारलेच पाहिजे, या आग्रहाचे कोणत्याहि सबबीवर समर्थन होऊ शकत नाही. वैज्ञानिक संशोधन करण्याची एखाद्या व्यक्तीची कुवत मोजण्याच्या काही साध्या रीती आहेत. विज्ञानाच्या क्षेत्रात शासनसंस्थेच्या अधिकृत भूमिकेचे प्रामाण्य शास्त्रज्ञ स्वीकारतो की नाही यापेक्षा, शास्त्रीय संशोधन करण्याची त्याची लायकी पाहून त्याला संशोधनाची संधि दिली जावी, हे तत्त्व अंगिकारणे सहज शक्य आहे. सामान्यतः, पश्चिम युरोपात, आज याच तत्त्वानुसार संशोधनासाठी शास्त्रज्ञांना सहाय्य दिले जात आहे. पण शास्त्रज्ञात जर एखाद्या ( शास्त्रीय स्वरूपाचा ) घटनेवरून तीव्र मतभेद होऊन गंभीर तट पडले तर, पश्चिम युरोपातहि हे तत्त्व पाळले जाईलच असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही; इतक्या नाजुक आधारावर ते उभे आहे.

कला आणि साहित्याच्या क्षेत्रात बंडखोरी टिकवून धरण्याच्या मार्गातील अडचणींचे स्वरूप वेगळे आहे. या व्यवसायांना लागणारी उपकरणे अल्प किंमतीची असल्यामुळे शासनसंस्थेवर फार मोठा बोजा पडत नाही. त्यामुळे लेखक कलावंतांना आपल्या मताप्रमाणे काम करण्याचे स्वातंत्र्य अधिक मिळू शकते. मात्र कलासाहित्याच्या क्षेत्रात गुणी माणसाची पारख करणे ही कितीतरी अधिक अवघड गोष्ट आहे. वयाने ज्येष्ठ असलेल्या लेखक-कलावंतांचे तरुण लेखक—कलावंतासंबंधीचे मत हमखास चुकीचे असते. ज्या नव्या लेखक-कलावंतांचा कालांतराने लोकांकडून श्रेष्ठ म्हणून निवाडा होतो त्यांच्यावर, प्रारंभीच्या काळात, मान्यवर ज्येष्ठ पंडितांनी आग पाखडली होती

असे नेहमीच घडले आहे. म्हणून, नव्या होतकरू लेखक-कलावंतांची निवड करण्याच्या दृष्टीने फ्रेंच अकादमी किंवा रॉयल अकादमी[१६] यांच्यासारख्या सरकारमान्य प्रतिष्ठित संस्था केवळ कुचकामाच्या नसून, हानिकारक असतात. कलावंताच्या ऐन उमेदीच्या काळात त्याची पारख समाजाकडून व्हावी याची काही रीत बसविता येत नाही. कलावंताच्या गुणांची ओळख पटेपर्यंत तो वृद्ध झालेला असतो, वा त्याच्या सगळ्या महत्त्वाच्या कृति लोकांच्या समोर आलेल्या असतात असेच बहुधा घडते. सहिष्णु वृत्तीने कलावंताला काम करण्यास संधि द्यावी एवढी एकच गोष्ट समाज करू शकतो. 'मला चित्रे काढायची आहेत' असे म्हणणाऱ्या प्रत्येकाला परवाना देऊन, त्याच्या चित्रकलेकरता, मग ती कितीहि भिकार असो, त्याच्या भरणपोषणाची जबाबदारी समाजाने घ्यावी अशी अपेक्षा कशी बाळगता येईल ? त्याला समाजाकडून आश्रय मिळेपर्यंत कलावंताने पोटापाण्यासाठी दुसरा व्यवसाय करावा आणि आपली कलेची उपासना स्वतंत्रपणे फावल्या वेळात करावी हा एकच मार्ग दिसतो. पोटापुरती मिळकत देणारे पार्ट-टाईम काम त्याने पत्करावे, काटकसरीने साधे जिणे जगावे, आणि फावल्या वेळात कलाकृति निर्माण कराव्यात. काही प्रसंगी याहून अधिक सुसह्य असा मार्ग निघू शकेल. उदाहरणार्थ, नाटककार स्वतःच नट बनू शकतो; किंवा संगीत रचना करणारा स्वतःच गायकवादकहि असतो. तात्पर्य असे की, आपले कलाकृति निर्मितीचे काम तरुण लेखक-कलावंतांनी समाजाच्या अर्थव्यवहारांपासून अलिप्त ठेवावे, आणि समाज ज्यासाठी किंमत मोजायला तयार आहे अशा कामापासून आपला उदरनिर्वाह साधावा. आपल्या कलोपासनेसाठी जर तो शासनसंस्थेवर अवलंबून राहिला तर, सरकारी अधिकाऱ्यांच्या बेअक्कल सेन्सॉरशिपच्या बंधनात त्याची कला भ्रष्ट होईल, त्याच्या कलोपासनेत व्यत्यय येईल. जो कोणी उच्च दर्जाचे काम करीत आहे त्याला त्याच्याबद्दल शिक्षा होऊ नये एवढीच अपेक्षा या क्षेत्रात शासनसंस्थेकडून आहे. एवढेहि शासनसंस्थेने केले तर कमी नाही.

जगातल्या रोजच्या प्रश्नांना तोंड देता न येणारी दुर्बल माणसे कल्पनेने भावी रामराज्याची चित्रे रंगविण्याचा फसवा खेळ खेळून स्वतःचे समाधान

करून घेतात अशी कुत्सित टीका केली जात असे. पण, आपल्या देखत समाज अतिशय झपाट्याने बदलत गेला आहे आणि या परिवर्तनाची प्रेरणा आदर्श समाजाची चित्रे रंगविणाऱ्या स्वप्नरंजकांपासून मुख्यत्वेकरून मिळालेली आहे. तेव्हा, स्वप्नरंजन हा एक दुर्बलांचा रिकामपणचा उद्योग म्हणून त्याची उपेक्षा न करता, या स्वप्नरंजनामागील प्रमुख प्रेरणांच्या इष्टानिष्टतेचा विचार करण्याची गरज आहे. आदर्शवादी स्वप्नरंजकाची टर उडविणारा मार्क्स, आणि त्याचा शिष्य लेनिन,[१७] हे दोघेहि आदर्शवादी स्वप्नरंजकांपैकीच एक होते. एका विराट आणि शक्तिमान राष्ट्रात आपले स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याचे अपूर्व भाग्य लाभणारा लेनिन हा, मला वाटते, आजवरच्या इतिहासात एकटाच आहे. तत्वज्ञानी आणि राजा यांचा संयोग एकाच व्यक्तीच्या ठिकाणी आढळावा अशी कल्पना प्लेटोने मांडली होती. प्लेटोच्या या 'तत्वज्ञ राजा'च्या कल्पनेशी सर्वांत जुळतीमिळती व्यक्ति आजवरच्या इतिहासात लेनिन हीच होऊन गेली. लेनिनने निर्माण केलेले राज्य 'रामराज्य' ठरले नाही याचे मूळ मार्क्स–लेनिन यांच्या विचारातील सैद्धान्तिक दोषात आहे. ही दोन्ही माणसे हुकूमशाही प्रकृतीची असल्यामुळे भावनेच्या रसायनातून हे विचार दोष निर्माण झाले, हे खरे असले तरी, दोष, मूलतः व प्रधानतः, सैद्धान्तिक स्वरूपाचेच होते हे ओळखले पाहिजे.

साम्यवादाशी सामना देऊ शकेल असे एखादे सुसंगत स्फूर्तिदायक तत्त्वज्ञान तुमच्यापाशी नाही असा आरोप लोकशाही समाजवादी लोकांचे मित्रहि त्यांच्यावर वारंवार करीत असतात. मला वाटते, या आरोपाला, या आव्हानाला, उत्तर देता येणे शक्य आहे. या साठी, या ठिकाणी विशेष वादविवादात न शिरता, चांगली लोकशाही समाजवादी समाजरचना कशी असावी या विषयीची माझी कल्पना मांडतो.

अशा समाजरचनेत, ( १ ) माणसाला समाजात उपयोगी असे स्थान असावे; ( २ ) त्याची चूक नसताना शक्यतोवर त्याच्यावर संकट परंपरा येऊ नये; आणि ( ३ ) इतरांना अपायकारक होणार नाही अशा रीतीने त्याच्या स्वयंप्रेरित कर्तृत्वाला वाव राहिला पाहिजे. यातील

९३६२८

कोणतेहि तत्त्व स्थलकालनिरपेक्ष सदैव अबाध्य राहील असे नाही. एखाद्या वेड्या माणसाला कोणतेच उपयोगी स्थान देता येणार नाही. परंतु वेडा म्हणून त्याला शिक्षाहि होऊ नये. युद्धात काही चूक नसतानाहि एखाद्यावर येणारी संकटे टाळता येण्यासारखी नसतात. एखाद्या महान् सामाजिक संकटाच्या वेळी एखाद्या श्रेष्ठ कलावंतालाहि, आपली कलेची साधना बाजूला ठेवून, एखादा वणवा, एखादा पूर किंवा एखादी सांथ यांच्याशी सामना करण्यासाठी जावे लागेल. आपण मांडलेली तीन तत्त्वे मार्गदर्शक आहेत, निर्बंधात्मक नाहीत.

( १ ) प्रत्येक व्यक्ति उपयोगी पडावी असे म्हणत असताना, समाजधारणेसाठी उपयोग पडावी असा अर्थ मला अभिप्रेत आहे. उपयुक्त काम कोणचे हे ठरविण्याचा अधिकार समाजाचा राहील हे मला मान्य आहे. एखादी व्यक्ति कवि असली, किंवा ‘सेव्हन्थ-डे-ॲडव्हेन्टिस्ट’[१८] या खिश्चन पंथाची अनुयायी असली, तर, अनुक्रमे, कविता रचणे किंवा शनिवारचा दिवस इतर कामे बंद ठेवून, ईश्वरोपासनेत घालवावा यासाठी लोकांची मने वळविणे ही कामे समाजधारणेला सर्वांत उपयोगी आहेत, असे ती व्यक्ति म्हणण्याची शक्यता आहे. यावर त्या व्यक्तीचे आणि समाजाचे एकमत झाले नाही तर, त्या व्यक्तीने, समाजाने उपयुक्त मानलेले काम करून उदरनिर्वाह करावा, आणि आपल्या फुरसतीच्या वेळासाठी धर्मप्रसाराचे वा कविता रचण्याचे काम राखून ठेवावे हे बरे.

( २ ) आर्थिक सुरक्षितता हा गेली पन्नास वर्षे ब्रिटनमधील समाजकल्याणविषयक कायद्यांचा प्रमुख उद्देश राहिलेला आहे. बेकारी, आजारपण व वृद्धापकाल यांची माणसाला सजा होऊ नये. या अवस्थेत माणसाला भोगावे लागणारे क्लेश निवारता येण्यासारखे आहेत. प्रत्येक सशक्त माणसाला कामाला लावण्याचा जसा समाजाला अधिकार आहे त्याचप्रमाणे, काम करण्याची मनाची तयारी असून ज्याला काही कारणाने काम करता येत नाही अशा सर्वांच्या पोषणाची जबाबदारीहि कर्तव्य म्हणून समाजावर आहे. कायदा व सुव्यवस्था या दृष्टीने, न्यायालयाची वा कायद्याची संमति असल्याखेरीज, अकारण कोणालाहि अटक होता कामा नये वा कोणाची मालमत्ता जप्त होता कामा नये, असा सुरक्षिततेचा अर्थ आहे.

( ३ ) स्वयंकर्तृत्वाला पूर्ण अवसर असावा या शर्तीचे पालन करणे इतके सोपे नाही; पण महत्वाचे आहे. समाजवादाची वैचारिक उभारणी ' कुवतीप्रमाणे काम व गरजेनुसार दाम ' या उपयुक्तता व सुरक्षिततेच्या दोन पायांवर झालेली आहे. पण स्वयंकर्तृत्वाला अवसर नसेल तर समाजवादी समाज हा गुणांनी श्रेष्ठ ठरणार नाही. प्लेटोचे ' रिपब्लिक ' आणि मूरचे ' युटोपिया '[१९] या दोन्ही पुस्तकात समाजवादाचा तोंडवळा असलेल्या आदर्श समाजाची चित्रे रंगविलेली आहेत. या दोन्ही पुस्तकात रंगविलेल्या आदर्श समाजांपैकी कोणच्याहि एकाचे आपण नागरिक आहोत अशी कल्पना स्वतःशी करून पहा. त्या आयुष्याचा कंटाळा येऊन तुम्ही आत्महत्त्येला तरी प्रवृत्त व्हाल किंवा बंड करून उठाल. कारण प्लेटोच्या किंवा मूरच्या आदर्श समाजात तुमचे जीवन, जन्मापासून थेट मरेपर्यंत, शासनसंस्थेने आंखल्याबरहुकूम चालते. त्यात, उपयुक्तता आणि सुरक्षितता या दोन गोष्टी शंभर टक्के साध्य होतात, पण स्वयंकर्तृत्वाला क्षणभर देखील अवसर मिळत नाही. आयुष्यात ज्याने कधी स्वास्थ्य म्हणून अनुभवले नाही अशा व्यक्तीला आयुष्यात सुरक्षिततेशिवाय दुसरे काही नको असे वाटते. पण, गिर्यारोहणाच्या भाषेत बोलायचे तर, सुरक्षितता ही केवळ पायथ्याची छावणी आहे. एकदा ती पक्की उभारली की खऱ्या गिर्यारोहणाच्या साहसाला बाहेर पडायचे असते. संकटे आणि साहसे यांच्याशी झुंज घेण्याची ईर्षा मनुष्यस्वभावात मुळातच सामावलेली आहे. मनुष्याच्या स्वभावाचा हा पैलू दुर्लक्षून उभारलेली समाजरचना, माणसांचा शंभर टक्के उपयोग करून घेऊन त्यांना अभेद्य सुरक्षितता बहाल करू शकत असली तरी, दीर्घकाळ टिकून राहणार नाही.

विज्ञानप्रणीत लोकशाही समाज आपल्या सभासदांकडून काम करवून घेतो आणि त्याच्या बदली त्यांच्या पदरात स्वास्थ्य व सुरक्षितता टाकतो. पण, काम करवून घेण्याची आणि सुरक्षिततेची जबाबदारी केंद्रीय शासनसंस्था घेत असल्यामुळे, पूर्वी खुल्या अनिर्बंध समाजव्यवस्थेमध्ये होते तितके स्वयंकर्तृत्वाचे स्वातंत्र्य विज्ञानप्रणीत लोकशाही समाज देत नाही. ऐंशी वर्षांपूर्वी व्हॅन्डरबिल्ट आणि जे गोल्ड[२०] या दोघात एरी रेल्वेमार्गाच्या मालकीवरून

वाद निर्माण झाला. दोघांचेहि म्हणणे या रेल्वे मार्गावर आपलीच संपूर्ण मालकी आहे. दोघांच्याहि मालकीचे छापखाने होते. तेव्हा प्रत्येकाने आपल्या मालकीचा पुरावा सादर करणाऱ्या पत्रकांचा पाऊस पाडला. दोघांच्याहि कह्यात भ्रष्ट न्यायाधीशांची सांखळीच्या सांखळी होती. प्रत्येकाने खालपासून वरपर्यंतच्या कोर्टांत आपल्या बाजूने निकाल करवून घेतला. प्रत्येकाच्या हातात रेल्वेमार्गापैकी काही भाग होता. शेवटी, एक दिवस रेल्वेमार्गाच्या दोन टोकांपासून दोघांनी आपापल्या मालकीच्या गाड्या सोडल्या. मध्यावर या दोन गाड्यांची गांठ पडली. प्रत्येक गाडीत भाडोत्री सशस्त्र गुंडांचे टोळके दोघांनीहि बरोबर आणले होते. या दोन टोळक्यात सहा तास लढाई चालली. व्हॅन्डरबिल्ट आणि जे गोल्ड दोघांचीहि करमणूक झाली; त्या गुंडांचीहि करमणूक झाली; साऱ्या अमेरिकन राष्ट्राला फुकटात एक तमाशा पाहण्यास मिळाला, तेव्हा त्यांचीहि करमणूक झाली असे म्हटले पाहिजे. करमणूक झाली नाही एरी रेल्वेमार्ग ज्यांना आपल्या कामासाठी वापरावयाचा होता त्यांची. या अजब प्रकाराची हकीकत वाचताना माझीहि करमणूक झाली. असे जरी असले तरी या घटनेने सबंध राष्ट्राला धक्का बसला हेहि खरे. आजकाल अशा प्रकारची स्वतःची करमणूक हैड्रोजन बॉम्ब तयार करण्याची चढाओढ लावणाऱ्या मंडळींना मिळत असणार. करमणुकीची ही तऱ्हा भयंकर धोक्याची पण, त्यामानाने, फार समाधान न देणारी आहे. जगात शांतता नांदावयाची असेल तर, शांततेचा भंग न करताहि लोकांच्या या साहसाकांक्षेचे समाधान करू शकतील असे काही प्रकार शोधून काढले पाहिजेत.

हिंसक साधनांचा वा मार्गांचा वापर न करता खेळल्या जाऊ शकणाऱ्या अशा द्वंद्वांची संधि उपलब्ध करून देणे ही या समस्येवरील प्रभावी उपाययोजना होऊ शकेल. लोकशाही समाजव्यवस्थेत अशी अहिंसक द्वंद्व खेळण्याची संधि मिळते हे लोकशाहीचे एक लक्षणीय वैशिष्ट्य आहे. समाजवादाचा तुम्हाला तिटकारा असला तरी मि. ॲटलींचा[२१] खून पाडायला नको. उलटपक्षी, भांडवलशाहीचा द्वेष तुम्ही करीत असलात तर मि. चर्चिल[२२] यांचा गळा घोटण्याचे कारण नाही. निवडणुकीत तुम्ही सणसणीत

भाषणे ठोकू शकता. तेवढ्याने तुमचे समाधान होणार नसेल तर पार्लमेंटवर निवडून जाण्याची (व रोज प्रतिपक्षाशी द्वंद्व खेळण्याची) तुम्हाला संधि आहेच. जोपर्यंत उदारमतवादी व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित आहे तोवर तुम्हांला हव्या त्या विचाराचा हवा तेवढा प्रचार करायला मोकळीक आहे. अनेकांच्या द्वंद्व खेळण्याच्या सुप्त इच्छेचे या शाब्दिक चकमकींनी पूर्ण समाधान होते. सर्जनाची उर्मि ही द्वंद्वात्मक प्रेरणा नाही. या उर्मींचे समाधान या प्रकारच्या द्वंद्वातून होत नाही. लोकशाही समाजात मनुष्याला फुरसतीच्या वेळात स्वतःच्या आवडीचे काम करण्याची संधि देण्यानेच या उर्मींचे समाधान होऊ शकेल. सर्जनाच्या उर्मींचे समाधान करण्याचा हा एकमेव मार्ग आहे. ही मानवी प्रवृत्ति समाजधारणेच्या दृष्टीने अत्यंत मूल्यवान आहे. तरी पण, कोणत्याहि विशिष्ट लेखक-कलावंताच्या बाबतीत त्याची कला सामान्य आहे की तिच्यात अलौकिक प्रतिभेचा गुण आढळतो याचा खात्रीलायक निवाडा करण्याचे साधन समाजाला उपलब्ध नाही. त्यामुळे या प्रकारच्या मानवी प्रवृत्तीचे नियमन वा नियोजन करणे इष्ट नसते. मानवी जीवनातील अत्यंत मौल्यवान असा एक कोपरा वैयक्तिक प्रेरणांच्या उत्स्फूर्त आविष्कारासाठी मोकळा ठेवला पाहिजे. मानवी जीवनाचे संपूर्ण आयोजन केल्याने तर मानसिक व आध्यात्मिकदृष्ट्या जीवन निष्प्राण बनेल.

* * *

## टीपा

१. पूर्व युरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रे व पाश्चिमात्य युरोपीय राष्ट्रे यांच्यात ही एक काल्पनिक सीमा रेषा रसेलनी आंखली आहे. ‘ एल्ब नदीच्या पूर्वेस ’ या शब्दप्रयोगाने पोलंड, पूर्व जर्मनी, चेकोस्लोवाकिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया इत्यादि कम्युनिस्ट राष्ट्रांचा निर्देश रसेल करीत आहेत. ‘एल्ब नदीच्या पश्चिमेस’ या शब्दप्रयोगाने पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, इंग्लंड या राष्ट्रांकडे ते निर्देश करीत आहेत.

२. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात व्यक्तिस्वातंत्र्य याचा अर्थ राज्यसत्तेचा सामाजिक, आर्थिक व्यवहारात कमीत कमी हस्तक्षेप असणे, व्यक्तीला आपला स्वार्थ संपादन करण्याची पूर्ण मुभा असणे, राज्यसंस्थेने फक्त कायदा व सुव्यवस्था राखणे, असा केला जात होता. विज्ञानप्रणीत समाजात, तंत्रविद्येच्या स्वरूपामुळे, राज्यसंस्था आणि प्रचंड संघटना याची भूमिका सर्वगामी राहणे अटळ असल्याने अशा समाजात व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा फेरविचार करायला हवा असे रसेल सुचवीत आहेत.

३. (१७१२–७८). फ्रेंच राज्यशास्त्रज्ञ, साहित्यिक व तत्त्वज्ञ. 'सोशल कॉंट्रॅक्ट' हा रूसोचा प्रसिद्ध ग्रंथ. माणूस उपजत स्वतंत्र व सद्‌वर्तनी आहे. संस्कृति आणि समाजव्यवस्था यांनी त्याचे अधःपतन घडून येत आहे. संस्कृति व समाजव्यवस्थेच्या बंधनातून माणसे मुक्त झाली तर जगात जनताजनार्दनाचे रामराज्य उदयास येईल असा याचा सिद्धांत. तत्कालीन फ्रेंच समाजात हा विचार अत्यंत क्रांतिकारी ठरला, कारण रूसोच्या विचारात सामान्य माणसाला राज्यकर्त्यांनी हिरावून घेतलेले हक्क हस्तगत करण्याचे आवाहन होते. या अर्थाने रूसो 'लोकशाही'च्या प्रथम पुरस्कर्त्यांपैकी एक आहे.

४. १७८९ साली फ्रेंच जनतेने व लोकप्रतिनिधींनी सोळाव्या लुईची अनियंत्रित राजसत्ता संपुष्टात आणून प्रतिनिधिक राज्याची स्थापना केली. सोळावा लुई हा नामधारी राजा राहिला. पण युरोपातील इतर राजेशाह्यांनी परत सोळाव्या लुईला सर्वाधिकारी बनविण्यासाठी आघाडी उघडली तेव्हा फ्रान्सने ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारले. राजाविरुद्ध लोकक्षोभ वाढत जाऊन १७९२ साली फ्रेंच नॅशनल कन्व्हेंशनने राजाला पदच्युत करून प्रजासत्ताकाची स्थापना केली व राजाला कैदेत टाकले. राजा असेपर्यंत प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थिर होणार नाही म्हणून शेवटी १७९३ मध्ये सोळाव्या लुईचा शिरच्छेद करण्यात आला. या घडामोडींना फ्रेंच राज्यक्रांति असे म्हणतात.

५. (१७९५–१८५१). इंग्लिश इतिहासकार व साहित्यिक. विभूतिपूजेचा पुरस्कार याच्या लेखनात आढळतो. लोकशाही समाज क्षीण व दुर्बल असतो अशा प्रकारची विखारी टीका कार्लाइलने केली आहे.

६. पान २९ वरील ६५ क्रमांकाची तळटीप पहा.

७. मुसोलिनीने स्थापन केलेल्या पक्षाचे नांव ' फासिस्ट ' असे असल्याने त्याने मांडलेल्या एक राष्ट्र, एक पक्ष, एक नेता, या विभूतिपूजेवर आधारित तत्त्वज्ञानाला फासिझम् हे नांव पडले. हिटलरचे तत्त्वज्ञानहि फासिस्ट आशयाचे होते.

८. अकराव्या शतकात पोलंड हे आकाराने युरोपातील रशिया व स्वीडनच्या खालोखाल तिसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र होते. मुठभर लोभी व कूपमंडूक वृत्तीचे उमराव अत्यंत गरीब व नाडलेल्या भूदासांवर राज्य करीत. पोलंड हे आकाराने मोठे पण एक दुर्बल राष्ट्र होते. १७६३ मध्ये पहिली १७९३ मध्ये दुसरी आणि १७९५ मध्ये तिसरी, अशा पोलंडच्या तीन फाळण्या झाल्या व पोलंडचा रशिया, प्रशिया ( आजचा जर्मनी, ) व ऑस्ट्रिया-हंगेरी या तीन साम्राज्यांनी आपापसात पोलंडची वांटणी करून घेतली.

९. अरेबियन नाईट्समधील गोष्ट अशी आहे की, जादूचा दिवा घासला की दिव्याच्या मालकाच्या सेवेला गुलाम हजर होई.

१०. सॅम्युअल बटलरने कल्पिलेला आदर्श समाज. पान २७ वरील ४१ क्रमांकाची तळटीप पहा.

११. अमेरिकेत पन्नास राज्ये आहेत. प्रत्येक राज्यातून दोन प्रतिनिधी सिनेटवर निवडले जातात. आपल्या लोकसभेशी समांतर अशी अमेरिकन काँग्रेस आहे. तिच्यावर लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक राज्यातून प्रतिनिधी निवडले जातात. काँग्रेसचे सुमारे साडेसहाशे सभासद असतात. सिनेटर हा अमेरिकन राजकारणातील फार वजनदार असामी असतो.

१२. स्वीडनची राजधानी.

१३. बी. बी. सी. ब्रिटनमधील सार्वजनिक मालकीची स्वायत्त नभोवाणी संस्था.

१४. ( खिस्तपूर्व ४७०–३९९ ). आपल्या विचाराकरता शांत चित्ताने हौतात्म्य पत्करणारा पहिला महापुरुष. बुद्धिवादी ग्रीक ज्ञानोपासक. प्लेटोचा गुरु.

१५. इंग्लंडचा राजा पहिला जेम्स रोमन कॅथालिक पंथीयांचा छळ करीत असे. या धोरणाने त्रस्त होऊन १६०६ साली राजा, उमराव व धर्मगुरु यांचा नायनाट करण्याच्या हेतूने उमराव सभा चालू असता सभागृह उडवून देण्याचा

कट कांही मंडळींनी रचला. तो कट उघडकीस येऊन त्या कटात सामील असणाऱ्या सर्वांचा शिरच्छेद करण्यात आला. गी फॉक्स हा त्या कटातील एक कारस्थानी.

१६ फ्रेंच अकादमी. रॉयल अकादमी. आपल्याकडील ललित कला व साहित्य अकादमींच्या धर्तीवरील साहित्यिक-कलावंत यांच्या फ्रान्स व इंग्लंडमधील संस्था. भारतीय संस्थांची संस्थापना यांच्या नमूना पुढे ठेवून झाली आहे.

१७. रशियन मार्क्सिस्ट पक्षातील बोल्शेविक गटाचा पुढारी. नोव्हेंबर १९१७ मध्ये केरेन्स्कीचे मवाळ समाजवादी राज्य उलथून पाडून बोल्शेविकांची सत्ता प्रस्थापित करणाऱ्या क्रांतीचा नेता. श्रेष्ठ मार्क्सिस्ट विचारवंत व असामान्य विभूति. १९१७ ते १९२४ रशियाचा सर्वाधिकारी.

१८. एक खिश्चन पंथ. शनिवारचा (म्हणजे आठवड्याचा शेवटचा) दिवस इतर कामे बंद ठेवून ईशोपासनेत घालवावा हा या पंथाचा वैशिष्टयपूर्ण सिद्धांत आहे.

१९. (१४८०-१५३५). इंग्लिश राजकारणी व लेखक. 'युटोपिया' ग्रंथाचा लेखक. आदर्श राज्याचे चित्रण या ग्रंथात केलेले आढळते.

२०. एकोणिसाव्या शतकातील दोन धनाढ्य अमेरिकन व्यक्ति. रेल्वे कंपन्यांचे चालक.

२१. ब्रिटिश मजूर पक्षाचे भूतपूर्व नेते, १९४० ते १९४५ इंग्लंडचे उपपंतप्रधान; १९४५ ते १९५१ पंतप्रधान.

२२. विसाव्या शतकातील एक श्रेष्ठ मुत्सद्दी, दुसऱ्या महायुद्धातले यांचे नेतृत्व हे दोस्त राष्ट्रांच्या विजयश्रीस कारणीभूत झाले असे मानले जाते. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचे १९४० ते १९५५ पर्यंत पुढारी. इतिहासकार, उत्कृष्ट वक्ते, हौशी चित्रकार.

प्रकरण पांचवें

# युद्ध आणि विज्ञान

विज्ञानाचा युद्धाशी असलेला संबंध दिवसेंदिवस अधिक घनिष्ठ होत चालला आहे. प्रख्यात शास्त्रज्ञ आर्किमिडिजचा चुलतभाऊ हिरॉन हा सिरॅक्यूजचा[1] सुलतान असताना ख्रिस्तपूर्व २१२ मध्ये सिरॅक्यूजवर रोमन सैन्य चालून आले. त्या प्रसंगी या भावाने शहराच्या संरक्षणासाठी आर्किमिडिजची मदत मागितली. विज्ञान युद्धाच्या मदतीला धावून आल्याची ही पहिली वेळ असे म्हणता येईल. आर्किमिडिजने शोधून काढलेल्या युद्धोपयोगी ' यंत्रां ' चे रसभरित वर्णन मार्सेलसच्या[2] चरित्ररेखेत प्लुटार्कने[3] केले आहे. या वर्णनात अर्थात आख्यायिकेचाच भाग अधिक आहे. लॉर्ड नॉर्थनी केलेल्या भाषांतरातून पुढील अवतरण मी घेतले आहे.

" ( युद्धाचा प्रसंग पडण्यापूर्वी अनेक वर्षे ) राजाने एकदा आर्किमिडिजची प्रार्थना केली की त्याने प्रतिपक्षाचा वेढा उठविण्याचे कामी

तसेच प्रतिपक्षावर हल्ला चढविण्याचे कामी उपयोगी पडतील अशी बचावाची व चढाईची यंत्रे तयार करावीत. राजाच्या विनंतीवरून आर्किमिडिजने अनेक वेगवेगळ्या प्रकारची युद्ध यंत्रे तयार केली. आपल्या कारकीर्दीची प्रारंभीची बरीच वर्षे हिरॉन राजाने कोणाशी युद्ध न करता शांततेत राज्य केल्यामुळे त्याच्यावर आर्किमिडिजच्या यंत्रांचा वापर करण्याचा प्रसंग आला नाही. पण पुढे एके प्रसंगी सिरॅक्यूजला वेढा पडला असता मात्र सिरॅक्यूजवासियांना त्यांनी करून ठेवलेल्या या यंत्रांचा फार मोठा उपयोग झाला. आर्किमिडिज याने आपल्या यंत्रांना चावी देता क्षणी डोळ्याचे पाते लवते न लवते तोच असंख्य प्रकारचे गोळे आणि मोठाले दगड कानठळ्या बसतील इतका आवाज करीत मोठ्या वेगाने आकाशात उडाले. शहरावर चाल करून येत असलेल्या पायदळावर त्यांचा वर्षाव होऊ लागला. या माऱ्याखाली सांपडलेल्या सर्व शिपायांच्या चिंधड्या–चिंधड्या झाल्या. या गोळ्यांचा मारा इतका वेगवान व जोरकस होता की त्यांच्यापुढे कोणाहि माणसाची मात्रा चालू शकत नव्हती. येणेकरून चाल करून येणाऱ्या पायदळाची धूळधाण उडाली. गलबतातून चाल करून येणाऱ्या सैन्याची देखील फजिती झाली. पडाव जवळ येताच तटाच्या आत बसविलेल्या यंत्रातून लाकडाचे प्रचंड ओंडके सूं सूं करीत सुटले. या ओंडक्यांच्या प्रचंड वजनाच्या माऱ्याने काही गलबते बुडाली. किनाऱ्याजवळ समुद्रात लपविलेल्या पोलादी पंजांनी काही गलबतांचे पुढचे टोक धरून गलबते उभी केली आणि उभीच्या उभी समुद्रात बुडविली. आणखी काही यंत्रांनी गलबतेच्या गलबते आपल्या दोन पोलादी पंजात धरून भिरभिर फिरविली आणि तटबंदीच्या बुरुजांवर अशी आपटली की गलबतांचा तर चक्काचूर झालाच पण आतील सैनिकांची शरीरे छिन्नविछिन्न झाली. काही यंत्रांनी गलबतेच्या गलबते हवेत इतकी उंच उचलली की ती हवेत उलटी सुलटी होत असताना पाहून बघणारी माणसे भयचकित झाली. आतील माणसांची दैना तर विचारूच नका, एक एक करून त्यातला प्रत्येक माणूस खोल समुद्रात फेकला जाई. गलबत रिकामे झाले की यंत्रांच्या पकडीतून सुटलेले गलबत तटबंदीवर आपटून त्याचे तुकडे तुकडे तरी होत नाहीतर परत ते समुद्रात जाऊन पडे. ”

वैज्ञानिक तंत्रविद्येच्या या अपूर्व कामागिरीचा उपयोग न होऊन अखेरीस रोमन सैन्याचा विजय झाला आणि खुद्द आर्किमिडीज एका साध्या शिपायाच्या हातून मारला गेला. जगज्जेत्या रोमन साम्राज्याची उभारणी ज्या पुराण शस्त्रांनी झाली त्या शस्त्रांनी चक्रम शास्त्रज्ञांनी शोधून काढलेल्या नवलाईच्या अस्त्रांवर परत एकदा मात केल्याचे पाहून रोमन साम्राज्यवादी लब्धप्रतिष्ठिताना चढलेल्या विजयोन्मादाची कल्पना करता येते.

हा प्रसंग सोडला तरी युद्धातील जयपराजय ठरविण्यात विज्ञानाची निर्णायक मदत होतच राहिली. ज्वालाग्राही गोळे फेकीच्या ग्रीक शोधाने अनेक शतके बायझन्टाईन[४] साम्राज्याचा बचाव केला. बंदुकीच्या दारूने युरोपमधील सरंजामशाहीचे थडगे खणले; याच बंदुकीच्या दारूपुढे धनुर्धारी इंग्रजांचे बाण गवताच्या काड्या ठरून जोन ऑफ आर्कच्या[५] अद्‌भुतरम्य पराक्रमाची गाथा निर्माण झाली. ‘ रेनेसान्स ’ चळवळीच्या सर्व प्रमुख पुढाऱ्यांनी युद्धशास्त्रातील आपल्या वैज्ञानिक तंत्रविद्यात्मक नैपुण्याने तत्कालीन सत्ताधीशांची मर्जी संपादन केली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. मिलानच्या ड्यूकच्या[६] पदरी नोकरी मागताना प्रख्यात चित्रकार लिओनार्दो द व्हिंचीने[७] स्वतःची शिफारस करणारे जे पत्र लिहिले, त्यात अभेद्य तटबंदी उभारण्याच्या शास्त्रात स्वतः केलेल्या सुधारणांची तपशील-वार माहिती दिली; जाता जाता, फक्त शेवटच्या ओळीत, ‘ मला थोडीफार चित्रेहि काढता येतात ’ असे लिहिले. लिओनार्दोला नोकरी मिळाली, पण मला नाही वाटत मिलानच्या ड्यूकने पत्रातली शेवटची ओळ वाचली असेल. गॅलिलिओला ग्रॅन्ड ड्यूक ऑफ टस्कनीच्या[८] दरबारी नोकरी हवी होती त्यावेळी तोफगोळ्यांच्या फेकीसंबंधीच्या आपल्या गणिति ज्ञानाचा त्याने उपयोग केला होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या दिवसात ज्यांच्या संशोधनाने युद्धाला मदत झाली त्यांचीच तेवढी डोकी वांचली, बाकीच्यांची एकजात कत्तल झाली. शास्त्रज्ञाने युद्धाच्या कार्यात मदत न केल्याचे एकच उदाहरण मला ठाऊक आहे. एकोणिसाव्या शतकात झालेल्या क्रिमियन युद्धाचे[९] वेळी विषारी वायूच्या उपयोगावरून प्रख्यात शास्त्रज्ञ मायकेल फॅरडेचा[१०] सल्ला घेण्यात आला होता. तांत्रिक दृष्ट्या विषारी वायूचा युद्धास्त्र म्हणून

उपयोग होऊ शकेल पण माणुसकीच्या दृष्टीने त्याचा धिक्कार केला पाहिजे असे फॅरडेने सांगितले. या घटनेला आता शंभर वर्षे होत आली.

शौर्य आणि मान या मूल्यांवर आधारित मध्ययुगीन दरबारी संस्कृतीच्या रोमांचकारी भाषेत क्रिमियन युद्धाची गाथा किंगलेक[११] गाऊ शकला. ही मध्ययुगीन मूल्ये व संस्कृति आगंतुक आणि अनाठायी ठरावी इतके युद्धाचे स्वरूप आधुनिक काळात पालटले आहे. आजहि उमद्या साहसाचे अधिकारी आणि शूर शिपाई प्राचीन योध्द्यांप्रमाणे हंसतमुखाने मरणाला आलिंगन देतात. पण युद्धातील जयपराजयाच्या दृष्टीने त्यांच्या शौर्याला काही किंमत नसते. पायदळाच्या अनेक पलटणींपेक्षा आण्विक संशोधन करणाऱ्या एका पदार्थविज्ञानशास्त्रज्ञाची किंमत आज जास्त आहे. आजच्या युद्धातील जयपराजय, सैनिकांच्या शौर्यावर अवलंबून नसून, अद्ययावत वैज्ञानिक संशोधन आणि त्याच्या जोडीला त्या देशाचे पायाभूत औद्योगिक सामर्थ्य या दोन गोष्टींवर अवलंबून असतो. पर्ल हार्बरला[१२] पराभव होऊनहि शेवटी युद्धात अमेरिकेचा जय झाला तो का? जगातील दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रातील सैनिकाला शौर्याच्या बाबतीत जपानी सैनिक हार गेला नाही; पण अमेरिकन औद्योगिक उत्पादनसामर्थ्यापुढे त्याची मात्रा चालली नाही. युरेनियम, पोलाद आणि खनिज तेल यांचे उत्पादन व प्रचंड साठे यांच्यावर विजयश्रीसाठी आधुनिक काळात राष्ट्रे अवलंबून राहतात, सैनिकांच्या शौर्यावर नाही.

प्राणहानीच्या दृष्टीने तुलना करता अद्याप तरी आधुनिक युद्ध हे विज्ञानपूर्व काळातील युद्धापेक्षा अधिक विनाशक ठरलेले नाही. शस्त्रास्त्रे अधिक विध्वंसक बनत चालली असली तरी त्याचवेळी दुसरीकडे वैद्यकशास्त्र आणि सार्वजनिक आरोग्य या दोन्ही क्षेत्रात झालेल्या सुधारणांमुळे युद्धातील प्राणहानीचे प्रमाण झपाट्याने घटत गेले आहे. लढाईपेक्षा रोगराईलाच अधिक सैनिक बळी पडत असा अगदी अलिकडील काळापर्यंतच्या युद्धांचा दाखला आहे. सेन्नचरिबने[१३] जेरुसलेमला दिलेल्या वेढ्यात एका रात्रीत त्यांचे एक लाख पंच्याऐंशी हजार सैन्य मरण पावले; 'दुसऱ्या दिवशी पहाटे उठून जेरुसलेमचे ख्रिस्ती पाहतात तर सगळे सैन्य मरून पडले

होते ’ ( II किंग्ज xix ३५ )[१४]. अथेन्समध्ये पसरलेल्या प्लेगच्या सांथीने पेलोपोन्नेशियन युद्धाचा[४] निर्णय केला असे म्हणायला हरकत नाही. सिरॅक्यूज आणि कार्थेज[१५] यांच्यातील पुष्कळ युद्धांचा शेवट रोगराईचा प्रादुर्भाव होऊनच झाला. बार्बारोसाने लोंबार्ड लीगचा[१६] संपूर्ण पराभव केल्यानंतर त्याचे स्वतःचेहि जवळजवळ सगळे सैन्य रोगराईने मरण पावले तेव्हा त्यालाच गुप्तपणे आल्प्स पर्वत ओलांडून स्वतःची सुटका करून घेण्याची पाळी आली. गेल्या दोन महायुद्धांपेक्षा तत्पूर्वीच्या युद्धातले सैनिकांच्या मृत्यूचे प्रमाण अधिक आहे. गेल्या दोन महायुद्धांप्रमाणेच भविष्यात होणाऱ्या युद्धातहि मृत्यूचे प्रमाण इतके अल्प राहील असे मी म्हणत नाही. त्याचा विचार मी पुढे करणार आहेच. माझे म्हणणे एवढेच की आज पर्यंतचा विचार केला तर, अद्याप तरी, विज्ञानाचा परिणाम युद्धातील एकंदर प्राणहानि वाढण्यात झालेला नाही. पुष्कळांच्या लक्षात ही गोष्ट येत नाही म्हणून मुद्दाम सांगायचे.

प्राणहानीखेरीज इतर बाबतीत मात्र युद्धाचे दुष्परिणाम बरेच वाढलेले आहेत. नेपोलियनच्या कारकीर्दीत १७९२ पासून १८१५ सालापर्यंत फ्रान्सचे युरोपात सतत कोणाशी ना कोणाशी युद्ध चालून अखेरीस १८१५ मध्ये फ्रान्सचा पूर्ण पराभव झाला.[१७] असे असूनहि दुसऱ्या महायुद्धानंतर मध्य युरोपमधील जनतेचे जे हाल झाले त्यामानाने फ्रेंच जनतेला काहीच क्लेश भोगावे लागले नाहीत. औद्योगिकरणाच्या पूर्वी युद्धात राष्ट्राची सर्व शक्ति युद्ध जिंकण्यासाठी संघटित होऊ शकत नसे. आजच्या युद्धात राष्ट्रातील सर्व लोकसंख्या, साधनसंपत्ति, यांचे नियोजबद्ध संघटन युद्ध जिंकण्यावर केंद्रित झालेले असते. नेपोलियनच्या काळात पराभवाचा परिणाम सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने इतका दूरगामी व विध्वंसक होत नव्हता. आज राष्ट्राचा पराभव झाला म्हणजे सर्व जीवनाची घडी विस्कटून जाते, साधनसंपत्तीची मोडतोड झालेली असते आणि देशातली जनता मनाने पार खचून गेलेली असते.

पण याहि बाबतीत आपण सर्वसामान्य नियम असा कोणताहि बनवू शकत नाहि. पूर्वीच्या काळीहि काही युद्धांच्या शेवटी संस्कृतीच्या संस्कृति

नष्ट झाल्याची उदाहरणे आहेत. रोमन साम्राज्यांतर्गत उत्तर आफ्रिकन प्रदेशाचे वैभव आणि संस्कृति त्या प्रदेशाला परत प्राप्त झालेली नाही. मंगोल लोकांच्या स्वाऱ्यांनंतर पर्शियन संस्कृतीने परत डोके वर काढलेच नाही. तुर्कांच्या हल्ल्यांमध्ये सिरिया जो एकदा अस्तंगत झाला तो कायमचाच. इतिहासात युद्धाचे नेहमीच दोन प्रकार राहिले आहेत. एका प्रकारच्या युद्धात पराभव हा मुख्यत्वेकरून मोहिमेपुरता मर्यादित असतो आणि पराभूत राष्ट्राला पराभवाची झळ सोसावी लागली तरी सर्वसामान्य लोकांच्या जीवनाची घडी कायम राहते. दुसऱ्या प्रकारच्या युद्धात कोणत्या तरी एका पक्षाचा संपूर्ण नायनाट होईपर्यंत युद्ध चालू राहते. दुर्दैवाने अशा अमर्याद युद्धाच्या युगात आपण प्रवेश करीत आहोत असे दिसते.

अणुबाँब आणि अलिकडे हैड्रोजन बाँब, यांच्यामुळे मानवी जीवितावर होणाऱ्या संभाव्य विध्वंसक परिणामांविषयी वैज्ञानिक प्रगतीने लोकांच्या मनात नव्याने तीव्र भीति निर्माण केली आहे. आईनस्टाईन[१८] आणि आईनस्टाईन यांच्यासारख्या इतरहि अधिकारी शास्त्रज्ञांनी अण्वस्त्रांच्या वापराने पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीच नष्ट होण्याची शक्यता बोलून दाखविली आहे. तिसऱ्याच महायुद्धात जगाच्या पाठीवरील सर्व जीवित नष्ट होईल असे मला वाटत नाही. पण तिसऱ्यानंतर चौथे महायुद्धहि जर मानवजातीने होऊ दिले तर मात्र हा धोका प्रत्यक्षात खरा होईल. हे भविष्य अचूक असेल तर पुढील पन्नास वर्षांच्या अवधीत दोन पर्यायातून कोणत्यातरी एकाची निवड आपल्याला करावी लागेल. एक तर मानवाने आपल्या हाताने मानवजातीचा विनाश करून घेण्यास संमति द्यावी; किंवा मग, आपल्याला प्रिय असलेले वागणुकीचे स्वातंत्र्य, विशेषतः आपल्याला इच्छा होईल तेव्हा परकीयांवर आक्रमण करून त्यांना कंठस्नान घालण्याचे स्वातंत्र्य, आपण शरण केले पाहिजे. आपलाच विनाश करून घेण्याचा पर्याय मानवजात पसंत करील ही गोष्ट सर्वस्वी शक्य कोटीतली आहे. ही निवड करीत असताना मानवजातीची समज अर्थातच अशी असणार की आपण जगाला वांचविण्याचा पर्याय निवडलेला आहे. कारण आपली बाजू न्यायाची असल्याने युद्धात (दोन्ही गोटातल्या लष्करी तज्ज्ञांनी दिलेल्या हमाच्या आधारे) जागतिक

विनाश न होता सत्य विजयी होणार यावर उभय पक्षांचा ठाम विश्वास असेल. मानवी युगाच्या अस्तकालात आपण बहुधा आज राहत आहोत. मानवाचा अस्त झालाच तर त्याचे श्रेय मात्र विज्ञानाला असेल.

मानवजातीला आपले जीवित प्यारे वाटून दुसरा पर्याय स्वीकारण्याचा निर्णय झाला तर मानवाला आपल्या आचार विचारात आमूलाग्र फेरबदल करावा लागेल. 'मोडेन पण वांकणार नाही' असल्या उक्ती कधीहि उच्चारायच्या नाहीत असे त्याला ठरवावे लागेल. ज्यांच्याविषयी मनातून द्वेष आणि तिरस्कार वाटतो अशा, सत्य व न्याय यांची चाड नसलेल्या, परकी राज्यकर्त्यांनी लादलेल्या कायद्याचे राज्य देखील स्वीकारण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे. प्रत्यक्ष काही उदाहरणांचा विचार करा. अरब आणि ज्यू यांना आपले भांडण मिटविण्याकरता लवाद पत्करावा लागेल. या लवादाचा निर्णय ज्यू समाजाच्या विरुद्ध गेला तर अमेरिकेच्या अध्यक्षांनी ज्यूंच्या पक्षाला अनुकूलता असूनहि, (कारण ज्यूंना पाठिंबा न दिल्यास न्यूयॉर्कमधील ज्यूंची मते त्याला गमवावी लागतील आणि त्यामुळे तो अध्यक्षीय निवडणूकहि हरेल.) लवादाचा निर्णय ज्यूंवर यशस्वीपणे लादण्याचे काम त्याला करावे लागेल. लवादाचा निर्णय अरबांच्या विरुद्ध लागला तर सबंध मुस्लीम जग अरबांच्या बाजूने लढाईला सज्ज होईल. त्यांनाहि वठणीवर आणण्याचे काम करावे लागेल. दुसरे उदाहरण घ्या. आयर्लंडचे कॅथॉलिक सरकार अल्स्टर[१९] प्रांतातील प्राटेस्टंटांचा आम्ही छळ करणार असे म्हणेल. या त्यांच्या धोरणाला ब्रिटनचा विरोध राहील तर अमेरिका आयर्लंडला आपला पाठिंबा देईल असे समजा. अशा आणिबाणीच्या संघर्षात आंतरराष्ट्रीय संघटना जिवंत राहू शकेल का? काश्मीरवरून भारत व पाकिस्तान यांचे भांडण आहे. तेव्हा एक राष्ट्र रशियाची बाजू घेते तर दुसरे अमेरिकेच्या गोटात सामील होते. यापैकी कोणच्याहि एका संघर्षाचा इतिहास परिचित असलेल्यांना ठाऊक आहे की, भांडणात गुंतलेल्यांना जगाच्या पाठीवरील जीवित सुरक्षित राहावे या गोष्टीपेक्षा भांडणाचा निकाल आपल्या बाजूने लागावा ही गोष्ट महत्त्वाची वाटते. आपला नाश होऊ द्यावयाचा नाही असा निर्णय मानवजात घेईलच अशी आशा करायला म्हणून फारशी जागा नाही.

वैज्ञानिक प्रगतीने मानवजातीच्या जीविताला निर्माण केलेल्या धोक्यावर मात करूनहि मानवजात जिवंत राहावयाची असेल तर आपल्या मनोविकारांवर नियंत्रण ठेवण्याची शिस्त मानवाला अंगी बाणवावी लागेल. पूर्वीच्या काळी आपल्या मनोविकारांना वेसण न घालूनहि चालत होते. कायदा अन्याय्य आणि जुलमी वाटला तरी त्या कायद्याचे बंधन मानावे लागेल. आपल्या मागण्या अगदी किमान व रास्त असून तेवढा तरी न्याय मिळालाच पाहिजे असे प्रामाणिकपणे वाटणाऱ्या राष्ट्रांना देखील त्रयस्थ लवादाने दिलेला विरोधी निवाडा शिरोधार्य मानावा लागेल. अशी शिस्त पाळणे सोपे आहे असे मी सुचवीत नाही. लोक व राष्ट्रे असे संयमी वर्तन करतील अशी भविष्यवाणीही मी वर्तवीत नाही. मी इतकेच म्हणेन की माणसांनी आणि राष्ट्रांनी आपल्यावर ही बंधने स्वखुशीने घालून घेतली नाहीत तर मानवजातीचा विनाश होईल, आणि या विनाशाला विज्ञान कारणीभूत ठरेल.

विवेक आणि विनाश या दोहोत एक कोणती तरी पक्की निवड या पुढील पन्नास वर्षांत केली पाहिजे. आंतरराष्ट्रीय संघटनेने ठरवून दिलेले कायदे व नियम यांचे पालन करणे म्हणजे विवेकाने वागणे असा अर्थ मी करतो. मानवजात आत्महत्या पत्करेल अशी मला भीति वाटते. माझी भीति खोटी ठरेल अशी मला आशा आहे.

* * *

## टीपा

१. सिसिली बेटावरील एक शहर.

२. सिरॅक्यूजवरील हल्ल्यातील रोमन सेनापति.

३. (इ. स. ४६–१२०) ग्रीक लेखक. याने सुप्रसिद्ध ग्रीक व रोमन व्यक्तींच्या चरित्ररेखा लिहिल्या.

४. इ. स. ३९५ ते १४५३ या काळातील पौर्वात्य ग्रीक ख्रिश्चन साम्राज्य. १४५३ मध्ये तुर्कांनी बायझन्टाईन साम्राज्याचा पाडाव केला. कॉन्स्टँटिनोपल हे या साम्राज्याचे राजधानीचे शहर.

५. ( १४१२-३१ ) पंधराव्या शतकात इंग्रजांची गुलामी पत्करण्याची पाळी फ्रेंच राष्ट्रावर आली असता मोक्याच्या वेळी जोन ऑफ आर्क ही ग्रामकन्यका फ्रेंच राजाच्या मदतीला धांवून आली आणि तिने इंग्लिश सैन्याचा पराभव केला. आपल्याला ईश्वरी संदेश ऐकू येतात असे तिचे म्हणणे होते. इंग्रजांचा पराभव ही फारच अकल्पित घटना होती. त्यामुळे जोन ऑफ आर्क भोवती आख्यायिका निर्माण झाली. रसेलला इथे सुचवावयाचे आहे की मोक्याच्या वेळी फ्रेंचांचा झालेला विजय हा ईश्वरी संदेशांचा किंवा अद्‌भुत सिद्धींचा परिणाम नसून धनुर्धारी इंग्रजांचे फ्रेंच दारूगोळ्यापुढे ( प्रगत युद्धतंत्रापुढे ) काही चालले नाही. वैज्ञानिक तंत्रविद्येचाच वास्तविक हा विजय होता.

६. **ड्यूक ऑफ मिलान, ग्रँड ड्यूक ऑफ टस्कनी**-चौदाव्या पंधराव्या शतकात तत्त्वतः हे सर्व रोमन कॅथलिक चर्चने नियुक्त केलेल्या सम्राटाचे मांडलिक असत. इटलीत व युरोपभर लहान मोठे सरंजामदार व राजेरजवाडे होते. या सरंजामदारांना व राजांना त्यांच्या राज्याच्या मानाने ड्यूक, ग्रँड ड्यूक इ. वेगवेगळ्या पदव्या असत. प्रत्यक्षात अर्थात् हे स्वतंत्र राजेच असत.

७. पान २७ वरील ३७ क्रमांकाची टीप पहावी.

८. वरील टीप ६ पहावी.

९. १८५४-५६. रशिया विरुद्ध ब्रिटन, फ्रान्स, तुर्कस्थान व सार्डिनिया यांच्यातील युद्ध. तुर्की साम्राजातील ग्रीक ऑर्थोडॉक्स ख्रिश्चन मंडळींच्या हित-संबंधांवरून हे युद्ध पेटले.

१०. ( १७९१-१८६७ ). इंग्लिश रसायन व पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ. वीज व चुंबकीय क्षेत्र यांच्या बाबतीत महत्त्वाचे संशोधन केले.

११. ( १८०९-९१ ) इंग्लिश साहित्यिक.

१२. हवाई बेटावरील अमेरिकन नाविकदलाचा तळ. दुसऱ्या महायुद्धात ७ डिसेंबर १९४१ रोजी जपान्यांनी अकस्मात हल्ला चढवून अमेरिकेच्या

युद्धनौका बुडविल्या. त्यामुळे सर्व दक्षिण व आग्नेय आशियात जपानला फार झपाट्याने आपली सत्ता प्रस्थापित करता आली. पण जपानचे हे नाविक वर्चस्व तात्कालिक ठरले. पर्ल हार्बरवरील जपानी हल्ल्यामुळे शेवटी अमेरिका महायुद्धात उतरली म्हणूनहि या घटनेला महत्त्व आहे.

१३. रोमन सेनापति.

१४. बायबलमधील किंग्ज या दुसऱ्या पुस्तकातील नवव्या प्रकरणातील ३५ वी ओळ असा याचा अर्थ आहे.

१५. ख्रिस्तपूर्व ४३१–४०४ या काळातील अथेन्स व स्पार्टा या दोन ग्रीक शहरराज्यातील युद्ध. या युद्धात इतरहि ग्रीक शहरराज्ये सामील होती.

१६. (११५२–११८४) जर्मन सरंजामशहांचा राजा व ख्रिश्चन रोमन साम्राज्याचा सम्राट. पोप तिसरा अलेक्झांडर याच्याशी बेबनाव होऊन ११७६ मध्ये पोपच्या पक्षाला मिळालेल्या लोंबार्ड लीग राज्यांशी बारबारोसाचे जे युद्ध झाले त्याचा इथे निर्देश केलेला आहे. लोंबार्ड लीग ही मध्ययुगातील उत्तर इटालीतील प्रजासत्ताक शहरराज्यांची संघटना.

१७. १७९२–१८१५ या काळात प्रजासत्ताक फ्रान्सचे युरोपातील इतर राजसत्तांशी सतत युद्ध चालू होते. यापैकी जवळ जवळ १८–१९ वर्षे फ्रेंच सैन्याचे अधिपत्य नेपोलियनकडे होते. सुरवातीस फ्रेंच सेनापति म्हणून व १८०४ नंतर फ्रेंच सम्राट म्हणून. १८१५ मध्ये अखेरीस वाटर्लू येथे नेपोलियनचा पराभव झाल्यावर युरोपला शांतता मिळाली.

१८. (१८७९–१९५५) विख्यात गणिती पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ. सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडून विश्वाबद्दलच्या कल्पनेत क्रांति घडवून आणली. विसाव्या शतकातील पहिल्या क्रमांकाचे शास्त्रज्ञ. हे ज्यू होते म्हणून हिटलरने यांना जर्मनीतून हाकलले. त्यानंतर ते अमेरिकेत स्थायिक झाले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप
अनुक्रम ३७९१५ वि: निबंध
क्रमांक १५६६ नों दि: २०।२।६

प्रकरण सहावे

# विज्ञान आणि मूल्ये

विज्ञानाशी सुसंगत वाटणारे तत्त्वज्ञान वेळोवेळी बदलत आलेले आहे. न्यूटन आणि त्याच्या समकालीन इंग्लिश शास्त्रज्ञांच्या मते विज्ञान हा सृष्टिव्यापारांना नियम घालून देणाऱ्या सर्वशक्तिमान ईश्वराच्या अस्तित्वाचाच प्रत्यक्ष पुरावा होता. गुरुत्वाकर्षणाचा नियम आणि इंग्लिश शास्त्रज्ञांनी शोधून काढलेले इतर सगळे नियम हे ईश्वरानेच घालून दिलेले अशी त्यांची धारणा होती. पृथ्वी हे विश्वाचे केंद्र नाही असे कोपर्निकसने दाखवून दिले असतानाहि, मानव हा **आध्यात्मिकदृष्ट्या** विश्वाच्या केंद्रस्थानी असून ईश्वराने मानवजातीसाठीच विश्वाची निर्मिति केली अशाप्रकारची श्रद्धा शास्त्रज्ञातहि प्रचलित होती. कॅथॉलिक धर्मसंस्थेशी आलेल्या राजकीय संघर्षामुळे 'फ्रेंच फिलॉसफर्स[1]' पैकी बंडखोर वृत्तीच्या तत्त्वज्ञांनी मात्र वेगळी भूमिका घेतली. सृष्टीचे व्यवहार नियमांनुसार चालतात म्हणून नियम घालून देणारा हा असलाच पाहिजे हे प्रतिपादन त्यांना अमान्य होते. उलट, ते

असे म्हणत की, जड सृष्टीच्या नियमांच्या आधारे मानवाच्या वर्तनाचे देखील स्पष्टीकरण केले जाऊ शकते. या बैठकीतून मानवी संकल्पाचे स्वातंत्र्य नाकारणारी जडवादी भूमिका त्यांनी घेतली. त्यांच्या मते, विश्वाच्या निर्मितीमागे कोणताहि हेतु नसून विश्वाच्या अनंतकालच्या इतिहासात माणसाचे अस्तित्व ही एक क्षुल्लक घटना होय. विश्वाच्या अफाट पसाऱ्याच्या चिंतनाने त्यांची मने भारावून नास्तिक भूमिकेमुळे कालबाह्य बनलेल्या नम्रतेची जागा एका नव्या लीनतेने घेतली. लिओपार्डी[२] या कवीच्या एका छोट्या कवितेत हा दृष्टिकोन चांगला व्यक्त होतो. विशेष म्हणजे, या कवितेत व्यक्त झालेली विश्व आणि विश्वाच्या चिंतनाने स्फुरणाऱ्या मानवी भावनांविषयीची जाणीव माझ्याहि मनातील भावना व्यक्त करते.

**अनंत**

निवान्त सान शैल हा प्रिय मला मनोमन
क्षितिज झाकते तरी प्रिय पुढील कुंपण
विसावुनी इथे असा निमेष-शांत लोचनी
अनंत या नभातला अनंत शोधतो मनी
अनंतसे, अकालसे, असीम, शांत, नीरव
चकित चित्त पाहते अपार विश्ववैभव
पर्ण पर्ण पाउली वाजवीत वात ये
समाधि शांततेत या अशी मुहूर्त जाग ये
काल चक्र चालले, मनात येत कल्पना
लोपली युगे युगे ‘ आज ’ उगवला पुन्हा
‘ अनंत ’ देखुनी असा विचारस्पंद थांबतो
असीम सागरात या विरून मी सुखावतो

(मुक्त अनुवाद : देवदत्त दाभोलकर)

असो; विश्वाबद्दलची ही भावना आता जुनी झाली. विश्वाचे रहस्य **जाणण्याचे** साधन म्हणून एकेकाळी विज्ञानाला मोल होते. तंत्रविद्येच्या अद्‌भुत पराक्रमांमुळे विश्व **बदलण्याची** युक्ति सांगणारे म्हणून आज विज्ञानाची किंमत केली जाते. रशिया आणि अमेरिका या दोन्ही देशात विज्ञानाकडे पाहण्याचा हाच दृष्टिकोन आज व्यवहारात सर्वत्र रूढ झालेला असून, अनेक आधुनिक तत्त्वज्ञहि याच दृष्टिकोनातून विज्ञानाची किंमत करतात. आपल्या 'थीसिस ऑन फॉरबाख' या ग्रंथात १८४५ साली मार्क्सने विज्ञानाकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोन प्रथम घोषित केला. मार्क्स लिहितो : 'मानवी बुद्धीला वस्तुनिष्ठ सत्य आकलनीय आहे की नाही हा तात्त्विक चर्चेचा प्रश्न उरला नसून प्रत्यक्ष व्यवहाराशी या प्रश्नाचा संबंध आहे. कोणत्याहि विचाराची सत्यता, म्हणजे त्या विचाराची वस्तुनिष्ठता आणि सामर्थ्य, प्रत्यक्ष व्यवहारात पडताळून पाहता आली पाहिजे. व्यवहाराशी फारकत करून एखाद्या विचाराची सत्यासत्यता ठरवू पाहणारी चर्चा हा केवळ पंडिती शब्दच्छल आहे...आजवर तत्त्वज्ञांनी जगाचा वेगवेगळा **अन्वयार्थ** लावला, पण खरे कार्य जगात **परिवर्तन घडवून आणणे** हे आहे.'

तत्त्वज्ञानाच्या विशिष्ट भाषेत या दृष्टिकोनावर आधारलेली दार्शनिक भूमिका जॉन डयूई[३] यांनी सर्वात उत्तम मांडलेली आहे. सर्वश्रेष्ठ अमेरिकन तत्त्वज्ञ म्हणून जॉन डयूई यांना जगभर मान्यता आहे.

या तत्त्वज्ञानाचे सैद्धान्तिक आणि नैतिक असे दोन पैलू आहेत. 'सत्य' ही कल्पना भ्रामक आहे असे विश्लेषण करून, सीझरने प्रत्यक्षात रुबिकॉन नदी ओलांडली ही वस्तुस्थिति असली, आणि तुमची समजूतहि 'सीझरने रुबिकॉन नदी ओलांडली' अशी असेल, तर तुमची समजूत सत्य असे पूर्वी मानले जात असे. (ज्ञान वस्तुस्थितीप्रमाणे असणे, ज्ञेय विषयाप्रमाणे असणे, अर्थाप्रमाणे असणे, म्हणजे ज्ञानाची यथार्थता असणे असे हे मत होते.) पण इथे विचारात घेतलेल्या तत्त्वज्ञांना हे मत मान्य नाही. तुमची समजूत 'सत्य' आहे याचा या मंडळींच्या मते अर्थ असा की, इतर कोणत्याहि समजुतीपेक्षा त्या समजुतीवर विश्वास ठेवणे तुम्हाला फल प्राप्त करून देणारे

आहे. सैद्धान्तिकदृष्ट्या हे तत्त्वज्ञान त्या जागी ' उपयुक्तता ' या कल्पनेची प्रतिष्ठापना करते. माझ्यासारखा माणूस यावर असा आक्षेप घेईल की, दीर्घकालपर्यन्त सर्वसामान्यपणे सत्य मानल्या गेलेल्या समजुती खोट्या होत्या हे शेवटी मान्य झाल्याची उदाहरणे आहेत. अशा समजुतींच्या बाबतीत, अद्याप मान्यता न पावलेल्या सत्य समजुतीऐवजी प्रचलित खोटी समजूत स्वीकारणे कोणाहि परीक्षार्थीला फायद्याचे ठरेल. फायदेशीर म्हणून तशी (मागाहून खोटी ठरलेली) समजूत सत्य मानावयाची काय ? एकच समजूत आज सत्य असेल तर उद्या खोटी असेल असे उत्तर या आक्षेपाला दिले जाते. रशियन राज्यक्रांतीच्या यशात ट्रॉटस्कीचा[४] वांटा फार मोठा होता हे १९२० साली ' सत्य ' होते, १९३० साली ते 'खोटे' होते. प्रत्यक्ष व्यवहारात या दृष्टिकोनाचे परिणाम काय होऊ शकतात याचे मार्मिक चित्रण ऑरवेलच्या[५] ' १९८४ ' या कादंबरीत वाचावयास मिळते.

विज्ञानापासून वेगवेगळ्या अंगांनी स्फूर्ति घेऊन या तत्त्वज्ञानाची उभारणी झालेली आहे. ड्युईने ज्याची मांडणी केली आहे असा, या तत्त्वज्ञानाचा त्यातल्या त्यात स्वीकारणीय भाग आपण प्रथम विचारात घेऊ. वैज्ञानिक सिद्धान्त वेळोवेळी बदलत आले आहेत, आणि जो सिद्धान्त ' काम ' देतो तो स्वीकारायचा असे विज्ञानाचे धोरण राहिलेले आहे, याकडे ड्यूई निर्देश करतो. नवीन घटनांच्या शोधामुळे जुना सिद्धान्त 'काम' देईनासा ठरला की तो टाकून दिला जातो. कोणताहि सिद्धान्त हे एक हत्यार आहे, अशा निर्णयावर ड्यूई येतो. या हत्यारांच्या साहाय्याने आपण कच्च्या मालाला हवा तसा आकार देऊ शकतो. इतर हत्यारांप्रमाणे, आपल्या मनासारखा आकार देण्याचे कामी विशिष्ट सिद्धान्त किती उपयोगी पडतो त्यानुसार तो उपयोगी किंवा निरुपयोगी ठरतो; आणि इतर कोणत्याहि हत्याराप्रमाणे, आज जो सिद्धान्त उपयुक्त वाटतो तो उद्या निरुपयोगीदेखील ठरू शकेल. एखादा सिद्धान्त उपयोगी आहे तोपर्यन्त तो ' सत्य ' आहे असे म्हणावे, पण 'सत्य' या शब्दाला या ठिकाणी परंपरागत अर्थ चिकटविला जात नाही हे पाहिले पाहिजे. ' सत्य ' या शब्दाच्या ऐवजी ' पुरावा असलेले विधान ' हा वाक्प्रयोग ड्यूई स्वतः पसंत करतो.

तंत्रविद्येविषयीची ओढ हे या तत्त्वज्ञानाच्या प्रसाराचे दुसरे कारण आहे. विजेसंबंधी आपल्याला कोणते ज्ञान हवे असते ? आपल्या कामासाठी विजेचा वापर कसा करून घेता येईल याच्याशी काय ते आपल्याला कर्तव्य असते. यापेक्षा अधिक खोलात शिरणे म्हणजे अर्थहीन अध्यात्मचर्चेच्या जंजाळात उडी घेण्यासारखे आपण मानतो. विज्ञानामुळे निसर्गावर सिद्धि प्राप्त होते म्हणून विज्ञानाचे महत्त्व. ही सिद्धि सर्वस्वी तंत्रविद्येमुळे प्राप्त होते. तेव्हा, सर्व भौतिक ज्ञानाला तंत्रविद्येत रूपांतरित करणारी ही दृष्टि मध्ययुगीन अध्यात्मवाद आणि तत्त्वज्ञान यांचा कचरा फेकून देऊन उपयोगाचे तेवढे शिल्लक ठेवते. वैज्ञानिक तंत्रविद्येने आकृष्ट होणाऱ्यांपैकी तुम्ही एक असलात तर तुम्हाला हे प्रतिपादन चटकन पटेल.

सत्तालालसेला फलतःप्रामाण्यवादात समर्थन सांपडते हे या तत्त्वज्ञानासंबंधी वाटणाऱ्या आकर्षणाचे तिसरे कारण होय. वरील, तंत्रविद्येशी संबंधित, दुसऱ्या कारणाहून हे कारण फारसे भिन्न नाही. माणसाच्या कामना विविध असतात. माणसाला ऐंद्रिय सुखे हवी असतात, सौंदर्याच्य रसग्रहणाने मिळणारा आनंद हवा असतो, चिंतनाची धुंदी अनुभवाविशी वाटते, कौटुंबिक प्रेम हवे असते, सत्तेचा उपभोग हवा असतो. एकेका व्यक्तीत यापैकी कोणती तरी एक कामना इतर कामनांहून प्रबळ ठरेल. तुमच्यात सत्ताकांक्षा प्रभावी असली तर तुम्हालाहि, मार्क्सप्रमाणे, जगाचे गूढ उकलणे महत्त्वाचे वाटणार नाही, जगाला आपल्या मनाजोगता आकार देता येणे ही गोष्ट एकमेव महत्त्वाची वाटेल. ज्ञानासंबंधीच्या पारंपरिक सिद्धांतांची जुळणी विश्वचिंतनात रमणाऱ्या विरागी वृत्तीच्या माणसांनी केली असे यंत्रवादाचे आधुनिक अनुयायी म्हणतात. यंत्रवादाच्या उपासनेमुळे माणसाच्या सत्तेत मोठी भर पडते. सत्तेची लालसा असणाऱ्यांना म्हणून विज्ञानातील तंत्रविद्येच्या भागाचेच खरे आकर्षण असते. आणि सत्तासंपादनासाठीच तुम्ही विज्ञानोपासना करणार असला तर हे तत्त्वज्ञान तुम्हाला अगदी हवे ते देते. यादृष्टीने विज्ञानसाधनेतील अनावश्यक भाग बरोबर वगळून फक्त उपयोगी तेवढेच विज्ञान फलतःप्रामाण्यवाद विचारात घेतो. तुम्ही एकच डोळा मागता तर फलतःप्रामाण्यावाद तुम्हाला दोन डोळे देतो,

कारण, एकदा पोलिसदल तुमच्या हाती आले की, मनोकामनेनुसार 'सत्य' निर्माण करण्याची ईश्वरसमान शक्ति तुम्हाला प्राप्त होते. सूर्याला थंड गोळा बनविणे काही तुमच्या हाती नाही, पण 'सूर्य हा थंड गोळा आहे' या उक्तीला व्यवहारात फलतःप्रामाण्यवादातील सत्यत्व तुम्ही देऊ शकता. जो कोणी त्याचे सत्यत्व नाकारेल त्याला यमसदनी पाठविण्याचे काम तुम्ही केलेत म्हणजे झाले. हे कर्तृत्व ब्रह्मदेवाच्याहि कुवतीबाहेरचे आहे.

विश्वाला आपल्या इच्छेप्रमाणे घडवू पाहणारे हे 'विश्वकर्म्या'चे तत्त्वज्ञान इतर तत्त्वज्ञाने आणि व्यवहारी शहाणपण यांच्याहून फारच वेगळे पडते. 'सत्या'ची निश्चिति करण्यासाठी 'वस्तुस्थिति' या कल्पनेचा आधार मूलभूत म्हणून इतर तत्त्वज्ञानात आणि सामान्य व्यवहारात आपण स्वीकारतो. फलतःप्रामाण्यवाद नेमकी ही मूलभूत कल्पना नाकारतो. उदाहरणार्थ, दक्षिण ध्रुवावर अतिशय थंडी असते ही खरीच 'वस्तुस्थिति' असल्याने, तुम्ही दक्षिण ध्रुवप्रदेश थंड आहे असे विधान केल्याने ते 'सत्य' विधान आहे असे आजवरच्या परंपरेत मानले गेले आहे. लोकांची श्रद्धा आहे म्हणून, किंवा लोकांना अशी समजूत बाळगण्यापासून काही फायदा आहे म्हणून, 'दक्षिण ध्रुवावर थंडी आहे' ही 'वस्तुस्थिति' ठरत नाही; मुळातच तिथे थंडी अस्तित्वात आहे म्हणून ती 'वस्तुस्थिति' ठरते. मनुष्य आणि मनुष्याच्या कृति सोडल्यास इतर 'वस्तुस्थिति' मानवी शक्तीच्या मर्यादाच अधोरेखित करते. आपला जन्मच आधीपासून अस्तित्वात असलेल्या सृष्टीत होतो. या सृष्टीची रचना आपल्याला निरीक्षणाच्या द्वारे समजते. जग "असे असायला हवे– तसे असायला हवे" या तुमच्या लहरीनुसार काही जगाचे स्वरूप ठरत नाही. पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळ व पृष्ठभागावर आपल्या कृतींनी माणूस सृष्टीच्या रचनेत परिवर्तन घडवून आणू शकतो हे खरे; पण हीच त्याच्या शक्तीची मर्यादाहि पण आहे. व्यवहारी माणसांना पृथ्वीव्यतिरिक्त इतर विश्वात परिवर्तन घडवून आणण्याची गरजच नसते आणि म्हणून पृथ्वीच्या पृष्ठभागाचे सर्व विश्वाशी समीकरण घालणारे तत्त्वज्ञान त्यांना ग्राह्य वाटते. पण पृथ्वीच्या पृष्ठभागावरदेखील मानवी शक्तीला मर्यादा आहेत. आपल्या इच्छेच्या कह्यात नसलेल्या अनेक नैसर्गिक घटनांचे बंधन आपल्या जीवनाला

पडलेले असते हे विसरणे पागलपणाचे होईल. एखाद्या भणंग वेड्याला आपण जगाचे पातशहा आहोत असे वाटण्यासारखे ते आहे. वैज्ञानिक तंत्र-विद्येच्या विजयश्रीमुळे आपण सर्वशक्तिमान असल्याचा उन्मादक पागलपणा वाढीला लागला आहे. सोव्हिएट सरकारची फर्माने न जुमानण्याचे धाष्टर्य प्रजननशास्त्राच्या नियमांच्या अंगी असू शकेल हे स्टालिनला कधी पटले नाही. पागलपणाचाच हा नमूना आहे. प्राचीनकाळी पर्शियाच्या झार्क्सिस[६] राजाने पोझेडॉन या सागराधिपति देवाला धडा शिकविण्याच्या हेतूने सामुद्र-धनीला चाबकाने फोडून काढण्याची आज्ञा दिली होती. त्यातलाच हा प्रकार झाला.

सत्याच्या कल्पनेबाबत मी १९०७ साली लिहिले होते : 'फलतः प्रामाण्यवादात सत्याची निश्चिति करण्यासाठी दंडशक्तीला आवाहन अनुस्यूत आहे. सत्य मानवनिरपेक्ष असेल तर, दोन व्यक्तीत सत्यासंबंधी वाद उद्भवल्यास, दोघांनीहि आपला वाद त्रयस्थ व उच्चतर निकष लावून सोडवावा असे म्हणता येईल. तेव्हा, निदान तत्त्वतः, कोणताहि सत्यासंबंधीचा वाद शांततेच्या व न्याय्य मार्गाने मिटविला जाऊ शकतो असे ठरेल. पण, जे यशस्वी वा वरचढ ते सत्य असे असेल तर, कोणताहि वाद अखेरीस बळाचा वापर करूनच सोडविला जाऊ शकतो हे उघड आहे...विशेषतः आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सत्यविषयक कोणता दृष्टिकोन स्वीकारला जातो त्याला महत्त्व आहे. दोन्ही पक्ष बलवान असले, आणि तिसरा कोणी पक्ष त्यांच्यावर नियंत्रण ठेवू शकणारा नसला, तर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपापसातील झगडा मिटविण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर होणार हे राष्ट्रांच्या सत्य-विषयक दृष्टिकोनावर अवलंबून राहील. देशांतर्गत शांततेप्रमाणेच, आंतर-राष्ट्रीय शांततेची निर्मितीदेखील कोणत्याहि वादग्रस्त प्रश्नासंबंधी वेगवेगळ्या पक्षांच्या म्हणण्यातील योग्य–अयोग्य विचारात घेऊन न्याय्य पक्षाच्या बाजूने उभी राहणारी लोकमताची प्रभावी शक्ति निर्माण करता येण्यावरच अवलंबून आहे. अशा व्यवस्थेत, बलाचा वापर करून वादग्रस्त प्रश्न सोडविला जातो असे म्हणत असताना, बळाच्या वापराला न्यायाची बाजू घेतलेल्या लोकमताची संमात असते, ही पुस्ती जोडण्याची दक्षता घेतली

पाहिजे. सत्यासत्यतेच्या स्वतंत्र कल्पनांवर आधारलेली न्यायकल्पना समाजात स्वीकृत असण्यावरच अशा प्रकारच्या न्यायाधिष्ठित लोकमताची उभारणी शक्य आहे. समाजाच्या इच्छेनुरूप जर योग्यायोग्यतेचा निर्णय होणार असेल तर दंडशक्तीला न्यायाचे अधिष्ठान असते असे म्हणता येणार नाही. फलतः प्रामाण्यवादी तत्त्वज्ञानात सत्यासत्यतेच्या स्वतंत्र, मानवनिरपेक्ष कल्पनेलाच स्थान नसल्यामुळे सत्याधिष्ठित न्याय ही कल्पनाच फलतः प्रामाण्यवादात बसत नाही. त्यामुळे, सहिष्णुता आणि स्वातंत्र्य या कल्पनांपासून हे तत्त्वज्ञान प्रस्थान ठेवत असले तरी, अखेरीस, मूळ गृहीतकृत्यामुळे फलतःप्रामाण्यवादी तत्त्वज्ञान, अपरिहार्यपणे, दंडशक्तीला आवाहन करते व ‘ बळी तो कान पिळी ’ या भूमिकेवर जाऊन पोचते. देशांतर्गत लोकशाही आणि देशाबाहेर साम्राज्यवाद या उभय भूमिकांना एकाचवेळी फलतः प्रामाण्यवादात त्यामुळे आधार सापडतो. आधुनिक जगातील आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या गरजांशी फलतःप्रामाण्यवादाचे जितके बेमालूम समायोजन होऊ शकले आहे तितके आजवर पुढे आलेल्या दुसऱ्या कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या बाबतीत शक्य झालेले नाही.

‘ सगळ्याचा मतितार्थ असा : पृथ्वीच्या पृष्ठभागापलिकडे ज्यांची नजर पोचत नाही, ज्यांना मानवाच्या शक्तीला असलेल्या मानवातीत मर्यादांचे भान नाही, ज्यांना आपला विकास “ अबाधित ” व सतत होत जाणार या विषयी आत्मविश्वास आहे, विजयश्री आपल्याच गळ्यात माळ घालणार अशी ठाम श्रद्धा असल्याने जे विनाशाचा धोका पत्करूनहि युद्धोत्सुक असतात, धर्म हा ज्यांच्या खाती पूर्णत्वाच्या ओढीतून निर्माण झालेला निःश्रेयसाचा शोध नसून रेल्वे, वीज याप्रमाणेच एक आपल्या आकांक्षापूर्तीचे साधन मात्र असतो, अशा सर्व लोकांच्या मनाची फलतःप्रामाण्यवाद पकड घेतो. पृथ्वीतलावरील मानवी जीवन ही जर अतीव विराट विश्वाचे दर्शन घडविणारी खिडकी नसती तर पृथ्वीवरील जीवन ही ज्यांना जन्मठेप वाटली असती, मानवाने सर्वशक्तिमान सर्वज्ञतेचा दावा करणे ज्यांना घमेंडखोरी वाटते, जगातील सर्व सम्राटांनी आपल्या पायाशी लोळण घ्यावी या नेपोलियनच्या जगज्जेत्या आकांक्षेपेक्षा जितेंद्रियाला सिद्ध होणारे विवेक-

निष्ठ स्वातंत्र्य ज्यांना अधिक हवेसे वाटते, थोडक्यात, ज्यांना पूजा बांधण्याइतका मानव हा प्राणि परिपूर्ण वाटत नाही, अशा व्यक्तींना फलतःप्रामाण्यवादी माणसाचे जग डबक्यासारखे क्षुद्र वाटेल. फलतःप्रामाण्यवाद अद्‌भुत आणि अनंत विश्व माणसापासून हिरावून घेतो आणि हे श्रेय हरपलेला माणूस स्वतःची अप्रतिष्ठा करून घेतो. अशा फलतःप्रामाण्यवादाचे कुंपण घातलेल्या जगातले जीवन या व्यक्तींना रसशुष्क वाटेल.'

विज्ञानाने मानवी सुखात काय भर टाकली आहे, आणि जुन्या काळापासून चालत आलेल्या कोणत्या अनिष्ट प्रवृत्ति विज्ञानामुळे तीव्रतर होण्याची शक्यता आहे, त्यांचा विचार करू.

पृथ्वीवर नंदनवन निर्माण करण्याचा एखादा राजमार्ग हाताशी आहे असे खोटे आश्वासन मी देत नाही. कोणत्याहि प्रकारच्या समाजव्यवस्थेत आजारपण आणि मरण या गोष्टी असणारच. सर्वकाळी वेडे हे असणार; तसेच म्हातारपण कोणाला टळणार नाही. जीवनात धोका हा राहणारच. पण धोका टाळावयाचा प्रयत्न केला तर जीवन कमालीचे कंटाळवाणे होईल. कुटुंबसंस्था आजच्या स्वरूपात टिकून आहे तोवर प्रेमाची अपरिपूर्ति, आईबापांची दंडेली आणि कृतघ्न पोरे हे सर्व प्रकार राहणारच. आणि कुटुंबसंस्थेची जागा दुसऱ्या संस्थेने घेतली तर नव्या व्यथा, नवे अन्याय निर्माण होतील; व, कदाचित, ते अधिक तीव्र असतील. मानवी जीवन निर्भेळ सुखी कधीच करता येणार नाही. तशी अवास्तव आशा बाळगणे म्हणजे निराशेला आपणहून आमंत्रण देण्यासारखे आहे. पण आज रास्तपणे अपेक्षा बाळगता येईल त्या जीवनापासून मिळणारे आश्वासनहि मोठे आहे. पुढे रेखाटलेल्या चित्रात भावी जीवनाचे मी भविष्य वर्तवीत नसून आदर्श परिस्थितीत काय घडू शकेल त्याची शक्यता दिग्दर्शित करीत आहे. अर्थात, बहुसंख्य लोकांनी पाठिंबा दिला तरच ती मूर्त होऊ शकेल.

विज्ञानाचा उपयोग अविचाराने केला तर प्राचीन कालापासून अस्तित्वात असलेल्या दोन अनिष्ट प्रवृत्ति अधिक तीव्रतर होतील. युद्ध आणि जुलूम

या त्या दोन प्रवृत्ति होत. पण ते असो. तूर्त विज्ञानजन्य अरिष्टांपेक्षा विज्ञान-जन्य सुखांचाच विचार मी इथे करणार आहे.

विज्ञानामुळे होणारा लाभ दोन प्रकारचा असू शकतो. मानवाला क्लेश-दायक व अनिष्ट वाटणाऱ्या गोष्टी विज्ञानाचा उपयोग केल्याने कमी होतात हा एक प्रकारचा लाभ आहे. मानवी जीवनात सुखाची, वैभवाची भर घालणाऱ्या गोष्टींना विज्ञान जन्म देते हा दुसऱ्या प्रकारचा लाभ. पहिल्या प्रकारच्या लाभाचा विचार प्रथम करू.

जगातले दारिद्र्य विज्ञान नष्ट करू शकेल. विज्ञानामुळे माणसाला अतिश्रम करण्याची आवश्यकता उरणार नाही. शेतीचा शोध लागला नव्हता अशा मानवजातीच्या आरंभकालात प्रत्येक माणसाच्या पोषणासाठी दोन किंवा अधिक चौरस मैलांचे क्षेत्र आवश्यक होते. मोठ्या प्रयासाने माणूस स्वतःला जिवंत ठेवीत असे. त्या काळात उपासमारीनें घडून येणारे मृत्यू पुष्कळ असले पाहिजेत. इतर जंगली प्राण्यांच्या जीवनात आजहि आढळते तसे, स्वच्छंद सुख आणि अपार दुःख यांचे मिश्रण मानवी आयुष्यात त्यावेळी होते.

आधुनिक यंत्रोद्योगाच्या शोधाने घडून आलेल्या क्रांतिइतकीच महत्त्वपूर्ण क्रांति त्या काळात शेतीच्या शोधाने घडून आली. शेतीचा शोध ज्या क्रूर व निष्ठूर पद्धतीने माणसाने राबविला त्यात आजच्या माणसाला गंभीर व भयानक इशारा आहे. गुलामी, दास्यत्व, नरबळि, अनियंत्रित राजसत्ता आणि महायुद्धे हे सर्व शेतीच्या शोधातून निष्पन्न आलेले परिणाम आहेत. मूळ सत्ताधारी वर्गाचा अपवाद सोडला तर, शेतीच्या शोधामुळे माणसाचे राहणीमान उंचावले नाही, माणसांची संख्या मात्र वाढली. शेतीच्या शोधामुळे घडून आलेल्या परिणामांचे नफानुकसान ताडून पाहिले तर, एकंदरीत, शेती करायला लागल्या काळापासून माणसाचे दैन्य आणि क्लेशच वाढले आहेत अशा निष्कर्षावर आपण येऊ अशी शक्यता आहे. आधुनिक यंत्रोद्योगांचा परिणाम याचीच पुनरावृत्ति करणारा ठरणे असंभवनीय नाही.

सुदैवाने पाश्चिमात्य जगात औद्योगिकरण आणि लोकशाही दोहोंची वाढ बरोबरीने होण्याचा योगायोग जुळून आला आहे. लोकसंख्येची वाढ

भरमसाट गतीने होत राहिली नाही तर एका माणसाच्या श्रमातून त्याच्या कुटुंबाच्या गरजांपेक्षा खूप अधिक उत्पादन होऊ शकेल असे वैज्ञानिक तंत्र आपल्या हाताशी उपलब्ध आहे. लोकशाही राजवट डोळस असली तर या तांत्रिक वरदानाचा उपयोग जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी केला जाईल. ब्रिटन व अमेरिकेत लोकांचे राहणीमान सुधारण्याकरता या तांत्रिक वरदानाचा उपयोग मर्यादित प्रमाणात करणे शक्य झाले आहे. युद्धांची आपत्ति कोसळली नसती तर त्याचा अधिक प्रभावी उपयोग करून घेतला गेला असता. या तांत्रिक वरदानाचा उपयोग राहणीमान उंचावण्यासाठी झाला याचे श्रेय तीन घटनांना आहे; लोकशाही, कामगार संघटना आणि संतति नियमन. अर्थातच, या तीनही चळवळींना श्रीमंत वर्गाचे शत्रुत्व पत्करावे लागले आहे. जगातील इतर राष्ट्रांचे औद्योगिकरण घडून येत असताना त्या राष्ट्रांना या तीन गोष्टींचा स्वीकार करण्यास जर प्रवृत्त करता आले, आणि महायुद्धांचे संकट कायमचे निवारता आले, तर साऱ्या जगातून दारिद्र्याचे उच्चाटन करता येईल आणि जगाच्या कुठल्याहि कोपऱ्यात कोणालाहि अतिश्रम करण्याची आवश्यकता उरणार नाही. या तीन गोष्टींचा अंगिकार न होताच औद्योगिकरण घडून आले तर, त्या औद्योगिकरणातून अगणित गुलामांचे घाम गाळून आणि रक्त सांडून पिरॅमिड्स उभारणाऱ्या फारोहांच्या राजवटींच्या प्रतिकृति मात्र निर्माण होतील. तसेच जगाची लोकसंख्या आजच्याच वेगाने वाढत राहिली तर जगातले दारिद्र्य नष्ट करणे किंवा श्रमाचे ओझे हलके करणे यापैकी कोणतीहि गोष्ट कदापिहि शक्य होणार नाही.

आधुनिक वैद्यकशास्त्र ही विज्ञानाने मानवाला दिलेली अभूतपूर्व देणगी आहे. अठराव्या शतकात आपली बहुसंख्य मुले बालपणीच मृत्यूमुखी पडणार ही गोष्ट आईबाप गृहीत धरून चालत. एकोणिसाव्या शतकापासून या परिस्थितीत सुधारणा घडून यायला सुरवात झाली. याचे प्रमुख श्रेय सांथीच्या रोगांवर रोग प्रतिबंधक लस शोधण्यात मिळालेल्या यशाला आहे. तेव्हापासून बालमृत्यूचे प्रमाण सतत घटत आले आणि आजहि त्या दिशेने सातत्याने प्रगति होत आहे. १९२० साली इंग्लंडमध्ये दर हजारी ८०

बालमृत्यू होत. १९४८ साली हे प्रमाण दर हजारी ३४ इतके खाली आले. आणि सर्वसाधारण मृत्यूचे प्रमाण १९४८ साली दर हजारी १९·८ इतके होते, हे प्रमाण इतके खाली त्या आधीच्या काळात केव्हाहि आले नव्हते. वैद्यकशास्त्रांमुळे मानवी आरोग्यात घडून येणाऱ्या सुधारणेला मर्यादा असलीच तर ती अद्याप उघड व्हायची आहे. क्लोरोफॉर्मसारख्या गुंगी आणणाऱ्या औषधामुळे माणसाला आजारपणात भोगाव्या लागणाऱ्या अनावश्यक वेदना कमी करता आल्या आहेत.

विज्ञानाशिवाय गुंडगिरी आणि हिंसा यांचे प्रमाण आजच्याइतके सामान्यपणे कमी होऊ शकले नसते. अठराव्या शतकातील कादंबऱ्या वाचीत असताना तत्कालीन लंडन शहरातील जीवनाचे एक रहस्यमय, भीषण चित्र उभे राहते. अंधारी रस्ते, पावलांचा आवाज होऊन वाटमाऱ्यांना पत्ता लागू नये म्हणून दबकत चालणारे वाटसरू, कोपऱ्याकोपऱ्यांवर लपून राहणारे वाटमारे, पोलिस किंवा तत्सदृश संरक्षक दलाचा अभाव, असे एकीकडेच चित्र; आणि, दुसऱ्या बाजूला, जणू काही या भयाची भरपाई करण्यासाठी गुन्हेगारांचा अमानुषपणे छळ करण्यास, त्यांच्या देहावर क्रूर अत्याचार करण्यास संमति देणारा कायदा. रस्त्यांवर दिवाबत्तींची सोय, टेलिफोनची सोय, बोटाचे ठसे घेण्याच्या कलेतील प्रगति आणि गुन्हेगारी व शिक्षा यांचा मानसशास्त्रीय अभ्यास या वैज्ञानिक सुधारणांमुळे उदारमतवादाच्या उत्कर्ष काळी कोणत्याहि आदर्शवादी तत्त्वज्ञानाने कल्पना केली नसती इतके गुन्हेगारीचे प्रमाण आज घटले आहे.

विज्ञानाने ज्या चांगल्या गोष्टी नव्याने निर्माण केल्या त्यांचा आता आपण विचार करू. श्रमाची उत्पादनक्षमता वाढल्यामुळे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करता येणे शक्य झाले ही विज्ञानानेच दिलेली देणगी आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात अमेरिकेने सर्वांच्या पुढे आघाडी मारली आहे. अमेरिकेत महाविद्यालयींन शिक्षणहि मोफत दिले जाते. न्युयॉर्कमध्ये पुष्कळवेळा पी. एच. डी. घेतलेले टॅक्सी ड्रायव्हर माझ्या पाहण्यात आले. माझ्याशी ते तत्वज्ञानासंबंधी चर्चा करू लागत आणि इकडे माझा जीव खालीवर होई,

कुठे आता अपघात होतो म्हणून. अमेरिका आणि इंग्लंड या दोन्ही राष्ट्रात शिक्षणक्षेत्रातील उच्च पातळ्यांवर घडून आलेल्या सुधारणाहि लक्षवेधी आहेत.

शिक्षणाच्या प्रसारामुळे स्वतःच्या विकासाची संधीहि सामान्य माणसांना आज अधिक प्रमाणात उपलब्ध झाली आहे. वडिलोपार्जित संपत्ति किंवा उच्चवर्गीय कुटुंबातील जन्म या प्रकारच्या उपजत गोष्टींचे पाठबळ नसलेल्या हुशार व होतकरू तरुणाला आपल्या गुणांच्या जोरावर समाजात उच्च प्रतिष्ठा प्राप्त करून घेणे पूर्वीपेक्षा आज कितीतरी सोपे जाते. अद्यापहि पैसा आणि खानदान यावर आधारलेली सामाजिक विषमता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. पण अमेरिका आणि इंग्लंड या देशात सर्व माणसांना लौकरच समान संधि प्राप्त होईल अशी आशा करण्यास जागा आहे. पूर्वीच्या काळी केवढी बुद्धिमत्ता कुजून जात असली पाहिजे याची कल्पना करवत नाही. अगणित नररत्ने उकिरड्यावर पडून वाया गेली असली पाहिजेत.

पूर्वी केव्हाहि नव्हते इतके सर्वसामान्य जीवन सुखाचे झाले आहे. मानव-जातीवरील युद्धाचे संकट निवारता आले तर दैनंदिन जीवनातील सुखात खूपच भर पडेल.

सुखासमाधानाने व शांतीने जीवन जगणारे जग निर्माण व्हावयाचे व चिरकाल टिकावयाचे असेल तर कोणते स्वभावविशेष समाजातील थोरा-पासून लहानांपर्यंत रुजले पाहिजेत त्याचा थोडा विचार करू.

बौद्धिक ठेवण काय असावी तेथपासून सुरुवात करू या. महत्त्वाच्या घटना व घडामोडींचे यथार्थ ज्ञान व्हावे अशी जिज्ञासा बहुसंख्य लोकात वाढली पाहिजे. मोहक पण भ्रामक समजुतींवर विश्वास न ठेवण्याची प्रवृत्ति सार्वत्रिक झाली पाहिजे. सध्या जगात कॅथॉलिक ख्रिश्चन तत्त्वज्ञान आणि साम्यवाद हे दोन प्रधान परस्परविरोधी विचार संप्रदाय आहेत. यापैकी कोणत्याही एका संप्रदायावर हौतात्म्य पत्करण्याची तयारी असण्याइतपत तुमची उत्कट निष्ठा असेल तर तुमचे आयुष्य फार समाधानी होईल आणि (वेदनारहित असले तर) मरणातहि तुम्हाला समाधान लाभेल. आपल्या

पंथासाठी नवेनवे अनुयायी तुम्ही मिळवाल; त्यांचे एक सैन्यच्या सैन्य उभे कराल; प्रतिस्पर्धी संप्रदायाविरुद्ध व त्या संप्रदायाच्या अनुयायांविरुद्ध लोकांत द्वेषाचा भडका निर्माण कराल. अशा वेगवेगळ्या मार्गांनी आपण फार प्रभावी काम काम करीत असल्याची कृतकृत्यता तुम्हाला लाभेल. बंदिस्त व कडव्या विचार संप्रदायाच्या अनुयायाला आपल्या संप्रदायाच्या कुशीत सुरक्षितता व समाधान लाभते. तुम्ही आणि तुमची रूक्ष विवेकनिष्ठा मुमूक्षूला समाधान ते कसले देणार ? असा प्रश्न मला नेहमी विचारला जातो.

या प्रश्नाचे उत्तर एकसुरी नाही. विवेकाची कांस सोडल्याने कडव्या धर्मनिष्ठेपासून प्राप्त होणारे कैफ व झिंग आणणारे मदांध समाधान लाभेल असे अभिवचन मी देऊ शकत नाही. दारू, गांजा, अफू इत्यादी पदार्थांच्या सेवनाने मिळणारे सुख मी पुढे करीत नाही. अनाथ मुले, विधवा व अबला स्त्रिया यांची फसवणूक करून अमाप पैका करण्यात येणाऱ्या उन्मादक सुखाची बरोबरी करण्याची हमी बुद्धिवादाची बाजू मांडताना मी घेऊ शकत नाही. एकेकट्या 'धर्मांतरित' सांप्रदायिक व्यक्तीच्या सुखाची मला मातब्बरी वाटत नाही, साऱ्या मानवजातीचे सुखसमाधान ही माझी चिंता आहे. सारी मानवजात सुखासमाधानात राहावी अशी जर तुमची आकांक्षा असेल तर काही प्रकारचे हीन सुखाचे मार्ग तुम्हाला खुले नसतात. बुद्धीचे सच्चेपण असलेला पिता मुलाच्या आजारपणात वैद्यकीय तपासणीचा निष्कर्ष, मग तो निराशाजनक आणि दुःखद असला तरी, स्वीकारील. तेच, 'पोर बरे होईल' या अडाणी वैदूच्या निदानावर बेफिकिर राहिल्याने ज्याचे मूल दगावते त्याला, वैदूने दिलेला सल्ला सुखद होता, या सबबीवर क्षमा होऊ शकत नाही. वैदूच्या निदानाने त्या पित्याला मिळालेले सुख व आनंद क्षणिककाल खरा असेल पण म्हणून तो विचारी पित्याच्या दुःखी चिंतेहून अधिक स्वागतार्ह ठरत नाही. सामान्य माणूस मुलांएवढेच मानवजातीवर प्रेम करील तर, घरात जसे तो वैदूला स्थान देणार नाही त्याचप्रमाणे, राजकारणातहि तो स्वतःला सुखद पण भ्रामक मायाजालाला फशी पडू देणार नाही.

विवेकनिष्ठेच्या बाजूचा दुसरा मुद्दा असा की, सर्वच कडव्या सांप्रदायिक श्रद्धा हानिकारक असतात. प्रतिस्पर्धी श्रद्धांशी लढा चालू असला म्हणजे

प्रतिपक्षांविरुद्ध ‘ जिहादा ’ ची भाषा करून द्वेष व संघर्ष पेटवावा लागतो. अशावेळी कडव्या सांप्रदायिक श्रद्धेचे हानिकारक रूप विशेषत्वाने प्रकट होते. पण समाजात अेकाच कडव्या सांप्रदायिक श्रद्धेचा अप्रतिहत संचार असतो त्याहि स्थितीत अशी श्रद्धा हानिकारकच असते. स्वतंत्र विचाराला खुला वाव द्यायला संप्रदाय मार्तंड धजत नाहीत. कारण स्वतंत्र विचारांचे वारे वाहू लागल्यास लोकमानसावरील आपली पकड ढिली होण्याची भीति त्यांना पडते. म्हणून कोणतीहि कडवी सांप्रदायिक श्रद्धा नेहमीच स्वतंत्र वैचारिक विकासाला मज्जाव करीत असते. सामान्यतः अशा श्रद्धेला पुरोहित वर्गाचा आधार घ्यावा लागतो. त्रिकालाबाधित सत्याचा साक्षात्कार सनातनी श्रद्धेत झालेला आहे अशी भूमिका घेऊन ( वास्तविक असा साक्षात्कार वगैरे काही झालेला नसतो ) विचारांच्या क्षेत्रात ‘ जैसे थे ’ परिस्थिति सुरक्षित राखण्याचाच व्यवसाय केलेल्या विशिष्ट जातीच्या हाती, कडव्या सांप्रदायिक श्रद्धेचे वर्चस्व असलेल्या समाजात, अपरंपार सत्ता येते.

कोणतीही कडवी श्रद्धा द्वेषमूलकच असते. माझ्या परिचयातील अेक गृहस्थ जगात एकच जागतिक भाषा असावी या भूमिकेचा अतिशय कडवा पुरस्कार करतात. अेस्परांतोच्या ऐवजी इडो या भाषेला त्याचा पाठिंबा आहे. त्यांचे संभाषण ऐकत असता असे वाटते की अेस्परांतोचे पुरस्कर्ते एकजात सर्व नादान आणि नंबरी बदमाष आहेत. अेस्परांतोच्या पुरस्कर्त्यांचे सुदैव, कोणत्याहि सरकारला माझ्या मित्राची भूमिका पटली नाही; एरवी त्यांची काही धडगत नव्हती. हेच, माझा मित्र जर वीस कोटी लोक-संख्येच्या राष्ट्राचा सर्वाधिकारी असता तर, अेस्परांतोच्या पुरस्कर्त्यांची काय हालत झाली असती त्याच्या नुसत्या कल्पनेने माझ्या अंगावर शहारे येतात.

कडव्या संप्रदायातील द्वेषाचा भागच पुष्कळ वेळा प्रबळ असतो आणि प्रत्यक्ष व्यवहारात तोच वरचढ ठरतो. स्वतःला गरीबांचे कैवारी म्हणविणारे वस्तुतः श्रीमंतांचा द्वेष करीत असतात, गरीबांबद्दलचा त्यांचा कळवळा केवळ एक मुखवटा असतो. ‘ स्वतःइतकेच शेजाऱ्यांवर प्रेम करा ’ असा उपदेश करणारी मंडळी त्यांचा उपदेश न मानणाऱ्या लोकांचा मनापासून

द्वेष करणे आपल्या सच्च्या तत्त्वनिष्ठेचे लक्षण मानतात. अशा मंडळींचेच प्राबल्य बहुधा त्या पंथात असल्यामुळे त्यांच्या कार्याने समाजात प्रेम आणि चांगुलपणा यांचा प्रभाव वाढत असल्याचे दिसून येत नाही.

कडव्या सांप्रदायिक श्रद्धेच्या स्वीकारामुळे समाजाला वरील प्रकारची हानि पोचते हे तर आहेच. पण, खरे म्हणजे, ' बाबा वाक्यं प्रमाणं ' या पद्धतीने, चिकित्सक बुद्धीने तपासून न पाहताच, कोणतीही श्रद्धा जशीच्या तशी स्वीकारणे ही गोष्ट विज्ञाननिष्ठेशी सुसंगत नाही. ज्या समाजात अशा अंधश्रद्धाळूवृत्तींचा सार्वत्रिक प्रसार असेल त्या समाजाची वैज्ञानिक प्रगति घडून येईल हे अशक्य आहे. बायबलच्या बाबतीतच नाही तर, मार्क्स–एंगल्सलिखित ग्रंथांबाबतही, त्यात केलेली विधाने चुकीची, भ्रामक आहेत असे दाखवून देता येते. ससा रवंथ करतो हे बायबलमधील विधान, आणि १८६६ च्या जर्मनी व ऑस्ट्रियातील युद्धात ऑस्ट्रियाचा जय होईल हे एंगल्सचे विधान, ही दोन्ही वरील म्हणण्याच्या सत्यतेची दोन उदाहरणे आहेत. आद्य ग्रंथांतील वाक्य न् वाक्य शब्दशः खरे मानून चालणाऱ्यांविरुद्ध मुख्यत्वेकरून वरील टीका प्रभावी आहे. पण शब्दशः अर्थ करण्याची भूमिका सोडल्यावरही ग्रंथप्रामाण्य जेव्हा कायम राहते तेव्हा आद्य ग्रंथाचा अर्थ लावणाऱ्या धर्ममार्तंडांच्या हाती सर्व अधिसत्ता एकवटते. ' द्वंद्वात्मक स्वयंचलित जडवादाचा ' अधिकृत अर्थ मग कालमानाप्रमाणे ' बदलू ' शकतो, आणि ' बदललेल्या ' अर्थाच्या प्रकाशात ज्यांचे पूर्वकालीन विश्लेषण चुकीचे ठरते त्यांना मग भूतकालातील चुकीबद्दल वर्तमानकालात देहदंडाची वा देहान्ताची शिक्षा होते.

ग्रंथप्रामाण्य वा आप्तवाक्याऐवजी निरीक्षण आणि निरीक्षणावर आधारलेला निष्कर्ष या निकषांचा स्वीकार केल्यामुळेच विज्ञानाला परिस्थितीवर अभूतपूर्व विजय संपादन करता आलेला आहे. वैचारिक क्षेत्रात ग्रंथ वा आप्तवाक्य प्रामाण्य प्रस्थापित करण्याचा केलेला प्रत्येक प्रयत्न हे प्रतिगामी पाऊल आहे. कोणत्याहि सिद्धांताच्या वतीने त्रिकालाबाधित सत्याचा दावा विज्ञान करीत नाही, उपलब्ध पुराव्याच्या मर्यादेत तो सर्वांत जास्त संभाव्य आहे ही भूमिका विज्ञान घेते. शास्त्रीय विचारपद्धतीचे हे एक

मूलगामी वैशिष्ट्य आहे. आत्मनिष्ठ साक्षात्कारी सत्याचा भ्रामक आधार न घेताही अर्थपूर्ण जीवन जगण्याची शिकवण विज्ञाननिष्ठेतून माणसाला मिळते ही विज्ञानाची एक अत्यंत महत्त्वाची देणगी आहे. स्वतंत्र विचाराच्या माणसांचा छळ ही गोष्ट विज्ञानाच्या मूल प्रकृतीशी विसंवादी आहे.

कडव्या सांप्रदायिक श्रद्धेची भूक ही आधुनिक काळातली एक अत्यंत दुष्ट घटना आहे. मानवी इतिहासात इतरही काही काली माणसे या विकृतीने पछाडलेली होती असे आढळते. रोमन साम्राज्याचा उत्तर काल आणि सोळाव्या शतकातील युरोप हे दोन कालखंड चटकन डोळ्यापुढे येतात. रोमन साम्राज्याच्या घसरगुंडीला सुरवात झाली, आणि तिसऱ्या शतकात रानटी टोळ्यांच्या हल्ल्यांनी लोकांचे जीवन अस्थिर व भयग्रस्त झाले, तेव्हा माणसे पारलौकिकात सुरक्षितता शोधू लागली. प्लेटोच्या चिरंतन सत्तत्वांच्या आदर्श जगात प्लॉटिनसला[९] ही निश्चितता लाभली. मिथ्राच्या[१०] उपासकांना ती सूर्यलोकीच्या स्वर्गात मिळेल असे वाटले तर ती स्वर्गात मिळेल अशी ख्रिश्चनांना खात्री होती. ख्रिश्चन लोकांची श्रद्धा इतरांच्या तुलनेने तीव्रतर असल्याने रोमन साम्राज्याच्या अस्तकाली ख्रिश्चन धर्माचा विजय झाला. ख्रिश्चन धर्माला राजाश्रय मिळताक्षणी ख्रिश्चन धर्मपंडितात प्रमाण ग्रंथांच्या अन्वयार्थावरून वाद निर्माण झाले आणि बारीकसारीक विचारभेदांसाठी आपल्यातील मंडळींचाच छळ करण्यावर त्यांची सर्व शक्ति केंद्रित झाली. रानटी आक्रमकांकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसतच झाली नाही. रशियाविरोधी कम्युनिस्टांवर 'ट्रॉस्टकीपंथीय' असल्याचा सरसकट आरोप केला जातो त्याचप्रमाणे हे रानटी लोक सगळे 'एरियन-पंथीय'[११] असल्याचा शिक्का मारून तत्कालीन ख्रिस्ती धर्मपंडित मोकळे झाले. तत्कालीन वैफल्याच्या आणि भयाच्या पोटी ही कडवी श्रद्धा जन्माला आलेली होती. साम्यवादी वा ख्रिश्चन, दोन्हीही प्रकारची कडवी सांप्रदायिकता आजही वैफल्याच्या व भयाच्या पोटीच पसरत आहे. संकटामुळे झालेली ही अविवेकी प्रतिक्रिया असून, नको असलेले संकट स्वतःच्या वागण्याने ओढवून घेणारी ही प्रतिक्रिया आहे. हैड्रोजन बॉम्बच्या भीतीच्या पोटी लोक आततायी भूमिकेकडे आकृष्ट होतात. पण आत्यंतिक भूमिकेमुळे हैड्रोजन बॉम्बचा वापर प्रत्यक्षात होण्याचा संभव जास्तच वाटतो. या

मार्गाने स्वर्गीय मोक्ष मिळेल हे सांप्रदायिकांचे म्हणणे खरे आहे असे आपण समजू. पण पृथ्वीवर स्वर्गसुख उपभोगण्याची आकांक्षा काही या मार्गाने पुरी होणार नाही खास.

बौद्धिक सचोटी आणि मानवमात्राविषयी करुणा वा प्रेम यांच्यातील परस्परसंबंधाबद्दल मी थोडी स्पष्टता करतो. दारूण क्लेश भोगीत असलेल्या माणसांकडे बघण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात. 'बलात्कारी' मनोविकृती असलेल्या माणसाला दुसऱ्याला होणाऱ्या वेदना पाहून गुदगुल्या होतील. सर्वस्वी कोरड्या निर्लेप भूमिकेतून पाहाणारा त्याकडे दुर्लक्षच करील. भावविवश माणूस स्वतःची समजूत काढेल की वाटते तितके काही क्लेश होत नसले पाहिजेत. पण अंतःकरणापासून करुणा वाटली तर या क्लेशाचे मूळ तुम्ही हुडकून काढाल आणि मुळातूनच मानवी क्लेशांना जन्म देणारे कारण निपटून काढण्याचा यत्न कराल. भावनाविवश माणूस म्हणेल की तुम्ही हृदयशून्य आहात; खरोखर दुसऱ्याचे दुःख पाहून तुम्हाला कळवळा वाटत असता तर अशी थंड, शास्त्रीय चिकित्सा करीत तुम्ही बसला नसता. दुःखाचा कळवळा खरा आपल्यालाच आहे असा दावा भावनाविवश माणूस करतो. मात्र, आपल्या कळवळ्याचे प्रदर्शन करता यावे म्हणूनच जणू काही, जगातील क्लेश दूर करण्यासाठी स्वतः कष्ट घेण्याचे तो नाकारतो.

गिल्बर्ट व सुलीवान[१२] या संगीतकांच्या 'द मिकाडो' या संगीतिकेत अशीच कोमल हृदयाची एक बाई शिरच्छेदाची शिक्षा झालेल्याला उद्देशून म्हणते, 'एका सभ्य गृहस्थाला सांगताना एक दिवस मी ऐकले, शिरच्छेदाची शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना पात्याची धारच लागत नाही. शिर धडापासून इतके सहज सुटे पडते. खरे असले तर काय भाग्यवान आहेस तू.'

म्युनिखच्या वाटाघाटीचे[१३] वेळी जे मुत्सद्दी हिटलरला शरण गेले ते असेच भासवीत की, ( १ ) नाझींनी ज्यूंविरूद्ध हत्याकांडाचे सत्र सुरू केलेले नाही; आणि ( २ ) ज्यूंना मुळी स्वतःची शिकार करवून घ्यायला आवडतेच. कम्युनिस्टांचे सहप्रवासी आज म्हणतातच की, ( १ ) रशियात वेठबिगार नाहीच; आणि ( २ ) आर्क्टिक हिवाळ्यात मरेपर्यंत श्रम करण्याइतकी

मजा दुसऱ्या कोणत्याहि उद्योगात रशियन लोकांना येत नाही. या मंडळींवर मात्र कोणी ‘ रूक्ष बुद्धिवादी ’ असल्याचा आरोप करीत नाही.

आत्मनाशाची सार्वत्रिक आढळणारी सुप्त इच्छा हे आजच्या युगाचे एक अत्यंत बेचैन करणारे मानसशास्त्रीय वैशिष्ट्य आहे. या अवस्थेतील माणसांना मानसिक तोल प्राप्त करून देण्यासाठी परिपूर्ण सर्वांगीण श्रद्धेची गरज आहे, मग ही श्रद्धा विवेकशून्य व भ्रामक असली तर हरकत नाही, अशा प्रकारचे प्रतिपादन ऐकावयास मिळते. गौरवर्णीयांच्या संस्कृतीचा एकाएकी आघात झाल्यामुळे जगण्याची इच्छाच क्षीण होऊन कालांतराने, केवळ या एका कारणामुळे, जमातीच्या जमाती नष्ट झाल्याची उदाहरणे आफ्रिकन टोळ्यांच्या बाबतीत घडलेली सर्वांच्या परिचयाची आहेत. आण्विक शस्त्रास्त्रांमुळे निर्माण झालेल्या सर्वनाशाच्या धोक्याचा परिणाम असाच पाश्चिम युरोपात लोकांची जगण्याची जिजीविषा क्षीण होण्यात झालेला दिसतो. वस्तुस्थिति गंभीर असून त्यातून बाहेर निघण्याचा मार्ग स्पष्ट नाही. अशा परिस्थितीत मुक्ततेचा मार्ग शोधून काढण्याचे कामी आपली सर्व शक्तिबुद्धि लावण्याचे ऐवजी गतकालच्या आठवणी काढून अश्रू गाळत बसण्याची इच्छा होते. हैड्रोजन बॉम्बमुळे सर्वनाश झाला तर निदान डोके उठविणारे सगळे प्रश्न तरी संपतील अशी बेपर्वा वृत्ति आढळते. रोमन साम्राज्याच्या शेवटच्या दिवसात रानटी टोळ्यांच्या आक्रमणांमुळे रोमन लोकांनी हातपाय गाळले आणि पराभव पत्करला. हैड्रोजन बाँबच्या बाबतीतली पाश्चिमात्य राष्ट्रातील प्रतिक्रियाहि क्लांत आणि दुबळ्या मनोवृत्तीची द्योतक आहे. या नैराश्यावर व पराभूत मनोवृत्तीवर मात करावयाची असेल तर धैर्य, आशा आणि सुबुद्ध आशावाद बाळगण्याची आवश्यकता आहे. आजच्या परिस्थितीत आशा बाळगायला पुरेसा आधार आहे काय ते आधी बघू.

क्षणभर युद्धाचे संकट बाजूला टेवून विचार केल्यास, अमेरिका आणि इंग्लंड या दोन्ही देशातील सामान्य जनतेचे जीवन कोणत्याहि समाजात पूर्वी कधीहि नव्हते इतके आज संपन्न आहे असे खात्रीपूर्वक म्हणता येते. शांततेच्या काळात या संपन्नतेत सतत वृद्धि होत आहे. तेव्हा जगाचा नाश टाळण्यासाठी एक फार मोठे कारण आपल्यापाशी आहे.

आजच्या युगाच्या काही गरजा आहेत. तसेच काही गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत अशी निकड आहे. करुणा आणि मानवजातीच्या कल्याणाची इच्छा या गोष्टींची गरज आहे. सुखद पण भ्रामक समजुतींचा निर्धाराने त्याग करून सत्याची उपासना करण्याची गरज आहे. चिवट आशा आणि विधायक सर्जनशील कर्तृत्व या गुणांची जोपासना करण्याची सर्वात जास्त गरज आहे. क्रौर्य, मत्सर, लोभ, स्पर्धा या विकारांच्या अप्रतिहत घोडदौडी-मुळे जग सर्वनाशाच्या उंबरठ्यावर आज उभे असलेले दिसत आहे. तेव्हा या विकारांचे निर्दालन केले पाहिजे. फ्राईड ज्याला आत्मनाशाची इच्छा म्हणतो ती, आणि विवेकशून्य आत्मनिष्ठ कडव्या श्रद्धेची भूक, याहि दोन गोष्टी जगाला विनाशाकडे खेचीत आहेत. त्यांचाहि बुद्धिपुरस्सर त्याग केला पाहिजे.

मानवजातीला जडलेल्या या रोगावर एक फार परिचित, साधे, घरगुती आणि जुनेच औषध आहे, ते इतके साधे आहे की, विद्वान मंडळी माझा उपहास करतील म्हणून, ते सांगायचीहि मला चोरी वाटते. प्रेम वा करुणा हे या रोगावर सर्वोत्तम प्रभावी औषध आहे. तुमच्या अंतःकरणात मानव-मात्राविषयी करुणा जागृत झाली तर आयुष्याला अर्थ प्राप्त होतो, कृतीला दिशा मिळते, धीर बाळगायला मनाला आधार सापडतो आणि बौद्धिक सचोटी अंतस्थ प्रेरणेतून निर्माण होते. करुणा जागृत असेल तर वेगळ्या कोणत्याहि धार्मिक श्रद्धेची तुम्हाला गरज उरणार नाही. करुणावान माणूस सुखी असेलच असे नाही. पण व्यर्थ वा रिते जीवन जगणाऱ्यांची तळ नसलेली निराशा त्याच्या पदरात कधी येणार नाही. कारण, मानवाला भोगाव्या लागणाऱ्या अपार दुःखाचे ओझे कमी करण्यासाठी काय करायला हवे हा प्रश्न त्याला कधीच पडणार नाही.

आज जी एक मरगळ आणि निराशा सर्वत्र पसरलेली आढळते ती अविवेकावर आधारलेली आहे हे मला विशेषेकरून सांगावयाचे आहे. उंच उभा, निसरडा कडा चढून पार करणाऱ्या गिर्यारोहकासारखी मानवजातीची आज स्थिति आहे. एवढा कडा पार केला की चढण संपून एक छान विस्तीर्ण हिरवेगार पठार लागणार आहे. कड्याच्या टोकाजवळ जसजसा तो पोचत आहे तसा तोल निसटला तर तो बचावण्याची शक्यता कमी कमी होत

चालली आहे. प्रत्येक पावलागणिक त्याचा थकवा वाढत चालला आहे आणि पुढचे पाऊल उचलणे त्याच्या जिवावर येत आहे. आता फक्त शिखर एक पाऊलच उरले आहे. पण त्याला हे माहीत नाही, कारण त्याच्या डोळ्यांसमोर कड्याची भिंतच आहे. शरीर इतके थकले आहे की सगळे सोडून 'विश्रांति' घ्यावी असा मोह त्याला होत आहे. आता जर त्याने हात सोडून दिला तर त्याला मरणात चिरविश्रांति मिळेल. आशावादी मन उरले सुरले बळ एकवटून म्हणते, 'बस्स ! आता एवढे एकच पाऊल उचल की बहुधा कडा पार होईल.' दुसरे मन उपहासाने म्हणते, 'काय मूर्ख आहेस. या आशेच्या नादाने तू चढायला सुरवात केलीस. तुझा प्राण मात्र धोक्यात आला.' पहिले मन म्हणते, 'आयुष्य आहे तोवर आशा संपली नाही.' दुसरे मन फुत्कारते, 'आयुष्य आहे म्हणजे दुःख संपले नाही.' श्रांत गिर्यारोहकाच्या पुढे दोन पर्याय आहेत. तो शेवटचा एक प्रयत्न करून पाहणार की सर्वनाशाच्या खाईत स्वतःला लोटून देणार ? आणखी काही वर्षांत आपल्यापैकी जिवंत असतील त्यांना गिर्यारोहकाने दिलेले उत्तर काय होते ते कळेलच.

रूपकाचा पोशाख उतरवून पाहिले तर परिस्थिति पुढीलप्रमाणे दिसते. आजवर कधी शक्य झाले नाही इतके ऐहिक कल्याण निर्माण करण्याची संधि विज्ञानाने मानवजातीला उपलब्ध करून दिली आहे. पण या संधीचा लाभ घेण्यापूर्वी काही शर्ती पुऱ्या करण्याची जबाबदारी विज्ञान माणसावर सोपविते. युद्धाचा मार्ग त्याज्य ठरविला पाहिजे, सत्तेचे समतोल विभाजन झाले पाहिजे, आणि लोकसंख्येच्या वाढीला आळा घातला गेला पाहिजे. ही तिन्ही उद्दिष्टे साध्य होणे आज पूर्वी कधी नव्हते इतके आटोक्यात आले आहे. उद्योगप्रधान पाश्चिमात्य देशात लोकसंख्येच्या वाढीस पूर्णतः आळा बसला आहे. धर्म आणि हुकूमशाही यांचा हस्तक्षेप झाला नाही तर इतर देशातहि औद्योगिकरणाच्या प्रगतीबरोबर लोकसंख्येच्या वाढीला आळा बसण्याची प्रक्रिया घडून येईल. इंग्लंडमध्ये आर्थिक व राजकीय सत्तेचे समविभाजन जवळजवळ पूर्णत्वाला गेले आहे, आणि इतर लोकशाही राष्ट्रांची त्या दिशेने झपाट्याने वाटचाल चालू आहे. तुम्ही म्हणाल, युद्ध-

बंदीचे काय ? युद्धबंदीचे उद्दिष्ट साध्य करण्याच्याहि आपण फार जवळ येऊन पोचलो आहोत. वरकरणी या विधानात विरोधाभास आहे. पण आपण खरोखरच आपल्या उद्दिष्टाच्या जवळ आहोत असे मला वाटते. कसे ते पाहू.

पूर्वी अनेक सार्वभौम राष्ट्रे जगात होती, त्यापैकी कोणतीहि दोन राष्ट्रे लहर लागेल तेव्हा परस्परांशी युद्ध खेळू शकत असत. पूर्वीच्या काळी संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन करण्याचे प्रयत्न अयशस्वी व्हावेत हे स्वाभाविकच होते. तंटा उत्पन्न झाला की त्रयस्थाची मध्यस्थी मान्य करणे उभयपक्षांना कमीपणाचे वाटे आणि त्रयस्थाचा निवाडा भांडणाऱ्या राष्ट्रांना स्वीकारण्यास भाग पाडायला तटस्थ राष्ट्रे फारशी उत्सुक नसत. जगात रशिया व अमेरिका ही दोनच राष्ट्रे आज खरी सार्वभौम आहेत. बाकीची राष्ट्रे नांवालाच सार्वभौम आहेत. या दोहोंपैकी जे कोणते राष्ट्र युद्धाच्या मार्गाने किंवा निर्विवाद वरचढ लष्करी सामर्थ्याच्या जोरावर जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकेल ते एक विश्वराज्य स्थापन करून युद्धावर बंदी घालू शकेल. सुरवातीच्या अवस्थेत काही प्रदेशात दंडशक्तीच्या जोरावर विश्वराज्याची अधिसत्ता टिकवून धरावी लागेल. पण विश्वराज्य स्थापन करण्यात एकदा जर पाश्चिमात्य राष्ट्रांना यश आले तर थोड्याच अवधीत, ( ही राष्ट्रे लोकशाही राष्ट्रे असल्याने, ) दंडशक्तीच्या ऐवजी लोकसंमतीचा आधार विश्वराज्याला प्राप्त होईल. विश्वराज्याच्या स्थापनेने जगापुढील सर्वात बिकट प्रश्न सोडविला जाऊन विज्ञानाचा उपयोग सर्वस्वी विधायक कार्यासाठी करण्याचा मार्ग खुला होईल.

विश्वराज्य राजकीयदृष्ट्या अस्थिर असेल, किंवा ते दीर्घकाळ टिकणार नाही अशी भीति बाळगण्याचे कारण नाही. सत्तालालसा, निरंकुश स्पर्धा, द्वेष आणि भय या चार गोष्टीतून विराट हिंसेचा प्रादुर्भाव होतो. जगातले प्रभावी लष्करी सामर्थ्य आंतरराष्ट्रीय सैन्य दलाच्या हाती जर एकवटलेले असेल तर राष्ट्रीय पातळीवर सत्तालालसेला थैमान घालायला अवसर असणार नाही. नियंत्रणे आणि कायदे यांनी स्पर्धेत मर्यादा ठरवून दिल्या जातील. युद्धाचे सावट लोकांच्या मनावरून दूर झाले म्हणजे भीति आजच्या

इतकी तीव्र आणि सर्वव्यापी स्वरूपात आढळणार नाही. द्वेष आणि सूडबुद्धि या मनुष्यस्वभावात खोल रुजलेल्या भावनांचा तेवढा प्रश्न राहील. आपल्या शेजाऱ्यांबद्दल कोणी काही वाईट गोष्ट सांगितली की त्यावर चटकन विश्वास टाकण्याची आपली सहज प्रवृत्ति असते, मग त्या आरोपाला काही बळकट आधार आहे की ती कंडी उठविलेली आहे याचा विचार आपण करीत नाही. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात जर्मन लोकांविषयींची द्वेषाची भावना इतकी तीव्र होती की, जर्मनांवर कडक प्रायश्चित्त लादण्याने आपल्या अर्थव्यवस्थेवरहि घातक परिणाम होतील याचे भान आपल्या लोकांना राहिले नाही. पाश्चिमात्य युरोपला आज सढळ हाताने मदत केली तर उद्या आपले रक्षण होईल या गोष्टीला कबूली द्यायला अमेरिकन काँग्रेसच्या सभासदांची तयारी होत नाही. दुसऱ्याचा माल विकत घेण्याची इच्छा अमेरिकेला नाही, आपला माल मात्र इतरांनी विकत घ्यावा असा आग्रह असतो. माल खपविण्यावर भर असल्याने शेवटी विकत नाही तर मदत म्हणून आपल्या मालाची निर्यात करणे अमेरिकेला भाग पडते. पण या औदार्यानेच काही लोकांचा जळफळाट होतो. दुसऱ्याचे वाईट झालेले पाहण्याची ही जी माणसात सामान्य प्रवृत्ति आहे ती माणसाला अतिशय घातक ठरणारी आहे. विश्वराज्य जर टिकाऊ ठरावयाचे असेल तर या प्रवृत्तीचे निराकारण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

या प्रवृत्तीचे निराकरण होऊ शकते, आणि तेहि फार झपाट्याने होऊ शकेल अशी खात्री मला वाटते. जागतिक शांतता सुरक्षित व स्थिर झाली की भौतिक सुबत्तेत फार जलद गतीने वाढ होईल. माणसाचे ऐहिक सुख वाढले म्हणजे इतरांकडे तो जरा उदार दृष्टीने पाहू लागतो. व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीत इंग्लंडमध्ये सामाजिक जीवनातील क्रौर्याचा फार झपाट्याने ऱ्हास झाला; राणीच्या कारकीर्दीत समाजातील सर्व वर्गांच्या सुबत्तेत झपाट्याने भर पडत गेली हे त्याचे मुख्य कारण आहे. युद्धबंदीमुळे जगाच्या सुबत्तेत जी प्रचंड भर पडेल त्यामुळे जगभर लोकांची वागणूक अधिकाधिक मानवतावादी बनेल असा आत्मविश्वास बाळगायला हरकत नाही. विश्वराज्याच्या स्थापनेनंतर संकुचित राष्ट्रीय भूमिकेतून मतप्रचार

करण्यास बंदी करण्यात येईल. शाळातून मुलांना परकीयांबद्दल तुच्छबुद्धि व द्वेषभावना यांची शिकवणूक दिली जाणार नाही. प्रचारातील या फेर-बदलानेहि द्वेष आणि सूडबुद्धीला चांगलाच उतारा पडेल. गतेतिहासातील अनिष्ट प्रवृत्ति व चुका आणि विश्वराज्याचे फायदे यांच्या शिकवणूकीने उरलेसुरले कार्य पुरे होईल. ॲटम बॉंबच्या रेडिओ–ॲक्टिव्ह ढगाखालील भयग्रस्त अवस्थेचे पुनरुज्जीवन करावे असे म्हणणारे काही उपजत अस्थिर मनोवृत्तीचे रोगी सोडले तर इतरांना हे नवे जीवन सुखासमाधानाचे वाटेल याची मला खात्री आहे.

मग अडचण कोठे आहे? विश्वराज्याच्या निर्मितीच्या मार्गात भौतिक परिस्थितीचे वा तांत्रिक ज्ञानाचे काही अडथळे नाहीत. संशय, भय, सत्ता लालसा, असहिष्णुता, द्वेष या दुष्ट मनोविकारांनी विश्वराज्याचा मार्ग रोखून धरलेला आहे. कम्युनिस्ट जगात हे विकार अधिक प्रभावी आहेत हे मी नाकबूल करीत नाही. पण पाश्चिमात्य देशातहि ते चांगलेच जोर करून आहेत हेहि तितकेच खरे. कम्युनिस्ट राष्ट्रे आणि पाश्चिमात्य राष्ट्रे यांच्यातील परस्पर संशय व द्वेष यांचे निराकरण होऊ शकले तर एक नवे जग निर्माण करण्याच्या दिशेने मानवजात या घटकेला घोडदौड करू लागेल. या दोन गटात दिलजमाई निर्माण करण्यासाठी काय करावे याविषयी माझ्या मनात स्पष्टता नाहीं. याबाबतीत केल्या गेलेल्या वेगवेगळ्या सूचना मात्र बालिश आहेत असे मला वाटते. दिलजमाई घडवून आणण्याचा मार्ग सांपडत नाही तोवर काहीहि करून युद्धाचा भडका उडू नये अशी दक्षता घ्यावी आणि एक दिवस मानवजातीला शहाणपण सुचेल अशी आशा करावी एवढेच शक्य आहे. पूर्वीच्या मानाने नजिकचा भविष्यकाळ एकतर फार आशादायी किंवा घोर निराशाजनक तरी सिद्ध होणार आहे. पुढील काही वर्षात काय तो निकाल लागेल.

* * *

# टीपा

१. अठराव्या शतकात फ्रान्समध्ये बुद्धिवादी विचारवंतांचा एक गट उदयास आला. निरीक्षण व प्रयोग यावर आधारलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा यांनी स्वीकार केलेला होता. अंधश्रद्धावादी धार्मिक दृष्टिकोनाविरुद्ध बुद्धिवादाचा यांनी प्रसार केला. या विचारवंतांच्या गटास **फिलासफर्स** असे नांव रूढ आहे.

२. ( १७९८–१८३७ ) इटालियन इतिहासकार, नाटककार व कवि.

३. ( १८५९–१९५२ ) श्रेष्ठ अमेरिकन तत्त्वज्ञ व शिक्षण शास्त्रज्ञ.

४. ( १८७९–१९४० ) बोल्शेविक रशियन क्रांतीचा एक नेता व लेनिनचा एक सहकारी. रशियन ‘ लाल सेने ’चा जनक. उत्कृष्ट वक्ता व फर्डा लेखक. स्टालिनशी मतभेद झाल्याने रशियातून १९२७ साली हद्दपार केले. १९४० साली मेक्सिकोत स्टालिनच्या हस्तकाद्वारे खून.

५. इंग्लिश साहित्यिक. हुकूमशाहीचे सत्यस्वरूप प्रकट करणाऱ्या याच्या ‘ १९८४ ’ व ‘ ॲनिमल फार्म ’ या कादंबऱ्या गाजलेल्या आहेत.

६. ( ख्रिस्तपूर्व ४८५–६४ ) पर्शियाचा राजा.

७. सर्व जगात एकच भाषा असावी या दृष्टीने काही मंडळींनी अनेक प्रचलित भाषातून शब्द घेऊन तयार केलेल्या या दोन भाषा आहेत. यांत एस्परांतो ही त्यातल्या त्यात जुनी व इडो ही नवी या भाषेत व्यवहार करणारे मोजक्या लोकांचे काही गट आहेत.

८. जर्मनीवर कोणाचे प्रभुत्व असावे या प्रश्नावरून ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्यात झालेले युद्ध प्रशियाच्या आधुनिक, शिस्तबद्ध सैन्याने ऑस्ट्रियाचा चुटकीसरशी पराभव केला.

९. तिसऱ्या शतकातील ग्रीक-ईजिप्शियन तत्त्वज्ञ.

१०. पर्शियन सूर्यदेव. रोमन साम्राज्याच्या अस्तकाली जे अनेक संप्रदाय पाश्चिमात्य जगात फोफावले त्यातला ‘ मिथ्रा ’ची उपासना करणाऱ्यांचा एक पंथ होता. ख्रिश्चन धर्माला हा प्रतिस्पर्धी संप्रदाय होता. ख्रिश्चन धर्मातील आचारविचारांशी व श्रद्धांशी यात पुष्कळ साम्य होते. काही काळ फार जोर केल्यावर इ. स. २७५ नंतर या संप्रदायाचा ऱ्हास झाला.

११. चौथ्या शतकातील आरियस या ग्रीक ख्रिश्चन विचारवंतांचे शिष्य. ख्रिस्त हा ईश्वराचा पुत्र नाही असे याचे प्रतिपादन होते. या मतावरून ख्रिश्चन धर्म दुभंगण्याची पाळी आली. तेव्हा इ. स. ३२५ मध्ये रोमन सम्राट कान्स्टंटाईन याने ख्रिश्चन धर्मगुरूंची परिषद बोलावली. या परिषदेत आरियसची मते पाखंडी ठरवून त्यांच्या प्रचारास बंदी घालण्यात आली. स्टालिन व ट्रॉटस्की यांच्यामधील मतभेदामुळेहि एकेकाळी आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळ दुभंगण्याची पाळी आली होती. स्टालिनने आपल्या सत्तेचा वापर करून ट्रॉटस्कीची मते पाखंडी ठरवून ट्रॉटस्की व त्यांचे अनुयायी यांना 'धर्मबाह्य' ठरविले.

१२. उपरोध व विनोदप्रधान संगीतिका लिहिणारे द्वय. गिल्बर्टने संगितिका लिहावी व सुलीवानने संगीतरचना करावी असे यांचे कामाचे वांटप होते. 'द मिकाडो' ही यांची संगीतिका प्रसिद्ध आहे.

१३. चेकोस्लोवाकियामधील जर्मन भाषिक सुडेटनलँड हा भाग जर्मनीला देऊ करण्यास ब्रिटिश व फ्रेंच पंतप्रधान यांनी हिटलरबरोबरच्या म्युनिख येथील वाटाघाटीत संमति दिली. ही संमति देत असता आपण हिटलरच्या साम्राज्या-कांक्षेला यशस्वी पायबंद घालून युद्धाचे संकट निवारले अशी या मुत्सद्यांची समजूत होती. पण चेकोस्लोवाकिया प्रकरणी ब्रिटन व फ्रान्सने स्वीकारलेल्या पडखाऊ धोरणाने हिटलरच्या साम्राज्याकांक्षेला अधिकच खतपाणी मिळाले व १९३९ साली शेवटी महायुद्धात तिचे पर्यवसान झाले.

प्रकरण सातवे

# विज्ञानप्रणीत समाजरचना टिकाऊ असू शकेल काय ?

या शेवटच्या प्रकरणात एका निखळ शास्त्रीय प्रश्नाची चर्चा करण्याचा माझा मानस आहे. विचार आणि तंत्रविद्या या क्षेत्रात विज्ञाननिष्ठ भूमिका घेणारा समाज प्राचीन ईजिप्तप्रमाणे दीर्घायुषी, टिकाऊ होऊ शकेल का ? की, अपरिहार्यपणे नैसर्गिक ऱ्हास किंवा विध्वंसक अंत घडून यावा अशा अंतस्थ प्रवृत्ति विज्ञानप्रणीत समाजात काम करीत आहेत ?

वरील प्रश्नाच्या स्पष्टीकरणाने आपण चर्चेला सुरुवात करू. दैनंदिन जीवन, अर्थव्यवहार आणि राजकीय संघटना या तिन्ही क्षेत्रात शास्त्रीय ज्ञान आणि त्या ज्ञानावर आधारित तंत्रविद्या यांचा प्रभाव ज्या प्रमाणात पडत असेल त्या प्रमाणात तो समाज विज्ञानप्रणीत आहे असे मी म्हणेन. यावरून हे स्पष्ट व्हावे की, ही बाब, ' कमी '—किंवा ' अधिक '— विज्ञानप्रणीत, अशा प्रमाणाच्याच परिभाषेत मांडता येण्यासारखी आहे. प्रारंभीच्या अवस्थेत विज्ञानोपासनेत रस घेणाऱ्या काही निवडक विद्वान

मंडळींपुरताच विज्ञानाचा सामाजिक प्रभाव मर्यादित होता; पण अलीकडे सामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनातहि नित्य वाढत्या गतीने विज्ञान बदल घडवून आणीत आहे.

पदार्थविज्ञानात स्थिर, टिकाऊ हे शब्द ज्या अर्थाने वापरले जातात तोच अर्थ मला इथे अभिप्रेत आहे. एका विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक गतीने भोवरा फिरत असतो तोपर्यंत तो स्थिर, टिकाऊ असतो; त्या मर्यादेच्या खाली गति आली की, त्याची 'स्थिरता' ढळते आणि आरीवर उभे राहणे अशक्य होऊन तो कोलमडतो. एरवी अणु हा स्थिर, पण तोच रेडिओ–ॲक्टिव्ह किरणांचा उत्सर्ग करू लागला की, 'अस्थिर' बनतो, त्याची अंतस्थ रचना व समतोल टिकणे अशक्य होते. एखादा तारा कोट्यवधि वर्षे 'स्थिर' राहतो; पण मग एका क्षणाला ( अंतस्थ ताण असह्य होऊन ) स्फोट होऊन त्याची शकले शकले होतात. आपण उभारणी करीत असलेला विज्ञानप्रणीत समाज वरील अर्थाने 'स्थिर' वा 'टिकाऊ' आहे का या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

हा एक सर्वस्वी वस्तुनिष्ठ प्रश्न आहे हे मला आवर्जून सांगितले पाहिजे. समाज 'स्थिर' असणे चांगले की 'अस्थिर' समाज अधिक श्रेष्ठ असा हा प्रश्न नाही; हे प्रश्न मूल्यचर्चेच्या कक्षेत येत असल्याने वस्तुनिष्ठ शास्त्रीय चर्चेच्या लक्ष्मण-रेषेच्या पलीकडचे ते प्रश्न ठरतात. विज्ञानाची कांस धरणारी समाजव्यवस्था प्रत्यक्षात टिकेल की टिकणार नाही ? वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहता काय संभवनीय आहे ते आपल्याला पहावयाचे आहे. विज्ञानप्रणीत समाजरचना 'टिकणार' असेल तर ज्ञान वृद्धिंगत होत जाईल त्या प्रमाणात असा समाज अधिकाधिक विज्ञानप्रणीत होत जाणार. विज्ञानप्रणीत समाज-रचना जर 'टिकणार नसेल' तर, एक तर, किरणोत्सर्गामुळे सूर्य जसा हळूहळू थंड होत चालला आहे तसा समाज आस्ते आस्ते क्षीण व जीर्ण होऊन ऱ्हास पावेल, किंवा, अवकाशात उत्पातकारी स्फोट होऊन नवा तारा जन्माला येतो तसे, रक्तबंबाळ क्रांति किंवा अपयशी युद्ध यांच्या उत्पातातून एक समाज नष्ट होऊन त्याची जागा दुसरा कोणता तरी नवाच समाज घेईल.

आपल्या प्रश्नाचे स्वरूप जुगार खेळण्यासारखे आहे. अर्थ असा की, प्रश्नाचे उत्तर हा केवळ एक अंदाज आहे. कालमानाचा विचार करीत असताना ही गोष्ट स्पष्ट होते. खगोलशास्त्रज्ञांच्या मते, अधेमधेच काही अनपेक्षित घडले नाही तर, आणखी कोट्यवधि वर्षे पृथ्वी मानवी वस्तीला योग्य अशी राहील. मानवाचे पृथ्वीवरील आजवरचे अस्तित्व केवळ दहा लाख वर्षांचे आहे. तेव्हा सारे सुरळीत राहिले तर भूतकालाशी तुलना करता मानवाला पृथ्वीवर अनेक युगे वास करावयाचा आहे असे म्हणायला हरकत नाही; पण सारे सुरळीत राहिले नाही तर एका क्षणात खेळ खलास होईल.

स्थूलमानाने असे म्हणता येईल की, साधननिर्मितीच्या क्षेत्रातील वाढते मानवी कौशल्य आणि साध्य निश्चितीबाबतीतील वाढता मानवी अविचार या उभयतात आज शर्यत लागलेली आहे. साध्ये अविचारी राहिली असे मानले तर, साध्ये हस्तगत करण्याच्या बाबतीत साधननिर्मितीच्या कौशल्यातील प्रत्येक पुढचे पाऊल हे अंतिम अरिष्टाकडे टाकलेले पाऊल ठरणार आहे. मानवजात आजवर जिवंत राहिली कारण ज्ञान आणि लायकी या दोन्हीत आपण मागसलेले होतो. अविचाराला जर ज्ञान आणि लायकीची जोड मिळाली तर मानवजातीचे जीवित काही सुरक्षित नाही. ज्ञान म्हणजेच सत्ता हे खरे; पण हे शस्त्र दुधारी आहे. चांगल्याकरता तसाच वाईटाकरताही त्याचा सारखाच प्रभावीपणे उपयोग करता येतो. तात्पर्य असे की, ज्ञान वृद्धिंगत होत असताना माणसे शहाणी होत गेली तर बरे, एरवी ज्ञानात पडणारी भर ही वाढत्या दुःखाला कारणीभूत ठरेल.

विज्ञानप्रणीत समाजरचनेच्या ‘ अस्थिरते ’ची संभाव्य कारणे पुढील तीन गटात विभागता येतील. ( १ ) भौतिक ( २ ) जीवशास्त्राशी संबंधित आणि ( ३ ) मानसशास्त्रीय. भौतिक कारणांचा विचार प्रथम करू.

पृथ्वीवर नैसर्गिक साधनसंपत्तीचा काही विशिष्ट सांठा आहे. उद्योगधंदे आणि शेती ज्या पद्धतीने आज चालविली जातात त्यात, दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात, नैसर्गिक साधनसंपत्तीरूप मूळ भांडवलाची नासधूस व उधळपट्टी चाललेली आहे. नाईल खोऱ्यासारखे काही अपवादभूत प्रदेश

सोडले तर शेतजमिनीच्या बाबतीत तर माणसाने शेतीला सुरवात केल्या-पासूनच ही नासधूस चाललेली आहे. जगात लोकवस्ती विरळ होती तेव्हा एक शेत धुपून गेले की, लोक ते तसेच टाकून, जंगल तोडून दुसरीकडे नवे शेत तयार करीत. माणसाचे प्रेत जमिनीत कुजल्याने जमिनीचा तेवढा तुकडा सुपीक झाल्याचे या सुमारास कोणाच्या तरी लक्षात आले; जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी नरबलि देण्याची प्रथा त्यानंतरच्या काळात सार्वत्रिक झाली. या प्रथेचा फायदा दुहेरी होता. जमीनहि सुपीक बने आणि दुसरी-कडे खाणारी तोंडे कमी होत. तरी देखील, कालांतराने ही प्रथा अमानुष व वाईट ठरून नाश पावली. त्या वेळपर्यंत अर्थात् युद्धांनी हे कार्य आपल्याकडे घेतले होते. पण जिवंत राहणाऱ्या लोकांचे हाल दूर होतील इतक्या प्रमाणात युद्धात माणसे मारली जाऊ शकली नाहीत, आणि जमिनीची सुपीकता तहत आजपर्यंत वाढत्या प्रमाणात घटत चालली आहे. उधळपट्टीने जमिनीचा वापर केल्याने अमेरिकेच्या टेनेसी राज्यात जेव्हा एकेकाळच्या सुपीक प्रदेशाचे पाहता पाहता वाळवंट झाले[२] तेव्हा प्रथम जमीन धुपून जाण्याच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधले गेले. जगात एकाएकी अन्नाचे दुर्भिक्ष्य निर्माण व्हावयाचे नसेल तर शेतीच्या पद्धतीत काय सुधारणा केल्या पाहिजेत त्याचे ज्ञान आता आपल्याला झाले आहे. पण या ज्ञानाचा लाभ घेऊन शेतीत प्रत्यक्षात सुधारणा घडून येतीलच असे खात्रीपूर्वक म्हणता येत नाही. अन्नधान्याची मागणी कायमची तीव्र आहे तोवर या व्यवसायात अल्पावधीत पैसा करण्याची शक्यता मोठी आहे. अशा परिस्थितीत जमिनीचा कस सुरक्षित राखून वैज्ञानिक पद्धतीने शेती करण्याचे बंधन शेतकऱ्यावर लादण्याचे काम विवेकी आणि समर्थ सरकारच करू शकेल. जगातल्या पुष्कळ राष्ट्रातून समर्थ आणि शहाणे सरकार राज्यावर नाही अशीच आज स्थिति आहे. तरी इथे मी जागतिक लोकसंख्येचा प्रश्न विचारात घेतलेला नाही; तो प्रश्न मी पुढे विचारात घेणार आहे.

जगात वेगवेळ्या प्रकारच्या कच्च्या खनिज संपत्तीचा जो सांठा आहे. त्याहि बाबतचा प्रश्न शेतजमिनीइतकाच गंभीर आहे. थेट फोनिशियन[३] काळापासून अगदी परवापर्यंत कॉर्नवॉलमधील खाणीतून कथिल काढले जात होते. आज कार्नवॉलमधील खाणीतले कथिल संपलेले आहे. पण जगाला चिंता

आहे काय ? छट् ! जग म्हणते, "मलायात कथिल आहे." जगाच्या लक्षात येत नाही की लौकरच ते देखील संपून जाईल. आज ना उद्या, विशेष प्रयास न घेता उपलब्ध होणारे, सगळीकडचेच कथिल संपून जाणार आहे. इतरहि खनिज कच्च्या मालांची हीच कथा आहे. खनिज तेल हा आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचा खनिज पदार्थ आहे. भरपूर तेल उपलब्ध नसले तर, आजच्या तंत्रविद्येनुसार राष्ट्राची औद्योगिक दृष्ट्या भरभराट होणेहि कठीण; युद्धात तर अशा राष्ट्राला स्वतःचे संरक्षण करणेहि जमणार नाही. तेलाचा वापर इतका वाढला आहे की, जगातला तेलाचा सांठा अतिशय झपाट्याने संपत चालला आहे; उरल्या सुरल्या तेलाच्या सांठ्याकरता होणाऱ्या भावी युद्धात अधिकच वेगाने तो आटेल. खनिज तेलाएवजी अणुअर्जेचा उपयोग औद्योगिक शक्ति म्हणून जग करू लागेल असे यावर याला उत्तर मिळेल. जगातील उपलब्ध थोरियम आणि युरेनियमच्या साहाय्याने माणसे, जनावरे आणि झाडेझुडुपे खतम करण्याचा उद्योग संपल्यावर मग जगाचे काय होणार ?

खरी गोष्ट अशी आहे की, उद्योगधंदे—आणि कृत्रिम सेंद्रिय खतांचा वापर करीत आहे त्यापुरती शेती–आज नाही उद्या संपणाऱ्या कच्च्या मालाच्या व औद्योगिक शक्ति पुरविणाऱ्या वस्तूंच्या सांठ्याच्या जिवावर चाललेले आहेत. गरज पडली म्हणजे माणूस नवनव्या कच्च्या मालांचा शोध लावील व आज निरुपयोगी असलेल्या इतर पदार्थांचा उपयोग करू लागेल हे सर्व खरे. पण जमीन आणि माणसाचे श्रम यापासून होणाऱ्या उत्पादनाचे प्रमाण हळूहळू कमीच होत जाणार. शेवटी, अशा प्रकारची उपाययोजना ही स्वभावतःच तात्पुरती ठरणार आहे हेहि विसरता कामा नये. आपल्या जवळचे मूळ भांडवल खाऊन जग जगत आहे; उद्योग-प्रधान जगाला याखेरीज दुसरा पर्याय पण नाही. विज्ञानप्रणीत समाज-व्यवस्थेत अस्थैर्य निर्माण करणारा हा घटक असून तो टाळता येण्यासारखा नाही. पण बहुधा या कारणाने अस्थिरता निर्माण होण्याची घटना दूर भविष्यातली आहे.

विज्ञानप्रणीत समाजाच्या संभाव्य अस्थिरतेची जीवनशास्त्राशी संबंधित कारणे आपण आता विचारासाठी घेऊ. जीवसृष्टीच्या क्षेत्रात, संख्या हे

जर प्राणिजातीच्या यशाचे गमक मानले तर, मानव या प्राण्याने अलौकिक यश संपादित केले आहे असे म्हणावे लागेल. पृथ्वीवर मानव जन्माला आला त्या सुरवातीच्या काळात ही जात पृथ्वीवर अतिशय दुर्मिळ असावी. औजारांचा वापर करण्यासाठी माणसाला आपले हात वापरता येतात आणि भाषेच्या माध्यमाद्वारे माणूस आपले शोध व अनुभव पुढच्या पिढीला प्रदान करू शकतो. जीवसृष्टीतील इतर प्राण्यात आढळणाऱ्या या दोन गुणांमुळे माणूस वरचढ ठरला. पण या गुणांपासून संचित झालेले धन माणसाजवळ हळूहळू गोळा होत गेलेले आहे. या धनाची वाढ प्रारंभी हळू आणि नंतर भूमितिश्रेढीने होत जाणारी असते. प्रारंभीच्या काळी माणसाजवळ अवजारेहि थोडी होती आणि पुढच्या पिढीला वारसाने द्यायला फारसे ज्ञानहि नव्हते. भाषेचा शोध तर कसा आणि केव्हा लागला ते अद्याप गूढच आहे. ते असो. जी तीन पावले टाकल्यामुळे बटु वामनरूपी मानवाने सारे जग व्यापले ती तीन पावले अशी : काही प्राणी माणसाळता येऊन त्यांचा उपयोग खाद्यान्नासाठी करता येतो हे पहिले; अन्नधान्य निर्मितीसाठी माणूस शेती करायला लागला हे दुसरे; आणि औद्योगिक क्रान्ति हे तिसरे पाऊल होय. ही तीन पावले टाकल्याने दुसऱ्या कोणत्याहि हिंस्र जातीच्या प्राण्यापेक्षा मानव जातीची संख्या जगाच्या पाठीवर कल्पनातीत वाढली आहे. मेंढ्या, गाई या प्राण्यांची संख्या खूप प्रचंड आहे. पण माणसाने ती पाळलेली आहेत हे त्यांच्या प्रचंड संख्येचे कारण आहे. आकाराने मोठा असूनहि कोणत्याहि इतर सस्तन प्राण्याला मानवापुढे टिकाव धरणे अजिबात शक्य नाही. उदाहरणार्थ, राखीव जंगलातील संरक्षित विभाग सोडला तर एके काळी गव्यांचे[४] असलेले प्रचंड कळप आज संपूर्ण नामशेष झाले आहेत.

पुढची उपपत्ति मी काहीशी भीतभीतच मांडीत आहे. वैद्यक शास्त्रातील प्रगतीमुळे लोकसंख्येत होणारी वाढ ही फार तात्कालिक असते; दूरगामी विचार करता, वैद्यक शास्त्रामुळे जागतिक लोकसंख्येत कायमची वाढ घडून येत राहील ही गोष्ट खरी नाही. गांठीच्या प्लेगावर वैद्यक शास्त्रात चौदाव्या शतकात इलाज असता तर गांठीच्या प्लेगाने दोन अडीच कोट माणसे मृत्यूमुखी न पडता चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपची लोकसंख्या तेवढी अधिक राहिली असती हे निर्विवाद.[५] पण प्लेगच्या सांथीत खर्ची झालेली

लोकसंख्या नैसर्गिक प्रक्रियेने लौकरच वाढून माल्थसच्या सिद्धांताप्रमाणे[६] उपलब्ध अन्नधान्य आणि लोकसंख्या यांचा अगदी प्राथमिक दारिद्र्याच्या पातळीवरील समतोल परत प्रस्थापित झाला. युरोपियन आणि अमेरिकन मिशनऱ्यांच्या कामामुळे चीनमध्ये अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण घटते. पण पुढे हीच मुले वयाच्या पांचव्यासहाव्या वर्षी दुष्काळात अन्नान्न दशा होऊन मरतात. अशा परिस्थितींत मिशनऱ्यांच्या वैद्यकीय सेवेने चिनी लोकांना लाभ होतो असे म्हणणे कठीणच. जननप्रमाणच कमी आहे असे देश सोडले तर अन्यत्र अन्नधान्याच्या पुरवठ्यावरच लोकसंख्या किती राहणार ते अंतिमतः अवलंबून असते. दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीने या वस्तुस्थितीत फरक पडत नाही. पाश्चिमात्य जगात जननप्रमाण घटल्यामुळे माल्थसचा लोकसंख्येबाबतचा सिद्धांत तात्पुरता खोटा ठरला आहे खरे. पण परवापरवापर्यंत माल्थसचा सिद्धांत साऱ्या जगाला लागू पडत होता आणि आजहि दाट लोकसंख्येच्या पौर्वात्य देशांना तो पूर्वीइतकाच लागू पडतो.

लोकसंख्येच्या वाढीला विज्ञानाने कसा हातभार लावला आहे ? कृत्रिम खते, यंत्रसामुग्री आणि सुधारलेले बी बियाणे व जनावरांच्या जाती यांच्याद्वारा दर एकरी उत्पादन वाढले; तसेच मानवी श्रमांची उत्पादकताहि वाढली. हा अन्नधान्याच्या उत्पादनाच्या बाबतीत घडून आलेला प्रत्यक्ष परिणाम आहे. पण विज्ञानाने घडून आलेला दुसरा एक परिणाम अधिक महत्त्वाचा, निदान आजतरी, आहे. दळणवळणाच्या साधनात झालेल्या सुधारणांमुळे एका प्रदेशात औद्योगिक उत्पादनावर तर दुसऱ्या प्रदेशात शेती उत्पादनावर सर्व शक्ति केंद्रित करणे आज शक्य झाले आहे. अन्नधान्य उत्पादनाच्या कुवतीपेक्षा अधिक लोकसंख्या एखाद्या प्रदेशात पोसणे ही गोष्ट यामुळे शक्य होत आहे. या बाबतीत इंग्लंडचे उदाहरण ठळकपणे लक्षात येण्यासारखे आहे. माणसे आणि वस्तू यांची देवाणघेवाण सर्व जगभर खुली आहे असे गृहीत धरल्यास, साऱ्या जगभर मिळून सबंध जगाला पुरेल इतके अन्नधान्य पिकवावे एवढीच आवश्यकता मग उरते. अपुऱ्या धान्योत्पादनाच्या प्रदेशांजवळ, अन्नधान्याच्या बदल्यात देता येतील, आणि गरजेपेक्षा अधिक धान्योत्पादन करणाऱ्या प्रदेशांत हव्या असलेल्या, अशा वस्तू असतील ही एक शर्त वरील विधानास जोडलेली राहील. पण दुष्काळी

काळात ही शर्त पाळली जाणार नाही अशी शक्यता उरते. पहिल्या महायुद्धानंतर रशियन शेतकऱ्याजवळ जेमतेम त्याला पुरेल इतके अन्नधान्य होते. कोणत्याहि शहरी वस्तूंच्या मोबदल्यात आपल्याजवळील अन्नधान्याची देवाणघेवाण करायला, रशियन शेतकरी मुळीच तयार होईना. त्यावेळी, आणि एकोणिसशे तिशीतल्या दुष्काळी वर्षामध्येहि, लष्कराच्या जोरावर बळजबरीने शेतकऱ्यांकडून धान्यवसूली केली म्हणूनच शहरी लोकसंख्येला जिवंत ठेवणें रशियन सरकारला शक्य झाले. या सरकारी कारवाईमुळे दुष्काळात लाखो शेतकरी उपासमारीने मेले. पण सरकारने हस्तक्षेप केला नसता तर शेतकऱ्यांऐवजी शहरवासीयांवर मरणाची पाळी आली असती.

अशा घटनातून सूचित होणाऱ्या बोधाकडे फार वेळा दुर्लक्ष होते असे मला वाटते. शेतीच्या गरजा भागविणारे औद्योगिक उत्पादन सोडले तर बाकीचे सारे उद्योगधंदे ही शेवटी एक चैन आहे. कडक दुष्काळाच्या दिवसात कारखान्यातून निर्माण होणाऱ्या वस्तूंना कोणी विचारीत नाही आणि शेतकऱ्यांवर जुलूम जबरदस्ती करूनच औद्योगिक कामगारांना जिवंत ठेवता येते; ही गोष्टहि मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचे उपासमारीला बलिदान दिल्यानेच शक्य होऊ शकते. असे दुष्काळ वारंवार पडू लागले तर उद्योगधंद्यांचा ऱ्हास होईल, आणि गेल्या दीडशे वर्षांच्या समाजाचे जे वैशिष्ट्य त्या औद्योगिकरणावर जबरदस्त आघात होईल, हा बोध यापासून घेण्याची आवश्यकता आहे.

असे दुष्काळ क्वचितच पडतात आणि या अपवादभूत समस्येवर त्या त्या वेळी काही विशेष उपाययोजनाहि केली जाऊ शकते असे तुम्ही म्हणाल. औद्योगिक क्रांतीच्या प्रथमोत्कर्षाच्या काळाबाबत हे विधान बरेचसे खरेहि आहे. तथापि, लोकसंख्येच्या वाढीत प्रचंड प्रमाणांत घट वाढून आल्याशिवाय भविष्यात हे विधान लागू होणार नाही. सध्या जागतिक लोकसंख्येत दिवसाला अठ्ठावन्न हजारांची भर पडत आहे. युद्धामुळे या वाढीवर विशेष परिणाम घडून आल्याचे दिसत नाही, कारण दोन्ही महायुद्धांच्या काळातहि लोकसंख्येत याच प्रमाणात वाढ होत होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत लोकसंख्येतील ही वाढ औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रामध्ये अधिक वेगाने

घडून आली. पण त्यानंतरच्या काळातील वाढ ही बव्हंशी अतिशय दरिद्री देशांमध्ये केंद्रित झालेली आहे. याबाबतीत संख्येच्या दृष्टीने चीन आणि भारत हे दोन देश सगळ्यात महत्त्वाचे असून जागतिक राजकारणाच्या दृष्टीने वाढत्या लोकसंख्येचा रशिया महत्त्वाचा आहे. जागतिक राजकारण बाजूला ठेवून तूर्त जीवशास्त्राशी संबंधित मुद्देच तेवढे विचारात घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

लोकसंख्येच्या अनिर्बंध वाढीचा अटळ परिणाम काय होईल ? आजच्या संपन्न देशांमधील जीवनमान एकूणच खूप खालावेल. जीवनमान खालावल्यामुळे औद्योगिक वस्तूंना असलेल्या मागणीत खूप घट होईल. खाजगी मोटारींचे उत्पादन थांबवून कारखान्यामधून फक्त ट्रकचेच उत्पादन चालू ठेवावे लागेल. पुस्तके, घड्याळे, संगीत वाद्ये, इत्यादि वस्तू यांचे उत्पादन इतके कमी होईल की समाजातील मुटभर अतिशय उच्चपदस्य सत्ताधीशांनाच, विशेषत: सैन्यदले व गुप्त सुरक्षादले अधिकारात असणाऱ्यांनाच, या गोष्टी वापरण्याची चैन करता येईल. अखेर सर्व जगात सर्वांनाच अत्यंत विपन्नावस्था प्राप्त होईल आणि माल्थसचा सिद्धांत जगावर निरंकुश अंमल गाजवू लागेल. ( व्यवहाराच्या दृष्टीने सगळे जग हे एकच बनल्याने ) उत्तम पिके येऊन जगात धान्याची लयलूट झाली म्हणजे लोकसंख्येत वाढ होईल, आणि दुष्काळ पडला म्हणजे उपासमारीने मृत्यू येऊन लोकसंख्येत घट होईल. आजची बहुसंख्य औद्योगिक आणि नागर केंद्रे लयास जातील. जगले वाचलेले त्यातील रहिवासी आपल्या मध्ययुगीन पूर्वजांप्रमाणे शेतकऱ्यांचे खडतर जीवन पूर्ववत् जगू लागतील. या जागतिक समाजाला एक नवी ' स्थिरता ' लाभेल; पण माणसाच्या आयुष्याला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या सर्व कमाईची किंमत देऊन विकत घेतलेले हे स्थैर्य असेल.

माणसाची अवनति होत असलेली उघड्या डोळ्यांनी पहावी इतके महत्त्व जगात राहणाऱ्या माणसांच्या निव्वळ संख्येला खासच नाही. मग या गोष्टीवर इलाज काय ? काही खोलवर रुजलेले पूर्वग्रह सोडण्याची मनाची तयारी असेल तर उपाययोजना स्पष्ट आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये ज्या पद्धतींनी लोकसंख्येच्या वाढीला आळा बसला आहे त्या संततिनियमनाच्या पद्धतींचा

प्रसार झपाट्याने लोकसंख्येत वाढ होणाऱ्या देशात केला पाहिजे. सरकारने हा कार्यक्रम उचलून धरला तर एका पिढीच्या अवधीत लोकशिक्षणात्मक प्रचाराद्वारे प्रयत्नपूर्वक हा परिणाम साधण्यात यश मिळेल. दोन जबरदस्त प्रवृत्तींचा मात्र या धोरणाला सक्त विरोध असतो; धर्म आणि राष्ट्रवाद या त्या दोन प्रवृत्ति होत. कटू सत्यहि जे पचवू शकतात अशांनी ओळखायला हवे की, संततिनियमनाच्या प्रसाराला विरोधी असलेल्या प्रवृत्तींचा जय झाला तर, सुमारे पन्नासएक वर्षांच्या आतच, सारी मानवजात भयंकर दारिद्य आणि अवनतीच्या गर्तेत लोटली जाणार आहे. ज्यांना हे कळते त्यांनी आपली सर्व शक्ति पणाला लावून या कटू सत्याचे अंजन लोकांच्या डोळ्यात घालावे हे त्यांचे कर्तव्य ठरते.

लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याचा संततिनियमन हा एकमेव मार्ग आहे असा दावा मी करीत नाही. संततिनियमनास विरोध असलेल्यांना लोकसंख्येला रोक लावण्याचे इतर मार्ग अधिक पसंत आहेत असे मानणे भाग आहे. वर म्हटल्याप्रमाणे, या बाबतीतली युद्धाची आजवरची कामगिरी निराशजनक आहे; पण रोगजंतूंच्या सहाय्याने खेळले जाणारे युद्ध कदाचित् या दिशेने अधिक समाधानकारक परिणाम दाखविल. दर वीस वर्षांनी चौदाव्या शतकातील युरोपमधील प्लेगच्या सांथीसारखी कोट्यावधी लोक स्वाहा करणारी रोगाची सांथ जगभर फैलावता आली तर, मग त्यातून वांचणाऱ्या भाग्यवान लोकांनी इच्छेला येईल तितके प्रजोत्पादन केले तरी जगाची लोकसंख्या फाजील होण्याचा संभव उरणार नाही. धार्मिकाची श्रद्धा किंवा राष्ट्रवाद्यांची महत्त्वाकांक्षा अशा प्रकारची उपाययोजना अंगिकारण्याच्या काही आड येणार नाही. आता, दर वीस वर्षांनी साथीच्या रोगात कोट्यावधि माणसे मरायची म्हणजे तसे दुःखकारकच; पण त्याचे काय होय ? उच्च विचारसरणीच्या निष्ठावंत लोकांना पुष्कळ वेळा सौख्याची पर्वा नसते, विशेषतः इतरांच्या सुखाची तर नाहीच नाही. असो. लोकसंख्या स्थिर राखण्याचा मूळ विषय सोडून हे विषयांतर झाले.

लोकसंख्येच्या बाबतीत स्थिर पातळी कायम टिकविणारी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे तीन मार्ग आहेत. संततिनियमन हा पहिला, भ्रूणहत्या

किंवा प्रचंड प्राणहानि होणारी युद्धे हा दुसरा, आणि मुठभर सत्ताधीश अल्पसंख्य सोडून इतरांनी अपार दारिद्र्यांत व विपन्नावस्थेत राहणे हा तिसरा, असे तीन मार्ग आहेत. हे तीनहि मार्ग चोखाळले गेलेले आहेत. ऑस्ट्रेलियातील आदिवासी जमातींनी पहिल्या मार्गाचा अवलंब केलेला आढळतो; प्राचीन ग्रीसमधील स्पार्टन समाजात, ॲझटेक जमातीत, आणि प्लेटोच्या ' रिपब्लिक 'मध्ये दुसऱ्या मार्गाचा पुरस्कार केलेला होता; तिसरा मार्ग सोव्हिएट रशियात चोखाळलेला असून कांही पाश्चिमात्य विश्वराज्यवादी भावी विश्वराज्याचे जे चित्र रंगवितात ते या मार्गाशी फार जुळते आहे. ( भारतीय वा चिनी लोकांना उपासमार आवडते असा याचा अर्थ करायचा नाही; या मंडळींच्या कल्पनेप्रमाणे पाश्चिमात्यांच्या लष्करी बळापुढे बिचाऱ्यांना आपल्या नशिबातला भोग स्वीकारावाच लागेल. ) बहुसंख्य लोकांना क्लेश वा दुःख न देता लोकसंख्येवर बंधन घालण्याचा संततिनियमन हा एकच मार्ग आहे. विश्वराज्य प्रस्थापित होत नाही तोवर, दरम्यानच्या काळात, वेगवेगळ्या राष्ट्रात जागतिक वर्चस्वासाठी सत्तास्पर्धा झुंपणार. वाढत्या लोकसंख्येमुळे दुष्काळाचे संकट भेडसावू लागेल तसे जागतिक प्रभुत्व हाच उपासमार टाळण्याचा राष्ट्रवाद्यांच्या हातातील एकमात्र उपाय ठरेल. तेव्हा मग भुकेलेली राष्ट्रे एकत्र येऊन साऱ्या सधन राष्ट्रांविरुद्ध आपला एक गट निर्माण करतील. चीनमधील कम्युनिझमच्या यशाचे रहस्य सधन विरुद्ध निर्धन या संघर्षात आहे.

विश्वराज्याच्या प्रस्थापनेखेरीज विज्ञानप्रणीत जागतिक समाज स्थिर वा टिकावू ठरणार नाही ही गोष्ट वरील विवेचनावरून सिद्ध होते.

हा निष्कर्ष अर्धवट विचारातून घाईघाईने काढलेला आहे असे म्हणता येईल. वरील विवेचनाच्या मर्यादेत निष्पन्न होणारा निष्कर्ष एवढाच की, संततिनियमनाचा जगभर अंगिकार करण्यास भाग पाडणारे विश्वराज्य अस्तित्वात नसले तर मधून मधून युद्धे होत राहतील. या युद्धात पराभूत होणाऱ्यांना पराभवाची किंमत उपासमारीने मरण्यात चुकवावी लागेल. आज जगाचा व्यवहार याच गृहीत कृत्यावर आधारलेला आहे. भविष्यातहि शेकडो वर्षे याच पद्धतीने जगाचे व्यवहार चालत राहण्यास काय आडकाठी

आहे असे काही जण विचारतील. पण या मार्गाने जग फार काळपर्यंत निर्वेधपणे टिकून राहील असे मला स्वतःला वाटत नाही. गेल्या दोन महायुद्धांमुळे जगातल्या पुष्कळ प्रदेशातून संस्कृतीची पातळी खालावली आहे. भविष्यात महायुद्ध झाले तर संस्कृतीचा ऱ्हास अधिक मोठ्या प्रमाणावर घडून येईल यात शंका नाही. कधी तरी या नित्याच्या संघर्षातून एक राष्ट्र किंवा राष्ट्रगट अत्यंत बलाढ्य बनून सर्व जगावर आपले एकतंत्री लष्करी प्रभुत्व प्रस्थापित करून जगाचे एकच राज्य बनवील तर ठीक; एरवी संस्कृतीचा ऱ्हास होत होत युद्धातील विध्वंसामुळे वैज्ञानिक तंत्रच नाहीसे होईल; जगात विज्ञान हीच चीज मुळी रहायची नाही. पुन्हा एकदा माणसाच्या हाती धनुष्यबाण येईल. मग माणसाला सुटकेचा निश्वास सोडता येईल आणि, अर्थात्, संस्कृतीची तीच बिकट चढण चढायला तो परत सुरवात करू शकेल.

लोकसंख्येच्या प्रश्नावर मानवी मूल्यांची कदर बाळगून इलाज करावयाचा असेल तर विश्वराज्याची आवश्यकता आहे हे डार्विनच्या सिद्धान्ताचे परिशीलन केल्याने देखील स्पष्ट होईल. दोन मानवसमूह घेतले तर, ( बाकीची परिस्थिति कायम राहिली असे समजा, ) वाढत्या लोकसंख्येच्या समूहाचे सामर्थ्य स्थिर लोकसंख्येच्या समूहाला कालांतराने डोईजड होणारच. युद्धात विजयी झालेला समूह प्रतिपक्षाच्या अन्नपुरवठ्यात कपात करेल. जित समुहापैकी अनेकांचा यामुळे मृत्यु होईल. लोकसंख्येचा गुणाकार होत असलेल्या राष्ट्रांचा अशाप्रकारे पुनःपुन्हा विजयच होत राहील. सनातन जीवनकलहाचीच ही आधुनिक आवृत्ति ठरणार. सर्वनाश करण्याची वैज्ञानिक तंत्रविद्या हस्तगत केलेल्या जगाने जीवनकलह चालू दिला तर ते जग स्थिर वा टिकाऊ ठरणार नाही.

विज्ञानप्रणीत समाजरचनेच्या अस्थिरतेची मानसशास्त्रीय कारणे भौतिक आणि जीवशास्त्राशी संबंधित कारणांइतकीच महत्वाची आहेत. पण पदार्थविज्ञान किंवा जीवशास्त्र यांच्याइतकी मानसशास्त्राची प्रगति शास्त्र म्हणून झालेली नसल्याने मानसशास्त्रीय कारणांची चर्चा करणे कठीण आहे. तरीपण आपण त्या दिशेने प्रयत्न करू.

जुने बुद्धिवादी मानसशास्त्र मानीत असे की, आपल्या वागणुकीचा परिणाम आत्मनाशात होणार असल्याचे तुम्ही एखाद्या माणसाला बौद्धिक-

दृष्ट्या पटवून देऊ शकलात तर तो आपली वागणूक सुधारेल. नगण्य मुठभर व्यक्ति सोडल्या तर, साधारणपणे, समाजातील सर्वांची जगण्याची आसक्ति दृढ आहे असेहि या मानसशास्त्राचे एक गृहीत कृत्य होते. बहुसंख्य व्यक्ति, कमीअधिक प्रमाणात, पण समंजस, बुद्धिनिष्ठ मार्गांनीच आपला स्वार्थ पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करीत असतात या बेंथॅमप्रणीत उदारमतवादी समजुतीवर पूर्वीइतकी आज जाणत्या माणसांची फारशी श्रद्धा उरलेली नाही. मनोविश्लेषणशास्त्राचा उदय व विकास प्रामुख्याने या स्थित्यंतराच्या बुडाशी आहे. पण व्यापक सामाजिक घटना वा स्थित्यंतरांचे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न आजवर राजकारणी मंडळींपैकी फार कोणी केलेला नाही. माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें असा प्रयत्न मी इथे करणार आहे.

तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने जग वहावत चालले आहे ही घटना माझ्या वरील म्हणण्याचे सर्वांत महत्त्वाचे उदाहरण म्हणून घेता येईल. राजकारणापासून अलिप्त आणि डोके ठिकाणावर असलेल्या समाधानी माणसाशी तुम्ही वरील विषयावर चर्चा करीत आहात अशी कल्पना करा. अण्वस्त्रापासून होणारे अनर्थावह परिणाम, पाश्चिमात्य युरोपवर रशियाची हुकमत प्रस्थापित होण्याने युरोपियन जनता आणि संस्कृति यांच्यावर होणारा भीषण आघात, आणि युद्धाचा निकाल तडकाफडकी लागला तरी त्या अल्पकालीन युद्धामुळेहि जगावर दरिद्री आणि दास्यमय जीवनाचे येणारे संकट, या सर्व गोष्टींची समजा तुम्ही त्या इसमाला सविस्तर माहिती दिलीत. तिसऱ्या महायुद्धाचे परिणाम तुम्ही म्हणता तसे अनर्थावह होतील—हे तो गृहस्थ पूर्णपणे मान्य करतो, त्याला तुमचे म्हणणे सर्व पटते, आणि तरीहि, या प्रश्नासंबंधीची त्याची आत्मसंतुष्ट, उदासीन वृत्ति बदलत नाही. संभाव्य परिणामांचे भयावह चित्र निर्माण केल्याने त्याच्या अंगावर भीतीने शहारे येतात; पण या भीतीच्या संवेदनेने तो जागृत व्हायच्या ऐवजी त्याला उलट त्याचीच मजा वाटते. आण्विक महायुद्धामुळे दैनंदिन जीवन कसकसे विस्कळित होईल ते तुम्ही त्याला सांगता; त्याच्या मनात येते, 'होईल बुवा विस्कळित. पण चला रोज ऑफिसला जायची तर कटकट वांचेल.' आण्विक शस्त्रास्त्रांमुळे लाखोंनी निरपराध माणसे कशी मरतील याचा तपशील

तुम्ही पुरवाल. त्याच्या मनाच्या पृष्ठभागावर या भीषण संहाराच्या कल्पनेने अपेक्षित धक्का बसतो. तो भयभीत होतो. पण कुठे अदृश्य अंतर्मनात एक तार हलकेच छेडली जाते: 'कदाचित् माझी बायकोहि त्यात दगावेल; ते काही तितकेसे वाईट होणार नाही'. या सुखद अंतस्थ प्रतिक्रियेमुळे, अनपेक्षितपणे, आधुनिक काळाशी विसंगत अशा शौर्याचे गुणगान तो करू लागेल, आणि म्हणेल, 'झाले तर झाले युद्ध, वीराचे मरण तर येईल.' त्याच्या असल्या असंबद्ध उत्तराने, तुमच्या संभाषणाचा शेवट, त्याच्याबद्दल तिरस्काराची भावना निर्माण होण्यात होण्याचा संभवच अधिक आहे.

आधुनिक राजकारणाला दोन विकार जडलेले आहेत. दोन विकारांची दोन टोके आहेत. या दोन मानसिक विकारांचा राजकारणावर पडणारा प्रभाव फार मोठा आहे. उन्माद आणि निःसत्व दीनवाणेपणा हे मनाच्या दोन टोकाला असलेले दोन मानसिक विकार आज फार प्रभावी झालेले आहेत. उन्मादाचे मासलेवाईक उदाहरण नाझी अधिकाऱ्यात सांपडते; आणि, युद्धापूर्वी, आणि युद्धकाळात, नाझी जर्मनीपुढें फ्रेंच लोकांनी जी निःसत्त्व दीन वृत्ति धारण केली त्यांत दुसऱ्या विकाराच्या प्रभावाचे उदाहरण सांपडते. कमीअधिक प्रमाणात इतरहि देशात आज या मानसिक रोगाची लागण झालेली असून औद्योगिकरणाबरोबर जीवनात जो सांचेबंदपणा आलेला आहे त्याचा या रोग विकारांच्या प्रसाराशी अत्यंत घनिष्ठ संबंध आहे असे मला वाटते. उन्मादाने पिसाट बनलेली राष्ट्रे स्वतःचाच नाश ओढवून घेणारी पागल कृत्ये करण्यास उद्युक्त होतात. निःसत्त्व दीन राष्ट्रे आपल्यावरील अरिष्टाचा प्रतिकार वेळीच करण्याबाबतीत गाफील राहतात; साधारणपणे कोणतेहि कष्टप्रद, साहसी काम अंगावर घ्यायला अशी राष्ट्रे नाखूष असतात. माणसाची प्रकृति आणि आजची जीवनाची रीत यातील विसंवादातून निर्माण होणाऱ्या हृद्रोगातून निर्माण होणारे हे विकार आहेत.

भौतिक जीवनात घडून येणाऱ्या बदलांची झपाट्याची गति हे या हृद्रोगाचे एक कारण आहे. संस्कृतीच्या प्रथमावस्थेतील जमातींना एकाएकी युरोपियन रीतीरिवाजांच्या संपर्कात आणल्याने, पुष्कळदा, परिचित जीवनक्रमापासून सर्वस्वी भिन्न असलेले जीवन सहन न होऊन, त्या जमातीतील माणसे

मरण पावल्याची उदाहरणे आहेत. १९२१ मध्ये जपानमध्ये असताना ज्यांच्याशी संभाषणाचा प्रसंग पडला त्या लोकांच्या मनावर, तसेच रस्त्यातून दृष्टीस पडणाऱ्या लोकांच्या चेहेऱ्यावर देखील, कायमच एक असह्य ताण असावा असे सारखे मला जाणवत होते. जनमानसात एकाएकी 'हिस्टेरिया' निर्माण होतो तो लोक जेव्हा असेच सतत अनैसर्गिक मानसिक ताणाखाली राहतात तेव्हा. सर्वसामान्य जपानी नागरिकांच्या नेणीवेत खोल, अंतस्थ रुजलेली निःश्रेयसाची कल्पना प्राचीन जपानी संस्कृतीने पुढे ठेवलेल्या आदर्शानुरूपच कायम राहिलेली होती. पण, पृष्ठभागावर, रोजच्या दैनंदिन जीवनात मात्र जपानला प्रतिअमेरिका बनविण्यासाठी या जपानी नागरिकांची शक्तिवृद्धि राबविली जात होती. नेणीवेत जीवनविषयक असलेली अदृश्य श्रद्धा व कल्पना आणि त्याच्याशी सर्वस्वी विसंगत असलेले दैनंदिन व्यवहार यांच्यातील विसंवादातून जपानी लोकांच्या मनावरील असह्य मानसिक ताण निर्माण होत असावा असे मला वाटले. जाणीव आणि नेणीव यांच्या विसंवादी ताणातून त्या व्यक्तीच्या मनात क्षोभ तरी निर्माण होणार किंवा विफलता तरी येणार. यापैकी कोणते वळण विशिष्ट व्यक्ति घेईल हे त्या व्यक्तीच्या प्रकृतीवर अवलंबून राहील. औद्योगिकरणाच्या झपाट्यानेहि लोकमानसात असाच विसंवादी ताण निर्माण होतो. सोव्हिएट रशियात हा ताण फार प्रचंड राहिला असावा.

औद्योगिकरणाची प्रक्रिया जिथे स्थिर व जुनी झालेली आहे त्या इंग्लंडसारख्या देशातहि, बदल इतके जलद गतीने घडून येत आहेत की, बदलत्या जीवनाशी मानसिक जुळणी करून घेणे ही गोष्ट कठीण बनलेली आहे. माझ्या आयुष्याचेच उदाहरण घ्या. माझ्या लहानपणी टेलिफोन नवा नवा प्रचारात आला होता. त्यावेळी टेलिफोन असणे ही फार दुर्मिळ बाब होती. अमेरिकेच्या पहिल्या भेटीत माझ्या तेथील संपूर्ण वास्तव्यात मला एक म्हणून मोटारगाडी दिसली नाही. वयाच्या एकोणचाळीसाव्या वर्षी मी प्रथम विमान पाहिले. माझ्या तरुणपणीचे जीवन आणि नभोवाणी व चित्रपट अस्तित्वात आल्यानंतरच्या काळातील तरुणांचे जीवन यात कुठेच साम्य नाही. सार्वजनिक जीवनाचे म्हणाल तर, मला राजकारण कळू लागले त्यावेळी अजूनहि व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीतील पुराणप्रिय, आत्म-

संतुष्ट संस्कृतीच्या भारदस्त रंगमंचावर ग्लॅडस्टन[८] व डिझरायली[९] परस्परांशी झुंज घेत होते; ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधी मावळेल हा विचार शिवत नव्हता; सातासमुद्रावरील ब्रिटिश आरमारी वर्चस्वाला आव्हान देण्याची कोणाची शामत होईल ही कल्पनाहि करवत नव्हती. इंग्लंड हा एक श्रीमंत, अमीर-उमरावांचा देश होता व त्यांच्या संपत्तीत सतत भर पडत होती; आणि, समाजवादाच्या विचाराकडे काही संशयास्पद असंतुष्ट व्यक्तींनी काढलेले खूळ म्हणून त्यावेळी पाहिले जात होते.

अण्वस्त्रे,अमेरिकेचे सार्वभौम नेतृत्व आणि कम्युनिस्टांचे प्राबल्य असलेल्या या जगांत माझ्यासारख्या वृद्ध माणसाला आपण कोठे तरी अज्ञात जागी आल्याचा भास होतो. पूर्वी अनुभवाने राजकीय मुत्सद्दीपणा प्राप्त होत असे. पण, इतक्या वेगळ्या परिस्थितीत अनुभव घेतल्याने, आजच्या परिस्थितीत योग्य समज प्राप्त करून घ्यायला अनुभवांचा अडथळाच व्हायचा. पूर्वीच्या समाजात वडील-धाऱ्या माणसांबद्दल आदराची भावना असे. कारण वय वाढत जाई तसे दीर्घ अनुभवाने शहाणपण प्राप्त होत असे. आज एका अनुभवातून ग्रहण होणारे ज्ञान उद्याच्या बदललेल्या परिस्थितीत कुचकामी ठरत असल्याने दीर्घानु-भवाने येणारे शहाणपण ही गोष्टच आता अशक्य ठरत आहे. बाह्य जीवनात झपाट्याने परिवर्तन घडवून आणण्यात विज्ञानाने यश मिळविले आहे. पण त्याच प्रमाणात माणसाच्या नेणीवेत आणि अबोध मनात वेगवान परिवर्तन घडवून आणण्याची युक्ति काही विज्ञानाला हस्तगत झालेली नाही. बहुसंख्य माणसांच्या नेणीवेला बालपणी अनुभवलेली परिस्थिति सोडून इतर कोणत्याहि परिस्थितीत आत्मविश्वास वाटत नाही.

मानसिक अस्वस्थतेच्या बुडाशी वेगवान परिवर्तन हे काही एकच कारण आहे असे नाही. आजवरचा अनुभव असा आहे की विज्ञानप्रणीत समाजात संघटनेच्या पुढे व्यक्तीला दुय्यम स्थान पत्करणे अटळ होऊन बसते. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर वाढत जाणारे संघटनेचे दास्यत्व हे मानसिक अस्वस्थतेचे दुसरे, आणि कदाचित अधिक बलवान, कारण आहे. महागड्या यंत्रसामग्रीचा वापर करून अनेक कामगारांच्या संयुक्त व सुसंयोजित श्रमातून वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यात, अधिकारी-व्यवस्थापक वर्ग सोडून,

बाकीच्या कामगारांच्या वैयक्तिक प्रेरणांवर संपूर्ण नियंत्रण असणे आवश्यकच आहे. कामावर असता वैयक्तिक साहसाला व आळशीपणाला वाव असण्याची सोय नाही. नोकरीचा वेळ सोडून इतर वेळातहि बहुतेकांना आपल्या वैयक्तिक प्रेरणांचे समाधान करण्याची संधी नसते. घरापासून कामाची जागा दूर असल्याने असे करण्यात बराचसा वेळ जातो. दिवसाच्या शेवटी काही विशेष करावे याकरता पैसा वा उत्साह काहीच शिल्लक उरत नाही. कारखान्यातून काम करणाऱ्या कामगारांची अवस्थाच, थोड्याबहुत फरकाने, सुसंघटित आधुनिक समाजातील सर्वसाधारण सर्व माणसांची आहे. तारुण्याची उभारी संपत येते तोवर, बहुतेक जणांना, आपली अवस्था घाण्याच्या बैलासारखी झाल्याचे लक्षात येते. मग यात जे चळवळे असतात ते बंडखोर बनतात; जे गरीब स्वभावाचे असतात ते निःसत्त्व दीन बनतात. अशा अवस्थेत युद्ध सुरू झाले तर कंटाळवाण्या चाकोरीमय आयुष्यातून सुटण्याची लोकांना ती एक संधी वाटते. ‘ युद्धकाळापेक्षा आज तुम्ही अधिक समाधानी आहात का कमी ? ’ या प्रश्नावर लोकमत अजमावणारे चांचणी लोकमत घ्यावे असे मला वाटते. स्त्रियांना आणि पुरुषांना दोघांनाहि हा प्रश्न विचारा. युद्धकाळापेक्षा आजच्या जीवनात कमी समाधान वाटणाऱ्यांची संख्या फार मोठी निघेल असा माझा तर्क आहे.

लोकांच्या या मनोवस्थेतून सूचित होणाऱ्या गंभीर मानसशास्त्रीय समस्येकडे राजकारणी मुत्सद्यांचे दुर्लक्ष होत आहे. लोकांना जर शांततेच्या काळात मानसिक समाधान लाभणार नसेल, ती शांतता टिकवायला जर लोक उत्सुक नसतील, तर शांततेच्या संरक्षणासाठी वेगवेगळ्या योजना बनविणे निष्फळ ठरणार आहे. युद्ध व्हावे अशी आपली सुप्त इच्छा असल्याचे लोकांना माहितहि नसते आणि उघडपणे ही गोष्ट ते मान्यहि करणार नाहीत. परिणाम असा होईल की, प्रकट स्वीकृत उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने अव्यवहार्य अशा अवास्तव महत्त्वाकांक्षी योजनांचा पाठपुरावा करण्यास त्यांचे नेणीव मन त्यांना प्रवृत्त करेल, ज्या योगे युद्ध व्हावे ही सुप्त इच्छा सफल होईल.

आधुनिक समाजाशी संघटना सजीवसदृश अत्यंत एकजीव होत चालल्याने औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीच्या मानाने आज दरएक व्यक्तीचे इतर सर्व

व्यक्तींवरील परावलंबन पराकोटीला जाऊन पोचत आहे. या परस्परावलंबित्वामुळे व्यक्तीच्या स्वयंकर्तृत्वाचा प्रश्न बिकट होऊन बसला आहे. जितके परस्परावलंबन जास्त तितके वैयक्तिक प्रेरणांना खुला वाव देणे दुरापास्त होऊन बसते. पण एका मर्यादेपलिकडे तुम्ही व्यक्तीच्या प्रेरणांना दडपून ठेवण्याचा प्रयत्न केलात तर त्यातून बेबंद बंडखोरी, विध्वंसक व क्रूर कृत्ये यांना चालना मिळते. तेव्हा, रोजच्या जीवनातील कांचणाऱ्या बंधनामुळे, एक दिवस प्रक्षुब्ध होऊन जनतेने फार कष्टाने संपादित केलेली संस्कृति नष्ट करू नये असे वाटत असेल तर स्वतःचे व्यक्तिमत्त्व प्रकट करायला आधुनिक जगातील बहुसंख्य व्यक्तींना आज आहे त्यापेक्षा अधिक वाव मिळायला हवा. ज्या समाजात यशस्वी राज्यक्रांतीचा धोका कायम राहतो, आणि ज्या समाजात सत्ताधिकारी वर्ग समाधानी नसतो, असा समाज स्थिर वा टिकाऊ असू शकणार नाही. दुसऱ्या बाजूने विचार करता हेहि खरे की, कैसर[१०] किंवा हिटलर यांच्यासारखे अविचारी साहस करणारे सत्ताधारी समाजांत असले तर, वरील दोन शर्ती पुऱ्या होऊनहि, तो समाज टिकणार नाही. इकडे साहसशून्यतेचा आड आणि तिकडे अविचारी साहसाची विहीर अशा स्थितीतून मार्ग कसा काढायचा हा प्रश्न आहे. मार्ग काढणे ही गोष्ट सोपी नाही. समाजात साहसाला प्रोत्साहन जरूर असावे; पण विध्वंसक मनोविकारातून प्रेरणा घेणाऱ्या अविचारी साहसाला समाजात थारा असता उपयोगीं नाही.

विज्ञानप्रणीत समाज स्थिर व टिकाऊ ठरण्यासाठी कोणत्या शर्ती पुऱ्या व्हायला हव्यात त्याचे तीन गटात विभागून आपण विवेचन केले. शेवटी ज्या निष्कर्षांवर आपण येऊन पोचलो ते संकलित रूपाने मांडू.

भौतिक सृष्टीशी संबंधित शर्ती प्रथमतः आपण पाहिल्या. त्या अशा : शेतजमीन आणि इतर कच्च्या मालांचा वापर फार जलदगतीनें होता कामा नये. विज्ञानाच्या साहाय्याने लागणाऱ्या नव्या शोधामुळे व नव्या तंत्रामुळे घट ज्या वेगाने भरून येत राहील त्याचवेगाने साधनसंपत्तीचा खर्च होऊन, जुन्या संपत्तीचा वापर व नव्या संपत्तीची निर्मिति यात समतोल राखला जाईल अशी दक्षता घेतली पाहिजे. अशा रीतीने आजची राहणीमानाची

संपन्न पातळी टिकविण्यासाठीहि विज्ञानाची सतत प्रगति होत राहिली पाहिजे. केवळ सामाजिक विकासच वैज्ञानिक प्रगतीवर अवलंबून आहे असे नव्हे; तंत्रविद्या एकाच जागी स्थिर राहिली तर तंत्रविद्येच्या गरजा भागविण्याच्या क्रियेत पाहता पाहता नैसर्गिक साधनसंपत्तीचा सांठा संपून जाईल. तसेच, साधनसंपत्तीचा साठा झटकन संपू नये असे वाटत असेल तर, साधनसंपत्ति हस्तगत करण्यासाठी चाललेली खुली अनिर्बंध स्पर्धा थांबविली पाहिजे; औद्योगिक भरभराट कायम राखण्याकरता आवश्यक तेवढ्या प्रमाणात कच्च्या मालाचे पुरवठा-वांटप आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत होईल अशी व्यवस्था होणे आवश्यक आहे. शेतजमीन धुपून नापीक व्हावयाची नसेल तर इतर साधनसंपत्तीप्रमाणेच तिचीहि जपणूक करावी लागेल.

दुसरा मुद्दा लोकसंख्येबाबतचा आहे. जगात कायम व सतत वाढता अन्नतुटवडा राहावयाचा नसेल तर शेतजमिनीचा कस कायम राखणाऱ्या पद्धतींनीच शेती करण्याचा आग्रह राखला पाहिजे. तसेच, तंत्रविद्यात्मक सुधारणांमुळे अन्नोत्पादन वाढते राहील त्याप्रमाणातच लोकसंख्येत वाढ होईल, भरमसाट वाढ होत राहाणार नाही, अशी खबरदारी घ्यावी लागेल. आज यापैकी कोणतीच शर्त पूर्ण होत नाही. जगाची लोकसंख्या वाढत आहे. अन्नोत्पादकाची शक्ति मात्र घटत आहे. याच दिशेने वाटचाल होत राहिली तर फार काळपर्यंत प्रलय आपण टाळू शकणार नाही.

जागतिक लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढल्यासच वरील समस्या सोडविता येईल. युद्ध, रोगराई व दुष्काळ हे इलाज टाळून हा प्रश्न सोडवावयाचा असेल तर सामर्थ्यशाली जागतिक अधिसत्ता प्रस्थापित करावी लागेल. अशा जागतिक सरकारने, आपल्या प्रस्थापनेच्या वेळीच, जगातील वेगवेगळ्या राष्ट्रांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात उपलब्ध अन्नपुरवठ्याचे वांटप निश्चित करून द्यावे. त्यानंतरच्या काळात जर एखाद्या राष्ट्राची लोकसंख्या वाढली तर त्या राष्ट्राला त्या सबबीवर आपला अन्नधान्याचा कोटा वाढवून मिळू नये. असा नियम केला म्हणजे लोकसंख्या स्थिर राखण्यासाठी आवश्यक ते दडपण निर्माण होईल. लोक-

संख्येत वाढ होऊ नये यासाठी काय उपाययोजना करावयाची ते ठरविण्याचा अधिकार ज्या त्या राष्ट्राला असावा.

ही उपाययोजना तर्कशुद्ध असली तरी आजच्या जागतिक परिस्थितीत व्यवहार्य ठरणारी नाही. जागतिक सरकार प्रस्थापित करणेच मुळात एक अत्यंत अवघड काम आहे; त्यातच जर प्रारंभीच्या काळात अशी अप्रिय धोरणे लादण्याचा जबाबदारी जागतिक सरकारने उचलायची म्हटले तर, जागतिक सरकार कधी अस्तित्वातच यावयाचे नाही. दोन परस्पर विरोधी अडचणी इथे उद्भवतात. आज जर उपलब्ध अन्न पुरवठ्याचे सामान वाटप केले तर, पाश्चिमात्य राष्ट्रांच्या नजरेत, त्यांची उपासमार होईल. इतके कमी अन्न त्या राष्ट्रांच्या वाट्याला येईल. दुसरीकडे एकदा ठरलेला कोटा बदलणार नसेल तर त्यामुळे दरिद्री राष्ट्रांचे फार हाल होतील, कारण याच देशांची लोकसंख्या आज झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे गरीब राष्ट्रे आणि सधन पाश्चिमात्य राष्ट्रे दोघेहि तर्कशुद्ध उपाययोजनेला विरोध करतील.

दूरदृष्टीने विचार करता, लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न कालांतराने विनासायास सुटणे अशक्य नाही. सधन पाश्चिमात्य राष्ट्रात जननाचे प्रमाण फार कमी आहे; इतके की, जेमतेम त्यांची लोकसंख्या स्थिर राहू शकते, कमी होत नाही. इतर राष्ट्रे जर पाश्चिमात्य राष्ट्रांइतकी उद्योगप्रधान व संपन्न झाली तर त्याही देशातून जननाचे प्रमाण घटेल आणि मग हा प्रश्न सहजी आटोक्यात येऊ शकेल. रशिया, चीन आणि भारत ही तीन राष्ट्रे आज गरीब आहेत; या तीन देशांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. अमेरिकेतील आजच्या सुबत्ते इतकी सुबत्ता जर या राष्ट्रात सार्वत्रिक निर्माण होऊ शकली तर त्यांच्या फाजील लोकसंख्येचे जगाला भय वाटण्याचे कारण उरणार नाही.

आजच्या अमेरिकेइतकी सुबत्ता सगळ्या जगात जर निर्माण करता आली तर विज्ञानप्रणीत समाजाचे स्थैर्य लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाने बिघडण्याचे भय उरणार नाही. अगोदर लोकसंख्येच्या वाढीला आळा न घालता प्रथम इतकी समृद्धि कशी निर्माण करावयाची ही खरी अडचण आहे. एखादा प्रलयंकारी उत्पात घडून आल्याखेरीज आजच्या परि-

स्थितीत ही गोष्ट घडून येणारी नाही. तेव्हा, आशियाई देशातील सरकारांनी नेटाने मोठ्या प्रमाणावर प्रचार केला तरच या देशातील लोकांच्या प्रजोत्पादनाशी संबंधित संवयी बदलतील आणि लोकसंख्येला आळा घालता येण्याची शक्यता निर्माण होईल. पण युद्धात पराभूत झाल्याखेरीज असे संततिनियमनाचा पुरस्कार करणारे सार्वत्रिक आंदोलन करण्यास आशियातील सरकार राजीखुषीने तयार होणार नाही. आणि, संततिनियमनाचा अंगिकार न करताच आशियाई राष्ट्रांना संपन्न व्हावयाचे असेल तर, पाश्चिमात्य राष्ट्रांचा पराभव करून, पाश्चिमात्य देशातील बहुसंख्य लोकांची कत्तल करून, त्यांचे देश आशियाई लोकांना वस्तीला खुले करावे लागतील. पाश्चिमात्य राष्ट्रांना ही कल्पना स्वागतार्ह खचितच वाटणार नाहीं. पण प्रत्यक्षात असे काही घडणे अशक्य नाही. या प्रश्नात अविचारी विकार आणि श्रद्धा इतक्या गुंतलेल्या आहेत की, उच्च शिक्षित लोकांपैकीहि अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतके लोकच काय ते या सर्व प्रश्नाचा बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनातून विचार करण्यास तयार आहेत. भविष्याबद्दल निराशाजनक निदान करण्यामागचे मुख्य कारण हे आहे.

शेवटी, स्थैर्याशी निगडित मानसशास्त्रीय शर्तींचा विचार करीत असतानाही असे आढळते की, आर्थिक संपन्नतेची उच्च पातळी ही इथेही आवश्यक आहे. जीवनमान चांगले संपन्न असले तर दीर्घकालीन भर पगारी सुट्ट्या देता येतील. पूर्वी, आंतरराष्ट्रीय चलन निर्बंध नव्हते त्या दिवसात, प्राध्यापक आणि शिक्षक मंडळी आल्प्स पर्वतांवर गिर्यारोहणात जीव धोक्यात घालून साहसाचा आनंद मिळवीत. अशा प्रकारे त्यांचे जीवन त्यांना सुसह्य होत असे. जगात शांतता नांदत असली, सीमित लोकसंख्या असली, आणि उत्पादनासाठी वैज्ञानिक तंत्रविद्येचे साहाय्य असले, तर अशा प्रकारचे सुखाचे साहसी मार्ग सर्वांनाच खुले होण्यास आडकाठी उरणार नाही. त्याचबरोबर, संघराज्य पद्धतीचा विस्तार, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि, इंग्लंडमधील विद्यापीठांना आहे त्यापद्धतीची, स्थानिक संस्थांना स्वायत्तता या तीन सुधारणाहि घडून येणे आवश्यक आहे. 'अधिसत्ता व व्यक्ति' या विषयावरील माझ्या बी. बी. सी. रीथ व्याख्यानमालेत या विषयाची सांगोपांग चर्चा केली असल्याने इथे मी या विषयाच्या खोलात शिरत नाही.

काही शर्ती पुऱ्या झाल्यास विज्ञानाप्रणीत समाजरचना स्थिर व टिकाऊ असू शकते या निष्कर्षाप्रत आपण येतो. सैन्यदले व शस्त्रास्त्रे यांच्यावर मक्तेदारी असलेले, आणि म्हणून जगात शांतता सुरक्षित राखू शकणारे, विश्वराज्य जगात स्थापन व्हायला हवे ही पहिली शर्त आहे. सर्व जगात सुबत्तेची एक साधारण समान पातळी अस्तित्वात यावी, ज्यामुळे जगातील एका प्रदेशाला दुसऱ्या प्रदेशांचा हेवा वाटणार नाही, ही आपली दुसरी शर्त आहे. ( दुसरी शर्त पूर्ण झाली असे गृहीत धरून, ) तिसरी शर्त अशी की, जननप्रमाण इतके घटावे की जगाची लोकसंख्या आहे त्या आकड्यावर प्रायः स्थिर राहील. आर्थिक आणि राजकीय व्यवस्था कायम राहण्याची गरज भागवून शक्य होईल तितके सत्तेचे समविभाजन व्हावे; आणि काम व छंद या दोन्ही क्षेत्रात वैयक्तिक स्वयंकर्तृत्वाला वाव असावा; ही आपली चौथी शर्त आहे.

या शर्ती पुऱ्या करायला जगाला अजून पुष्कळ काळ लोटायचा आहे. तेव्हा, जगाला शांति व स्थैर्य लाभण्याआधी दरम्यानच्या काळात आणखी काही प्रलयंकारी उत्पात आणि कल्पनातीत दारुण दुःख यातून आपणास जावे लागेल अशी आपण तयारी ठेवली पाहिजे. आजवर उत्पात आणि दुःख हाच माणसाच्या नशिबातला भोग राहिला आहे. निदान आज, अगदी अंधुक व अनिश्चित का होईना, एक नवे विश्व नजरेच्या टप्प्यात यावे इतपत आपण वाटचाल केलेली आहे. या नव्या जगात युद्ध आणि दारिद्र्य या संकटांचे निवारण झालेले असेल; सर्वनाशाच्या भयापासून माणसाला मुक्ति मिळालेली असेल. खूप चढण चढून आपल्याला जायची आहे पण म्हणून शिखर गाठण्याची आशा सोडावी असे नाही.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप
अनुक्रम ............ विः ......
क्रमांक ........................ नों विः ......

मराठी ग्रंथ ... रा. क्र. ...

## टीपा

१. ईजिप्तमध्ये नाईल नदीला दरवर्षी प्रचंड पूर येतो. या पुराचे पाणी दोन्ही कांठावर मैलोगणति पसरते. या पुराबरोबर येणाऱ्या गाळामुळे नाईलच्या खोऱ्यातील जमिनींची सुपीकता सतत कायम राहते.

२. अमेरिकेतील टेनेसी या मध्य पश्चिम राज्यात विस्तीर्ण कुरणे होती. हा प्रदेश एक सपाट मैदान आहे. हा प्रदेश प्रथम लागवडीला आणला त्यावेळीं तेथील हवामानासंबंधीं माहिती नव्हती. या प्रदेशात वर्षातून काही महिने जोराचे वारे वाहतात. जमिनीच्या पृष्ठभागावरील सुपीक मातीचा थर या वाऱ्यांमुळे धुरळ्यांच्या रूपाने उडून जाऊन हा सर्व प्रदेश फारच थोड्या वर्षांच्या अवधीत एक रेताड वाळवंट बनले.

३. कार्थेजियन लोकांच्या संस्कृतीला फोनिशियन संस्कृति म्हणतात. कार्थेजियन लोकांची भाषा फोनिस, त्यावरून त्यांच्या संस्कृतीला फोनिशियन असे नांव पडले. खिस्तपूर्व सुमारे सातव्या शतकाचा काळ.

४. एक प्रकारचा रानबैल.

५. १३४८–४९ या वर्षी या साथीत युरोपमध्ये अडीच कोटी माणसे मेली. इंग्लंडची निम्मी लोकसंख्या मृत्यूमुखी पडली. आशिया व आफ्रिकेत किती लोक मेले त्याची गणतीच नाही.

६. पान २८ वरील ५५ क्रमांकाची टीप पहा.

७. स्पार्टा हे प्राचीन ग्रीसमधील एक शहर राज्य. या राज्यात नवजात बालकाला उघड्यावरच विवस्त्र स्थितीत डोंगरावर ठेवण्यांत येई. या कसोटीत जे जिवंत राहतील त्यांचेच पालनपोषण करण्यात येई.

८. (१८०९–१८९५) उदारमतवादी. इंग्लंडचा चार वेळा पंतप्रधान होता.

९. (१८०४–८१) कॉन्झर्व्हेटिव्ह पुढारी. दोनदा पंतप्रधान झाला. ग्लॅडस्टन व डिझरायली हे एकाच काळातील प्रतिस्पर्धी राजकारणी होते.

१०. पहिल्या महायुद्धाचे वेळचा जर्मन राजा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ... अनुक्रम ... 30.8.1.7 वि. निबंध...
नों. दि. 20/2/65

REFBK-0013726